मूल्य रु. १५०/-

# गुरु महिमा २०१९ गाणगापुर विशेषांक

## श्रीभालचंद्र महाराज उपासना मठ, गाणगापुर

रौप्य महोत्सव




सद्‌गुरु श्री भालचंद्र महाराज

भालचंद्र महाराज उपासना मठ

भालचंद्र महाराज उपासना मठ

२५

अभिमानाची, परिश्रमाची, विकासाची

रौप्य महोत्सवी वर्ष

श्रीक्षेत्र देवल गाणगापुर


सद्गुरु श्री भाऊ महाराज

# संपादकीय

आजचे युग हे वैज्ञानिक युग मानले जाते. विज्ञानाने प्रचंड प्रगती केली. त्याद्वारे बसल्या जागी अनेक गोष्टींची प्राप्ती होऊ लागली. त्यात माणूस अधिक गुरफटला गेला. त्याला स्वत:विषयी काळजी घेण्याचीहि उसंत मिळत नाही. परंतु विज्ञान युग म्हटले तरी ते कलियुग आहे याचा मात्र विसर पडलेला दिसतो. ह्यात भयंकर परिणाम होत आहेत याची जाणीवहि मानवाला आहे, पण त्याच्याकडे वेळ कुठे आहे ? ज्याने जन्माला घातले, जो अवघ्या सृष्टीचे पालन-पोषण करतो त्याचे स्मरण करायला वेळ नाही. कलियुगा प्रमाणे या जगात जितके काही वाईट आहे तितकेच साधु-संत, संत-महात्म्ये यांच्या उदयाने या भारत भूमीत चांगल्या गोष्टी आहेत. त्यांचा स्त्रोत अर्थात 'भक्तिमार्ग' सर्वसामान्य माणसांना मिळाला. संताच्या भक्तिमार्गानेच कलिचे अक्राळ-विक्राळ रुप शांत होऊन जीवन सुकर होते.


सध्याच्या या कलियुगात दत्तभक्तिला प्राधान्य असून आज भारतात अनेक ठिकाणी ती प्रेमाने, भक्तिभावाने केली जाते. महाराष्ट्रातहि गेल्या साडे पाचशे वर्षांपासून दत्तभक्ती रुजली आहे. दत्तप्रभूंचे दुसरे अवतार श्रीनृसिंहसरस्वती यांचा जन्मच महाराष्ट्रातील अकोल्या जिल्ह्यात असलेल्या करंजनगर (आताचे लाड कारंजा) येथे झाला. साहजिकच दत्तभक्ति येथे रुजून वाढली यात आश्चर्य नाही. पुढे श्रीनृसिंहगुरुंनी आपल्या वास्तव्याने औदुंबर, नरसोबावाडी, गाणगापुर ही क्षेत्रे पावन केली. त्यांची जगभर कीर्ति पसरली.

यंदाचा हा अंक श्रीनृसिंहसरस्वती अर्थात गाणगापुर यावर विशेष आधारीत आहे. यंदाच का ? कारण सद्गुरु भाऊ महाराजांनी दत्तप्रभूंच्याच आदेशाने तेथे असंख्य भक्तगणांसाठी भला थोरला मठ उभारला, त्याला आज पंचवीस वर्षे पूर्ण होत आहे. त्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून हा 'गुरुमहिमा' दिवाळी अंक 'गाणगापुर विशेषांक' म्हणून प्रकाशित होत आहे.

श्रीनृसिंह गुरुंनी ज्या ज्या लीला गाणगापुरात केल्या त्यामुळे गाणगापुरला दत्तप्रभूंचे 'लीलाक्षेत्र' असे म्हटले जाते. अर्थात त्या त्या कथा या अंकात प्रस्तुत केल्या आहेत. भक्तांनी त्या या दिवाळी अंकाच्या माध्यमातून वाचाव्यात, श्रवण कराव्यात. त्यातून भक्तिप्रेम अधिक वाढेल यात शंका नाही.

**ही दीपावली सर्वांना सुखाची,**
**समृध्दीची आणि भरभराटीची जावो !**

संपादक
श्री. रविंद्र ज. गावडे



आदिमानवाच्या मनाच्या भीतीतून, आश्चर्यातून आणि कृतज्ञतेतून देवतांना जन्म दिला. ऋतुचक्रातील नाना रंग-रुपे धारण करणारी पंचमहाभूते, वृक्ष, वेली आणि पशुपक्षी यांतून मानवाच्या आदिदेवता जन्म पावल्या. पुढे जसजसे मानवाचे जीवनाबद्दल आणि विश्वाबद्दल चिंतन वाढू लागले तसतसे त्या प्राकृत देवतांनी सुसंस्कृत स्वरुप धारण केले. बाह्य शत्रूंवर विजय मिळवणारा वीरपुरुष आणि आंतरीक शत्रूंवर विजय मिळवणारा सिध्द्पुरुष यांनाही देवत्व प्राप्त झाले होते. मध्य युगात दत्तात्रेयांची निर्मिती झाली, जी सिध्द देवता आहे.

भारतीय संस्कृतीच्या उन्नतेतील एक अद्‌भूत निर्मिती म्हणजे दत्तात्रेय होय. शैव, वैष्णव आणि शाक्त या तीनही प्रमुख उपासना पंथांना व्यापून उरणारा दत्तात्रेयांचा प्रभाव आजही अनंत वर्षानंतरही तसाच आहे. म्हणूनच महानुभाव, नाथ, वारकरी आणि समर्थ या चारही संप्रदायांत दत्तगुरुंविषयी उत्कट भाव आहे. त्याचप्रमाणे खास दत्तभक्तीची परंपरा चालत आलेला (नारद मुनींनी निर्माण केलेला) दत्त संप्रदायही गेली पाचशे वर्षांहून अधिक वर्षे महाराष्ट्रात नांदत आहे. या संप्रदायात दत्तप्रभूंवर दृढ श्रध्दा असणाऱ्या हिंदूबरोबर मुसलमानांचा देखील समावेश आहे.

विविध पंथांची, संप्रदायाची देवतायने ही त्या त्या समाजाच्या संस्कृतीची अर्थपूर्ण प्रतीके ठरतात. कारण मानवाच्या वैयक्तिक आणि सामूहिक चिंतनाच्या गर्भातून विविध देवतांच्या मूर्ती आकारास आल्या.

प्रभू दत्तात्रेय हे भारतीयांच्या प्रगल्भ चिंतनाची निर्मिती आहे. प्राचीन काळातील रामायण व महाभारत ह्या दोन महाकाव्यांना ‘इतिहास’ अशी संज्ञा दिली गेली आहे. यापैकी महाभारतात दत्तगुरुंचे उल्लेख आढळून येतात. वनपर्व, शांतीपर्व आणि अनुशासन पर्वांत दत्तगुरुंनी सहस्त्रार्जुनावर केलेल्या कृपेचे उल्लेख आहेत. अग्निपुराणातही, तप करणाऱ्या कार्तवीर्य अर्जुनाला दत्तगुरुंनी सप्तद्विपांकित पृथ्वीचे राज्य, सहस्त्र बाहु आणि युध्दात अजेयत्व दिले, अशी कमी-अधिक माहिती उपलब्ध होते.

दत्तात्रेयाच्या अवतार हेतूंची कल्पना ब्रह्मपुराण सांगते, जो सर्व भूतमात्राचा अंतरात्मा असून विष्णूचा दत्तात्रेय नाम अवतार झाला, तो क्षमाशील आहे. त्याने वेदांना प्रतिष्ठा मिळवून दिली. यज्ञ-यागाचे उज्जीवन करुन चातुर्वर्ण्यातील शैथिल्य दूर करुन अधर्म आणि असत्य यांचा समूळ नाश केला. आणि दुबळ्या झालेल्या प्रजेत सामर्थ्य निर्माण केले.

मार्कंडेय पुराण दत्तात्रेयांचे काहीसे विलक्षण चरित्र वर्णन करते. ब्रह्मा-विष्णू-महेशांच्या वरदानाने अनुक्रमे सोम, दत्त व दुर्वास हे तीन अत्रीपुत्र निर्माण झाले.

दत्तगुरुंच्या जन्माविषयी नाना कथा प्रचलित आहेत. अर्थात त्या सर्व कथांतून ते अत्री-अनसुयेचे पुत्र आणि विष्णूचे अंश होय, हे सर्वमान्य आहे.

## दत्तगुरुंच्या जन्मकथा.

पुत्रप्राप्तीसाठी अत्रिऋषींनी ऋक्ष पर्वतावर घोर तपश्चर्या केली. त्यांच्या प्रखर तपश्चर्येने प्रसन्न होऊन ब्रह्मा-विष्णु-महेश ह्या त्रिमूर्तींना अत्रींसमोर प्रकट होऊन त्यांना या घोर तपश्चर्येचे कारण विचारले तेव्हा ऋषी म्हणाले,

आपण माझ्या उदरी पुत्ररुपाने जन्म घ्यावा. त्रैमूर्तींनी अत्रिंची विनंती मान्य केली. त्यांच्या आशिर्वादाने सोम (चंद्र), दत्त व दुर्वास हे तीन पुत्र अनसूयेच्या उदरी जन्म पावले.

ब्रह्मपुराणात कथा आहे, अत्रिऋषींनी पुत्रप्राप्तीसाठी ब्रह्मा-विष्णू-महेशांची आराधना केली. ते संतुष्ट झाल्यावर ऋषींनी त्यांना विनंती केली, आपण माझ्या घरी पुत्ररुपाने जन्म घ्यावा व मला एक रुपवती कन्या प्राप्त व्हावी. त्याप्रमाणे तीन्ही देवाच्या वरदानाने सोम, दत्त व दुर्वास हे तीन पुत्र आणि शुभात्रेयी नावाची रुपवती पुत्री अत्रि-अनसूयेला प्राप्त झाली.

कौशिक नावाचा एक ब्राह्मण विवाहित असूनही एका वेश्येच्या नादी लागला होता. पत्नी शाण्डिली, साध्वी असूनही तिची फिकीर त्याला नव्हती. कालावधानाने कौशिकाला महारोग झाला. त्याची गात्रे सडू लागली तशी त्या वेश्येने कौशिकाला हाकलून दिले. कुठेही आसरा न मिळाल्याने कौशिक आपल्या घरी परतला. त्याची किळसवाणी अवस्था पाहुनही त्याच्या पत्नीने आदराने त्याला घरी घेतले. त्याची मनोभावे सेवाशुश्रुषा सुरु केली. इतके असूनही कौशिकाला आपल्या पत्नीबद्दल मुळीच स्नेहभाव नव्हता. त्याच्या ध्यानी-मनी ती वेश्या बसली होती. एके दिवशी त्याने आपल्या पत्नीला त्या वेश्येच्या घरी घेऊन जाण्यास सांगितले. त्या साध्वी शाण्डिलीने रात्रीच्या वेळी आपल्या पतीला पाठीवर मारुन वेश्येच्या घरची वाट चालू लागली.

त्या काळात एक घटना घडली होती. त्या नगरीच्या राजाने चुकीने चोर समजून मांडव्य ऋषींना सुळावर चढविले होते. आपल्या तपश्चर्येच्या बळावर ते जीवंत होते. त्याच वाटेने ही सती अंधारातून कौशिकाला घेऊन जात असता त्यांना कौशिकाचा धक्का लागला. त्या धक्क्याने मांडव्य विव्हळले. त्यांनी शाप दिला, मला धक्का दिलेला उद्या सूर्योदय होताच मृत्यु पावेल. परंतु कौशिक पत्नीच्या सतीत्वाच्या प्रभावाने सूर्योदय झालाच नाही.

सूर्योदय न झाल्याने सृष्टीत बिघाड झाला. सारे देव-देवता सती अनसूयेकडे येऊन त्यांनी तिला मध्यस्थी करावयास सांगितले. अनसूयेने कौशिक पत्नीची भेट घेऊन तिला अभयाचे वचन देऊन सूर्योदय घडवून आणला. मात्र तपस्वी मांडव्याच्या शापाने कौशिक मृत झाला. परंतु अनसूयेने आपल्या सतीत्वाच्या प्रभावाने कौशिकाला जीवंत केले. तिच्या या कार्याने संतुष्ट होऊनी सर्व देवांनी तिला वरदान दिले, त्रैमूर्ती तुझ्या उदरी जन्म घेतील.

एक कथा प्रचलीत आहे, ती अशी, राहूने सूर्याला ग्रासले तेव्हा पृथ्वी अंधारमय झाली. अत्रिऋषींनी सूर्याला राहूच्या मगर मिठीतून सोडविले, व पृथ्वी पुन्हा प्रकाशमय केली. ऋषींच्या या महत्कार्याने संतुष्ट होऊन शिव-विष्णूंनी दुर्वास व दत्त या रुपाने अत्रींच्या उदरी जन्म घेतला.

या दत्तजन्म कथेला वैदिक आधार आहे. ऋग्वेदाचे जे पाचवे मंडल आहे, त्याच्या चाळीसाव्या सूक्तात काही ऋचा आहेत त्या अशा,

सहावी ऋचा - इंद्रा, जेव्हा तू आकाशात चाललेले स्वर्भानूचे (राहूचे) कपट प्रयोग नष्ट केलेस, तेव्हा त्या व्रतभ्रष्ट अहंकाराने झाकलेला सूर्य चौथ्या मंत्राने अत्रीने प्राप्त केला.

सातवी ऋचा- सूर्य म्हणतो, हे अत्रीऋषी, मी ग्रस्त स्थितीत असलेल्या मला, तू दृष्टाच्या विळख्यातून बाहेर

काढलेस. तू खरे ऐश्वर्य असलेला मित्र आहेस.

नववी ऋचा - राहूने अंधकाराने ज्या सूर्याला ग्रासून टाकले होते, त्याला अत्रीने शोधून काढले व सूर्याची सुटका केली. इतर ते करु शकले नाहीत.

वरील सर्व कथां पलिकडे आणखी एक कथा प्रचलित आणि सर्वमान्य आहे, ती अशा प्रकारे-

नारद मुनींच्या सती अनसूयेच्या सतीत्वाच्या गौरवामुळे उमा-रमा व सरस्वती या तीन देवींच्या मनात अनसूयेबद्दल असूया निर्माण झाली आणि त्यांनी आपल्या पतींना (ब्रह्मा-विष्णू-महेश) अनसूयेचे सत्व हरण करण्यास पाठविले. परंतु अनसूयेच्या पतिव्रताच्या प्रभावाने तिन्ही देव लहान बालक झाले. इकडे बराच काळ पती परत आले नाहीत म्हणून उमा-रमा-सरस्वती पती शोधार्थ फिरत फिरत अत्रिंच्या आश्रमात आल्या. (ही सारी खेळी नारद मुनींनीच केली होती.) तेथे येऊन पाहतात तो आपल्या पतींना अनसूयेने बालक केले आहेत. त्या देवभार्यांची विकलावस्था पाहून सती अनसूयेचे ह्रदय द्रवले. तिने पुन्हा त्रिदेवांना पूर्वरुप दिले. तिन्ही देवांनी तिच्या या महान कार्यावर प्रसन्न होऊन अनसूयेच्या पोटी पुत्ररुपाने जन्म घेतला.

भागवत पुराणाच्या चतुर्थ स्कंदात दत्तजन्माची कथा साकारली आहे, ती अशी-

अत्रिऋषींनी पुत्रप्राप्तीसाठी ऋक्षपर्वतावर तपश्चर्या आरंभीली ती केवळ श्रीविष्णूला संतुष्ट करण्यासाठी. परंतु त्यांच्या तपश्चर्येने ब्रह्मा आणि शिवहि संतुष्ट होऊन विष्णूसह अत्रींसमोर प्रकट झाले. अत्रींना आश्चर्य वाटले. तरीहि त्यांनी तिघांचीहि स्तुती करुन त्यांना प्रश्न केला, तुमच्या पैकी मी एकालाच बोलावले होते. मी ज्याची आराधना केली तो कोण बरे ? तेव्हा त्या त्रैमूर्तींनी उत्तर दिले, यद् त्वं ध्यायति ते वयम्! तू ज्या एका तत्वाचे ध्यान केलेस त्याचेच आम्ही तिघे अंश भूत आहोत.

म्हणून भागवतकार म्हणतात, दत्तात्रेय, हे केवळ श्रीविष्णूंचेच अवतार आहेत.

काळानुसार त्रिमूर्ती कल्पना आणि दत्तात्रेयांचे चरित्र एक साथ लोकमानसात विकास पावत, आकार घेत गेले. पुढे तेराव्या शतकात हए एकात्म स्वरुप श्रीनृसिंह सरस्वतींच्या जीवनकालात उपासकांच्या, भक्तांच्या ह्रदयात एकवटले आणि त्या ऐकात्म्यातून 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ती' अशा दत्तगुरुंचे स्वरुप, महात्म्य आविस्कृत झाले.

<u>प्रभू श्रीपादश्रीवल्लभ अवतार.</u>

श्रीगुरु दत्तात्रेयांचे पहिले अवतार श्रीपादश्रीवल्लभ होत. इ.स. १३२०-१३५० हा श्रीपादराजांचा काळ मानला जातो. गुरुचरित्रकार सरस्वती गंगाधरानी श्रीपादांचा जन्म 'पीठापूर पूर्वदेशी' झाला असे म्हटले आहे. इ.स. ५८४ मध्ये पश्चिम चालुक्य या कुलातील सत्याश्रय नावाच्या राजाने 'पीठापूर' जिंकले होते. हैदय व पूर्व चालुक्य या कुळातील राजांचाही पीठापूरशी संबंध होता. कलिंगराज वसिष्ठीपुत्र शक्तिवर्मन ह्याने येथील ब्राह्मणांना अग्रहार दिल्याचा उल्लेख एका शिलालेखात आढळतो. येथे 'कुंतिमाधव' नावाचे प्राचीन मंदिर असून त्याच्या समोर 'पदगया' नावाचे तीर्थकुंड आहे. या मंदिराच्या आवारात असलेल्या स्तंभावर अनेक शिलालेख आहेत. सध्या हे स्थान 'पीठापूरम्' या नावाने ओळखले जाते. श्रीगुरुचरित्राच्या ५ ते १० या अध्यायंमध्ये श्रीपादराजांची अवतार कथा वर्णिलेली आहे. अध्याय ६-७ मध्ये गोकर्ण महिमा, अध्याय ८ मध्ये शनिप्रदोषव्रत-महात्म्य आणि १० व्या

अध्यायात कुरवपूर-महिमा वर्णिला आहे. फक्त ५ व ९ या दोनच अध्यायात श्रीपादश्रीवल्लभअंचे अवतार विषयीचे वृत्त आहे. थोडक्यात गुरुचरित्रकारांना त्यांच्याविषयी विशेष माहिती उपलब्ध झालेली नव्हती.

हल्लीच्या काळी श्रीपाद श्रीवल्लभ संपूर्ण चरित्रामृत, सुमती नंदन पब्लीकेशन ट्रस्टने प्रकाशित केले आहे.

श्रीपादराजांच्या काळातील शंकरभट्ट हे कर्नाटक देशस्थ स्मार्त, भारद्वाज गोत्री ब्राह्मण, अल्पबुध्दीचे, विद्येचा गंध नसलेले सामान्य साधे मनुष्य. परंतु प्रभू श्रीपादांच्या संकल्पाप्रमाणे त्यांच्यात दिव्य प्रेरणा व प्रेमभावना निर्माण होऊन प्रभूंच्या आशिर्वादाने दिव्य दत्तचरित्र निर्माण झाले. हे मूळ संस्कृत भाषेत होते. पुढे बापन्नाचार्युलु ३३ व्या पीढीतील स्वर्गीय मल्लादि गोविंद दिक्षित हे ह्या ग्रंथास निमित्त रुप ठरले. अगदी पुरातन झालेली जीर्ण प्रत पुन्हा तेलगु भाषेत अनुवादित केली. श्रीपादराजेंच्याच प्रेरणेने व आशिर्वादाने शंकर भट्टांनी संस्कृत भाषेत लिहिलेल्या मूळ ग्रंथात, बापन्नाचार्युलु यांच्या ३३ व्या पीढीत हे चरित्र प्रकाशित होईल, असे लिहून ठेवले होते. त्यामुळे इतर भाषेत श्रीपादराजेंचे चरित्र उपलब्ध नव्हते. हैदराबादचे सिध्दयोगाचार्य श्री. हरिभाऊ जोशी निटुरकर (भाऊ महाराज) यांनी त्या तेलगु ग्रंथाचा मराठी व हिंदी या दोन भाषांत अनुवाद करुन महाराष्ट्रीय लोकांना श्रीपादश्रीवल्लभ चरित्र उपलब्ध करुन देऊन दत्तभक्तांवर फार मोठे उपकार केलेले आहेत.

इ.स. ६व्या शतकापासून प्रसिध्द असलेल्या पीठापुरात श्रीपादश्रीवल्लभांचा जन्म झाला. पित्याचे नाव आपळराज आणि मातेचे नाव सुमती. आपळराज हा आपस्तंब शाखीय ब्राह्मण! पत्नी सुमती पतिसेवेत सदैव रत असलेली आणि अतिथी अभ्यागतांची भक्ति-भावाने पुजा करणारी होती. या ब्राह्मणाच्या घरी अमावस्येच्या दिनी श्राध्दविधी असताना, ब्राह्मण भोजनापूर्वी दारी आलेल्या अवधूताला सुमतीने भिक्षा घातली. (हा अवधूत म्हणजे प्रत्यक्ष दत्तात्रेयच होते, असे श्रीगुरुचरित्रात वर्णिले आहे.) प्रसन्न झालेल्या अवधूतांनी सुमतीला सांगितले, माते, तुझ्या मनात जी इच्छा असेल ती प्रकट कर. आपल्या दोन्ही मुलांच्या अवस्थेमुळे दुःखी असलेल्या सुमतीने 'आपल्या सारखाच तेजस्वी मुलगा प्राप्त व्हावा' ही इच्छा प्रकट केली. तिची ही प्रार्थना मान्य करुन तापसी, वंशाचा उध्दार करणारा, कलियुगात ख्यातिवंत होणारा, दैन्यहारक आणि ज्ञानमार्गे अर्तुबळी असा पुत्र तुला होईल असा आशिर्वाद देऊन अवधूत वेशधारी दत्तात्रेय अदृश्य झाले. आनंदभरीत झालेल्या सुमतीने हा सारा वृत्तांत आपल्या पतीस निवेदन केला. तेव्हा आपळराजांनी उद्गार काढले,

दत्तात्रेयांचे स्थान जाण । माहूर करवीर क्षेत्र खूण ।
सदा वास याचि ग्रामा । पांचाळेश्वर नगरांत ।।
नाना रुपे भिक्षुकवेषें । दत्तात्रेय येताती हरुषें ।
न पुसता माझ्या निरोपास । भिक्षा मात्र घालिजे ।।

यथाकाल सुमतीला पुत्ररत्न प्राप्त झाले. ब्राह्मणांनी जातक वर्तविले, हा महान तपस्वी आणि दीक्षाकर्ता जगद्गुरु होईल. दत्तात्रेयांच्या आशिर्वादाने जन्म झाला. म्हणून मुलाचे नाव 'श्रीपाद' असे ठेवले. या दैवी बालकाने बालवयात म्हणजे सोळा वर्षांच्या आतच सकळ शास्त्रात विशेषतः वेदान्तात प्राविण्य मिळवले. सोळावे वर्ष लागल्यावर मातापित्यांनी त्यांच्या विवाहाचा विचार करु लागले तेव्हा मनी विरक्त असलेले श्रीपाद म्हणाले, आपण तापसी

ब्रह्मचारी। योगश्रियावांचोनी नारी। न लगती, हा बोल निर्धारी। श्रियावल्लभ नाम माझै।।

या घटनेनंतर श्रीपादराजेंनी घर सोडण्याचा निश्चय केला आणि माता-पित्यांकडे उत्तरयात्रेला जाण्याची अनुमती मागितली. तेव्हा माता सुमती कळवळून म्हणाली, आता आम्ही म्हातारपणी कुणाच्या आधाराने दिवस कंठावे ? हे तुझे दोन लुळे-पांगळे आणि आंधळे भाऊ त्यांना आता कुणी पोसावे ? बाळ, आमचा जीव तुझ्यावरच विसंबून होता. मातेचे हे बोलणे ऐश्रकून श्रीपादांनी आपल्या दोघा अपंग भावांकडे अमृतदृष्टीने पाहताच ते दोघेही अव्यंग बनले. त्याचबरोबर त्यांना प्रज्ञाही प्राप्त झाली आणि माता-पित्यांची चिंता दूर झाली.

या चमत्कारानंतर श्रीपाद आपल्या माता-पित्यांचा निरोप घेऊन उत्तरयात्रेला निघाले. या यात्रेत त्यांनी जगन्नाथपुरी, काशी आणि बद्रीकेदार तीर्थस्थानात भ्रमण केले. उत्तरयात्रा पूर्ण करुन ते दक्षिणेत गोकर्ण महाबळेश्वर या स्थानी आले. तेथे तीन वर्षे गुप्त रितीने निवास करुन श्रीशैलावर गेले आणि तेथे चार मास राहून पुढे निवृत्तिसंगमावर कृष्णेच्या काठी कुरवपुर गावी आले. तेथे वास्तव्य असताना दोन घटना घडल्या, ज्यांचा श्रीपादांच्या उत्तरावताराशी आणि नृसिंह सरस्वती स्वामींच्या जीवनाशी संबंधीत होत्या हे श्रीगुरुचरित्रावरुन दिसून येते.

<u>पहिली घटना</u> :

कुरवपुर येथे राहणाऱ्या एका वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणाची अंबिका नामे पत्नी होती. या पतिसेवापरायण सुशील स्त्रीला अपत्य सुख नव्हते. तिची मुले अकाली मृत्यु पावत. ह्या भयानक संकटातून सुटण्यासाठी तिने अनेक तीर्थव्रते आचरली. अंती तिचा एक मुलगा वाचला. पण तो मंदमती निघाला. एकुलत्या एक मुलाच्या जडमूढ अवस्थेने हताश होऊन मनोव्यथेने अंबिकेच्या पतीने इहलोक सोडला. त्यामुळे अंबिका व तिच्या मूढ मुलगा दोघांचीही स्थिती अधिक शोचनीय झाली. तो मूढ मुलगा जसजसा वाढू लागला तसतसा समाजात अधिकच निंदास्पद ठरु लागला. अखेर लोकनिंदेने त्रस्त होऊन अंबिकेने मुलासह कृष्णेच्या कुशीत जीव देण्याचे ठरविले आणि मायलेकरे कृष्णा प्रवाहात प्रवेश करणार, इतक्यात अंबिकेला तेथे श्रीपादयति स्नान करताना दिसले. त्या माऊलीने लगबगीने पुत्रासह श्रीपादांना वंदन केले आणि आत्महत्येच्या महादोषातून मुक्त होण्यासाठी आशिर्वाद मागितला. तिच्या या मागणीने श्रीपादयती करुणेने म्हणाले, 'तू शनिप्रदोष व्रताचे' आचरण कर, म्हणजे तुझी मनोवांछिते पूर्ण होतील. परंतु अंबिकेचे मनोवांच्छित दुहेरी होते; एक तर तिच्या मूढ मुलाला प्रज्ञा संपन्नता लाभावी आणि दुसरे,

देवा, आता ऐसे करणे। पुढील जन्मी मनुष्यपणे।
पुज्यमान पुत्र पावणें। जैसा तूं पुज्य जगत्त्रयासी।।
वासना असे माझ्या मनी। पुत्र व्हावा ब्रह्मज्ञानी।
बाळपणीच पाहे नयनीं। पुज्यमान समस्तांसी।।

अंबिकेची श्रध्दा अधिक दृढ करण्यासाठीच श्रीपादांनी तिला शनिप्रदोष व्रताचे महात्म्य विवरुन सांगितले आणि तिच्या मूढ पुत्राच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्याला ज्ञानसंपन्न बनविले. श्रीगुरुचरित्रकार म्हणतात, ही अंबिका

म्हणजेच पुढील जन्मातील लाड कारंजाची अंबाभवानी आणि श्रीपादयतिंच्या कृपेने ह्या जन्मातील पुत्र म्हणजेच श्रीनृसिंह सरस्वती होय.

<u>दुसरी घटना</u> :

श्रीपादयति कुरवपुरात असताना नित्य गंगास्नानाला जात, तेव्हा तेथे धुणे धूत असलेला एक रजक त्यांना भक्तिभावाने वंदन करीत असे. पुढे पुढे त्याला श्रीपादयतिंच्या सेवेचे वेड लागले. तो त्यांच्या मठाची झाड-लोट करी. एके दिवशी जलक्रिडा करण्यासाठी एक म्लेंच्छ राजा गंगाप्रवाहात आपल्या राजपरिवारासह नावेतून विहार करीत होता. ते या धुणे धुणाऱ्या रजकाने पाहिले. राजाचे वैभव पाहून त्याला स्वस्थिती बद्दल वाईट वाटले. तेथे जवळच असलेल्या श्रीपादगुरुंनी त्याची मनःकामना मनोमन जाणली आणि

श्रीपाद म्हणती रजकासी । जन्मदाता कष्टलासी ।
वांछा असे भोगावयासी । राज्यपद तमोवृत्ती ।।
निववावी इंद्रिये सकळ । नातरी नव्हे मन निर्मळ ।
बाधा करितीं पुढें केवळ । जन्मांतरी परियेसी ।
तुष्टवावया इंद्रियांसी । तुवां जन्मावे म्लेंच्छवंशी ।।
आवडी जाहली तुझे मानसीं । राज्य भोगी जाय त्वरीत ।

श्रीपादयतींचे हे वचन ऐकून रजकाच्या मनात आनंदाबरोबर दुःखाचे संमिश्रण निर्माण झाले. एक राज्य भोगाचा आनंद व दुसरे गुरु विरहाचे दुःख! असा त्याच्या मनी संघर्ष सुरु झाला असतानाच श्रीपादयतींनी त्याला आश्वासन दिले,

श्रीगुरु म्हणती तयासी । वैदुरानगरी जन्म घेसी ।
भेटी देऊ अंतकाळी । कारण असे आम्हां येणे ।।
आणिक कार्यकारणेसी । अवतार होऊ परियेसी ।
वेष धरु संन्यासी । नाम नृसिंह सरस्वती ।।

या घटनेतून गुरुचरित्रकारांना सूचित करायचे आहे की, श्रीपादश्रीवल्लभांचाच पुढील अवतार नृसिंह सरस्वतींच्या रुपाने झाला आणि त्यांनी ज्या रजकास राज्य प्राप्तीचा वर दिला, तोच पुढे नृसिंह सरस्वतींचा उपासक बनलेला बेदरचा मुसलमान बादशहा झाला.

अशा काही चमत्कारानंतर सर्वांना पुजनीय ठरलेले श्रीपादगुरुंनी कुरवपुरीच आश्विन वद्य द्वादशी या दिनी निजानंदी गमन केले (गंगेत अंतर्धान पावले). हा त्यांच्या निजानंद गमनाचा दिवस आजही 'गुरुद्वादशी' म्हणून अतीव श्रध्देने पाळला जातो.

## श्रीनृसिंह सरस्वती स्वामींचे अवतरण.

श्रीनृसिंह सरस्वती स्वामींचा अवतार काल श. १३०० ते १३८० (इ.स. १३७८ ते १४५८) असा आहे. हा काळ महाराष्ट्राच्या दृष्टीने संघर्षाचा आणि संकटांचा होता. अल्लाउद्दिनाच्या स्वाऱ्यांनी देवगिरीच्या यादवांचे राज्य नष्ट झाले होते. महाराष्ट्रातील स्वराज्याचा प्रकाश लुप्त झाला. यादवांच्या राज्याचा अंतिम ग्रास घेण्यासाठी इ.स. १३१२ मध्ये मलिक काफूर याने आक्रमण केले. सर्व काही नष्ट केले त्याचबरोबर धर्मच्छळाचे सत्रही मलिक काफूर ने सुरु केले. छोट्या-मोठ्या राजवटी संपुष्टात आल्या. अल्लाउद्दिन खिलजी नंतर दिल्लीचे तख्त तुघलक घराण्याने घेतले. या घराण्यातील पहिला पुरुष ग्यासुद्दिन याचा मुलगा महंमद तुघलक हा दक्षिणैचा सुभेदार होता. इ.स. १३२३ च्या सुमारास त्याने दक्षिणेतील वरंगळवर स्वारी केली. इ.स. १३२५ मध्ये ग्यासुद्दिन मृत्यु पावल्यावर दिल्लीचे तक्त महंमदला मिळाले. याला वेडा महंमद म्हटले जायचे. इ.स. १३३३ मध्ये राजधानीचे स्थलांतर करण्यासाठी तो दौलताबादला आला. अर्थातच त्याचा हा खुळा प्रयत्न फसला. या अपयशानंतर महंमदाने हसन गंगू बहामनीस दक्षिणेचा सुभेदार नेमले. या हसनने १३४७ मध्ये स्वातंत्र्य पुकारुन राजधानी गुलबर्ग्यास नेली. आणि हे बहामनी राज्य दक्षिणेत मुसलमानांचे आसन स्थिर करण्यास कारणीभूत ठरले.

बहामनी राज्याच्या स्थापनेपूर्वी विजयनगर येथे एका स्वतंत्र्य हिंदू राज्याची नव्याने स्थापना झाली होती. मुसलमानी राजवटीच्या विध्वंसकारी व धर्मसंहारक वृत्तीने होरपळून निघालेल्या दोन पराक्रमी व कर्तव्यसंपन्न पुरुषांनी (हरिहर व बुक्क) या राज्याची स्थापना केली. त्यांच्या या पुरुषार्थामागे शृंगेरी पीठातील श्रीविद्यारण्य स्वामींची उत्कट प्रेरणा होती. कारण अल्लाउद्दिनच्या पहिल्या स्वारीनंतर सव्वाशे वर्षांच्या कालखंडात यवनी राजवटीचे भयंकर परिणाम हिंदू प्रजेला भोगावे लागले होते. निरपराध हिंदूंची कत्तल, सक्तीचे धर्मांतर, स्त्रियांवरील अत्याचार, मंदिरांचा-मूर्तीचा विध्वंस इत्यादी आसुरी अत्याचाराने हिंदू प्रजा त्रस्त झाली होती.

इस्लामच्या शस्त्रधारी आक्रमणाबरोबरच हृदयपरिवर्तनाच्या मार्गाने धर्माचा प्रसार करणारे अनेक प्रचारक भारतभूमीत पसरलेले होते. सौम्य मार्ग अवलंबणारे हे सारे प्रचारक सूफी पंथाचे अनुयायी होते. त्यापैकी रबिया, मन्सूर, गझाली, फरिदोद्दिन अत्तार, जलालुद्दिन रुमी, शेख सादी, हाफीज आणि जामी हे सूफी संप्रदायातील श्रेष्ठ संत होते. परंतु आत्मप्राप्तीसाठी अनेक प्रयत्न करणाऱ्या भक्तीमार्गी सूफी साधकांचा इस्लामने अत्यंत छळ केला. अनहलक (म्हणजे अहं ब्रह्मास्मि) अशा साक्षात्काराचा अनुभव, उद्घोष करणाऱ्या मन्सूरला इस्लामने फाशी दिले. का ? तर मन्सूरने सेवा, प्रेम, निवृत्ती, ज्ञान, उन्मनी अवस्था परमेश्वर प्राप्ती आणि मिलन या सात साधनांनी परमेश्वर प्राप्ती करण्याचा उपदेश केला म्हणून मन्सूरला फासावर चढवले गेले.

उत्तर भारतात महंमद गझनीच्या काळापासून सूफींची आवक सुरु झाली. उल् हुजवेरी हा भारतात आलेला पहिला सूफी प्रचारक होय. त्याच्यानंतर आलेल्या ख्वाजा चिश्ती, ख्वाजा कुतुबुद्दिन, फरीदोद्दिन गंज, निजामोद्दिन अवलीया इत्यादी बिनीच्या सूफी प्रचारकांनी उत्तरभारतात धुमाकुळ घातला होता. त्यांनी हजारो हिंदूंचे धर्मांतर केले. हिंदू सरदारांच्या मुलींशी लग्ने केली आणि मुसलमान राज्यकर्त्यांशी हात मिळवणी करुन इस्लामचा ‘हरा झेंडा’ भारतात फडकविला. मंदिर-मूर्ती फोडणे, तेथे मशिदी उभारणे इत्यादी अत्याचार केले गेले.

दक्षिणेतही सूफीचा संचार सुरु झाला होता. पण तो मुसलमानी आक्रमणापूर्वीचे. यादवांच्या कालखंडात आठ ते दहा सूफी प्रचारक होऊन गेले. तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात जलालुद्दिन गंजरवा आणि मोमिन आरीफ या दोन सूफींनी यादवांच्या राजधानीत अर्थात देवगिरी-दौलताबाद आणि खुलताबाद या ठिकाणी ठाण मांडले होते.

इ.स. १२४९ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने यादवांचे राज्य खिळखिळे केले. सर्व महाराष्ट्रभर या सूफींनी धर्मांतराचा सपाटा चालवला होता. मोईजोद्दिन उर्फ मौलनासाहेब याने पैठणच्या भव्य महालक्ष्मी मंदिराचा ताबा घेऊन त्या जागी दर्गा उभरला. त्याचप्रमाणे सर्व महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठवाडा, दौलताबाद, औरंगाबाद, खुल्ताबाद, हैदराबाद इत्यादी ठिकाणी सूफींची मुख्ये केंद्रे स्थापन केली.

अशा संघर्षमय आणि भयानक काळात श्रीपाद-श्रीवल्लभ आणि श्रीनृसिंह सरस्वती स्वामी या महा विभूतींचा क्रमाने अवतार झाला. श्रीपादश्रीवल्लभ हे इतिहास काळातील दत्तात्रेयांचे पहिले अवतार व श्रीनृसंहि सरस्वती स्वामी हे दुसरे अवतार समजले जातात.

श्रीदत्तात्रेयांचे दुसरा अवतार आणि श्रीपादश्रीवल्लभांचे उत्तरावतार म्हणून श्रीनृसिंह सरस्वती स्वामींना दत्त संप्रदायात सन्मान, गौरव, प्रसिध्दि व नावलौकिक आहे. श्रीगुरुचरित्राचे ते चरित्र नायक असून अध्याय ११ ते ५१ यांत त्यांचे चरित्र वर्णन आहे.

कुरवपुरातील अंबिका नामक विप्रस्त्रीला श्रीपादगुरुंनी आशिर्वाद दिला होता. तीच अंबिका करंजनगर (आजचे लाड कारंजा, जि. अकोला, विदर्भ हे स्थान उत्तरेकडील गाणगापूर समजले जाते.) या गावी वाजसेनीय शाखेच्या ब्राह्मण कुळात जन्म पावली. माता-पित्यांनी तिचे नाव ठेवले 'अंबा भवानी'. पुढे विवाह योग्य झाल्यावर त्याच गावातील एक शिवव्रती ब्राह्मण 'माधव' याच्याशी विवाहबध्द झाली.

पूर्वसंस्कारानुसार विवाहानंतरही ती शनिप्रदोषव्रताचे आचरण करीत राहिली. अशी सोळा वर्षे निघून गेली आणि शिवकृपेने शके १३०० (इ.स. १३७८) च्या सुमारास एक तेजस्वी बालकाने तिच्या उदरी जन्म घेतला.

जन्मतःच हे तेजस्वी बालक ॐ काराचा उच्चार करु लागले.

या तेजस्वी बालकाचे जन्मनाव 'शालग्रामदेव' असे ठेवण्यात आले. परंतु लौकिक नाम 'नरहरी' असे रुढ झाले. जातक वर्तविण्यास आलेले ब्राह्मण या तेजस्वी बालकाकडे पाहून म्हणाले,

कुमार होईल कारणिक पुरुषी । गुरु होईल सकळिकां ।
याचा अनुग्रह होईल ज्यासी । तो वंद्य होईल विश्वासी ।।
नवनिधि याच्या घरी । राहती ऐक द्विजोत्तमा ।
न होती यासी गृहणी-सुत । पुज्य होईल त्रिभुवनांत ।।
होईल हा अवतार पुरुषी । आम्हां दिसतसे भरंवसी ।
संदेह न धरावा मानसी । म्हणोनी करिती नमस्कार ।।

नरहरि सात वर्षांचे होईतो ते काहीच बोलत नसत. आपला पुत्र मुका निघणार या विचारानेच माता-पिता चिंतेने

ग्रस्त झाले. अखेर मौजिबंधन करण्याचे ठरले. सांग विधिविधानासह थाटामाटाने मुंज पार पडली. गायत्री मंत्राची दीक्षा मिळाली आणि नरहरी आपल्या मातेकडे भिक्षा मागण्यास गेले. भिक्षा मागताना त्यांच्या मुखातून वेदवाणी प्रकटली. या चमत्काराने माता-पिता, इतर सर्व लोक आनंदाने व विस्मयाने भारावून गेले. परंतु या आनंदावर विरजन पडले. नरहरि मातेला म्हणाले,

तुवां उपदेश केला एक । भिक्षा माग म्हणोनी ।
नव्हती बोल तुझे मिथ्या । निर्धार राहिला माझ्या चित्ता ।।
निरोप द्यावा आम्हां त्वरिता । जाऊं तीर्थे आचरावया ।।
आम्हां आचार ब्रह्मचारी । भिक्षा करावी घरोघरी ।
वेदाभ्यास मनोहरी । करणे असे परियेसा ।।

नरहरिंच्या या वचनाने मातेचे ह्दय पिळवटून निघाले. क्षणैक ती मूर्च्छित झाली. सावध झाल्यावर डोळ्यांतून आसवांचा महापूर सांडित म्हणाली, बाळा, सोळा वर्षे शिवाची आाराधना केल्यानंतर तुझी प्राप्ती झाली. सात वर्षे तू बोलला नाहीस आणि आता बोलू लागल्यावर मला सोडून निघालास! किती आशेने मी तुझ्याकडे पाहत होते!

आपल्या मातेचे सांत्वन करीत नरहरींनी तिला पूर्वील जन्माचे स्मरण दिले. या स्मरणाने तिला नरहरींच्या ठिकाणी श्रीपादगुरुंची मूर्ती दिसू लागली. तिचे मायेने भरलेले मन विरहाची कल्पना सहन करण्यास तयार होईना. तिने नरहरींना धर्मविहित आश्रम पालनाची जाणीव देऊन तिन्ही पूर्वाश्रमांचे सुयोग्य आचरण करुनच संन्यास घेणे उचित आहे असे सुचविले.

मायेचे आवरण चढलेल्या आपल्या मातेचे समर्थन नरहरींना पटेना. तरीही त्यांनी

संवत्सर एक तुझ्या घरीं । राहू माते निर्धारी ।
वासना पुरतील तुझ्या जरी । मग निरोप दे मज ।।

असे मातेजवळ कबूल करुन तात्काळ नरहरींनी करंजनगरातील जनमाणसाला मंत्रमुग्ध केले. मातेला दोन जुळे पुत्रांची प्राप्ती करुन देऊन सर्वांचा निरोप घेतला. केवळ नऊ वर्षांच्या नरहरीने बदरीकेदारच्या यात्रेचे प्रस्थान ठेवले. कारंजापासून काशीपर्यंत प्रदीर्घ वाटचाल करुन नरहरि मणिकर्णिकेच्या घाटावर पोहोचले. तेथे काहीकाळ साधुसंतांच्या नि तपस्वीजनांच्या सहवासात राहिले. तेथे त्रिकाल स्नान करणे, विश्वेश्वराची मनोभावे पुजा अर्चा करणे हा नरहरींचा नित्यक्रम होता. हे नऊ वर्षांचे तेजस्वी बालक आपल्या तपाने व प्रज्ञेने समस्त काशीवासी संन्यासीजनांच्या कुतुहलाचा विषय ठरले. त्याचवेळी तेथे वास्तव करुन राहणाऱ्या कृष्णसरस्वती नामक एका वृध्द संन्याशाच्या ह्दयात या तेजस्वी बालकाविषयी वात्सल्य निर्माण झाले. हे कृष्ण सरस्वती शृंगेरी मठातील विद्यारण्यस्वामींच्या परंपरेतील होते. बहुकाळिचा संन्याशी अशी त्यांची ख्याती होती. हा तेजस्वी, स्वयंप्रज्ञ आणि निग्रही बालक जर संन्यास धर्माचे अनुकरण करण्यास तयार झाला, तर आपल्या परंपरेची प्रतिष्ठा निश्चितच वाढेल. हा आपल्या मनातील विचारतरंग त्यांनी अन्य संन्यासी जनांकडे व्यक्त केला आणि संगनमताने, दंभरहित विनयाने त्यांनी नरहरींना विचारणा केली;

लोकानुग्रहाकारणें । तुम्ही आता संन्यास घेणे ।
आम्हां समस्तां उध्दारणें । पुजा घेणे आम्हाकरवीं ।।
या कलियुगी संन्यास म्हणोन । निंदा करती सकलै जन ।
स्थापना करणार कवण । न दिसती भूमीवर ।।

कृष्ण सरस्वतींचा हा प्रस्ताव वैराग्यशाली नरहरींच्या हृदयावर जाऊन भिडला आणि तात्काळ त्यांनी कृष्ण सरस्वतींकडून संन्यास दीक्षा स्वीकारली. गुरुदेवांनी नरहरींचे दीक्षांत नृसिंह (नरसिंह) सरस्वती असे ठेवले. त्या क्षणापासून नरहरी 'श्रीनृसिंह सरस्वती' या लोकविख्यात नावाने प्रसिध्द पावले.

संन्यास ग्रहणानंतर श्रीगुरु (श्रीनृसिंह सरस्वती) काशीत काही काळ थांबले. तेथे ज्ञानदानाचे कार्य करुन त्यांनी जिज्ञासू व मुमुक्षूंना परमार्थाचा मार्ग दाखविला. त्यानंतर बरोबर मुनीजनांचा मेळा घेऊन बद्रीकेदारला आले. तेथे बद्रीनाथाचे (बदरीनाथ) दर्शन घेऊन आणि सुमेरुला सव्य प्रदक्षिणा घालून ते गंगासागरी आले. तेथून गंगातटाक यात्रा करीत प्रयाग येथे आले. या प्रयागातील निवासात माधव नामक एका ब्राह्मणाने श्रीगुरुंकडून दीक्षा घेतली. हे त्यांचे प्रथम शिष्य. श्रीगुरुंनी त्याचे नाव माधव सरस्वती असे ठेवले. यांच्यावर श्रीगुरुंची असीम प्रीती झाली होती. याच ठिकाणी माधव सरस्वतींशिवाय बाळकृष्ण सरस्वती, कृष्ण सरस्वती, उपेंद्र सरस्वती, सदानंद सरस्वती, ज्ञानज्योती सरस्वती आणि सिध्द सरस्वती असे आणखी सहा थोर शिष्य श्रीगुरुंना लाभले. या सात शिष्यांना सोबत घेऊन ते दक्षिणेकडे वळले, आणि आपल्या शिष्यवृंदासह करंजनगरात परत आले.

वयाच्या नवव्या वर्षी श्रीगुरुंनी घर सोडले आणि तीस वर्षांनंतर ते आपल्या घरी परत आले होते. त्यांच्या पुनर्दर्शनाने माता-पित्यांना अपार आनंद झाला. श्रीगुरुंचे तेजस्वी रुप पाहून ग्रामस्थांना त्यांच्याविषयी श्रध्दाभाव निर्माण झाला. श्रीगुरुंनी जेव्हा घर सोडले होते तेव्हा त्यांना दोन जुळे भाऊ होते. त्यानंतर प्रदीर्घ काळात अंबाभवानीला आणखी दोन पुत्र व एक कन्या (रत्नाई तिचे नाव) झाली होती. ही पाचही भावंडे आता मोठी झाली होती. तेजःसंपन्न आणि परमज्ञानी जेष्ठ बंधूला पाहून त्या अपरिचित भावंडांच्या मनात परम आदर निर्माण झाला. आपल्या घरातील व गावातील सर्वांना अल्प सहवास देऊन श्रीगुरुंनी करंजनगर सोडले व ते त्र्यंबकेश्वरला आले. तेथील गोदावरीचे उगमस्थान पाहून आणि नाशिक क्षेत्रातील सारी तीर्थे वंदून गोदावरीची तटाकयात्रा सुरु केली. या वाटचालीत श्रीगुरु मंजरिका गावी पोहोचले. तेथे माधवारण्य नामक एक मुनी वास्तव्य करुन होते. ते नरसिंहाचे उपासक होते. त्यांच्या हृदयी नरसिंहाचे जे ध्यान मनोमनी दृढ झाले होते तेच त्यांना श्रीगुरुंच्या दर्शनात जाणवले. आपले परमोपास्य दैवतच आपल्या समोर प्रकट झाले आहे अशी त्यांची भावना होऊन ते श्रीगुरुंना सर्वस्वाने शरण गेले. त्यांचा हा उत्कट भाव पाहून श्रीगुरु मनोमनी संतोष पावले आणि त्यांनी माधवारण्यांना आत्मबोध करुन परमसिध्दीचा आशिर्वाद देऊन ते पुढे वासर ब्रह्मेश्वर (हे स्थान नांदेड जिल्ह्यात गोदावरी काठी आहे) येथे गेले.

वासर ब्रह्मेश्वर ठिकाणी गोदावरीच्या पात्रात स्नान करीत असताना श्रीगुरुंना एक ब्राह्मण पोटदुःखीच्या व अन्नद्वेषाच्या विकाराने त्रासून आत्महत्या करताना दिसला. श्रीगुरुंनी त्याला शिष्यांकरवी बोलावून घेतले आणि त्याची व्यथा दूर करण्याचे आश्वासन दिले. इतक्यात गंगास्नानासाठी एक ब्राह्मण ग्रामाधिकारी तेथे आला.

श्रीगुरुंचा संन्यासवेश पाहून त्याने जवळ येऊन श्रीगुरुंना प्रणिपात केला. श्रीगुरुंनी त्याला नाव-गाव विचारले. त्याचे नाव सायंदेव. आपस्तंब शाखेतील कौंडिन्य गोत्राचा. मूळ कडगंचीचा (कडगंची हे गाव गाणगापूरापासून १३ मैलावर आहे.) राहणारा. परंतु त्याने उदरपूर्तीसाठी यवनसेवा पत्करलेली असल्याकारणाने ग्रामाधिकारी म्हणून एका वर्षापूर्वी त्याची वासर ब्रह्मेश्वरीला नेमणूक झाली होती.

श्रीगुरुंनी पोटदु:खी असलेल्या ब्राह्मणास सायंदेवाजवळ आणून विशिष्ट औषधयोजना व अन्नपथ्य करावयास सांगितले. श्रीगुरुंच्या तेज:प्रभावाने सायंदेव भारावून गेला होता. त्याने त्यांना आपल्या घरी भिक्षा स्वीकारण्याची विनंती केली. त्याच्या विनंतीला मान देऊन श्रीगुरु शिष्यांसह त्याच्या घरी गेले आणि तेथे जठरव्यथा झालेल्या ब्राह्मणास पंक्तीस बसवून त्याची जठरव्यथा संपविली. परंतु त्याचवेळी सायंदेवाची हृदयव्यथा श्रीगुरुंची कृपा शोधू लागली;

माझे वंशपरंपरी । भक्ती द्यावी निर्धारीं ।
इहसौख्य पुत्रपौत्री । उपरी द्यावी सद्‌गती ।।
ऐसी विनंती करुनी । पुनरपी विनवी करुणावचनी ।
सेवा करितों द्वारयवनी । महाशूर क्रूर असे ।।
प्रतिसंवत्सरी ब्राह्मणांसी । घात करितो जीवेसीं ।
याचिं कारणें आम्हांसी । बोलवितसे मज आजि ।।
जाता तया जवळी आपण । निश्चये घेईल माझा प्राण ।
भेटी जाहली तुमचे चरण । मरण कैंचे आपणांसी ।।

सायंदेवाची ही व्यथा प्रकट होताच श्रीगुरुंनी त्याच्या मस्तकी अभयकर ठेवून म्हटले, तू निर्भयपणे बादशहाकडे जाऊन ये. तू परत येईपर्यंत मी येथेच थांबतो. त्यांच्या आदेशाप्रमाणे सायंदेव बादशहाकडे गेला. चमत्कार असा झाला, सायंदेवाचा घात करण्याऐवजी त्याला वस्त्रभूषणे देऊन बादशहाने सत्कार करुन त्याची रवानगी केली. या चमत्कारामुळे सायंदेवाच्या हृदयात श्रीगुरुंची चरणकमळे कायमची स्थीरावली. मात्र श्रीगुरु निरोप घेताच तो गुरु वियोगाच्या कल्पनेने अत्यंत कासावीस झाला तेव्हा श्रीगुरुंनी त्याला आश्वासन दिले;

कारण असे आम्हां जाणे । तीर्थे असती दक्षिणे ।
पुनरुपि तुम्हां दर्शन देणे । संवत्सरी पंचदशी ।।
आम्ही तुमचे गांवासमीपत । वास करु हे निश्चित ।
कलत्र पुत्र इष्ट भ्रात । मिळोनि भेटा तुम्ही आम्हां ।।

अशा तऱ्हेने सायंदेवाचा निरोप घेऊन श्रीगुरु परळी वैजनाथाकडे आले. पदोपदी श्रीगुरुंचा महिमा वाढत होता, तसा शिष्यांचा मोठा समुदाय वाढू लागला. याची श्रीगुरुंना तीव्र जाणीव होऊन त्यांनी सर्व शिष्यांना तीर्थभ्रमण करण्याचा आदेश दिला आणि स्वत: अज्ञातपणे एक वर्षभर वैजनाथास राहिले. या वर्षभराच्या काळात श्रीगुरुंच्या सेवेला केवळ सिध्द सरस्वती हे एकमेव शिष्य होते.

येथे असताना एक गुरुद्रोही ब्राह्मणास श्रीगुरुंनी गुरु महात्म्य कथन करुन त्याचे मन विकल्परहित करुन आपल्या गुरुंकडे परत पाठविले. तेथील एका वर्षाच्या अज्ञातवासानंतर श्रीगुरु भिलवडीला आले. येथे भुवनेश्वरी या शक्तिदेवतेचे स्थान असल्यामुळे एक सिध्दस्थान म्हणून त्याचे महिमान मोठे होते. श्रीगुरुंनी येथे चातुर्मास निवास केला त्यामुळे भिलवडीचे महिमान शतगुणित झाले. याच ठिकाणी भुवनेश्वरी पुढे करवीर (कोल्हापूर) क्षेत्रातील एका मंदबुध्दी ब्राह्मणाने विद्याप्राप्तीसाठी धरणे धरले होते. घरीदारी त्याची निर्भत्सना होत असे. जननिंदेने त्रस्त होऊन त्याने देवीचरणांजवळ धरणे धरले होते. परंतु त्याला देवीची कृपा होईतोवर वाट पाहण्या इतका धीर नव्हता. त्याने एका धारदार शस्त्राने स्वतःची जीभ कापून घेतली आणि मनात संकल्प केला, आता माझी इच्छा पुरविली नाहीस तर माझे मस्तक छाटून तुझ्या चरणी वाहीन. देवी साक्षात प्रगट झाली आणि तिने त्या ब्राह्मणाला सांगितले, पैलतीरावर औदुंबरातळी एक तपोनिधी आहे. त्याच्याकडे जा. तो तुला बुध्दीचे देणे देईल.

देवीच्या आज्ञेप्रमाणे लागलीच त्या ब्राह्मणाने कृष्णेच्या प्रवाहात उडी घेतली आणि पोहत तो औदुंबरतळी येऊन पोहोचला. श्रीगुरुंच्या चरणी पूर्ण शरणागती पत्करुन विनयाने त्यांच्या चरणी मस्तक ठेवले. त्याचा उत्कट भक्तिभाव पाहून श्रीगुरुंना संतोष झाला. त्यांनी अतीव प्रमाने उठवून त्याच्या मस्तकी आपला वरदहस्त ठेवताच त्या मंदबुध्दी ब्राह्मणाला जीव्हा फुटून सर्व ज्ञान प्राप्त झाले.

चातुर्मास संपल्यावर श्रीगुरु कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर आले. श्रीगुरुंच्या आगमनापूर्वीच हे स्थान तीर्थरुप झालेले होते. अद्‌भूत सृष्टीसौंदर्याची क्रीडाभूमी आणि साधुसंतांची तपोभूमी पाहून श्रीगुरुंचे तपःप्रिय हृदय तेथेच विसावले. बरोबर एक तप श्रीगुरु या स्थानी राहिले आणि त्यांच्याच नावाने या स्थानाला 'नरसोबाची वाडी (नृसिंहवाडी)' म्हणून ओळखले जाऊ लागले.

भिलवडीप्रमाणेच येथेही श्रीगुरु विरुध्द दिशेला अर्थात गाव एका तीरावर आणि निवास दुसऱ्या तीरावर अशीच परिस्थिती होती. कृष्णेचा वेगवान प्रवाह, पंचगंगेशी झालेला तिचा प्राप्तीसंगम, तीरावरील प्रसन्न वृक्षसंपदा, त्यातून संचारणारा गंधवाही वारा आणि वृक्षपर्णात दडी घेऊन चाललेले पक्षांचे कुंजन, सारे काही विलोभनीयच होते. श्रीगुरु या अतीव प्रसन्न वातावरणात मनन-चिंतन करीत आणि माध्यान्हि पैलतीरावरील अमरापूर गावात भिक्षेसाठी जात असत. आपल्या बारा वर्षांच्या निवासात श्रीगुरुंनी अनेक आर्तांची मनोइच्छा पूर्ण केली.

अमरापूर येथे योगी बनून सिध्दजीवन व्यतीत करुन एक तपानंतर श्रीगुरु गाणगापूर क्षेत्री आले. तेथे त्यांनी दोन तपांएवढा काळ वास्तव्य केले.

## <u>स्वामी नृसिंह सरस्वतींचे गाणगापूरी आगमन.</u>

दोन सरीतांच्या संगमाविषयी श्रीगुरुंच्या हृदयात विशेष प्रीती होती. त्यांच्या १२ वर्षांच्या कृष्णा-पंचगंगा संगमावरील प्रदीर्घ वास्तव्यावरुन कळून चुकते. तेथून स्वामी निघाले ते भीमा-अमरजा संगमतळी श्रीक्षेत्र गाणगापूरला येऊन पोहोचले. आणि येथे स्वामी दोन तपाइतका काळ राहिले.

गाणगापूर क्षेत्र ही एक वरदभूमी आहे. भीमा-अमरजा सरितांचा सुंदर संगम, तेथील अश्वत्थवृक्ष, प्रयागा सारखे

क्षेत्र आणि अष्टतीर्थे, इत्यादी उत्तमोत्तम गोष्टी या क्षेत्रात असल्यानेच तेथील तीर्थांचा महिमा भक्तांच्या उध्दारासाठी प्रकट करावा म्हणूनच श्रीगुरु गाणगापूरी आले. जरी गुप्तवेशाने त्यांचा तेथे वास असला तरी ईश्वरी तेज प्रकाशित झाल्याशिवाय राहणार होते का? त्यांचा महिमा आपोआप प्रकट झाला. तेथे संगमावर निवास करुन मध्यान्ही गाणगापूरात भिक्षेला येण्याचा क्रम सुरु केला.

गाणगापूर हा गाव ब्राह्मणांना अग्रहार मिळालेला होता. तेथे ब्राह्मणांची शंभरावर घरे होती. या ब्राह्मणांमध्ये अनेक वेदपाठक 'श्रौती' होते. परंतु श्रीगुरु फक्त एका गरीब ब्राह्मणाकडे भीक्षेसाठी जात. हा ब्राह्मण एका वांझ म्हशीवरुन मळ्यासाठी खारी माती वाहण्याचे काम करीत असे, त्यासाठी त्याला भाडे मिळत असे आणि त्या पैशांवर त्याच्या कुटुंबाचा उदर निर्वाह चालत असे. ज्या दिवशी म्हशीचे भाडे मिळत नसे, त्या दिवशी तो ब्राह्मण गावात कोरडी भिक्षा मागून आणे. अशा या ब्राह्मणाच्या घरी श्रीगुरु भिक्षेसाठी गेले. इतर विद्वान ब्राह्मणांना त्याचे वैषम्य वाटले. सद्‌गुरुंची दृष्टी भेदभाव करीत नाही. तर ती परमार्थ आणि खऱ्या भक्तांना कृतार्थ करण्याची असते. त्या दिवशी भाडे नसल्याने म्हैस दारातच बांधली होती आणि ब्राह्मण गावात भिक्षेसाठी गेला होता.

दारात येऊन सद्‌गुरुंनी भिक्षेसाठी आवाज देताच ब्राह्मण पत्नी 'पतिव्रता' (हे तिचे नाव आहे) बाहेर आली आणि सद्‌गुरुंना पाहून नमस्कार करुन म्हणाली, गृहस्वामी भिक्षेसाठी गेले आहेत ते इतक्यात येतील. तोपर्यंत आपण बसावे. श्रीगुरु हसून पाटावर बसले आणि तिला म्हणाले, दारात म्हैस असताना भिक्षा म्हणून दूध का देत नाहीस? घरात धान्य नाही असे सांगून उगीच चाळवण्या का दाखवतेस? तेव्हा पतिव्रतेने नमस्कर करुन सांगितले, म्हैस वांझ आहे. तिचे दात पडलेले आहेत. ती गर्भ धरीत नसल्यामुळे रेडा म्हणून तिला पोसत असतो. माती वगैरे वाहण्यासाठी तिचा उपयोग करुन उदर निर्वाह करतो. आणि म्हणूनच तिच्या नाकात वेसण घातलेली आहे.

श्रीगुरु म्हणाले, उगा काही तरी मिथ्या गोष्टी करु नकोस. जा, चटकन जाऊन धार काढ आणि आम्हाला दुधाची भिक्षा देऊन मोकळे कर. त्यांचे बोलणे ऐकूण पतिव्रतेने चटकन लाकडाचे पाळे घेऊन दुध काढण्यास गेली. श्रीगुरुंचे वचन कामधेनूप्रमाणे झाले व वांझ म्हशीला दूध आले. दोन पायली दूध भरले. तिने लागलीच घरात आणून चुलीवर तापवले व थोडे निवल्यावर श्रीगुरुंना भिक्षा केली. श्रीगुरुहि दूध घेऊन आपल्याला दुसरीकडे जायचे आहे असे म्हणून आनंदाने घरांतून बाहेर पडतांना त्या ब्राह्मणीला प्रेमपूर्वक आशिर्वाद दिला, ''तुझ्या घरी अखंड लक्ष्मीचा वास राहिल. तुम्हांला पुत्रपौत्र होऊन घर संपन्न राहिल''!

श्रीगुरु निघून गेल्यावर घरमालक ब्राह्मण घरी आला. पतिव्रतेने आनंदाने सर्व घटना कथन करताच त्याला फार आश्चर्य वाटले. हे संन्याशी नसून साक्षात ईश्वर आहेत असे पक्के समजला आणि तो ब्राह्मण पत्नीसहित हाती आरती घेऊन संगमावर गेला आणि भक्तिभावाने, विधिपूर्वक श्रीगुरुंची पूजा-आरती केली. तेव्हा अती संतुष्ट होऊन श्रीगुरुंनी पुन्हां आशिर्वाद दिले. सद्‌गुरुंच्या आशिर्वादाने त्या ब्राह्मणाला (उभयतांना) कन्या-पुत्र, स्थिर लक्ष्मी व पूर्णायुष्य प्राप्त झाले.

ही कथा ऐतिहासिक आहे. (गुरुचरित्रकार या कथेची तुलना विदुराशी करतात. ज्याप्रमाणे हस्तीनापुरांत

पांडवांच्या वतीने शिष्टाई करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण आले असताना दुर्योधनाच्या राजवाड्यात न जाता विदुराच्या घरी गेले होते. त्याप्रमाणे श्रीगुरु गाणगापूरातील विद्वान, सधन ब्राह्मणांच्या घरी न जाता दरिद्री ब्राह्मणाच्या घरी गेले.) ज्ञानोत्तर भक्तीची आहे. केवळ बुध्दीगम्य ज्ञान हे सात्विक मनोवृत्तीशिवाय कोरडे रखरखीत आणि वांझोटे असते, ते म्हशीच्या रुपाने या कथेत गुंफले आहे. बुध्दिगम्य ज्ञान हे जेव्हा भक्तीत रुपांतरीत होते तेव्हा ते ज्ञान फलद्रूप होते. ज्ञानाची फलद्रूपता म्हणजे वांझ म्हैस दुभती झाली. या कथेतून एक महत्वाचा भाग प्रकट होतो, दारिद्र्य असले तरी अतिथी सत्काराचे कर्म ब्राह्मणीने टिकविले. तसे नसते तर त्या पतिव्रतेने आपला धनि घरी नाही व घरातहि भिक्षा घालण्यास काही नाही असे सांगून श्रीगुरुंची बोळवण केली असती. त्यात तर खोटेपणा कुठेही नव्हताच. वस्तुस्थितीहि तशीच होती. पण इतके असूनसुध्दा पतिव्रतेने भक्तीभावाने श्रीगुरुंना बसवून घेतले. गृहस्थाश्रमाचा धर्म निभावला. तिच्या ह्या आचरणावरच श्रीगुरु संतुष्ट झाले. शिवाय 'धार काढून आण' या शब्दावर इतकी वर्षे म्हैस वांझ आहे हे माहित असूनही त्याच भक्तिभावाने ती चटकन पाळे घेऊन दूध काढण्यास गेली. या तिच्या भावभक्तीवर, विश्वासावर श्रीगुरु आणखी संतुष्ट झाले आणि वांझ म्हशीला त्यांनी अखंड दुभती केले.

<u>श्रीगुरु गाणगापूर गावात वास्तव्यासाठी आले.</u>

वांझ म्हैस दुभती झालेल्याची हकिकत त्या ब्राह्मणाने प्रकट केली, त्याचे कारण असे घडले, दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे लोक त्या ब्राह्मणाच्या घरी माती वाहण्यासाठी भाड्याने म्हैस नेण्यास आले असता तो ब्राह्मण म्हणाला, आता भाड्याने म्हैस मिळणार नाही. कारण ती आता दुभती झाली आहे असे म्हणून त्याने दुधाने भरलेली भांडी लोकांना दाखवली. सर्वांना नवल वाटले. कालपर्यंत नाकात वेसण घातलेली म्हैस अचानक दुभती कशी झाली ? ती तर व्यालीही नाही. मग अचानक हे कसे घडले ? तेव्हा त्या ब्राह्मणांने आदल्या दिवशी घडलेला सर्व वृतांत त्या लोकांना कथन केला. लोकांनी ही हकिकत गावचा मुख्य अधिकारी (ग्रामाधिपती) याच्या कानावर घातली. त्यालाहि आश्चर्य वाटले म्हणून ग्रामाधिपती त्या ब्राह्मणाच्या घरी आला. त्याच्याकडून समक्ष ऐकल्यावर त्याची खात्री पटली की हे सामान्य संन्याशी नसून त्रिमूर्तीचे अवतार आहेत. लागलीच तो ग्रामाधिपती आपल्या बायका मुलांसह आपला लवाजमा घेऊन श्रीगुरु नृसिंह स्वामींच्या दर्शनासाठी संगमावर आला.

श्रीगुरुंना साष्टांग नमस्कार घालून त्याने भक्तिभावाने त्यांची स्तुती केली. आपणच त्रिमूर्ती आहात. जगाच्या कल्याणसाठी अवतार धारण केला आहात. आम्ही मायेच्या वेष्टणात गुरफटून अंधारात बुडालो आहोत, तरी आपण आमचा उध्दार करावा.

ग्रामाधिपतीची ही विनंती ऐकून श्रीगुरुंना संतोष झाला. ते म्हणाले, आम्ही तापसी-संन्याशी, अरण्यात, कोठेही राहणारे. आपण बायका-मुले हा लवाजमा घेऊन आमच्या कडे येण्याचे कारण काय ? तेव्हा ग्रामाधिपतीं हात जोडून नम्रतेने म्हणाला, स्वामी, आपण सर्वांचे तारक आहात. मग आपण अरण्यात कां रहावे ? भक्तवत्सल म्हणून आपले ब्रीद आहे. भक्तांच्या उध्दारासाठीच आपण अवतार धारण करता आणि भक्तांच्या मनाप्रमाणेच वागता. मग आपला वास अरण्यात का ? म्हणूनच आपण हे गाणगापूर महाक्षेत्र आपल्या वास्तव्याने पावन करण्यासाठी गावात येऊन

रहावे. तेथे मठ स्थापन करावा. अशी नम्र विनंती करुन ग्रामाधिपतीने श्रीगुरुंचे चरण धरले.

श्रीगुरुंनी संतुष्ट होऊन म्हटले, जशी तुझ्या मनात भक्ति असेल तसे कर. ते ऐकून ग्रामाधिपतीस अत्यंत आनंद झाला. त्याने श्रीगुरुंना पालखीत बसवून वाजत्री वाजवत, गीत-वाद्यांचा मंगलघोष करीत, छत्रचामरे ढाळत मोठ्या प्रेमाने गावात आणले. नगरवासी स्त्री-पुरुषांनी आरती ओवाळून श्रीगुरुंचे स्वागत केले आणि श्रीगुरु गावात प्रवेश करते झाले. त्याचवेळी एक विस्मयकारक घटना घडली.

त्या गावात पश्चिमदिशेला एक मोठा पिंपळ वृक्ष होता आणि त्याचे जवळच एक मोठे घर ओस पडले होते. त्या पिंपळावर एक भयानक ब्रह्मराक्षस राहात होता. अत्यंत क्रूर व लोकांना ठार मारुन खात असे. त्यामुळे सर्वांना त्याचे मोठे भय वाटत असे. श्रीगुरुंची पालखी त्या पिंपळ वृक्षाजवळ येताच तो ब्रह्मराक्षस धावतच त्यांचे जवळ आला आणि श्रीगुरुंचे चरण पकडून म्हणाला, स्वामी मी घोर अंधारात बुडालो आहे. मला तारा. आपण सर्वांवर कृपा करणारे आहात. आपण माझा उध्दार करा, असे म्हणून तो ब्रह्मराक्षस श्रीगुरुंच्या चरणांवर लोळू लागला. श्रीगुरु त्याला म्हणाले, त्वरीत संगमावर जा आणि स्नान कर! तू लागलीच मुक्त होशील. तुला पुनर्जन्म नाही. श्रीगुरुंचे हे वचन ऐकून त्या ब्रह्मराक्षसाने संगमावर धाव घेतली. तेथे स्नान करताच तो आपल्या शरीराचे बंधन सोडून मुक्त झाला. ही घटना पाहून सारी मंडळी आश्चर्यचकित झाली. त्यांची खात्री पटली की श्रीगुरु हे त्रैमूर्तीचेच अवतार आहेत. या गोष्टीचा गाजावाजा होऊन श्रीनृसिंह स्वामींची सर्वत्र कीर्ति व प्रसिध्दी झाली.

ही कथाही ऐतिहासिक आहे. पूर्ण विश्वास अर्थात भक्ति आणि मनाची पूर्ण शरणागती पत्करली असता 'भक्तवत्सल' भगवंत कोणीही कितीही पापी असला तरी त्याचा उध्दार करतात. त्याचप्रमाणे श्रीगुरुंनी उच्चारलेले वचन, आश्वासन हे तात्काळ परिणाम दाखवते, फलप्राप्ती करुन देते, हे या कथेवरुन स्पष्ट होते. थोडक्यात श्रीगुरुंचा महिमा कळून येतो.

भगवत् गीतेतील अठराव्या अध्यायातील ६६वा श्लोक सांगतो,

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।<br>
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिण्यामि मा शुचः।।

भगवंत म्हणातात, सर्व प्रकारचे धर्म अर्थात भगवद् प्राप्तीची सर्व साधने सोडून मला एकट्याला शरण ये. मी तुला सर्व पापांतून मुक्त करीन. भिऊ नकोस. हे प्रत्यक्ष भगवंताचेच वचन आहे. हेच त्या ब्रह्मराक्षसाच्या बाबतीत घडले.

अनेक वर्षे त्या वाईट योनीत राहिल्यामुळे त्या योनीला (ब्रह्मराक्षस) कंटाळला होता. या योनीतून कशी व केव्हा सुटका होईल याची तळमळ लागली होती. लोकांना बाह्यदर्शी क्रूर, भयानक दिसत असला तरी आतून त्याला पश्चाताप होत होता. म्हणूनच तो ब्रह्मराक्षस श्रीगुरुंना मनापासून शरण गेला होता आणि श्रीगुरुंनाहि त्याची आंतरिक अवस्था समजली होती. त्यात श्रीगुरु निग्रहानुग्रह असल्याने तात्काळ त्यांनी ब्रह्मराक्षसाला मुक्ती दिली. अर्थात त्या भयंकर योनीतून सुटका केली ती कायमची. म्हणूनच श्रीगुरु शेवटचे वाक्य म्हणाले, तुला पुनर्जन्म नाही.

या कथेवरुन आणखी एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी, जरी पिशाच्च योनी असली तरी पूर्व संचिताप्रमाणे काही अंशात्मक सात्विक भाव असतोच, आणि तो अतिसूक्ष्मपणे नांदत असतो. तो फक्त अवतारी विभूतींनाच दिसतो. ह्या सात्विक भावाने शरण आलेल्या ब्रह्मराक्षसाला श्रीगुरुंनी मुक्त केले. अध्यात्मशास्त्रात भक्तिमार्ग हे अत्यंत श्रेष्ठ साधन आहे. भक्तिबरोबर पूर्ण शरणागती प्रकट झाली की तात्काळ श्रीगुरुंची कृपा प्राप्त होते.

## त्रिविक्रम भारतीस श्रीगुरुंनी विश्वरुप दाखविले.

गाणगापूर स्थानाजवळच वसलेले 'कुमसी' हे गाव. तेथे त्रिविक्रम भारती नामक एक तपस्वी होते. तीन वेदांचा त्यांचा अभ्यास त्यात ते नित्य नृसिंहाची माणसपूजा करीत असत. श्रीगुरुंची कीर्ति त्यांच्या कानी गेली. चतुर्थाश्रम घेऊन असले खेळ करणे हा दांभिकपणा आहे, असे त्यांना श्रीगुरुंविषयी वाटून मनोमनी त्यांची निंदा केली. श्रीगुरुंच्या ही गोष्ट लक्षात आली. त्यातूनच एक अपूर्व कथानक घडून आले.

श्रीगुरुंनी ग्रामाधिपतीस म्हटले, मला आजच कुमसी ग्रामी त्रिविक्रम भारतीला भेटायला जायचे आहे. तो माझी निंदा करतो. ग्रामाधिपतीने लागलीच पालखी शृंगारुन त्यात श्रीगुरुंना बसविले आणि थाटामाटात वाजंत्री वाजवित मोठ्या लवाजम्यासह कुमसी ग्रामी आणले. त्याचवेळी भारती नृसिंह देवतेची मानसपूजा करीत बसले होते. पण त्यांचे चित्त स्थिर होईना आणि आपल्या उपास्य देवतेचे दर्शन होत नव्हते. आज आपले उपास्य दैवत प्रकट का होत नाही ? याची घोर चिंता लागली असतानाच त्यांना श्रीगुरु दुरुन येताना दिसले. त्यांच्या बरोबर असलेली सारी मंडळी दंडधारी असल्याचे व प्रत्येकात एकच नरहरीचे रुप विराजमान असल्याचे दिसू लागले. ते पाहून त्रिविक्रम भारतींना आश्चर्य वाटले. आणि ते पळतच श्रीगुरुंकडे गेले आणि साष्टांग नमस्कर करुन त्यांचे चरण धरले. पुन्हा तेच एकच रुप भारतींना दिसू लागले. भ्रमीत अवस्थेत श्रीगुरुंना म्हणाले, अविद्येने, मायेने वेष्टित झालो म्हणून आपले निज स्वरुप मला ओळखता येत नाही. तरी नेहमीचे रुप धारण करुन मला दर्शन द्यावे. तुम्ही त्रयमूर्ती आहात एवढी एकच खूण मला ओळखता येते. तुम्हीच माझे उपास्य दैवत (नृसिंहमूर्ती) असून हे संन्याशी रुप धारण केले आहे. अनेक काळाची माझी मानसपूजा करीत आलो ती आज फलद्रूप होऊन साक्षात दर्शन घडले. सर्व विश्वात आपलेच चिन्मय रुप भरुन उरलेले आहे असा बोध मला व्हावा.

त्रिविक्रम भारतीच्या स्तुतीने श्रीगुरुंना संतोष झाला आणि त्यांनी नेहमीच्या एका रुपात त्यांना दर्शन देऊन म्हणाले, रोज आमची 'दंभ-दंभ' म्हणून निंदा करतोस म्हणून तुझ्यापाशी आलो. तेव्हा आता मला दंभ म्हणजे काय ते सविस्तर सांग. श्रीगुरुंचे हे बोलणे ऐकून भारती अनन्यभावे त्यांना शरण जाऊन क्षमा याचना करीत म्हणाले, या अज्ञानी, मायेने वेढलेल्या अज्ञानाला श्रीगुरुंनीच क्षमा करुन या सेवकाचा उध्दार करावा. आपल्या भेटीने मी आज कृतार्थ झालो. जसा श्रीकृष्ण विदुराच्या घरी गेला तसे आपण कृपावंत होऊन माझ्याकडे आलात. आता आपण मला या भवसागरातून पार करुन पैलतटावर न्यावे ! भक्तवत्सल म्हणून आपली कीर्ति आहे त्याची आज प्रचिती आली. अशा तऱ्हेची स्तुती ऐकून श्रीगुरुंना फार संतोष झाला आणि त्यांनी भारतींना वरदान दिले. तुला सद्‌गति मिळेल आणि पुनर्जन्म नाही. तुला परमार्थ साध्य होऊन ईश्वराशी एकरुप होशील. असा वर देऊन श्रीगुरु गाणगापूरी परतले. मात्र त्रिविक्रम भारतींना कुमसी गावात राहण्यास सांगून ईशावास्योपनिषदांतील आदेशा प्रमाणे ईश्वरी

इच्छेने जे प्राप्त होईल ते त्यागाने भोगण्याचा उपदेश केला. त्यामागे श्रीगुरुंची पुढील काही योजना होती. किंबहुना त्रिविक्रममुनींच्या प्रारब्धात काही कर्म (इतरांना मार्गदर्शन व्हावे म्हणून) घडावे अशी श्रीगुरुंची इच्छा होती आणि पुढे तसे घडलेही.

लौकिक अर्थाने त्रिविक्रम भारती वेदज्ञ होते. म्हणूनच ते ज्ञानी होते. पण त्यात त्रुटी होती. संन्यासाश्रमाच्या बाह्य आचारांबद्दल आग्रह धरताना अनवधानाने त्यांच्याकडून श्रीगुरुंची निंदा घडली. परंतु भक्तवत्सल श्रीगुरुंनी स्वतः त्यांचेकडे जाऊन त्यांना विश्वरुप दर्शन दाखविले. त्यांना त्यांची चूक समजावून सांगितली. त्यांचेवर पूर्ण कृपा करुन त्यांचे जीवन कृतार्थ केले.

<u>गर्वाने उन्मत्त झालेल्या ब्राह्मणांना शाप व पतिताचा उध्दार.</u>

मागे सायंदेवाच्या निमित्ताने ज्या 'महाक्रूर' आणि 'ब्राह्मणद्वेषी' म्लेंच्छ राजाचा उल्लेख आला, त्या राजाच्या वर्तनावर प्रकाश टाकणारी आणि हिंदू समाजाच्या दृष्टीने चिंतनीय असणारी घटना नंतर घडून आली. या यवन राजाने स्वधर्म आणि स्वप्रतिष्ठा विकणाऱ्या अनेक ब्राह्मणांनांकरवी हिंदूधर्म खंडन करण्याचा विलक्षण डाव टाकला होता. या त्याच्या डावाला बळी न पडणाऱ्या ब्राह्मणांवर दहशतीची तलवार नेहमी टांगती असे. याच जातीच्या वेदविदांपैकी दोन ब्राह्मण यवन राजाकडे आले. अन्य ब्राह्मणांनी त्यांच्या विद्वत्तेचा बहुमान केल्यावर यवन राजाने त्यांना मोठा बहुमान केला, आणि त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना शास्त्रचर्चेची जयपत्रे मिळविण्यासाठी रवाना केले. द्रव्य पुरस्काराच्या मोहाने धुंद झालेले आणि शाब्दिकतेचा अभिमान बाळगणारे ते दोन ब्राह्मण पंडित हिंडत हिंडत (जयपत्रे मिळवित) कुमसी ग्रामी आले. तेथे त्रिविक्रम भारतींना वादासाठी आव्हान केले.

श्रीगुरुंचा आत्मबोध प्राप्त झालेले त्रिविक्रमभारती आता दंभरहित झाले होते. त्यामुळे जय-पराजयाच्या फसव्या अभिमानाला त्यांना बळी पडायचे नव्हते. परंतु ते उन्मत्त पंडित त्रिविक्रमभारतींचे ऐकण्यास तयार नव्हते. अंती निरुपाय होऊन त्या दोन पंडितांना घेऊन ते गाणगापूरला श्रीगुरुंकडे घेऊन आले. वास्तविक त्या दोघांचे परिपत्य करण्याचे सामर्थ्य त्रिविक्रमभारतींकडे निश्चितच होते. तरीसुध्दा त्यांनी त्या दोघांना घेऊन श्रीगुरुंकडे आले. कारण श्रीगुरु हे प्रत्यक्ष ईश्वर आहेत ही त्यांची खात्रीपूर्वक पूर्ण श्रध्दा होती. ईशावास्यातील उपदेशाप्रमाणे त्यांनी कुमसी येथेच रहावे असा श्रीगुरुंचा आदेश होता. त्यामुळे आपल्या वैयक्तिक आणि एकंदरीत जगात जे जे काही घडणार तें तें सर्व ईश्वरी इच्छेनेच घडणार याबद्दल त्यांची खात्री होती. 'मी त्रिविक्रम' त्या ब्राह्मणाचा पारिपत्याचा कर्ता असणार नाही याची त्यांना पूर्ण खात्री होती. कारण चालता बोलता, सगुणावतारी ईश्वर सद्‌गुरुंच्या रुपाने गाणगापूरास विराजमान होता.

त्या दोन ब्राह्मण पंडितांचे एकच म्हणणे होते, 'आम्ही सर्व वेद जाणतो, आमच्या सारखे दुसरे कोणीच नाहींत आणि तुम्ही आमच्या बरोबर वाद करा नाहीतर जयपत्र द्या.'

श्रीगुरुंसमोर आल्यानंतर त्यांनी हेच सांगितले. याचे कारण ते नुसते समाजात शेखी मिरविण्यास उत्सुक नव्हते तर त्यांत ते धन्यता मानीत होते. म्हणजे ते दोघे उन्मत, घमेंडखोर आणि पक्के ढोंगी, स्वार्थी व अप्रामाणिक होते.

हे सर्व ओळखून सुध्दा श्रीगुरुंनी त्यांच्याशी अतिशय कृपाळूपणे एखाद्या हट्टी मुलास प्रेमाने समजावतात त्याप्रमाणे त्या दोघांशी बोलणे केले. तुम्ही गर्व करु नका, त्याने शेवटी अध:पात होईल असे सूचित करुन आपल्याला सर्व वेदांचे ज्ञान आहे हे म्हणणे कसे चुकीचे आहे हेहि त्यांना दाखवण्याचा प्रयत्न केला. आणि त्यासाठी वेद अनंत आहेत, त्यांचे पूर्ण ज्ञान कोणासच नाही, हे पटवून देण्यासाठी श्रीगुरुंनी वेदांच्या विस्ताराचे वर्णन केले. परंतु राजाश्रयाने उन्मत्त झालेले ते दोन ब्राह्मण कितीहि समजावून सांगितले तरी ऐकत नाहीत हे पाहून आता त्यांचे पारिपत्य करायलाच हवे म्हणून त्रिविक्रम भारतींकडून वा आपण स्वतः त्यांचे पारिपत्य न करता श्रीगुरुंनी रस्त्यावरुन त्यावेळी सहज जात असलेल्या मातंगाला बोलावून घेतले. त्याला रेषा ओलांडायला लावल्या. त्याचे सात जन्मांपूर्वीचे संस्कार जागृत करुन त्याच्यावर भस्माचे प्रोक्षण करुन त्याला 'ब्राह्मण' बनविले आणि त्याला राजदरबारातून आलेल्या त्या दोन घमेंडी ब्राह्मणाशी चर्चा करण्यास सांगितले. श्रीगुरुंच्या स्पर्शाने तो पतित मनुष्य ज्ञानी झाला. त्याला विलक्षण ज्ञान प्राप्त झाले आणि तो सांगोपांग वेदमंत्र म्हणू लागला.

हा सारा प्रकार पाहून ते दोघे मदोन्मत्त ब्राह्मण भयचकित झाले. त्यांच्या जिभा अडखळू लागून हृदयात वेदना सुरु झाल्या. ते थरथरां कापू लागले. श्रीगुरुंच्या चरणांवर लोळण घेऊन त्यांची विनवणी करु लागले, हे जगज्योती, ईश्वरा आम्ही गुरुद्रोही आहोत. आम्ही ब्राह्मण असूनही ब्राह्मणांचा धिक्कार केला. परंतु आपण सदाशिव आहात, सर्वांवर क्षमा करणारे आहात. तरी आमचा दोष मनी न ठेवता आम्हांला क्षमा करा. आमचा उध्दार करा. अशी विनंती करुन त्यांनी श्रीगुरुंची स्तुतिहि केली. सृष्टीची रचना, सृष्टीचे पालन-पोषण आणि सृष्टीचे प्रलय करणारे जगद्‌गुरु त्रैमूर्ती आपणच आहात. तुमचा महिमा वर्णन करण्याइतकी आमची बुध्दी नाही. आम्ही शरणागत आहोत. आपण वरप्रद आहात. आपण आमचा उध्दार करावा. आता आम्हांला पुढे कोणती गती मिळेल? त्या ब्राह्मणांची विनंती ऐकून श्रीगुरु म्हणाले, महामुनीसारख्या त्रिविक्रम भारतींना तुम्ही उपद्रव केलात. इतरहि महादोष तुमच्या हातून घडले, ब्राह्मणांची निंदा केलीत. या सर्व अर्जित कर्माचे फळ म्हणून तुम्ही ब्रह्मराक्षस म्हणून जन्म पावाल. कर्म भोगून संपविल्याखेरीज आणि पापाची फेड झाल्याशिवाय तुम्हांला गति नाही.

तेव्हा त्या ब्राह्मणांनी श्रीगुरुंच्या चरणांवर लोळण घेऊन विचारले, स्वामी या भयानक योनीतून आमचा उध्दार केव्हा होईल? आणि आम्ही केव्हा पैलतीराला लागूं?

श्रीगुरु कृपामूर्ती असल्यामुळे त्या ब्राह्मणांना म्हणाले, बारा वर्षोपर्यंत तुम्ही ब्रह्मराक्षस म्हणून रहाल. तुम्हांला खरोखर पश्चाताप झाल्यामुळे तुम्ही शांतरुप असाल. शुक्ल नारायणाचे प्रथम वाक्य तुम्ही म्हणत रहा, तुमचे पाप धुवून गेल्यानंतर एक ब्राह्मण फिरत फिरत येईल. त्याने तुम्हांला पुढचे वाक्य सांगितले की तुमचा उध्दार होईल. आता नदीवर जा आणि चांगले स्थान बघून बसा.

एवढे झाल्यावर ते दोघे ब्राह्मण गांवाबाहेर पडले आणि त्यांच्या छातीतून विलक्षण कळा येऊन नदीकाठी पोहचताच तेथे मृत्यु पावले. श्रीगुरुंच्या वचनाप्रमाणे ते ब्रह्मराक्षस होऊन बारा वर्षे राहिले.

श्रीगुरुंनी त्या दोघा उन्मत्त ब्राह्मणांना शाप देऊन ब्रह्मराक्षस बनविले नाही, तर त्या अवस्थेत जाणे हा त्या ब्राह्मणांचा जन्मभर केलेल्या दुष्कर्माचा परिपाक होता. तो कोणत्याही परिस्थितीत त्यांना प्राप्त होणार होता. जरी

श्रीगुरुंची भेट झाली नसती तरी ते उन्मत्त ब्राह्मण ब्रह्मराक्षस बनणारच होते. कदाचित त्या पिशाच्च योनीत हजारो वर्षेहि रहावे लागले असते. परंतु श्रीगुरुंची गाठ पडल्यामुळे आणि त्यांना शरण जाऊन क्षमा मागितल्यामुळे पिशाच्च योनीत केवळ बारा वर्षेच राहावे लागणार होते आणि तेहि शांततापूर्वक ! सद्गुरुंचा कोपसुध्दा कसा कृपापूर्ण होतो हे ही कथा सांगते.

दुसरी महत्वाची गोष्ट अशी, जो पतित आता विप्र झाला होता, त्याने सद्गुरुंचे चरण पकडून भक्तिभावाने विनंती केली, हे गुरुदेव आपण अज्ञान, माया यांचा अंधःकार नष्ट करणारे ज्योतिःस्वरुप जगद्गुरु आहात. मी जर सात जन्मांपूर्वी ब्राह्मण (अध्यापक) होतो तर जातीभ्रष्ट होऊन अधोगतीला का गेलो ? हे स्वामीराया मला हे सविस्तर सांगा.

श्रीगुरु म्हणाले, तू अध्यापक नांव असलेला, वेदशास्त्र पारंगत ब्राह्मण होतास. परंतु माता-पिता-गुरु यांचा द्वेष केल्यामुळे त्यांच्याशी वाईट वागल्यामुळे तू अधःपतित होऊन घसरत घसरत मातंग जातीत जन्माला आलास.

यातून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते की, सात जन्मांपर्यंत अनेक दुःखे भोगून, पश्चाताप पावून, आपले मन मोकळे होण्यासाठी धपडत असला पाहिजे. त्याच्या उध्दाराची वेळ आलेली असली पाहिजे. म्हणूनच श्रीगुरुंची त्याला भेट झाली. त्याला वाटणारी खंत आणि त्यावेळची त्याच्या मनाची अवस्था त्याने काढलेल्या उद्गारातून स्पष्ट होते;

श्रीगुरु पुसती तयासी । जन्म कवण यातीसी ।
तुझा वृत्तांत सांगे कैसी । म्हणोनी पुसती तयेवेळी ।।
त्यावेळी त्या मातंगाने श्रीगुरुंना सांगितलेः
श्रीगुरुवचन परिसोन । सांगे आपण यतिहीन ।
मातंग नाम म्हणोन । स्थान आपले बहिर्ग्रामी ।।
तू कृपाळू सर्वांभूती । म्हणोनी पाचारिले प्रीती ।
आपण झालो उध्दारगती । म्हणोनी दंडवत नमन करी।।

त्या मातंगाची व्यथा होती ती त्याने श्रीगुरुंना निवेदन केली; मला कोणी जवळ येऊ देत नाही म्हणून आपणाला गावाबाहेर रहावे लागते. परंतु आपण सर्वांवर कृपा करणारे म्हणून आपल्याला प्रेमाने जवळ बोलावले.

आपल्याला कोणी जवळ घेत नाहीत याची खंत आणि कृपाळू सद्गुरुंनी जवळ बोलावले म्हणजे आपला उध्दार होणार या भावनेचा अतिव आनंद या दोन्ही गोष्टी यातून व्यक्त होतात.

तो मातंग मनातून मोकळा होण्यासाठी उत्सुक असल्याखेरीज त्याच्या मुखातून असे उद्गार निघाले नसते. तो यातून मोकळा होण्यासाठी धडपडत होता आणि त्याच्या उध्दाराची वेळ आली होती म्हणून हे सर्व श्रीगुरुंनी घडवून आणले.

श्रीगुरुंनी त्या विप्र झालेल्या मातंगाला पुढे सांगितले, भीमा अमरजा संगमात महिनाभर नियमाने स्नान केलेस तर तुझे दोष जाऊन पुन्हा तुला विप्रजन्म मिळू शकेल ! तेव्हा तो पतित श्रीगुरुंना म्हणाला, मला आपले दर्शन घडले

आणि त्या दर्शनाने मी पवित्र झालो. जसा कावळा मानससरोवरात गेल्यावर राजहंस होतो! आता आपण मला तारावयास हवे. परिस लागल्याने लोखंडाचे एकदा सोने झाल्यावर त्या सोन्याचे पुन्हा लोखंड कसे होईल? आपल्या अमृतासारख्या दर्शनाने मला ज्ञान प्राप्त झाले. आता आपणच अभिमंत्रित करुन मला ब्राह्मणांमध्ये समाविष्ट करावे. तेव्हा श्रीगुरु हसून म्हणाले, तुझा देह हीन जातीचा आहे. तुला ब्राह्मण कसे म्हणता येईल? पतिताच्या अन्नरसाने (वीर्याने) तुझा रक्त-मासांने हा देह वाढला आहे. त्यामुळे तुला कोणी ब्राह्मण म्हणणार नाहीत. उलट सर्व तुझी निंदा-नालस्ती करतील. यासाठी तुझ्या सध्याचा देह तू विसर्जित करणे आवश्यक आहे. तुझ्या मनी पश्चाताप झालेला आहे. त्यामुळे तुला ब्राह्मण जन्म मिळेल.

परंतु पतिताच्या मनाला पटेना. एखाद्या मोठा ठेवा सापडला तर समाधानाने तो मिळालेला ठेवा कसा सोडेल? तो आपल्या (मातंगाच्या) झोपडीत परत जाण्यास तयार होईना. आपण ब्राह्मण आहोत असे म्हणू लागला. इतक्यात त्याची बायको व मुले तेथे आली. त्यांना तो पतित क्रोधाने मारावयास धावून आपल्याला कोणी स्पर्श करु नये असे म्हणू लागला. तेव्हा त्या पतिताची स्त्री श्रीगुरुंकडे जाऊन रडू लागली. आम्हांला आता कोण सांभाळील? कारण आमचा प्रतिपाळ करणारा या माझ्या पतीवाचून कोणीही नाही. त्याच्या वाचून आम्ही अनाथ होऊ. स्वामी तुम्ही माझ्या पतीला काही सांगितले नाही तर मी माझ्या मुलांसह येथे प्राण देईन. श्रीगुरुंनी हा सर्व प्रकार पाहून पतिताला म्हणाले, तू आपल्या बायका मुलांबरोबर घरी जा. बायको-मुलांचा क्षोभ ओढावून घेतलास तर तुला गति मिळणार नाही. आणि तुझा आणखी अधःपात होईल. तरीही तो पतित ऐकेना, हे पाहून एका लुब्धकाला (म्हणजे लोभी माणसाला) बोलावून घेतले आणि त्याच्या अंगावर घडाभर पाणी ओतण्यास सांगितले. लुब्धकाने तसे करताच त्या पतिताच्या अंगावरील सारी विभूती धुवून गेली. त्याच क्षणी पतिताचे ज्ञान गेले. तो पुन्हा अज्ञानी झाला. समोर बायको व मुलाला पाहून त्याला नवल वाटले. म्हणून त्याने बायको व मुलाला, तुम्ही येथे कसे आलात? असे विचारले. आणि त्यांना घेऊन तो आपल्या झोपडीत परत गेला.

येथे प्रश्न असा उद्भवतो की श्रीगुरुंनी त्या पतिताच्या अंगावरची विभूती (भस्म) धुवून का टाकविली? सद्गुरुंनी असे का केले? त्यांनी त्या पतिताला ब्राह्मणांमध्ये समाविष्ट न करता त्या मातंग जातीतील आपल्या बायका-मुलांकडे का परत पाठविले? वा त्याच्या स्त्रीच्या विनंतीवरुन त्याला पुनः पतितावस्थेत पाठवले?

श्रीगुरुंनी पतिताच्या सात जन्मांतील संस्कार सुक्ष्म रुपाने जागृत केले होते, तरी त्याचा 'अन्नमय' कोश (पतिताच्या कुळातील चांडाळाच्या अन्नरसाने निर्माण झालेला) तसाच होता. त्याला 'ब्राह्मण' म्हणून मान्यता दिली असती तर त्याच्यात असलेल्या तमोगुणाच्या प्राबल्याने अन्नमय स्थूल देहातील संस्कार उफाळून आले असते आणि भस्म प्रयोगाने जागृत केलेले 'सत्वगुणांचे' संस्कार नष्ट झाले असते. म्हणून श्रीगुरुंनी त्याला महिनाभर नित्य नियमाने संगमावर स्थान करशील तर तुला 'पुढील जन्म' ब्राह्मणाचा प्राप्त होईल असे सांगितले होते. परंतु हे कर्म करण्यास तो पतित तयार नव्हता. 'कर्म नको पण फळ मात्र हवे!' श्रीगुरुंच्या कृपेने प्राप्त झालेले (सात रेषा ओलंडण्या पलिकडे काहीच केले नव्हते) 'ब्राह्मणपद' कायमचे हवे होते. श्रीगुरुंनी मोहामुळे त्याच्यावर अनुग्रह केला नव्हता, तर त्याला जो थोडाफार पश्चाताप झाला होता त्यामुळे!

परंतु तमोगुणाच्या प्राबल्यामुळे त्याने श्रीगुरुंनी सांगितलेली साधना त्या पतिताने नाकारली. त्याउलट त्या दोन उन्मत्त ब्राह्मणांनी श्रीगुरुंनी सांगितलेले 'कर्म' आचरले आणि केवळ बारा वर्षांत शांतस्थितीत राहण्याचा आशिर्वाद मिळवून उध्दार करुन घेतला.श्रीगुरुंनी ही संधी त्या पतितालाही दिली होती. त्या संधीचा त्याने फायदा करुन घेतला नाही.

भगवंत नि:पक्षपाती व निस्पृह (निरपेक्ष) आहे. तो प्रत्येकावर ज्याच्या त्याच्या भाव-भावनेवर कृपा करतो, अनुग्रह करतो. परंतु अनुग्रह मिळाल्यानंतर सुध्दा 'विधियुक्त कर्म' आचरावे लागते. तसे केले तरच निष्काम बुध्दी प्राप्त होते.

जीवदशा ही अतिशय कठीण असून क्षणोक्षणी मोह उफाळून येतो आणि जीव मोहात अडकला की तो कोठपर्यंत भरकटला जाईल याचा नेम नसतो. श्रीत्रिविक्रम भारतींनी असेच केले. त्यांनी श्रीगुरुंची कृपा तर प्राप्त केलीच; शिवाय त्यांच्या आज्ञाप्रमाणे वागून आपल्या जीवनाचे सार्थक करुन घेतले. एक ज्ञानी-संन्यासी म्हणून त्यांची ख्याती झाली.

त्रिविक्रमभारतींमध्ये श्रीगुरुंबद्दल परिपक्व भक्ति होती. त्या उन्मत्त ब्राह्मणांमध्ये भयामुळे भक्ति निर्माण झाली. परंतु पतितामध्ये भक्ति निर्माण झाली नाही. श्रीगुरुंच्या रुपाने ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन होऊन, त्यांचा अनुग्रह मिळून सुध्दा पतिताला स्वत:चा उध्दार करुन घेता आला नाही.

श्रीगुरुंच्या महात्म्याने अनुभव घेतलेले अनेक जण त्यांच्या चरणसेवेत चूर झालेले. परंतु श्रीगुरुंचे अंत:करण मात्र एका विशेष विचाराने त्रस्त झाले होते. त्या दोन मदोन्मत्त ब्राह्मण पंडितांच्या विचाराने त्यांच्या मनात काहूर उठले होते. ब्राह्मणांच्या अध:पतनाचे आणि यवनांच्या सर्वग्रासी आक्रमणाचे भयंकर प्रत्यंतर श्रीगुरुंना त्या उन्मत्त ब्राह्मणांमुळे आले होते. वास्तविक याची जाणीव त्यांना यापूर्वीच झाली होती. संपूर्ण भारतात चाललेले इस्लामचे थैमान श्रीगुरुंनी उघड्या डोळ्यांनी पाहिले होते. ब्राह्मण यवनसेवेत गर्क होऊन स्वजनांची व स्वधर्माची कशी वंचना करीत होते हे त्यांनी अनुभवले होते. सायंदेवांसारख्या काही सत्प्रवृत्त ब्राह्मणांची यवनसेवेत कशी कुचंबना होत होती याचीही श्रीगुरुंना जाणीव होती.

## श्रीगुरुंनी कथन केलेले भस्म महात्म्य.

पतिताची विभूती धुतली गेल्यामुळे त्याचे ज्ञान गेले व तो बायको-मुलाला घेऊन घरी गेला. हा सगळा प्रकार पाहून तेथे जमलेल्या सर्व मंडळींना आणि त्रिविक्रमभारतींना आश्चर्य वाटले, आणि हे अभिनव काय व कसे घडले असा त्यांना प्रश्न पडला. तेव्हा त्रिविक्रमांनी श्रीगुरुंना विनयतेने विचारले, पतिताला आपण ज्ञान दिलेत आणि ते सारे ज्ञान त्याचे अंग धुवून काढल्यावर कसे काय गेले ? याचा उलगडा आम्हांस होत नाही म्हणून ते आपणच कृपया आम्हांस सांगावे. श्रीगुरु त्यांची भक्तिपूर्वक विनंती ऐकून म्हणाले, भस्माचे महात्म्य फार मोठे आहे. असे भस्म थोर महात्म्याच्या हाताने मिळाले तर सारा प्रपंच परब्रह्मरुप होऊन जातो. तेव्हा त्रिविक्रमांनी भस्म महात्म्य सांगण्याची श्रीगुरुंना विनंती केली. तेव्हा श्रीगुरु त्यांना म्हणाले, 'भस्माचे महात्म्य विचारतो आहेस तर एकचित्ताने अवधान देऊन ऐक'.

पूर्वी कृतयुगात वामदेव नामक एक महान प्रसिध्द योगी-गुरु होऊन गेले. ते पृथ्वीवर सर्वत्र संचार करीत असत. एकदा ते दंडकारण्याच्या दक्षिण भागी क्रौंचारण्यांत येऊन पोहोचले. माणसे तेथे जात नसत. कारण एक महाभयंकर ब्रह्मराक्षस राहात असे. माणूस वा कोणी पशु तेथे आला तर त्याला भक्षण करुन आपली भूक भागवत असे. त्याने वामदेवांना पाहिले आणि भूकेने व्याकुळ झालेल्या व भक्ष सापडल्याच्या आनंदात तो वामदेवांजवळ धावतच आला, आणि आधाशाप्रमाणे त्यांने त्यांना मिठीत पकडले. त्यावेळी वामदेवांच्या अंगाचे भस्म त्या राक्षसाच्या अंगाला लागले आणि त्याला एकदम मागील अनेक पूर्व जन्मांचे स्मरण झाले. त्याचे सर्व पाप जळून गेले. तो भयंकर ब्रह्मराक्षस पवित्र झाला. तो पापी राक्षस ज्ञानी झाला. त्याने त्यांच्या पाया पडून म्हटले, हे गुरुशिरोमणी आपण साक्षात ईश्वर आहात. आपण माझे रक्षण करावे. तुमच्या दर्शनाने माझी अनेक जन्मांची पापे जळून नष्ट झाली. हे जगद्‌गुरु आपण भक्तांवर कृपा करणारे आहात. आपण मला तारावे. तेव्हा कृपाळू वामदेवांनी त्याला विचारले, 'तू कोण, कोणाच्या वंशाचा आणि या अशा भयानक जागी का राहतोस ?'

ब्रह्मराक्षस हात जोडून म्हणाला, माझे गेल्या पंचवीस जन्मांतले सर्व दोष मला लख्ख प्रकाशात पहावे तसे स्पष्ट दिसत आहेत. पंचवीस जन्मांपूर्वी मी एका यवन वंशाचा राजा होतो. माझे नाव 'दुर्जय' असे होते. त्यावेळी मी फार दुराचाराने वागलो. अनेकांना मी ठार मारले. प्रजेला अतिशय दुःख दिले. अनेक स्त्रीयांशी विवाह केला. त्या व्यतिरिक्त अनेक स्त्रिया जुलुमाने पकडून आणल्या आणि एकेकदा उपभोग घेऊन त्यांना पुन्हा पुनः कधीही जवळ केले नाही. अशा अनेक स्त्रियांना अंत:पुरात कोंडून ठेवले. माझ्या राज्यात जे ब्राह्मण होते ते सरे दुसऱ्या ठिकाणी गेले. त्यांच्याही स्त्रियांना बळजबरीने उपभोगले. ब्राह्मीणी, क्षत्राणी, वैश्याणी, शुद्रिणी, चांडाळिनी, भिल्लीणी, विधवा, रजस्वला, डोंबिणी, परिटीणी, वेश्या अनेक स्त्रियांचा उन्मत्तपणे उपभोग घेतला तरी माझ्या मनाची तृप्ती झाली नाही. नित्य मद्यपान करीत होतो. असे होता होता मला क्षयरोग झाला. दुसऱ्या देशाच्या राजांनी माझे राज्य जिंकून घेतले. आणि त्यातच मी मृत्यु पावलो. यमदूतांनी मला नरकात नेऊन टाकले. तेथे दहा हजार वर्षे एका नरकवास असे दहा वेळा मला फिरवले. तेथे अनेक कष्ट मला भोगावे लागले. एवढे सर्व होऊन मला दुसरा जन्म मिळाला तो जीवांची हिंसा करणाऱ्या वाघाचा. नंतर तिसरा जन्म मिळाला अजगराचा. त्यानंतर क्रमाने लांडगाा, डुक्कर, सरडा, कुत्रा, कोल्हा, हरिण, ससा असे दहा जन्म झाले. अकरावा जन्मात माकड, त्यानंतर घार, मुंगुस, कावळा, अस्वल, रानकोंबडा, आंधळे गाढव, मांजर, बेडूक, कासव इत्यादी वीस जन्म झाले. एकवीसाव्यांत मासा झालो. बावीसाव्यांत जन्मांतर चोरी करणारा उंदीर तर तेविसाव्यात दिवसा आंधळे असणारे बहिरे घुबड झालो. चोविसाव्यात जन्मांत मी तामसी स्वभावाचा हत्ती झालो; आणि या जन्मांत मी ब्रह्मराक्षस झालो. रात्रंदिन भुकेने तडफडत होतो. अचानक तुम्हांला पाहिले आणि तुम्हांला खाऊन टाकण्याची प्रबळ वासना होऊन तुमच्या अंगावर धावून आलो. मी महापापी आहे. पण तुमच्या अंगाचा स्पर्श झाला व पूर्व जन्मांचे सारे पाप मला स्पष्ट दिसू लागले. स्वामी मला या घोर अंधारातून बाहेर काढा. आता जन्म पुरे. तुमच्या अनुग्रहाने तरुन जाईन. तुम्ही सर्व विश्वाला तारणारे आहात, म्हणूनच मला भेटलेले दिसता. केवळ स्पर्शाने मला ज्ञान झाले. तुमचा महिमा कसा आहे हे मला समजत नाही. आपण अत्यंत उदार दाते आहात म्हणूनच आपण साक्षात ईश्वर आहात.

हे त्या ब्रह्मराक्षसाचे स्तुतिवर म्हणणे ऐकून वामदेव संतोषाने त्याला म्हणाले, हा सर्व भस्माचा महिमा आहे. माझ्या

देहाला लावलेले थोडेसे भस्म तुझ्या अंगाला लागले आणि तुझ्या अनेक जन्मांच्या आठवणी जाग्या झाल्या. भस्माचा महिमा ब्रह्मदेवाला सुध्दा पूर्णपणे समजला नाही. केवळ कर्पूरगौर शंकरच त्याचा महिमा जाणतात व सर्वांगावर भस्म भूषणाप्रमाणे धारण करतात. तू जर मला विचारशील तर भस्माचा महिमा स्पष्ट करणारी मी स्वतः पाहिलेली एक गोष्ट दृष्टान्ता दाखल तुला सांगतो.

द्रविड देशात एक आचारहीन, क्षुद्र स्त्रियांशी व्याभिचार करणारा, कर्मभ्रष्ट जीवन जगणारा ब्राह्मण रहात होता. इतर ब्राह्मणांनी त्याच्यावर बहिष्कार टाकल्यामुळे आई-वडील, भाऊबंद इत्यादींनीही त्याचा त्याग केला. तेव्हा तो आचारभ्रष्ट ब्राह्मण एक शुद्र स्त्रीशी विवाह करुन काळ क्रमणा करु लागला. पोट भरावे म्हणून चोऱ्या करु लागला. असे होता होता एक दिवस संध्याकाळी कोठेतरी चोरी करुन रात्रीच्या वेळी कोठेतरी व्याभिचार करण्यासाठी जात असताना एका क्षुद्र जातीच्या माणसाने त्याला ठार मारुन गावांबाहेर एका भयाण जागी फरफटत ओढून नेऊन त्याचे प्रेत फेकून दिले. त्यावेळी त्या गावांत एक कुत्रा भस्मात बसलेला होता आणि त्याच्या सर्वांगाला भस्म लागलेले होते. तो भस्माने माखलेला कुत्रा भक्ष शोधीत तेथे आला आणि त्या प्रेतावर बसून आपली भूक भागविण्याचा प्रयत्न करु लागला. त्या कुत्र्याच्या अंगाचे भस्म त्या प्रेताच्या कपाळाला, छातीला, हाताला लागले. त्या ब्राह्मणाचे प्राण खेचून घेऊन यमदूत त्याला मारझोड करीत नेत असताना एकदम शिवदूत तेथे प्रगट झाले आणि त्यांनी यमदूतांना म्हटले, त्याच्या अंगावर भस्म असताना तुम्ही त्याला कसे नेऊ शकता ? असे म्हणून शिवदूतांनी त्यांना चोप देताच ते पळून गेले आणि त्यांनी ही घटना यमाच्या कानी घातली आणि म्हटले, शिवदूत जर आम्हांला मारणार असतील तर आम्ही भूलोकांत जाणार नाही. हे ऐकून यमराज रागावून शिवदूतांकडे येऊन म्हणाले, तुम्ही माझ्या दूतांना का मारले ? एका पाप्याला हिसकावून घेऊन शिवलोकांत कसा नेला ? एका अघोरी पापी जीवाला सन्मानपूर्वक शिवलोकात नेण्याचे कारण काय ? तेव्हा शिवदूत यमाला समजावून सांगू लागले, त्याच्या बहुतेक सर्वांगाला भस्म लागलेले होते. तरीही तुमच्या दूतांनी त्याला कसे उचलले ? आम्हांला ईश्वराची आज्ञा आहे, जी माणसे भस्मांकित (भस्म लावलेली) असतील, ज्यांच्या कपाळाला त्रिपुंड -टिळक लावलेला असे, ज्यांच्या गळ्यात रुद्राक्षाची माळ असेल, त्यांचे कडून अनेक दोष जरी घडले असतील त्यांना शिवलोकी आणावे. ईश्वराची अशी आज्ञा असताना तुम्ही त्याला यमपुरी का नेत होते ? हे ऐकून यमाने आपल्या दूतांना तसे आदेश दिले.

वामदेवांनी ब्रह्मराक्षसाला ही कथा सांगून म्हटले, असा हा भस्माचा महिमा आहे आणि म्हणूनच आम्ही ते नेहमी भक्तीने सर्वांगाला लावत असतो. हे भस्म देवाधिकांनाही दुर्लभ आहे. वामदेवांचे हे बोलणे ऐकून ब्रह्मराक्षसाने त्यांना नमस्कार करीत म्हणाला, तुम्हीच साक्षात ईश्वर आहात. तुमच्या दर्शनाने मला अनेक जन्मांचे ज्ञान झाले. काही थोडेसे पुण्य घडले असावे म्हणून आपली भेट झाली. त्याविषयीची घटनाही ब्रह्मराक्षसाला आठवली. त्याने राजा असताना रानात एक तळे बांधले होते आणि एका ब्राह्मणाला काही ठराविक उत्पन्न वेळच्यावेळी मिळेल अशी व्यवस्था करुन दिली होती. एवढेच काय ते पुण्य होते! ब्रह्मराक्षस म्हणाला, मृत्युनंतर मला यमलोकां नेले तेव्हा यमाने चित्रगुप्ताला माझे पुण्य किती ते विचारले होते आणि चित्रगुप्ताने हे एवढे पुण्य सांगितले होते. हे माझे पुण्य पंचवीस जन्मांनंतर फळाला येईल असे यमधर्माने स्वतःच मला सांगितले होते. त्या तेवढ्याच पुण्याच्या बळावर स्वामी तुमचे चरण मला लाभले. तेव्हा हे जगद्गुरु माझा उध्दार करा. या भस्माचा महिमा, ते कसे लावावे याचे

विधान, कोणत्या मंत्राने उच्चारण करुन लावावे हे सविस्तर सांगा. तेव्हा वामदेवांनी त्या ब्रह्मराक्षसाला भस्म कसे लावावे हे सविस्तर सांगितले;

भस्म डाव्या हातावर घेऊन ''भस्म सदयोजातमितिमंत्रेण ग्राह्यमुत्तमम'' असा मंत्र म्हणावा. नंतर 'अग्निरित्यादि जाबालप्रोक्त मंत्रैश्च मंत्रयेत' हा मंत्र अभिमंत्रित करावा. तळहातावरील भस्मात पाणी घालून ''माणस्तोक इति स्वच्छमंगुष्ठेनैव मर्दयेत'' हा मंत्र म्हणून झाला की ''शिरासी त्र्यम्बकमि ति धारयेद्‌भक्तिभावितः'' हा मंत्र म्हणून भस्म कपाळ, हात व इतर ठिकाणी लावावे. प्रत्येक स्थानी तीन रेषा आणि प्रत्येक रेषा भुवई इतकी जाड असावी, त्यापेक्षा अधिक नसावी.

अशा तऱ्हेने नित्य आदरपूर्वक त्रिपुंडभस्म सदाशिवाचे व्रत म्हणून लावावे, असे वेदशास्त्रे सांगतात. म्हणून विधियुक्त भस्म धारण वेदसंमत आहे. जे कोणी मोक्ष प्राप्त व्हावा म्हणून भस्म धारण करतात ते मुक्त होतात. म्हणून ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थाश्रमी आणि संन्यासी सर्वांनी प्रतिदिन भस्म लावावे. एखादा महापापी असला आणि त्याने भस्म धारण केले तर त्याचे पुण्यात्मात रुपांतर होते. ज्यांना मंत्र येत नाहीत त्यांनी शुध्द भावनेने भस्म लावले तरी त्यांना त्याचे उत्तम फल प्राप्त होते.

महामुनी वामदेवांनी हा भस्म महिमा ब्रह्मराक्षसाला सांगितला त्यामुळे त्याला अपार समाधान वाटले. त्याने वामदेवांचे पाय धरले असता वामदेव म्हणाले, माझ्या अंगाचे भस्म तुझ्या अंगाला लागताच तुला ज्ञान प्राप्त झाले, हे घे तुला भस्म असे म्हणून त्यांनी आपल्याकडील भस्म अभिमंत्रित करुन त्या ब्रह्मराक्षसाला दिले. त्याने कपाळाला त्रिपुंड लावले त्याबरोबर त्याला दिव्यदेह प्राप्त होऊन तो तेजस्वी बनला. त्याला दिव्य अवयव प्राप्त झाले. ब्रह्मराक्षस अत्यंत आनंदित झाला. महामुनी योगेश्वर वामदेवांना भक्तिपूर्वक प्रदक्षिणा करीत असतांना सूर्याच्या तेजाप्रमाणे चमकणारे विमान खाली उतरले आणि त्या दिव्य विमानांत बसून तो ब्रह्मराक्षस स्वर्गलोकात गेला. अशा तऱ्हेने वामदेवांनी त्या ब्रह्मराक्षसाला उत्तम परलोक प्राप्त करुन दिला.

वामदेव हे त्रैमूर्तीचे अवतार आहेत. जगदोध्दारासाठी भूमीवर मनुष्यरुप घेऊन हिंडत असतात. भक्तांना तारतात.

अत्यंत थोर असे भस्माचे महात्म्य आहे. त्यांत सद्‌गुरुंचा हस्तस्पर्श झाला की उध्दार हा ठरलेलाच. कोणताही मंत्र गुरुकृपेशिवाय सिध्द होत नाही. वेदशास्त्रे सांगतात, नास्ति तत्व गुरोःपरमौ असे गुरुहस्ताने मिळालेले भस्माचे महत्व श्रीगुरुंनी त्रिविक्रमभारती आणि इतर भक्तांना सांगितले. श्रीगुरुंनी केलेल्या उपदेशाने सर्वांनाच ज्ञानाची प्राप्ती झाली.

कथेत एक गोष्ट विचार करण्यासाठी आहे ती म्हणजे भस्म लागलेल्या कुत्र्याचा उध्दार झाला असे कथेत म्हटले नाही. कारण पशु-पक्षी या भोग योनी आहेत, त्यांच्यामध्ये त्या जीवांना जावे लागते. त्यांना कर्म स्वातंत्र्य नाही. त्यामुळे त्या कुत्र्याच्या अंगाला लागलेल्या त्या जीवाला (कुत्रा म्हणून जीवंत असताना) काही उपयोग करुन घेणे शक्य नव्हते. परंतु जर भस्म लागलेला असताना कुत्र्याचे प्राण गेले असते तर त्या जीवाला (कुत्र्याला) पुढे चांगला जन्म मिळाला असता. पण पातकी असलेल्या द्रविड ब्राह्मणाच्या देहाला 'मृत्युच्यावेळी' भस्म लागले होते म्हणून

त्याला जीवन सुधारण्याची 'संधि' देण्याचा शिवदूतांनी विचार करुन शिवलोकात घेऊन गेले.

मृत्युच्या समयी सूक्ष्म किंवा लिंग देह स्थूलदेहापासून मोकळा होत असताना त्याच्यातील शक्तीला उत्तम दिशेला वळविण्यास सूक्ष्मदेहातील सत्वगुणांचे संस्कार उत्तेजित झाले तर मदत होऊ शकते. आणि हे सत्वगुणांचे संस्कार भस्म प्रोक्षणाने उत्तेजित होऊ शकतात. ते संस्कार योग्य वेळी उत्तेजित झाले तर ते त्या जीवाला उच्च अवस्थेकडे (शिवलोकात) नेऊ शकतात.

तेव्हा ब्रह्मराक्षसाची वामदेवांशी झालेली भेट ही कथा आणि त्या कथेतूनच उद्‌भवलेली द्रविड ब्राह्मणाची दुसरी कथा या दोन्ही कथांमधून मृत्युनंतरच्या जीवनात चांगल्या अवस्थेकडे जाण्यास जीवात्म्याला ईश्वरी शक्तीची मदत मिळू शकते हे कळून येते.

## माहुरच्या दत्त व सावित्री दांपत्याची कथा.

उत्तरेकडील माहूर येथे गोपीनाथ नामक श्रीमंत ब्राह्मणाला पुत्र संतति होऊन मरत असे. त्यामुळे तो ब्राह्मण व त्याची पत्नी फार दुःखी होत असत. त्या उभयतांनी श्रीगुरु दत्तात्रेयांची आराधना केली आणि त्याना एक पुत्र होऊन तो जगला. त्यामुळे गोपीनाथ ब्राह्मणाने त्याचे नाव 'दत्त' असे ठेवले. श्रीमंती असल्याने त्यांनी आपल्या या एकुलत्या एक पुत्रास अतिशय प्रेमाने व मोठ्या लाडात वाढविले. पाचव्या वर्षी मुलाची मुंज केली. बाराव्या वर्षी त्याचे एका अतिसुंदर मुलीबरोबर लग्न लावून दिले. ती मुलगी म्हणजे मदनाच्या रतीप्रमाणे सुंदर होती. सासूसासऱ्यांच्या आवडीची होती. त्यामुळे ते तिचा अत्यानंदाने प्रतिपाळ करीत. नविन दांपत्य बरोबर वयाचे, आनंदी स्वभावाचे व एकमेकांवर अतिशय प्रेम करणारे, एकमेकांना क्षणभरही न विसरणारे होते. होता होता दोघेही सोळा वर्षांचे झाले. अचानक गोपीनाथाच्या मुलाला व्याधि झाली. अनेक औषधे देऊन सुध्दा त्याची व्याधी बरी होईना. त्याला अन्न घेता येईना त्यामुळे तो उपवासी राहू लागला. त्याच्या बायकोचे त्याच्यावर अतिशय प्रेम असल्याने तीही अन्न खाईना. तिलाही नित्य उपोषण घडू लागले. नवऱ्याला जी औषधे द्यायची ती स्वतःही प्राशन करु लागली. नवऱ्याबरोबर कष्ट उपसू लागली. सास-सासरे, भाऊबंद, नातेवाईक सर्वांनी तिला सांगून पाहिले पण ती पतिव्रता ज्ञानी स्त्री कोणाचेही ऐकत नव्हती. अशी तीन वर्षे निघून गेली. नवऱ्याचे दुःखणे क्षयावर गेले. नवऱ्याचा देह क्षीण झाला तसा त्या पतिव्रता स्त्रीचाही देह क्षीण झाला.

दोघांचेहि आई-वडिल महाधनी श्रीमंत होते. आपल्या मुलाची व मुलीची अवस्था पाहून त्यांना फार दुःख होत असे. त्यासाठी त्यांनी अनेक जप, अनुष्ठाने, मंत्रविद्येचे प्रयोग, मोठी होम-हवने, ब्राह्मण भोजने इत्यादी करविली. अनेक वैद्य आणून त्यांच्याकडून दिव्य रस-औषधे देवविली. पण त्या मुलाला आरोग्य लाभले नाही. मुलगा आपल्या आई-वडिलांना सांगू लागला, माझे भोग संपले. तुम्हांला जेवढे कर्ज दिले तेवढे वसूल झाले. आता तुमच्याकडून अधिक काही मी कसे घेऊ ? कर्जाचा-ऋणाचा हिशेब कसा चुकणार ? म्हणून तुम्ही आता दुःख करु नये. त्याच्या उद्‌गाराने त्याच्या आई-वडिलांना अतिशय दुःख झाले.

आई-वडिलांप्रमाणे त्याने आपल्या पत्नींला सांगितले, आता माझे दिवस संपले. माझ्यासाठी तू फार कष्ट केलेस. पण दुर्दैवाने तुझे सारे कष्ट वाया गेले ! जणू कांही तुझ्याशी माझे पूर्वजन्मीचे वैर होते किंवा तुझ्यावर माझे

कर्ज होते म्हणून मी तूला कष्ट भोगायला लावले असे समज. मी गेल्यावर तू येथे राहिलीस तर तुझे पोषण येथे होईल. ते जर तुला कष्टदायक वाटत असतील तर तू आपल्या माहेरी जा. मी दैवहीन आहे. तुझ्या सुंदरपणाचा मला लाभ घेता आला नाही. उलट माझ्या स्पर्शाने तुझे सौभाग्य नष्ट होणार, ते राहणार नाही. नवऱ्याचे बोलणे ऐकून ती साध्वी म्हणाली, मला अव्हेरुन, माझा त्याग करुन जाऊ नका! तुमच्याशिवाय मला गति नाही. जेथे तुमचा देह तेथेच मीही असणारच! यात मुळीच शंका घेऊ नका. त्या दोघांचे संभाषण ऐकून तिचे सासु-सासरे धरतीवर अंग टाकून शोक करु लागले. तेव्हा ती सती सून त्यांना धीर देऊन म्हणाली, तुम्ही काही चिंता करु नका. माझे पती वाचतील असा मला भरवंसा आहे. गाणगापूरात श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरु आहेत, त्यांचा महिमा फार मोठा आहे. त्यांच्या दर्शनाने माझ्या पतीस आरोग्य मिळून ते बरे होतील. तेव्हा आम्हांला लवकर गाणगापूरास पाठवा! तिच्या ह्या विनंतीला घरच्या सर्व मंडळींनी संमति दर्शविली आणि सर्वांचा निरोप घेऊन पतीला डोलीत बसवून गाणगापूरास निघाली. निघताना तिने सासू-सासऱ्यांना नमस्कार करुन म्हणाली, ''तुम्ही अंतःकरण स्थिर करुन रहा. पति माझा प्राण आहे. माझी कुलदेवता त्यांचे रक्षण करील.'' सासू-सासऱ्यांनीहि, ''तुझे सौभाग्य स्थिर राहो'' असा आशिर्वाद देऊन निरोप दिला.

अशा तऱ्हेने माहुरहून पतीला घेऊन निघालेली पतिव्रता मार्गक्रमण करुन गाणगापूरास पोचली. वाटेत तिच्या पतीला कफ-वात-पित्त या त्रिदोषाचा जोर वाढला आणि गाणगापूरात येताच त्याचे प्राण निघून गेले. त्या साध्वीवर दुःखाचा डोंगर कोसळला. ती मोठा आकांत मांडला. जमिनीबर गडबडा लोळू लागली.सुरी हातात घेऊन स्वतःस भोसकून घेण्यास निघाली. तेव्हा तेथे असलेल्या लोकांनी तिला त्यापासून परावृत्त केले. अत्यंत आक्रोशाने ती म्हणू लागली, देवा हे काय केलेस ? तू माझ्या पतीचे रक्षण करशील या विचाराने तुझ्या दारी आले. देवळात पूजेला जावे आणि देऊळच अंगावर कोसळावे हे कधीहि ऐकले नव्हते. पण मला मात्र तसा प्रत्यक्ष अनुभव आला. तिचा शोक, आकांत ऐकून जमलेले लोक तिची समजूत घालून तिला शांत करण्याचा प्रयत्न करु लागले. इतक्यात तेथे एक जटाधारी, सर्वांगाला भस्म लावलेले, गळ्यात रुद्राक्ष माळा धारण केलेले आणि हाती त्रिशुळ असलेले सिध्द पुरुष आले, आणि त्या साध्वीला म्हणाले, तू एवढ्या मोठ-मोठ्याने शोक का करीत आहेस ? जे प्रारब्धात आहे ते घडणारच. पूर्वजन्मीच्या कर्माची फळे भोगावीच लागतात. तेव्हा रडून, आकांत करुन काय उपयोग ? आठ दिवस जरी शोक करीत बसलीस तरी तुझ्या पतीचे प्राण परत येणार आहेत का ? पृथ्वीवर आलेला कोणता जीव अमर झाला आहे. सर्वांना मृत्यु हा आहेच. मग दुःख करणे मूर्खपणाचे नाही का ? ज्या प्रमाणे गंगेत पूर आला की विविध प्रकारची लाकडे वाहात एकत्र येतात आणि पुनः अलग अलग होऊन चारी दिशांना फेकली जातात, त्याप्रमाणे मानवी जीवन आहे. संसार आहे. तो स्थिर रहात नाही. म्हणून तू व्यर्थ शोक करु नकोस. हा जो संसार आहे तो सारा कर्माच्या आधीन असतो. आपल्या प्रारब्ध कर्मामुळे त्यात सुख-दुःखे निर्माण होतात. देवादिकांनाही काळ चुकत नाही. मग मनुष्याची काय कथा! ज्यांच्या गुण-कर्मांची जशी अवस्था असेल त्याप्रमाणे जन्म-मृत्यु त्यांच्या वाट्यास येतात. कोणाला लहानपणी मृत्यु येतो तर कोणाला वृध्द झाल्यावर. ज्याचे जसे प्रारब्ध असेल तसेच सर्व घडत असते. देव-दानव-मानव यांच्यापैकी कोणालाच काळाला (मृत्युला) चुकवता आले नाही. शंभर-हजार-कोटी जन्मांपूर्वी तू कोणाची पत्नी वा आणखी कोण होतीस हे आठवते का बघ. त्याचा विचार कर आणि उगाच दुःख

करुं नकोस. त्या ऐवजी पुढचा विचार कर. कोणता मार्ग हितकारक आहे, ज्याच्यामुळे संसार सागर तरुन जाता येईल त्याचा विचार कर, ते समजून घे.

सिध्द पुरुषाच्या त्या बोधाने त्या साध्वीला ज्ञान होऊन तिने आपला शोक आवरला. त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून तिने नमस्कार केला आणि हात जोडून भक्तिपूर्वक विनंती केली, स्वामी, माझा उध्दार करा. तुम्हीच आता माझे माता-पिता आहात आणि तुम्हीच मला तारुन न्या. तुम्ही जसे मला मार्गदर्शन कराल त्याप्रमाणेच मी वागेन. तिचे हे बोलणे ऐकून त्या तापसी सिध्द पुरुषाला संतोष वाटला आणि त्याने स्त्रियांच्या आचरणाबद्दल विस्तारपूर्वक उपदेश केला आणि म्हटले, हे बघ मुली तुला जे रुचेल ते कर. सारे दुःख बाजूला ठेवून माझे सांगणे लक्षात ठेव. तुझ्याजवळ धैर्य असेल तर पतीबरोबर सहगमन कर, नाहीतर विधवा धर्माचे पालन कर. तो धर्महि तितकाच पुण्यदायक आहे. तुझ्या डोक्यावर हात ठेवून मी प्रेमाने विचारीत आहे. तुला मनापासून पसंत असेल तो मला स्पष्ट सांग. असे त्या सिध्दाने म्हटल्यावर त्या साध्वीने त्यांना नमस्कार करुन भक्तिभावाने पण करुणापणाने विनंती केली, हे स्वामी योगेश्वरा, आपणच माझे सर्व काही आहात. मी परप्रांतात आलेली असल्याने माझे असे येथे कोणीच नाहीत. आता अंतकाळचे असलेले सर्व आपणच आहात आणि आपण मला परमार्थाचे जे दोन मार्ग दाखविलात त्यात विधवाधर्म मला अधिक कष्टप्रद वाटतो. मी तरुण आहे, माझा देह सुंदर आहे. त्यामुळे या कलियुगाच्या काळात या देहामुळे निंदापवादाचे प्रसंग घडतील असे वाटते. सहगमनामध्ये अपार पुण्य आहे आणि मी निर्धाराने पतिसोबत समाधानाने जाईन. भवसागरात बुडणाऱ्या मला हे स्वामीनाथा, आपण तारावे.

योगीश्वर सिध्द पुरुषाने तिला वर उठवले आणि अभयमुद्रा दाखवून म्हटले, ब्रह्मदेवाने ठरवून दिल्याप्रमाणे जे व्हायचे ते झाले. मृत्युला कोणीही जिंकलेले नाही आणि ब्रह्मलिखित चुकत नसते हे समजून घे. जसे कारण असेल तसे कार्य घडते हे श्रुतिवचन आहे. आता तुम्ही त्वरीत सहगमनासाठी जा. पण शेवटी अंतकाळाचा क्षण येण्यापूर्वी गुरु दर्शनाला मात्र जा. इतक्या दूरुन तू पतीला घेऊन आलीस ती गुरुंच्या दर्शनासाठी, भेटीसाठी! तेव्हा गुरुचरणांचे दर्शन करुन, गुरुचरण डोळ्यांनी पाहून मग तेथून परत आल्यावर सहगमन करावे. इतके म्हणून त्या योगेश्वराने तिच्या कपाळाला भस्म लावून चार रुद्राक्ष दिले. दोन रुद्राक्ष आपल्या गळसरीला बांधून दोन प्रेताच्या कानात घालून मग दहन करावे, असे सांगितले. सुवासिनींना वाणे द्यावीत आणि ब्राह्मणांना पुष्कळ द्रव्य द्यावे. त्यानंतर मग सहगमन करावे.

इतके सांगून तो योगेश्वर निघून गेला. त्या साध्वीने त्याप्रमाणे तयारी केली. चांगल्या ब्राह्मणांना बोलावून प्रायश्चित देऊन मरणोत्तर करण्याचा सोळावा संस्कार करविला, गृहाग्नि सिध्द करुन प्रेतपिंड इत्यादी कर्म (औपासन म्हणतात) करविले. त्यानंतर स्वतः स्वच्छ स्नान करुन जरीचे (पितांबर) उंची वस्त्रे नेसून सर्व अलंकार धारण केले. हळदी-कुंकू लावले. तोवर औपासन विधि पूर्ण होऊन प्रेत नदीतीरावर दहनासाठी नेण्यात आले. तळहातावर अग्नि घेऊन अत्यंत आनंदात ती साध्वी चालत होती. सोळा वर्षाचे तरुण वय, त्यात लावण्य सुंदर रुप, सगळे अलंकार धारण केलेले, अशी ती स्त्री लक्ष्मी सारखी दिसू लागली. गांवातील अनेक स्त्रिया तिला पहायला आल्या. त्या साध्वीला पाहून देवहि नतमस्तक झाले. काही लोक म्हणू लागले, इतक्या लहान वयाची ही तरुण बालिका आपल्या पतीबरोबर सती जात आहे. तिचे पूर्वजन्मीचे फळ चांगलेच असणार! पतीचे काही सुख मिळाले

नसेल, पोटी एकहि अपत्य नाही, तरीसुध्दा पतीबरोबर हिचा जीव किती एकरुप झाला आहे! किती आनंदाने ती सती जात आहे. दुसरे म्हणू लागले, अहो हिची कोणीतरी समजूत घाला, ही व्यर्थ जीव कशाला देते आहे ? आपल्या आई-वडिलांकडे परत जा म्हणावे. तिसरे कोणी म्हणू लागले, ही खरी पतिव्रता आहे, खरी ज्ञानवंती आहे. हे भगवंता साऱ्या स्त्रियांना जर अशीच बुध्दी तू देशील तर किती चांगले होईल! हिचे माता-पिता भाग्यवंत आहेत. ही साध्वी आता आपल्या बेचाळीस कुळांचा उध्दार करील. प्रेतापुढे ती अशी चालली आहे. तिला एकेक पाऊलाला एकेक अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य लाभत आहे.

अशा तऱ्हेने ती पतीव्रता नदीवर पोचली. लाकडे गोवऱ्या भरपूर घालून अग्निकुंड तयार केले गेले, त्यावर साध्वीच्या पतीचे प्रेत आणून ठेवले. मग तिने सुवासिनींना बोलावून वाणे दिले. सुपे, चोळी, कुंकू-हळद, काजळ कानांतले अलंकार, गळ्यातले मंगळसूत्रादि सारे अलंकार तिने सुवासिनींना दिले. सर्व ब्राह्मणांना पुष्कळ द्रव्य दिले. सर्वांना नमस्कार करुन ती साध्वी म्हणाली, मी माहेरी निघाले, तुमचा सर्वांचा लोभ असू द्या! श्रीशंकर माझे पिता आहेत आणि गौरी माझी माता आहे. त्यांनी आम्हांला प्रेमभावाने बोलावले आहे. आता दिपावलीचा सण आलाच आहे म्हणून पतिसोबत मी माहेरी जात आहे. तिच्या बरोबर आलेल्या लोकांना सांगितले, इकडे घडलेला प्रकार माझ्या सासू-सासऱ्यांना सांगू नका! आमच्यासाठी माझ्या प्रमाणेच ते प्राण देतील आणि तुम्हांला वंश हत्येचे पाप लागेल. त्यांना सांगावे, भीमा-अमरजा हे स्थान उत्तम आहे म्हणून आम्ही श्रीगुरुंजवळ येथील तीर्थवास करुन खुशाल आहोत. श्रीगुरुंच्या दर्शनाला आम्ही आलो, पतीला आरोग्य मिळाले म्हणून आम्ही स्वसंतोषाने येथे राहिलो आहोत, असे सांगा. तेवढ्यात तिला योगेश्वराने उपदेश केलेला आठवला. तिने दोन रुद्राक्ष काढून प्रेताच्या कानात बांधले आणि दोन आपल्या गळ्यात बांधले आणि ब्राह्मणांना म्हणाली, श्रीगुरुमूर्ती कशी आहे हे डोळ्यांनी पहावे असा मी मनात संकल्प केला आहे. तेव्हा श्रीगुरुंचे दर्शन घेऊन लगेच परत येते. तेवढी जाण्याची आज्ञा आपण द्यावी. ब्राह्मण म्हणाले, दहनासाठी सूर्यास्त होऊ नये, तेव्हा तुम्ही त्वरीत परत या. ब्राह्मणांची आज्ञा मिळताच ती साध्वी संगमाकडे निघाली. तिच्या बरोबर गांवांतील काही स्त्रियाहि होत्या.काहि ब्राह्मणहि कौतुकाने तिच्या बरोबर होते. जाताना वाटेत ती साध्वी मनातल्या मनात श्रीगुरुंची स्तुति करु लागली. स्वामी मी पूर्वजन्मीची अभागीण म्हणून आपण माझा अव्हेर केलांत! तुम्हीच सर्वेश्वर आहात. सर्वांना देणारे आहात, शरणागतांना आपलाच आधार असतो. हे आपले ब्रीद आहे, मात्र माझ्या उपयोगी ठरले नाही. आपणच त्रैमूर्ती आहात. सहज लीलेने रजोगुणाच्या सहाय्याने विश्वाची रचना करता, सत्वगुणांने पालन करता आणि तमोगुणाने सर्वांचा नाश करता. माझ्यातच आपल्याला काही दोष आढळला असेल म्हणून माझा अव्हेर केला असला पाहिजे. भक्तजनांना आपलाच आधार आहे असे सगळे सांगतात. तशी आपली ख्याती आहे. आई-वडिल, सासू-सासरे या सर्वांना सोडून वीस गाव (ऐंशी कोस म्हणजे अडीचशे किलोमीटर) अंतरावरुन आपल्या भेटीसाठी आले. आपली भेट झाली की पतीला आरोग्य होईल असे समजून मी आले. मला पुत्र नाही, मी दगडाप्रमाणे राहिले. पति रोगग्रस्त असताना मला संतति व्हावी कशी ? पण माझी इच्छा, नवस पुरले बरं का ? मनोरथ पूर्ण झाले! माझ्या पतीला आरोग्य प्राप्त होऊन मला पुष्कळ पुत्र झाले बरं कां ? म्हणून आपला आता निरोप घेऊन, तुमची कीर्ति घेऊन मी परलोकी जाते.

असे विचार मनी चालू असतानाच ती अमरजा संगमावर येऊन पोचली. श्रीगुरु तेथेच अश्वत्थवृक्षाखाली

बसलेले त्या साध्वीने पाहिले. लांबूनच तिने श्रीगुरुंना साष्टांग नमस्कार घातला, तेव्हा 'निरंतर सुवासिनी हो' असा श्रीगुरुंनी आशिर्वाद दिला. तेव्हा पुन्हा त्या साध्वीने भक्तिपूर्वक नमस्कार केला, तेव्हाहि श्रीगुरुंनी 'अष्टपुत्र सौभाग्यवती भव' असा आशिर्वाद दिला. श्रीगुरुंचे आशिर्वाद ऐकून साध्वी बरोबर आलेले ब्राह्मण म्हणाले, हिचा पती मरण पावला आहे, ही कशी सुवासिनी होईल. त्याचे प्रेत अंत्यसंस्कारासाठी स्मशानात नेले आहे. ही सहगमन करणार आहे आणि त्यापूर्वी आपला निरोप घेण्यासाठी, आपल्या दर्शनासाठी येथे आलेली आहे. ब्राह्मणांचे बोलण ऐकून श्रीगुरु हसून म्हणाले, हिचे सौभाग्य स्थिर असतांना ही मरेल कशी? आमच्या मुखातून 'अष्टपुत्र सौभाग्यवती भव' असे वाक्य निघाले आहे, तेव्हा हिचे अहेवपण (अवैधव्य वा सौभाग्य) स्थिर आहे याबद्दल संशय धरु नका. प्रेत आमच्याजवळ आणा; असा श्रीगुरुंचा आदेश झाल्यावर लोक धावतच स्मशानाकडे गेले. तेवढ्यात तेथे चार ब्राह्मण आले आणि त्यांनी भक्तिपूर्वक श्रीगुरुंच्या चरणांवर रुद्राभिषेक सुरु केला. इतक्यात लोक प्रेत घेऊन आले व ते श्रीगुरुंच्या समोर ठेवले. श्रीगुरुंनी ब्राह्मण मंडळींना प्रेताचे दोर सोडण्यास सांगितले व एका विप्राकडे रुद्राभिषेक देऊन प्रेताच्या सर्वांगावर प्रोक्षण करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या ब्राह्मणाने प्रेताचे दोर सोडून श्रीगुरुंनी दिलेले तीर्थ प्रेताच्या सर्वांगावर शिंपडले. श्रीगुरुंनी त्या प्रेताकडे अमृतदृष्टीने पाहताच प्रेतात चैतन्य प्रकटून तो मृत साध्वीचा पती जिवंत होऊन तत्क्षणी उठून बसला आणि अंगाला आळोखे-पिळोखे देऊ लागला. तेवढ्यात आपण नग्न आहोत याची जाणीव होऊन त्याला लज्जा वाटू लागली. लोकांनी नविन वस्त्रे दिली ती नेसून एका बाजूला येऊन बसला. आपल्या पत्नीला बोलावून हा काय प्रकार आहे, आपणाला कोठे आणले आहे, हे यतिराज कोण आहेत असे सगळे विचारु लागला आणि इतके सारे लोक आलेले असताना मला तू उठविले कां नाहीस? मी उन्मत्तसारखा झोपूनच कसा राहिलो, असे म्हणू लागला. तेव्हा त्या साध्वीने सर्व गोष्टी विस्तारुन सांगितल्या. मग दोघा उभयतांनी उभे राहून श्रीगुरुंना भाव-भक्तिपूर्वक नमस्कार केला. सारी मंडळी हे दृश्य पाहून आनंदाने वेडी झाली.

त्या पतीपत्नींनी श्रीगुरुंची खूप स्तुति केली. आम्ही पूर्वी पाप केले होते, त्या पापाला अनुसरुनच आम्हांला हा जन्म प्राप्त झाला. पापी वर्तन केले आणि पापसागरातून बुडून हे जगदीश्वरा तुझी आठवण मात्र राहिली नाही. सर्व प्राणीमात्रांचे रक्षण करणारे सदाशिव आपणच आहात आनि शरणांगताला क्षमा करुन त्याचे रक्षण करण्याची आपली ख्याती त्रिभुवनांस सर्वत्र पसरलेली आहे. हे जगद्‌गुरु आमचे रक्षण करा-रक्षण करा! हे गुरुमूर्ती आपला जयजयकार असो. आपण सर्व भूतांमध्ये वास करणारे, देवांचे शिरोमणी आणि मायाप्रवर्तक आहात, अशी अनुभूती आम्हांला आली. आम्ही आपल्या चरणांना वंदन करतो. आतां पुनः जन्म नको असा आमच्या मनाचा निश्चय झालेला आहे. आपण आमच्या अपराधांची क्षमा करा. हे स्वामी, क्षमा करा. आम्ही आपल्या चरणी माथा ठेवतो.

अशी अनेक प्रकारे त्या उभयतांनी श्रीगुरुंची स्तुति केली. त्यामुळे श्रीगुरुंना अपार संतोष झाला. त्यांनी त्या साध्वीला आश्वासन दिले, तू पूर्णायुषी होऊन अष्टपुत्र होशील, श्रीमंत होशील आणि आनंदात राहशील. तुझे सारे दोष मावळले. हा देह पडल्यानंतर तुम्हां दोघांना मुक्ति मिळेल. धर्म-अर्थ-काम-मोक्ष हे चारही पुरुषार्थ तुमचे सिध्द झालेले आहेत.आता सर्व संशय सोडून तुम्ही सुखाने रहा.

इतक्यात गावांतील इतर स्त्रिया तेथे पोचल्या. त्यांनी श्रीगुरुंचा मोठा जयजयकार केला. त्यांची खूप स्तुति

केली, गायन केले. निरंजने प्रज्वलित करुन श्रीगुरुंची आरती केली. जयजयकार केला. असा आनंदोत्सव चालला असताना तेथे एक धूर्त, कुबुध्दीचा ब्राह्मण होता. त्याने श्रीगुरुंना विचारले, हे स्वामी, माझी एक विनंती आहे. आमच्या मनांत संदेह निर्माण झाला आहे तो असा की एकीकडे वेद शास्त्रे-पुराणे, 'ब्रह्मलिखित सत्य' हे सनातन तत्व आहे असे ठासून सांगतात आणि येथे पहावे तर या माणसाला अपमृत्यु आला नाही, दिवसा उजेडी याला नैसर्गिक मृत्यु आला असताना याचा प्राण परत कसा आला? मग ब्रह्मलिखित सत्य मानावे कां मिथ्या मानावे?

त्या मूर्ख ब्राह्मणाला सद्‌गुरु हसून म्हणाले, ऐक, या मानवाला पुढे आणखी जन्म घ्यायचे आहेत. त्या पुढच्या जन्मांपैकी या माणसाचे तीस वर्षांचे आयुष्य आम्ही ब्रह्मदेवांकडून मागून घेतले आहे. भक्ताचे रक्षण करण्यासाठी आम्ही हे केले. ते ऐकून सारी मंडळी स्तंभित झाली. सर्वांनी श्रीगुरुंना साष्टांग नमस्कार करुन आपापल्या ठिकाणी निघून गेली.

त्यानंतर त्या दोघा उभयतांनी संगमात स्नान केले आणि अतिशय संतोषपूर्वक अंतःकरणाने श्रीगुरुंची भक्तिपूर्वक पुजा केली.

ही एक मृत्युची कथा आहे आणि ती ऐतिहासिक म्हणजे प्रत्यक्ष घडलेली आहे. एका पतिव्रता, साध्वी स्त्रीच्या धीरोदत्त मनोवृत्तीची, आपल्या पतीवरील एक निष्ठ प्रेमाची, त्या प्रेमासाठी पडतील त्या खस्ता बिनातक्रार सहन करण्याची, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत धीराने व उमेदीने मार्ग काढण्याचे व तिच्या शुध्द निष्कलंक चारित्र्याचे अनेक पैलु व्यक्त करणारी ही कथा आहे. पतीच्या शरीराला दुर्गंधि येऊ लागली असताना व वैद्यहि जवळ येईनासे झाले असताना त्या पतिव्रतेने अत्यंत शुध्द मनाने मुळीच किळस न बाळगता पतीची सेवा चालू ठेवली. यात तिच्या स्वतःचा असा कोणताही स्वार्थ दिसत नाही. पत्नीचा धर्म व कर्तव्य ती पार पाडीत होती. तिचे आई-वडिल, सासू-सासरे दोघेही महाधनिक श्रीमंत होते. ते तिला परावृत्त करु पहात होते. परंतु तिने कोणाचेही ऐकले नाही.

''माता पिता दायाद गोती । समस्त तिसी वारिती ।। पतिव्रता प्रज्ञावंती । न ऐके बोल कुणाचे ।।''

दागदागिने घालणे, उंची वस्त्रे परिधान करण्याचे तिने केव्हाच सोडून दिले होते. केवळ तपश्चर्या म्हणून ती पतिसेवा करीत होती. पति हेच तिचे सर्वस्व होते. त्या तिच्या निश्चयापासून कोणीही तिला परावृत्त करु शकत नव्हते.

हा त्या साध्वीचा निर्धार, तिचा त्याग, तिचे ते वैराग्य तेहि केवळ पंधरा-सोळा वर्षांत प्रकट होणे ही एक विलक्षण बाब लक्षात येते. गुरुचरित्रकार या साध्वीचे वर्ण करतात; 'पतिव्रता ज्ञानवंती'. हे आपणांस मान्य करावे लागते. कारण तिची मानसिक आणि बौधिक प्रगल्भताच तशी होती. त्या प्रगल्भतेमुळेच सारे वैद्यकिय व दैवी उपाय थकल्यावर निराश न होता, खचून न जाता, हुरुप न सोडता आई-वडिल, सासू-सासरे यांची संमति मिळवून आपल्या रोगग्रस्त पतीला घेऊन ती गाणगापूरी आली. यावरुन योग्य वेळी निर्णय घेण्याची क्षमता आणि निर्णयाप्रमाणे कृति करण्याची कार्यक्षमता असे अनेक विध गुणवत्ता लहानपणी त्या साध्वीस आलेली होती. तिचे व्यक्तिमत्व चांगले विकसित झालेले होते हे दिसून येते.

इतकेच नव्हे तर तिचा पतिही मृत्युला घाबरत नव्हता हे त्याने आपल्या आई-वडिल व पत्नीशी केलेल्या संवादावरुन कळून येते. आपल्या आई-वडील-पत्नी यांना पडलेल्या कष्टाची जाणीव ठेवणारा समंजस, विवेकी होता. म्हणून त्याने मृत्युला सामोरे जाण्याची तयारी ठेवली होती. त्याचेही वय १८-२० वर्षांपेक्षा अधिक नव्हते. त्याचे मन परिपक्व झालेले होते. त्याचे विचार सात्विक होते म्हणून तो निर्भय होता.

ती साध्वी आपल्या पतीला पालखी घालून जवळ जवळ २५० किलोमीटर दूर इतक्या अंतरावर गाणगापूरास घेऊन गेली. त्यासाठी कमीत कमी १५-१७ दिवस तरी सहज लागले असतील. तेथे पोचल्याबरोबर लगेचच तिच्या पतीचे ‘प्राणोत्क्रमण’ झाले. यापुढील सविस्तर भाग या कथेत आलेला आहे.

पतीमध्ये किंवा गुरुंमध्ये जी चैतन्यशक्ती आहे त्याची उपासना पतीच्या किंवा गुरुंच्या द्वारे जी आज्ञा होईल वा जी इच्छा होईल त्या प्रमाणे वागणे आणि तसे आचरण ठेवताना आपल्या अहंकाराला, मनात उफाळणाऱ्या बंडखोर वृत्तीला मुरड घालणे, आळा घालणे अशी ही उपासना म्हणजे साधना आहे. त्याचप्रमाणे पतीच्या वा गुरुंच्या आदेशाचे पालन करताना आपले दोष व वाईट प्रवृत्ति काढून टाकून मन लवचिक, सद्‌गुणी व शिस्तबध्द बनवायचे हा अभ्यास आहे.

या कथेत जो पतिव्रता धर्माचा तपशील दिला आहे तो सर्वांनाच एकतर्फी असल्याचे वाटू लागेल. परंतु पतिव्रता धर्माच्या मूळाशी जाता समजून येईल की पारमार्थिक प्राप्ती करुन घेण्यासाठी दुर्लभ अशा मनुष्य जन्माचे सार्थक होण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परिस्थितीत कसे वागावे, कसे करावे, कोणाचे आचरण ठेवावे हे सांगण्यासाठीच ते मांडले गेले आहे. कारण मूलभूत संकल्पना या पायाभूत स्वरुपाच्या असतात. काशीखंडात पतिव्रता धर्माचे नियम सांगितले आहेत. पुजनीय टेंबेस्वामी महाराजांनीही द्विसाहस्त्री मध्ये एकंदर पंधरा श्लोकांमध्ये पतिव्रता धर्माचे नियम दिलेले आहेत आणि ते श्रीगुरुचरित्रांत दिलेल्या धर्तीचे आहेत.

शास्त्राने नेमून दिलेल्या पतिसेवेचे कर्म निष्काम बुध्दीनेकरुन ‘स्थितप्रज्ञ’ अवस्थेपर्यंत ती अल्पवयीन पतिव्रता कशी पोचली होती व त्या अवस्थेत ‘सर्वसंग परित्याग’ करण्याचे धैर्य ती दाखवते की नाही याची परिक्षा घेण्यासाठी श्रीगुरुंनीच हे सारे कथानक घडवले होते. नाहीतर ती साध्वी पतीच्या प्रेताजवळ जो विलाप करीत होती तेव्हा श्रीगुरु योगेश्वराचे रुप धारण करुन आले तेव्हा तेथेच तिच्या पतीला जिवंत करु शकले असते. परंतु त्यांनी तसे केले नाही. कारण त्या रोगी पुरुषाचे आयुष्यच संपलेले होते. शिवाय प्रकृतीच्या नियमात त्यांना ढवळाढवळ करायची नव्हती. पुढे त्या अल्पवयीन साध्वीने सर्वसंगपरित्याग करण्याचे ठरविले तरी पण श्रीगुरुंनी आपला अव्हेर केला हे शल्य तिच्या मनात राहिलेच. म्हणून संगमावर श्रीगुरुंच्या दर्शनास जात असताना तिच्या मनात आलेले विचार व उसळलेली भावना श्रीगुरुंना जाऊन भिडली आणि भक्तवत्सल श्रीगुरु कळवळले ! मग मात्र मुळीच वेळ लागला नाही. साध्वीच्या मृत पतीला आपल्या चरणाच्या तीर्थाने व अमृत दृष्टीने क्षणात जिवंत केले.

दुसरे दिनी प्रात:काळी साध्वी व तिचा पती स्नान करुन श्रीगुरुंजवळ येऊन त्यांना नमस्कार करुन बसले. साध्वी हात जोडून म्हणाली, स्वामी आम्हांस ज्या दिवशी शोक झाला तेव्हा एका यतिमहाराजांनी मला सर्व धर्म (पतिव्रता व विधवा धर्म) सांगून चार रुद्राक्ष दिले. त्यातील दोन मला गळ्यात घालण्यासाठी आणि दोन प्रेताच्या

कानात घालून मग प्रेत दहन करण्यास सांगितले. परंतु रुद्राक्ष आपल्यापाशी व पतिदेवांच्या कानांत तसेच राहिले. तेव्हा श्रीगुरु प्रसन्नतेने हसून त्या साध्वीला म्हणाले, आम्हीच यतीरुपात तुला भेटायला आलो. तुझी भक्ति पाहून रुद्राक्ष आम्हीच दिले होते. आता या रुद्राक्षाचा अनुपम महिमा तुला सांगतो.

श्रीगुरुंनी साध्वीला सांगितलेला रुद्राक्ष महिमा.

श्रीगुरु त्या पतिव्रतेला सांगू लागले, भक्ति असो वा नसो, रुद्राक्ष धारण करणाऱ्यास पापे स्पर्श करीत नाहीत. मग तो उच्च वर्णी असो वा नीच वर्णीय! रुद्राक्ष धारण करणे वेदमान्य असून त्याचे पुण्य अगणित आहे. इतके की त्यासाठी कोणती उपमाच देता येत नाही. रुद्राक्ष माळेने केलेल्या जपाचे फळ अनंत पटीने मिळते.

रुद्राक्षाचे पूर्वीचे एक आख्यान आहे, जे विशेष महत्वाचे असून ते ऐकले असता पापे लगेच दूर होतात, असे म्हणून श्रीगुरु पुढे सांगू लागले;

पूर्वी काश्मीरदेशामध्ये 'भद्रसेन' नामक राजा होऊन गेला. त्याला सुधर्मा नावाचा पुत्र होता. राजाच्या प्रधानालाही तारक नावाचा पुत्र होता. दोन्ही कुमार प्रख्यात होते. त्यांची आपापसांत मोठी मैत्री होती. दोघेही एका वयाचे, सुंदर, एकाच ठिकाणी विद्याभ्यास करणारे, जेवताना-खेळताना दोघेही नेहमी एकत्र असत व समाधानाने राहात. दोघेही शिवपुजन करणारे व महाज्ञानी होते. दोघांच्याही अंगाला भस्म लावलेले आणि सर्वांगावर रुद्राक्ष माळांचे अलंकार असत. आई-वडिलांनी अलंकार दागिने दिले की ते कुमार रागावून लोखंड-दगड म्हणून फेकून देत असत.

असे होता होता एके दिवशी साक्षात ब्रह्म असे पराशर ऋषी भद्रसेन राजाला भेटायला राजवाड्यात आले. राजाने सन्मुख जाऊन त्यांना साष्टांग नमस्कार करुन त्यांचे प्रेमाने, भक्तिभावाने स्वागत केले. त्यांना दरबारात आणून, सिंहासनावर बसवून, अर्ध्य-पाद्य देऊन आनंदाने, मनोभावे त्यांची पूजा केली. आणि होत जोडून ऋषींना म्हटले, ऋषीवर माझ्या आणि प्रधानाच्या दोन्ही मुलांना वेड लागल्यासारखे दिसते. ते रत्न, अलंकार, दागिने फेकून देऊन केवळ रुद्राक्षच धारण करतात. काय त्यांच्या डोक्यात शिरले आहे ते कळतच नाही. आपण त्रिकालज्ञ आहात, आपण खुलासेवार समजून सांगावे.

पराशर ऋषी हसून म्हणाले, राजन तुझ्या आणि प्रधानाच्या मुलाचे पूर्वजन्मीचे मोठे आश्चर्यपूर्ण कथन तुला सांगतो. ते तू लक्षपूर्वक ऐक.

पूर्वी नंदीग्राम नावाच्या नगरात एक महानंदा नावाची प्रसिध्द वेश्या होती. विलक्षण लावण्यवती! तिचे वैभव व ऐश्वर्यहि डोळे दिपवणारे होते. अनेक परिचे अलंकार-दागदागिने तिच्या जवळ होते. शिवाय तरुण होती. सर्वाभरणे ल्यायल्यावर (वेशभूषा, अलंकार परिधान केल्यावर) ती मदनाच्या रतीप्रमाणे शोभत असे. त्या नंदीग्राम नगरीत ती अतिशय ऐश्वर्याने नांदत होती. वारवनिता (वेश्या) असूनही आपण पतिव्रता आहोत असे ती म्हणे. ब्राह्मण तसेच इतर लोक यांना अमर्याद दानधर्म करायची. तिच्या महालात अनेक प्रकारची रत्ने जडविलेला एक नाट्यमंडप (नृत्यशाळा) उभारला होता. तेथे ती नेहमी आपल्या सख्यांसह नृत्य करीत असे. त्याच नाट्यमंडपात तिने मौजेसाठी (गंमत म्हणून) एक कोंबडा व एक माकड (कुक्कुट-मर्कट) पाळले होते. त्यांना रुद्राक्षाच्या माळा

घातलेल्या असत आणि डोक्यावरहि रुद्राक्षमणी बांधलेला असे. त्या दोघांना ती नृत्य करायला शिकवित असे.

एके दिवशी 'शिवव्रता' नावाचा महाधनाढ्य वैश्य (व्यापारी) कपाळाला भस्म लावून व रुद्राक्षमाळा धारण करुन महानंदेच्या महालात आला. त्याच्या जवळ एक अत्यंत तेजस्वी, पिंगट वर्णाचे रत्नखचित व सूर्याप्रमाणे लखलखणारे एक शिवलिंग होते. महानंदेने त्याचे नमस्कार करुन स्वागत करुन त्याला नाट्यमंडपात घेऊन आली. तेथे यथोचित त्याला आसन दिले. ती त्या वैश्याकडील शिवलिंग पाहून चकित झाली. आणि मनात म्हणाली, अशी वस्तु आपल्याजवळ असावयास हवी. तिने सखीला सांगितले, तो आपल्याला शिवलिंग विकत असेल तर वाटेल ती किंमत देऊन किंवा रतिसुखाच्या बदल्यात देणार असेल, तर मी त्याची कुलस्त्री म्हणून तीन दिवस राहिन. त्यावर तो तयार आहे का ? असे तिने आपल्या सखीस त्या वैश्यास विचारण्यास सांगितले. त्याप्रमाणे महानंदेच्या सखीने त्यांस विचारले. तेव्हा वैश्य हसून म्हणाला, 'रतिसुखाच्या बदली मी हे शिवलिंग देईन, पण तुमची जी मुख्य वारवनिता आहे तिने माझी पत्नी म्हणून मनोभावे पतिव्रता व्रत पाळून तीन दिवस राहिले पाहिजे. नाहीतर बोलून चालून तुम्ही वेश्या! व्याभिचार करणे हे तुमचे काम! तेव्हा तुझे बोलणे कितपत खरे मानायचे हा प्रश्नच आहे. कारण तुमचे मन एका पुरुषाबरोबर तिन दिवस कसे स्थिर राहणार ?'

तेव्हा महानंदा म्हणाली, मी तीन दिवस खरेपणाने तुमची कुलस्त्री म्हणून राहिन. तनमनधनाने रतिप्रसंगी तुम्हांला पूर्ण समाधान मजकडून मिळेल, त्याबदली ते दिव्य शिवलिंग आपण मला द्यावे. वैश्य तिला म्हणाला, तीन दिवस व तीन रात्री पत्नीधर्माने राहून तू सर्व कर्मे करशील याचे प्रमाण दे. (म्हणजे अशी शपथ घे) धर्मपत्नी बनून तशी कर्मे मी करीन असे वचन दे. वेश्येने त्या दिव्य शिवलिंगावर हात ठेवून चंद्र व सूर्य यांच्या साक्षीने तशी शपथ घेतली आणि त्या वैश्याची धर्मपत्नी झाली. एवढे झाल्यावर त्याने ते दिव्य शिवलिंग तिच्या हाती देऊन म्हटले, माझ्या प्राणासमान हे शिवलिंग आहे. ते नीट जपून ठेव आणि त्या शिवलिंगाला जर काही हानी पोचली तर मी माझा प्राणत्याग करीन हे लक्षात ठेव. महानंदेला अतिशय आनंद, समाधान वाटले आणि तिने धर्मपत्नी म्हणून हाती कंकण बांधले. वैश्याचे म्हणणे मान्य करुन तिने 'मी प्राणापलिकडे या शिवलिंगाचे जतन करीन' असे पुनः वचन दिले.

इतके सगळे झाल्यावर दिवस मावळ्यानंतर ती दोघे अंतःपुरात (शयन मंदिरात) गेली. तेव्हा रतिप्रसंगी शिवलिंग जवळ नसावे, ते पवित्र स्थानी ठेवावे असे वैश्याने सांगितले असता महानंदेने ते शिवलिंग नाट्यमंडपात मध्यभागी खांबाजवळ व्यवस्थित ठेवून मग ती शयनमंदिरात आली. काही काळ त्या दोघांची रतिक्रिडा चालली असता नाट्यमंडपात अचानक आग लागली. त्या अग्निमध्ये नाट्यमंडप अगरबत्ती वा धूप जळावा त्याप्रमाणे जळून खाक झाला. नगरांतील लोक एकत्र येऊन ती प्रचंड आग विझविण्याचा प्रयत्न करु लागले. आग कशीबशी विझल्यावर तेथे जाऊन पाहिले तर ते दिव्य शिवलिंग जळून गेले होते. त्या बरोबर तेथे बांधलेले कुक्कुट व मर्कटही जळून गेले होते. ते पाहून तो वैश्य विलाप करु लागला. ''हाय, हाय, हे काय झाले ? माझे प्राणलिंग जळाले.'' दुःखाने बेभान होऊन वैश्य म्हणाला, ''प्राणलिंग जळून गेले आता मीहि प्राण देतो'' असे म्हणून त्याने सर्व तयारी करुन अग्नि प्रज्वलित केला आणि आपले प्राणलिंग जळाले म्हणत त्या अग्निमध्ये प्रवेश केला.

नगरवासी लोक हा सारा प्रकार पाहून आश्चर्यचकित झाले. महानंदा फार दुःखी झाली. ''हाय, हाय, हे काय घडले. मला पुरुष हत्येचा दोष लागला. वैश्य माझा प्रिय प्राणेश्वर होता, त्याला हानी पोचली. आता

पतिव्रताधर्माप्रमाणे मीहि प्राणत्याग करीन.'' असे म्हणून तिने ब्राह्मणांना बोलावले. सहगमनाची सर्व तयारी करुन चंदनाच्या काष्ठांची चिता रचली, ब्राह्मणांना नमस्कार करुन पुष्कळ दानधर्म केला. वस्त्रे-भुषणे सर्वांना वाटून टाकली. लोकांनी तिला विरोध करुन दोष देऊ लागले. तिची मती भ्रष्ट झाली असे म्हणू लागले. आपण जन्म कोणता, त्याप्रमाणेच वागले पाहिजे. वेश्येच्या घरी रतिकांक्षा मनात धरुन किती पुरुष येतात याची गणती नाही, तेव्हा सहगमनाचा धर्म तू काय करतेस ? कसाला वैश्य आणि कसले शिवलिंग ? वेश्या म्हटल्यावर रोज नवा पुरुष हाच तुझा धर्म ! अशा तऱ्हेने सर्व जन तिला सती जाण्यापासून परावृत्त करु लागले. पण महानंदा कोणाचे ऐकेना ! ती म्हणाली, वैश्य माझा पति होता (आहे). हे अढळ सत्य आहे. पृथ्वी, चंद्र-सुर्य आणि शिवलिंगाच्या साक्षीने तीन दिवस तीन रात्री धर्म-कर्माने मी त्याची सती (पतिव्रता पत्नी) होण्याचे मान्य करुन तशी धर्मपत्नी झाले होते. माझा पती आता मृत झालेला आहे. तेव्हा वेदाशास्त्राने सांगितलेल्या पतिव्रताधर्माप्रमाणे मला सती गेलेच पाहिजे. असे म्हणून महानंदेने अग्निकुंडाला नमस्कार केला, सूर्याला नमस्कार केला, ईश्वराचे स्मरण केले आणि ब्राह्मणांना नमस्कार करुन तिने अग्निकुंडात उडी टाकली.

त्यावेळी एक विलक्षण व अपूर्व घटना घडली. साक्षात भगवान श्रीशंकर प्रकट झाले आणि त्यांनी वरच्यावर महानंदा वेश्येला झेलून उचलून धरले. अग्निकुंडातील अग्नि एकदम शांत होऊन दिसेनासा झाला. भक्तवत्सल सदाशिव प्रसन्न झाले. महानंदेला अग्निकुंडाच्या बाहेर आणि तिचा हात धरुन म्हणाले, तुझी परिक्षा घेण्यासाठी ''धर्मधैर्य'' पाहण्यासाठी वैश्य बनून मीच आलो होतो. मीच तुला दिव्य शिवलिंग दिले. मायेने अग्नि निर्माण करुन नाट्यमंडप मीच जाळला. तुझे मन पाहण्यासाठी मी मुद्दामच अग्निप्रवेश केला. पण खरी पतिव्रता असल्याने तू आपले व्रत सत्य करुन दाखविलेस. तुझ्या भक्तिने मी संतुष्ट झालो आहे. वर माग ! तू मागशील ते मी तुला देईन. तेव्हा ती वेश्या म्हणाली, मला कोणताच वर नको. माझ्या सर्व बंधूजणांना, दासदासींना स्वर्गात न्यावे. मला मात्र आपल्या सान्निध्यात राहु द्यावे. मला पुनः जन्म, पुनः संसार यांची यातायात नको. मला मुक्ती द्यावी, असे म्हणून महानंदेने ईश्वराचे चरण पकडले. गौरीरमण अत्यंत संतुष्ट झाले. तिच्या सगळ्या लोकांना विमानात बसवून त्यांनी स्वर्गलोकांत त्यांची पाठवणी केली आणि महानंदेला मुक्ती दिली.

इतके कथानक सांगून पराशर ऋषी भद्रसेन राजास म्हणाले, राजन त्या कुक्कुट-मर्कटाचा दग्ध होऊन मृत्यु झाला. ते दोघे आता राजपुत्र व प्रधानपुत्र म्हणून तुमच्या पोटी जन्मास आले आहेत. पूर्वसंस्कारामुळेच ते दोघेहि या जन्मी रुद्राक्ष धारण करीत आहेत. पण या जन्मी ते समजून उमजून तसे करीत नाहीत. पूर्वजन्मी रुद्राक्ष धारण करुन त्यांनी एवढे पुण्य जोडले आणि राजन, तुझ्या राजकुळांत जन्म पावले.

महानंदेची व कुक्कुट-मर्कटांची ही सर्व कथा शिवलीलामृतातीलच आहे. शिव उपासक मोठ्या श्रध्देने शिवलीलामृताचा अकरावा अध्याय ज्यात ही कथा आलेली आहे.) भक्तिभावाने पठण करतात. याचे कारण ही कथा भक्तांच्या, उपासकांच्या मनात भक्तीभाव निर्माण करणारी आहे आणि म्हणूनच ती लोकप्रिय आहे.

महानंदा ही एक वेश्या होती. तिचा पती धर्माशी काय संबंध ? असे कोणीही सहज म्हणून जाईल. तिचा व्यवसाय जरी हीन असला तरी ती तो धर्मभावनेने करीत असे. आपल्याकडे येणाऱ्या पुरुषाच्या रुपाने ईश्वरच येत असतो, त्याची सेवा हीच ईश्वराची सेवा या भावनेने ती आपला व्यवसाय करी. त्या पुरुषाचे समाधान-आनंद त्याच्या

अपेक्षेप्रमाणे देण्याचे तिचे सर्व प्राधान्य असे. आपल्या व्यवसायाचे कर्मच 'स्वधर्म' म्हणून आचरण करीत होती. त्याचप्रमाणे 'पतिव्रता धर्माचे' पालन ही महानंदेने करुन दाखविले. तिला जो तिचा स्वकीयांकडून सती जाण्याचा विरोध होता तो तिच्या वेश्याव्यवसायाला धरुनच होता. लौकिकदृष्ट्या तिने आप्तस्वकीयांनी सांगितल्याप्रमाणे वागली असती तर ते वेश्याव्यवसायाला धरुनच होते. त्यामुळे तिला त्याबद्दल कोणी दोष देण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु तिने पतिव्रताधर्म स्वीकारला आणि त्याचे पालन करण्यासाठी सती जाण्याचा निर्णय घेतला, हेच तिचे खास वैशिष्ट्य आहे. यांत पतिव्रताधर्माची पराकाष्ठा आहे आणि त्या धर्म पालनात उच्च कोटीची निष्कामताहि आहे.

आता प्रश्न येतो तो कुक्कुट-मर्कटांचा. ते दोघेहि अग्नित जळून मेले असे कथानकांत आले आहे. या दोन्हीहि भोगयोनी आहेत. त्यांना महानंदेने रुद्राक्ष चढवलेले होते. परंतु त्या भोगयोनी असल्यामुळे त्यांना रुद्राक्ष धारण करण्याचे पुण्य लागणार नव्हते. परंतु ''अंते मतिः सा गतिः'' या न्यायाने अंतकाळी ते कुक्कुट-मर्कट यांच भौतिक देहातून मोकळे होत असताना त्यांच्या देहावर रुद्राक्ष होते; आणि वैश्याच्या मायिक रुपात का होईना ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन त्यांना झाले होते. त्यामुळे त्यांना फार मोठे पुण्य प्राप्त होऊन त्या पुण्यांच्या बळावर मनुष्य योनीत राजकुळांत जन्म मिळाला.

अशी ही महानंदेची कथा पौराणिक असली तरी पतिव्रता धर्माचे रहस्य प्रकट करणारी आणि निष्काम कर्मयोगातीचीहि उच्च पायरी दर्शविणारी आहे.

या कथेला जोडून आणखी एक कथा आली आहे त्यात पराशर ऋषींनी राजाला रुद्राध्याचा महिमा सांगून रुद्राध्यायाने त्याच्या पुत्राला पुन्हा जिवंत केले त्याची कथा आहे.

## रुद्राचा महिमा

भद्रसेन राजाने पराशर ऋषींना आपल्या व प्रधान पुत्रांविषयी विचारले, ते आता पुढे कसे वागतील? आपण त्रिकालज्ञ आहात, भूत-भविष्य जाणता आहात, माझ्या आणि प्रधानपुत्राचे पुढील लक्षण आम्हांस विस्ताराने सांगावे. त्यावर पराशरऋषींनी उत्तर दिले दोन्ही पुत्रांचे लक्षण अपूर्व असेच आहे. तुझ्या पुत्राविषयी कसे सांगावे? ते ऐकून तूला फार दुःख होईल. राजाने चिंतीत स्वरात म्हटले, जे काय असेल ते स्पष्ट सांगावे. जे काही दुःख वाट्याला येईल त्या दुःखातून मुक्त होण्याचा उपायहि आपणच करावा. तेव्हा ऋषीवर म्हणाले, राजन तुझ्या मुलाचे आयुष्य बारा वर्षांचे आहे. त्या बारा वर्षांपैकी फक्त सात दिवस उरले आहेत. आठव्या दिवशी तुझा मुलगा मृत्यु पावेल. हे ऐकून राजा एकदम मुर्च्छित पडला. आणि सावध झाल्यावर मोठमोठ्याने रडू लागला. ऋषीवरांचे पाय धरुन म्हणाला, मी आपणांस शरण आलो आहे. आपण महातपस्वी आहात. आपण माझे रक्षण करावे. राजपत्नीनेही त्यांचे पाय धरुन विनंती केली आणि उपाय विचारला. पराशरांनी त्यांना समजावून सांगितले, भगवान शिवशंकराला शरण जा. मनातील भय काढून शिवाची उपासना करा ते शूलपाणि रक्षण करतील. काळाला (म्हणजे मृत्युला) जिंकण्याचा उपाय एकच आहे तो लक्षपूर्वक ऐक.

स्वर्गलोक, मृत्युलोक-पाताळलोक सगळीकडे निर्मळ, चिदानंदस्वरुप ईश्वर एकच आहे. त्याने रजोगुणी ब्रह्मदेव उत्पन्न केला आणि सृष्टी चालण्याची नीट व्यवस्था व्हावी म्हणून वेद उत्पन्न केले. ते चारी वेद ब्रह्मदेवाच्या

स्वाधीन करुन ईश्वराने आत्मतत्व रहस्य ज्यांत भरले आहे असा उपनिषदांचा समूह स्वत:जवळ ठेवला होता. त्या उपनिषद समूहांतील सर्व वेदांचे सार असलेला रुद्राध्याय ईश्वराने ब्रह्मदेवास दिला. रुद्राध्यायाचा महिमा फार मोठा होता. श्रीगुरुंच्या सांगण्याप्रमाणे जे या रुद्राची भक्ति करतात ते भवसागर तरुन जातात. असे समजावून सांगितले. ऋषीवर म्हणाले, राजन रुद्राची दश सहस्त्र आवर्तने करुन ईश्वरावर दुधाचा अभिषेक कर म्हणजे तुझ्या पुत्राचे आयुष्य वाढून तो जगेल आणि इंद्राप्रमाणे राज्य करील. त्याचे राजवैभवहि वाढेल आणि सर्वत्र निष्कंटक असा त्याच्या राज्याचा विस्तार होईल. तेव्हा विद्वान, ज्ञाती असलेले, यज्ञनिष्ठ, कामक्रोध नसणारे, आचारसंपन्न अशा शंभर ब्राह्मणांना पाचारण करुन भगवान शिवशंकरावर अभिषेक कर. त्याप्रमाणे राजाने शंभर ब्राह्मणांना बोलावून शंभर कलशांमधून दुधाने ईश्वरावर विधिपूर्वक अभिषेक करविले आणि दररोज अर्थात सात दिवसपर्यंत भक्तिपूर्वक करविले. आणि त्या अभिषेक जलाने प्रत्येक दिवशी राजपुत्राला स्नान घातले. सात दिवसांता अवधी संपला आणि राजपुत्र मूर्च्छित पडला. काहीवेळ त्याची शुध्द गेली. पण पराशरऋषींनी त्याचे रक्षण केले. त्यावेळी अचानक अदृश्य सृष्टीत शब्द आला. यमदूत अदृश्य रुपाने आले होते. त्याचवेळी ब्राह्मणांनी त्या मूर्च्छित पडलेल्या राजकुमारावर मंत्राक्षता टाकल्या. त्या यमदूतांनी लांबून पाहिल्या त्यामुळे ते पुढे सरकून राजपुत्राचा प्राण हरण करु शकले नाहीत. तेथेच राहून त्यांनी राजपुत्रावर महापाश टाकण्याचा प्रयत्न केला तेव्हा शिवदूतांनी यमदूतांवर हल्ला करताच ते भयभीत होऊन पळून गेले. अशा तऱ्हेने रुद्राजाप्य करणाऱ्या ब्राह्मणांनी राजपुत्राचे रक्षण केले आणि त्याला वेदोक्त आशिर्वाद दिले. राजकुमार स्थिरमनाने सावध झाला. राजाला आणि सर्वांना फार आनंद झाला. मोठ्या समारंभाने तो आनंद साजरा करण्यात आला. राजाने सर्व ब्राह्मणांचे पूजन करुन त्यांना भोजन दिले, विडा-दक्षिणा दिली. पराशर ऋषींना सिंहासनावर बसवून त्यांचा सत्कार केला. इतक्यात नारद मुनींची स्वारी तेथे आली हे पाहून राजाने पुढे जाऊन त्यांना वंदन केले. त्यांचा आदर-सत्कार केला, आणि हात जोडून विनंती केली, हे नारदऋषी आपण त्रैलोक्यामध्ये संचार करता, तेव्हा काही अपूर्व विशेष असेल तर आम्हांस सांगावे.

नारदमुनी म्हणाले, कैलासाहून येताना एक अपूर्व दृश्य पाहिले. यमदूत तुझ्या मुलाचे प्राण नेण्यास आले होते पण शिवदूतांनी येऊन त्यांना पळवून लावले. यमदूत यमाकडे जाऊन म्हणाले, शिवदूतांनी आम्हांला मार दिला, आतां आम्ही पृथ्वीवर कसे जावे ? तेव्हा यम रागावून वीरभद्राकडे (शिवदूतांचा प्रमुख) गेला आणि त्याने विचारले, माझ्या निरपराध दूतांना तुम्ही का मारले ? तेव्हा वीरभद्र संतापून यमाला म्हणाला, राजकुमाराला दशसहस्त्र वर्षांचे आयुष्य असताना चित्रगुप्ताला न विचारता तुम्ही दूतांना त्याचे प्राण आणण्यासाठी का पाठविले ? तेव्हा यमाने चित्रगुप्ताला निरोप पाठवून बोलावून घेतले आणि राजकुमाराचे आयुष्य विचारले असता, त्याने पत्र काढून पाहिल्यावर तेथे लिहिले होते, बाराव्या वर्षी अपमृत्यु योग आहे आणि त्यापुढे असेहि लिहिले होते की हा अपमृत्यु ओलांडून हा दहा सहस्त्र वर्षे जगेल. तेव्हा मात्र यमाने वीरभद्राची क्षमा मागून निघून गेला.

हे सारे वर्तमान नारदांनी भद्रसेन राजाला सांगितले आणि ते राजाला म्हणाले, रुद्रजाप्याच्या पुण्यामुळे तुझ्या मुलाचे आयुष्य वृाध्दिंगत झाले. पराशरगुरुंच्या कृपेने तू खरोखर मृत्युला जिंकलेस. असे म्हणून नारदमुनी निघून गेले. पराशर ऋषींनीहि राजाचा निरोप घेतला. सारे ब्राह्मण आपापल्या ठिकाणी परत गेले.

रुद्राध्यायाचा महिमा हा असा आहे. सद्‌गुरुंच्या आज्ञेने रुद्र मंत्रांनी शिवपुजा केली असता काळाची भीती

बाळगण्याचे कारण नाही. असे नृसिंह गुरुंनी त्या दंपतीस सांगितले.

या कथानकांतील मुख्य मुद्दा असा की आयुष्य संपत आलेले आहे हे माहित झालेले असतानासुध्दा एवढे मोठे विधियुक्त 'कर्म' पराशर ऋषींनी भद्रसेन राजाकडून कां करविले? दुसरे म्हणजे केवळ बारा वर्षांचे हे विधिलिखित आहे तर ते अनुष्ठान केल्याने वाढू शकते का?

याचा अर्थ असा, अनेक जन्मांमध्ये आपली आपणच स्वप्रयत्नाने उन्नति करुन घेऊन जीव वेगळ्या अवस्थेत वेगळ्या पायरीवर पोचू शकतो आणि ईश्वराचा 'लाडका' बनून ईश्वराचे 'कार्य' करण्यासाठी 'कर्मशरीरा' ने मृत्युलोकांत सुध्दां आपले आयुष्य अंगीकृत 'कार्या'साठी वाढवू शकतो. आणि मृत्युवर मात करु शकतो. पण तेथे सद्‌गुरुंची कृपा मात्र असावी लागते. त्यासाठी पूर्वजन्मांतील आध्यात्मिक संस्कारहि महत्वाचे असतात.

ज्याप्रमाणे वैदिक मंत्र न येणाऱ्यांसाठी शिवलीलामृतांतला अकरावा अध्याय महत्वाचा आहे त्याप्रमाणे वैदिकांसाठी रुद्राध्याय महत्वाचा आहे.

श्रीगुरुंकडून रुद्राचा महिमा ऐकल्यानंतर त्या साध्वीने श्रीगुरुंना विनंती करुन म्हटले, आमचे पुढे काय करावे? आम्हांला चांगली गति मिळावी म्हणून आपण आम्हांस एखाद्या मंत्राचा उपदेश द्या की ज्यामुळे आम्हांला आपल्या चरणांची नित्य आठवण राहिल. श्रीगुरु तिला म्हणाले, स्त्रियांनी मनापासून पतिसेवा व्रत आचरावे. स्त्रियांना मंत्राचा उपदेश देऊ नये. कारण दिलेला मंत्र निरुपयोगी होतो आणि मंत्र ऐकणाऱ्याची हानी होते. त्यावरुन त्यांनी कच-देवयानी-शुक्राचार्यांची कथा सांगितली आणि म्हणाले, स्त्रियांसाठी आपल्या संस्कृतीत अत्यंत आदर्श असे फक्त 'पातिव्रत्य' हेच व्रत होय. स्त्रिचे मुख्य साधन 'पतिसेवा' हे आहे. म्हणून स्त्रियांनी पतिच्या किंवा गुरुंच्या सांगण्यावरुन व्रत-उपवास इत्यादी करावेत. त्यांना मंत्र देता येत नाहीत. तेव्हा त्या साध्वीने विनयपणे श्रीगुरुंना म्हणाली, तरीदेखील आपण मला एखादे व्रत नेमून द्यावे. तेव्हा श्रीगुरुंनी, सोमवारी ईश्वरार्चन (भगवान शंकराचे पूजन) करण्याचे व्रत तिला सांगितले. त्याने सर्व प्रकारचे कल्याण होते. सोमवारी दिवसभर उपवास करुन रात्री भोजन करावे. ब्रह्मचर्य पाळावे. वैदिक-लौकिक विधिनुसार सदाशिवाचे पूजन करावे. अशा प्रकारे सोमवारचे व्रत सांगून श्रीगुरुंनी त्या व्रताचे आख्यान सांगितले. तेच सीमंतिनी आख्यान होय. ते स्कंदपुराणातील आहे.

श्रीगुरुंनी त्या दंपत्तीला (माहूरचा दत्त व त्याची पत्नी सावित्री या दोघांना) सोमवार व्रत सांगून म्हटले, हे व्रत तूहि कर म्हणजे तुझे सौभाग्य अखंड राहिल; तुम्हांला कन्यापुत्र अशी संततीही होईल. हे आमचे वाक्य आहे हे लक्षात ठेवा! तेव्हा ते दंपत्ती दोघेजण श्रीगुरुंना हात जोडून म्हणाले, स्वामी आपली चरण सेवा हेच आमचे व्रत, तेच आम्ही निर्धाराने करु. आम्हांला आणखी दुसरे व्रत हवेच कशाला? त्यावर श्रीगुरु म्हणाले, 'आम्ही सांगितले म्हणून सोमवारचे व्रत करा, तीच सेवा आम्हांला पावेल'!

त्या दंपतीने श्रीगुरुंना साष्टांग नमस्कार घालून त्यांचा निरोप घेऊन आपल्या घरी माहूरला परत आले. आणि आपल्या माता-पित्यांना भेटले. सर्वांना अत्यंत आनंद झाला. त्यांनी अमाप खर्च करुन श्रीगुरुंची भक्तिपूर्वक मोठी पुजा केली. ब्राह्मणांची मोठी समाराधना केली. त्यामुळे श्रीगुरुंची कीर्ति चहू राष्ट्रांत पसरली. पुढे दत्त व सावित्रीला पाच शतायुषी पुत्र झाले. त्यांची नावेहि श्रीगुरुंनीच ठेवली. दरवर्षी ते दांपत्य श्रीगुरुंच्या दर्शनास येत असे आणि

उभयतां श्रीगुरुंचे शिष्य झाले.

## श्रीगुरुंनी अह्निक व नित्यकर्म निरुपण केले.

श्रीगुरु गाणगापुरात असताना त्यांचा महिमा अपरंपार असा वाढला. गाणगापुरात एक वेदरत विद्वान व विरक्त ब्राह्मण होता आणि कर्ममार्गाचे आचरण निष्ठेने करीत असे. तो प्रतिग्रह (म्हणजे दान) घेत नसे, परान्न जेवत नसे. मिथ्यावाद (म्हणजे वितंडवाद, चर्चा इत्याद) टाळीत असे. त्याचप्रमाणे कोणाचीही निंदा-नालस्ती करणे वा कोणाबद्दल अपशब्द बोलणे त्याला वर्ज्य असे. रोज कोरान्न म्हणजे शुक्लभिक्षा मागून आणीत असे आणि त्यावर आपला उदरनिर्वाह करीत असे. तरीसुध्दां नित्य अतिथी-अभ्यागतांना अन्न दिल्याशिवाय स्वत: जेवत नसे. त्याची पत्नि अतिशय तापट व क्रोधी स्वभावाची होती.

त्या गाणगापुरात नित्य परगांवचे ब्राह्मण श्राध्दपक्ष इत्यादी करण्यासाठी येत आणि सहस्त्रसंख्येने ब्राह्मण भोजन घालीत. गावांतील इतर ब्राह्मणस्त्रीयाहि या भोजनासाठी जात आणि त्याचे रसभरीत वर्णन करीत. ते सर्व ऐकून या कर्मनिष्ठ ब्राह्मणाच्या पत्निला फार दु:ख होत असे. ती देवाला उद्देशून मनात नेहमी म्हणे, की हे परमेश्वरा, किती मी दैवहीन आहे पहा, असले सुग्रास भोजन मला स्वप्नात सुध्दा कधी मिळणार नाही. माझै पूर्वजन्मीचे कर्म वाईट असणार म्हणून मला असला दरिद्री पती मिळाला. इतर ब्राह्मण आपल्या स्त्रियांना घेऊन परान्न भोजनाला जातात. पण माझा पती कधी परान्न घेत नाही, हे नारायणा, मी काय रे करु ?

अचानक एके दिवशी एक मोठा धनिक तेथे आला आनि महालय श्राध्द करायचे म्हणून सर्व ब्राह्मणांना भोजनाचे आमंत्रण देऊन गेला. हे पाहून ती ब्राह्मणी आपल्या पतीजवळ जाऊन एका मोठ्या धनिक ब्राह्मणाने महालय श्राध्दाच्या भोजनाचे आमंत्रण दिले आहे. अनेक तऱ्हेची पक्वान्ने, नेसण्या-पांघरण्याची वस्त्रे-प्रावरणे शिवाय भरपूर द्रव्य दक्षिणा तो ब्राह्मण देणार असल्याचे सांगून पतीला म्हणाली, हे आमंत्रण स्वीकारा; नाहीतर मला जाण्याची परवानगी द्या; पक्वान्नांचे जेवण जेवावे अशी माझी उत्कट इच्छा आहे ! हे ऐकून ब्राह्मण म्हणाला, तुला जायचे असेल तर जा, जेवण कर, पण मी येणार नाही ! ते ऐकून ती ब्राह्मणी त्या धनिकाकडे जाऊन म्हणाली, मी जेवायच्या वेळी आले तर चालेल का ? असे विचारताच त्या धनिकाने उत्तर दिले, 'आम्ही दंपतीला आमंत्रण दिले आहे; तुम्ही आपल्या पतीला बरोबर घेऊन या. आपले पती बरोबर येणार असतील तरच आपण आमच्या घरी यावे !' हे ऐकून ती ब्राह्मणी फार उदास झाली आणि आता काय करावे असा विचार करुन श्रीगुरुंकडे आली. त्यांना साष्टांग नमस्कार घालून तिने विनंती केली, स्वामी, आम्हांला चांगलेअन्न खायला मिळत नाही हो; कधीच मिळत नाही ! माझा पती परान्न घेणार नाही म्हणतो आणि ते गृहस्थ फक्त दंपतीला आमंत्रण देतो असे म्हणतात. आपण माझ्या पतीला हे आमंत्रण स्वीकारण्यास सांगा. तेथे अन्नाबरोबर वस्त्रे आणि मोठी दक्षिणाहि देतात. तिचे बोलणे ऐकून श्रीगुरु हसले, त्यांनी लगेचच तिच्या पतीला बोलावून तू या आमंत्रणाप्रमाणे भोजनाला जा, तुझ्या पत्निच्या मनात पक्वान्ने, मिष्ठान्ने खावीत अशी इच्छा आहे. तेव्हा तू तिची इच्छा पूर्ण कर. कुलस्त्रीचे अंत:करण नेहमीच खिन्न व दु:खी असू नये.

ब्राह्मण श्रीगुरुंना नमस्कार करुन म्हणाला, परान्न न घेण्याचा माझा नियम आहे, पण गुरुवचनाचा अव्हेर करणे म्हणजे नरकांत जाणेच होय ! केवळ आपला आदेश शिरसावंद्य असल्यामुळेच मी जाईन. अशी श्रीगुरुंची परवानगी

घेऊन मगच ते दांपत्य आमंत्रणाप्रमाणे भोजनास गेले.

आपल्या पितरांच्या व गोत्राच्या नावाचा उच्चार करुन त्या ब्राह्मणाने संकल्प सोडला. पण भोजन करताना त्या ब्राह्मणीला कुत्री व डुकरे आपल्याबरोबर जेवत आहेत असे विपरीत अशुभ असे दृश्य दिसले. त्यामुळे तिला उबग येऊन ती पानावरुन उठली आणि पतीसह घरी परतली. पतीला सांगितले, तुम्ही कुत्र्या-डुकरांचे उच्छिष्ट जेवलात! तेव्हा ब्राह्मण म्हणू लागला, तुझ्यामुळे हे दुर्दैव माझ्या वाट्याला आले. त्याला इतके वाईट वाटले तितकाच संतापहि आला आणि अशा स्थितीत ते दोघेजण श्रीगुरुंकडे आले. श्रीगुरु त्या ब्राह्मणीला म्हणाले, परान्न खाण्यातले सुख कसे आहे ते अनुभवलेस ना! श्रीगुरुंचे हे बोल ऐकून त्या ब्राह्मणीने त्यांचे पाय धरुन क्षमा मागितली. तो ब्राह्मण मोठ्या काळजीत पडलेला पाहून श्रीगुरु उद्‌गारले, तू बायकोची इच्छा पूर्ण केलीस, तिचे मन शांत झाले. आता ती परान्न घेण्यास पुन: जाणार नाही आणि तुझ्या सांगण्याप्रमाणे वागेल. तू मनांत चिंता करु नकोस. तू आमच्या आज्ञेने गेला होतास. तुला काहीही दोष लागणार नाही, हे लक्षात घे. श्रीगुरुंचे हे बोल ऐकून ब्राह्मणाने त्यांना साष्टांग नमस्कार घालून विचारले, स्वामी कोणाच्या घरी अन्न घ्यावे, कोणाकडे भोजनास जाऊ नये, अन्नग्रहणाच्या बाबतीत चूक झाल्यास कोणकोणते दोष लागतात? हे सर्व मला समजावून सांगा.

त्या ब्राह्मणाची विनंती ऐकून श्रीगुरुंनी विस्तारपूर्वक सांगितले.

### अन्न कोणाकडे घ्यावे.

आपल्या गुरुंच्या घरी, आपल्या शिष्याच्या घरी, वैदिक विद्वांच्या घरी, मामा-सासरे-भाऊ यांच्या घरी,साधुसंतांच्या घरी अन्न घ्यावे. एखादा विप्र ब्राह्मण मिळत नाही म्हणून नडला असेल, तर त्याचे घरी अन्न घ्यावे. मात्र दोषहरणार्थ गायत्री जप करावा.

### अन्न कोणाकडे घेऊ नये.

माता-पितांकडून नेहमी सेवा करवून घेणाऱ्याकडे, धनलोभिष्ट स्त्रियांच्या घरी, ज्याच्यावर बहिष्कार घातलेला आहे अशाच्या घरी, किंवा भिक्षा मागून पोट भरणाऱ्याच्या घरी, आपली स्वत:ची स्तुती आणि दुसऱ्याची निंदा करणाऱ्याच्या घरी, गुरु असून दुसऱ्यास मंत्रोपदेश देणारा पण ज्याचे शिष्य अनीतीने वागतात अशा गुरुंच्या घरी, क्रोधी ब्राह्मणाच्या घरी, बायकोला टाकून देणाऱ्याच्या घरी, पुत्र व पती यांना सोडून राहणाऱ्या स्त्रीच्या घरी,दारु गाळणाऱ्याच्या घरी,चोरी करणाऱ्याच्या घरी, ब्राह्मणाचा,साधूंचा द्वेष करणाऱ्याच्या घरी, चांगल्या साधक ब्राह्मणांनी अन्न घेऊ नये किंवा अन्न घेण्याचे टाळावे. आपल्या कन्येच्या घरी भोजनास जाऊ नये. तिला पुत्र झाला की मात्र सुखाने जावे. तसेच सूर्यग्रहण-चंद्रग्रहण असताना अन्न ग्रहण करु नये. जननाशौच (सोयर) किंवा मृताशौच (सुतक) असलेल्या घरी चांगल्या साधकाने अन्न घेऊ नये.

अशा तऱ्हेने कोणाकडे अन्न घ्यावे व कोणाकडे अन्न घेऊ नये याचा विचार सांगितल्यावर ब्राह्मणांच्या आचाराबद्दल श्रीगुरु म्हणाले, एखाद्या चांगल्या ब्राह्मणाचे आचरण पाहून तसे आपणहि करायचे असे जे करतील त्यांचेहि दैन्य दूर होते. त्यांना देव वश होतात. मदोन्मत्त होऊन ब्राह्मणांनी आपली आचारकर्मे सोडली त्यामुळे ते स्वधर्मापासून भ्रष्ट होऊन दरिद्री झाले.

श्रीगुरुंचे वचन ऐकून त्या कर्मनिष्ठ ब्राह्मणाने त्यांना नम्रपणे विनंती केली आचारधर्म का पाळावा हे आम्हांस सविस्तर सांगावे. तेव्हा पूर्वी ऋषींनी जे आचारधर्माचे आचरण केले तो आचारधर्म श्रीगुरुंनी सांगितला.

श्रीगुरु म्हणाले पूर्वी नैमिष्यारण्यात सर्व ऋषी जमले असताना पराशर ऋषी तेथे आले. त्यांना आचारधर्माचे ब्राह्मणांनी कसे पालन करावे याचे मार्गदर्शन करावे अशी इतर ऋषींनी विनंती करताच पराशरांनी आचारधर्म समाजावून सांगितला.

ब्राह्मणमुहूर्ती म्हणजे पहाटेच्या पाच घटिका रात्री (म्हणजे पहाटे तीन वाजता) उठून श्रीगुरुस्मरण करुन ब्रह्मा-विष्णू-महेश या त्रिमूर्तीचे ध्यान करावे. त्यानंतर अंथरुणावरुन उठून दोनदा आचमन करावे आणि लघवी करुन आल्यानंतर शुध्दीसाठी आणखी एकदा आचमन करावे.

यानिमित्ताने आचमन केव्हा केव्हा करावे तेहि सांगितले. स्नानापूर्वी, स्नानानंतर, पाणी पिण्यापूर्वी व पाणी प्यायल्यानंतर, निजण्यापूर्वी व उठल्यानंतर, भोजनापूर्वी व भोजन झाल्यानंतर, लघुशंका, शौच, जांभई, शिंक, अधोवायू शब्द होणे, अशुभ-अमंगळ असे काही दृष्टीस पडल्यास दोनदा आचमन करुन शुध्दि करावी. पाणीजवळ नसेल तर श्रोत्राचमन करावे (डोळ्यांना व कानांना स्पर्श करावा.) आणि पवित्र व्हावे.

लघुशंका व आचमन झाल्यानंतर मौनाने मानसस्नान करावे. मानसस्नानानंतर चांगल्या पवित्र आसनावर अरुणोदय होईपर्यंत बसावे आणि गायत्री जपाव्यतिरिक्त इतर शास्त्रोक्त मंत्रांचा जप करावा.

अरुणोदय होण्याच्या सुमारास घराच्या किंवा गावाच्या बाहेर शौचासाठी जावे. यज्ञोपवीत कानावर ठेवून नैऋत्य दिशेस जावे. डोक्यावर धोतराचा पदर किंवा पंचा घेऊन खाली तोंड करुन बसावे. विचारपूर्वक मौन पाहून चहुंकडे न पाहतां बसावे. नुसत्या जमिनीवर न बसता, वाळलेल्या पानावर-गवतावर बसावे. हिरवी पाने दूर ठेवावी. त्यानंतर पाण्याच्या भांड्याकडे जाऊन अंग धुवावे. त्यानंतर मातीने अपानद्वार, लिंग, हातपाय यांची स्वच्छता करावी. माती जलाशयाच्या तीरावरील किंवा वाळवंटातील असावी. शौच झाल्यावर चुळा भराव्यांत. ब्राह्मणाने आठ वेळा चुळा भरुन तीन वेळा आचमन करावे व मग कुलदेवतेचे स्मरण करावे.

आमचन मौन राहून करावे व नाम न घेता आपल्या शरीराच्या वीस स्थानांना स्पर्श करावा. तोंडाची दुर्गंधी नाहिशी व्हावी या उद्देशाने दंतधावन म्हणजे दात घासावेत. दंतधावनासाठी खैर, करंज, आघाडा, औदुंबर, वड किंवा करवंद इत्यादी वृक्षांचे काष्ठ घ्यावेत.

प्रात:स्नान करावे. त्याने दु:स्वप्नांचा नाश होऊन प्रज्ञेची वृध्दि होते. तेजोबळ, आयुष्यवर्धन गोष्टी साधतात. नित्य प्रात:स्नान केल्याने पापांचा नाश होतो. रडण्यानंतर उलटी-ओकारी झाल्यानंतर, स्त्रीसंगानंतर व वाईट स्वप्न दिसल्यानंतर स्नानाशिवाय शुध्दि होत नाही आणि म्हणून स्नान अवश्य करावे.

ब्राह्मणांनी मुख्यत: शुभ्र पांढरे वस्त्र (धोतर) नेसावे. एक उपवस्त्र असावे. पण ते उपवस्त्र घेतले असता हात मोकळा रहावा. वस्त्राने गुंडाळलेला नसावा. त्याला उत्तरवस्त्र वा उपरणे म्हणतात. धोतर नेसल्यानंतर विधोनोक्त मंत्र म्हणून गोपिचंदन व भस्म (विभूती) लावावे.

असे करुन त्यापुढील कुश व दर्भाची माहिती ते किती प्रकारचे आहेत, प्रातःसंध्या विधि (गायत्री जप व प्राणायाम), प्राणायामाचे विधि, मार्जन, अर्ध्यदान, गायत्रीजप कसा करावा (त्याचे सविस्तर वर्णन), ध्यान व आवाहन, औपासन आणि ब्रह्मयज्ञ इत्यादी साऱ्या गोष्टींचे (आचारधर्मांचे पालन) सविस्तर निरुपण पराशर ऋषींनी केले आहे.

अशा तऱ्हेने श्रीगुरुंनी त्या कर्मठ ब्राह्मणावर कृपा करुन त्याला सर्व आचारधर्म सांगितला.

त्यानंतर देवपुजेचेहि सविस्तर वर्णन कथन केले. देवपुजेनंतर वैश्वदेव कसा करावा याचेहि सविस्तर मार्गदर्शन केले. अंती भोजन विधिची सारी माहिती सविस्तर सांगितली.

रात्रीच्या भोजनानंतर एक प्रहर वेदाभ्यास करावा आणि मगच झोपावयास जावे.

त्यानंतर स्त्रीसंगाविषयीहि विचार कथन केला आहे. रजस्वला स्त्रीच्या चौथ्या दिवशी तिच्याजवळ जाऊ नये. स्त्रीसंगाचे वेळी दीप नसावेत. जानवे उपविती (नेहमी सारखे) असावे. संग करण्याच्या वेळी चंद्रबळ असावे. स्त्री किंवा पुरुष यांच्यापैकी कोणालाहि क्रोध, मनाची क्षुब्धता नसावी. उभयतांचा संतोष असावा. संग करताना स्त्री-पुरुषांची मनोवृत्ती जशी असेल त्याप्रमाणे पिंड निर्माण होतो.

अशा तऱ्हेने आचारधर्म जो पाळतो तो सर्व देवांना वंद्य होईल. त्याच्या घरी लक्ष्मी अखंड राहिल. त्याला अपमृत्यु घडत नाही.

श्रीगुरुंचे हे सांगणे ऐकून त्या कर्मनिष्ठ ब्राह्मणाने त्यांचे चरण पकडून म्हटले, हे कृपासागरा, आपल्या उपदेशाने माझा उद्धार झाला आणि बुध्दीमध्ये ज्ञानज्योती प्रकाशली! असे म्हणून त्याने पुन: श्रीगुरुंच्या चरणांना मिठी मारली.

श्रीगुरु संतुष्ट होऊन त्यांस म्हणाले, तुला आचारधर्म सांगितला आहे त्याचे पालन करुन सुखी हो. आता तुला भिक्षेला जाण्याची गरज नाही. तुझ्या सर्व मनोकामना पूर्ण होतील. तुला जे जे हवे असेल ते ते मिळेल. तुझ्या घरी कन्या-पुत्र नांदतील!

असा वर श्रीगुरुंकडून प्राप्त करुन घेतलेला तो ब्राह्मण आपल्या घरी गेला. श्रीगुरुंच्या उपदेशाप्रमाणे आचारधर्मांचे पालन करुन त्याला सकल अभीष्टांची प्राप्ती झाली.

आचारधर्माचे पालन करु यम-नियम अंगी बाणवले व धर्मशास्त्राच्या आधारे वागले तर देव, ऋषी, पितर व समाज यांच्या ऋणातून मुक्त होता येते. शास्त्रशुध्द कर्माचरण हाच सर्व सिध्दीचा पाया आहे. कारण अशा कर्माचरणाने चित्तशुद्धि, चित्तशुद्धितून ज्ञान, ज्ञानाने मोक्ष साधण्यासाठी सद्गुरुंची प्राप्ती होते व सद्गुरुंच्या आदेशाप्रमाणे वर्तन ठेवल्यास सारे काही प्राप्त होते.

श्रीगुरुंनी कर्मठ ब्राह्मणाला सांगितलेले आचाराचे नियम स्मृतिचंद्रिका व पराशर ऋषींची वचने यावर आधारलेले आहेत.

## भास्कर ब्राह्मणाची समाराधना.

कोणी भक्तांनी द्रव्य-रोकड, पैसा वगैरे आणला तर श्रीगुरु त्या द्रव्याने समाराधना करा असे सांगत असत. त्यामुळे श्रीगुरुंच्या मठात नेहमी समाराधना (अन्नसंतर्पण) होत असे. एके दिवशी काश्यप गोत्राचा, गरीब-दुबळा भास्कर नावाचा ब्राह्मण श्रीगुरुंच्या दर्शनाला आला आणि त्याने मनांतच संकल्प केला, श्रीगुरुंना भिक्षेसाठी आमंत्रण देऊन आपण प्रसाद घ्यावा. तीन माणसांना पुरेल एवढे तांदुळ-कणिक इत्यादी शिधा व स्वयंपाकाचे वरकड पदार्थ व साहित्य त्याच्याजवळ होते. त्याने ते एका कापडाच्या गाठोड्यात बांधलेले होते. मठात नित्य समाराधना होत असे. समाराधना घालण्यासाठी अनेक भक्त येत असत. त्यांच्या गर्दीत भास्कर ब्राह्मणाला श्रीगुरुंना भिक्षा करण्याची संधी मिळेना. रोज आपले गाठोडे उशाशी ठेवून झोपायचा. सगळे जन त्याला हसायचे आणि म्हणायचे, हा समाराधनेची तयारी करुन आलो आहे असे म्हणतो पण रोज स्वतःच दुसऱ्यांच्या समाराधनेमध्ये जेवतो आहे. एका माणसाला पुरेल एवढेसुध्दा अन्न याच्याजवळ नाही आणि येथे श्रीगुरुंचे इतके शिष्यगण आहेत, कसे करील हा ब्राह्मण ? वरुन समाराधना करीन म्हणतो. अरे समाराधना म्हणायची तरी लाज वाटली पाहिजे! तुझा स्वयंपाक सगळा आम्हांला देऊन तू माधुकरी का मागत नाही ? अशा नाना प्रकारे त्याची चेष्ठा मस्करी मठांतले सर्व लोक करु लागले. असे तीन महिने होऊन गेले. त्यांची टिंगल टवाळी फारच होऊ लागली. ही गोष्ट श्रीगुरुंच्या कानावर गेली. त्यांनी भास्कर ब्राह्मणाला आपल्या समोर बोलावून म्हटले, आज तू आमच्या भिक्षेची तयारी करुन लवकर स्वयंपाक कर. श्रीगुरुंचे हे बोल ऐकून भास्कर ब्राह्मण फार आनंदी झाला. त्याने श्रीगुरुंच्या चरणांवर डोके ठेवून स्वयंपाकाच्या तयारीला लागला. दोन शेर तूप, भाज्या आणल्या आणि स्नान करुन शुचिर्भूतपणाने स्वयंपाक केला. मठातील ब्राह्मण श्रीगुरुंकडे जाऊन म्हणाले, आज आमच्या घरी जाऊन जोंधळ्याच्या कण्या खाण्याची वेळ आली आहे. येथे रोज समाराधना होते, आम्हांला मिष्ठान्न खायला मिळते. पण आज हा कसला ब्राह्मण येथे आला आहे, ज्याच्यामुळे आज काही समाराधना होणार नाही. पण श्रीगुरु त्या ब्राह्मणांना म्हणाले, तुम्ही चटकन आंघोळ करुन या आणि येथेच जेवा. त्या ब्राह्मणांनी विचार केला, मठात भोजनाचे सामान तयार असावे, आता स्वयंपाक करविणार असतील म्हणूनच श्रीगुरु आपल्याला येथे जेवायला सांगत असतील! सर्व स्नानाला गेले. इकडे श्रीगुरुंनी भास्कर ब्राह्मणाला बोलावून स्वयंपाकाविषयी विचारले तेव्हा त्याने स्वयंपाक तयार असल्याचे सांगितले. तेव्हा श्रीगुरु म्हणाले, नदीवर जा आणि स्नानासाठी गेलेल्या सर्व ब्राह्मणांना भोजणासाठी बोलावून आण. त्याप्रमाणे भास्कर ब्राह्मण नदीवर जाऊन 'लवकर चला, श्रीगुरुंनी सर्वांना भोजनास बोलावले आहे', असे सांगताच ब्राह्मण त्याला म्हणाले, मोठा स्वयंपाक व्हायला वेळ लागेल. कदाचित संध्याकाळहि होईल; तर तू लवकर परत जाऊन श्रीगुरुंना भिक्षा उरकून घे. ते ऐकून भास्कर ब्राह्मण परत येऊन श्रीगुरुंना म्हणाला, माझ्या बोलवण्यास ब्राह्मण येत नाहीत, रात्री जेवूं असे म्हणतात. त्यावेळी श्रीगुरु म्हणाले, आज आमचा ब्राह्मणांना पंक्तीला घेऊन जेवण्याचा नियम आहे. ब्राह्मणांसह तू आम्हांला वाढत असशील तर ठीक आहे. हे जर तूला मान्य नसेल तर आम्ही तुझ्याकडे जेवणार नाही. भास्कर ब्राह्मण म्हणाला, आपण सांगाल तसे मी करीन. मी आपल्याला ब्राह्मणांसह जेवू घालीन. त्यांने मनात विचार केला, श्रीगुरु म्हणजे अवतारी विभूती आहेत. ते आपले वचन सत्य करुन दाखवतील. म्हणून भास्कर ब्राह्मणांने श्रीगुरुंना हात जोडून विनंती केली की, 'माझ्याच्याने ब्राह्मण येथे येत नाहीत. ते माझ्या

बोलण्याची टर उडवतात' ! तेव्हा श्रीगुरुंनी आपल्या दुसऱ्या शिष्याला सर्व ब्राह्मणांना लवकर भोजणासाठी बोलावून आणण्यास पाठविले. त्याने सर्व ब्राह्मणांना बोलावून आणले.

श्रीगुरु सर्व ब्राह्मणांस म्हणाले, हा (भास्कर) ब्राह्मण समाराधना करतो आहे. आज सहकुटुंब तुम्ही सारे येथेच जेवा. मग श्रीगुरु भास्कर ब्राह्मणाला म्हणाले, या सर्व ब्राह्मणांना सहकुटुंब भोजनाला येण्याची प्रार्थना कर. मी समाराधना करतो आहे तरी आपण सहकुटुंब यावेअसे म्हण. भास्कर ब्राह्मण त्याप्रमाणे सर्वांना प्रार्थना करु लागला. तेव्हा ब्राह्मण हसून म्हणाले, काय जेवा म्हणून म्हणतोस ! आमच्या एकेकाच्या वाट्याला एकेक शित तरी येईल का ? आमंत्रण सांगण्याची तुला लाज वाटत नाही. पण एक वृध्द ब्राह्मण त्यांना म्हणाले, भास्कर ब्राह्मणांची निंदाकरु नका. श्रीगुरु सारे ऐकत आहेत. जसे त्यांनी सांगितले तसा तो बोलतो आहे. तेव्हा निंदा करणारे 'हो कां ? बरं बरं' असे म्हणून पत्रावळी करु लागले. इकडे भास्कर ब्राह्मणाने काया-वाचा-मने श्रीगुरुंची सर्वोपचार पूर्वक पूजा करुन मंगलारती ओवाळली. त्याने श्रीगुरु संतुष्ट झाले. ते भास्कर ब्राह्मणाला म्हणाले, लवकर पाने मांडा. स्वयंपाक येथे आमच्याजवळ आणून ठेवा. त्याबरोबर त्याने तात्काळ सर्व स्वयंपाक श्रीगुरुंच्या जवळ आणून ठेवला. श्रीगुरुंनी आपल्या अंगावरची छाटी काढून भास्कर ब्राह्मणाजवळ देऊन त्याने सर्व स्वयंपाक झाकून ठेवण्यास सांगितले. भास्कराने तसे केल्यावर श्रीगुरुंनी कमंडलूतील पाणी त्या अन्नावर प्रोक्षण (शिंपडले) केले आणि भास्कर ब्राह्मणाला अन्नावरचे वस्त्र काढायचे नाही. पाहिजे तेवढे अन्न काढून घ्यायचे, पुन्हा वस्त्र अन्नावर झाकून ठेवायचे व काढलेले अन्न वाढावयास न्यायचे असे बजावून सांगितले. सगळ्यांची पाने मांडून सर्वजण बसले व भास्कर वाढू लागला. त्याला वाढायला मदत करा ! असे गुरु म्हणताच बरेच जण उठून त्याच्याबरोबर पंगत वाढू लागले. जितके अन्न काढून वाढावयास न्यावे तितके पुनः परिपूर्ण होऊन मूळ भांडी पुनः भरलेली. श्रीगुरुंच्या बरोबर सारेजण आनंदाने पोटभर जेवले. भास्कर ब्राह्मण वाढू जाताच 'पुरे पुरे अगदी आकंठ जेवलो, आम्ही तृप्त झालो,' असे म्हणू लागले. भक्ष्य (चावून खाण्याचे पदार्थ), परमान्न (पक्वान्ने व पालेभाज्या), साखर, दही, मीठ-चटणी इत्यादी सर्व पदार्थ सगळेजण यथेष्ट जेवले. गावातील सारी ब्राह्मण मंडळी आपल्या बायका-मुलांसह जेवली. त्यांनतर अंत्यज (महार) वगैरे अस्पृश्य लोकही पोटभर जेवून गेली. त्यानंतर गावांत दवंडी पिटून कोणी भुकेला, उपाशी राहिला आहे का याची खात्री करुन घेण्यात आली. त्यानंतर श्रीगुरुंनी भास्कर ब्राह्मणाला म्हणाले, आता तूही जेवून घे ! भास्कराने भोजन केल्यानंतर जाऊन पाहिले तेव्हा आपण जेवढे जेवण बनविले होते तेवढेच शिल्लक राहिल्याचे दिसले. तेव्हा ते अन्न घेऊन जाऊन नदीतील जलचरांना खाऊ घालण्यास श्रीगुरुंनी भास्करास सांगितले. व ते जीवही तृप्त झाले. अशा तऱ्हेने त्या दिवशी चारसहस्त्र पाने झाली. सर्वांना त्याचे आश्चर्य वाटले आणि सर्वत्र ही गोष्ट प्रसिध्द झाली. एवढेसे अन्न चार हजार जणांना कसे पुरेल ? कोणी म्हणाले, श्रीगुरुंनी अन्नपूर्णेचे स्मरण केले असेल, कोणी म्हणाले, ते स्वतःच मोठे समर्थ अवतारी पुरुष आहेत. कोणी म्हणाले, पांडवांकडे दुर्वास ऋषी सत्वपरिक्षेसाठी गेले असताना भगवान श्रीकृष्णांनी स्वतः प्रकट होऊन अन्नपूर्ण केले, त्याचेच दुसरे उदाहरण आज पहावयास मिळाले.

नंतर श्रीगुरुंनी भास्कर ब्राह्मणाला जवळ बोलावून त्याला वर दिला, 'तुझे दारिद्र्य दूर होऊन तुला मुले-नातवंडे होतील' !

या कथेत भास्कर ब्राह्मणाची भक्ति अधिक मुरलेली दिसून येते. तो गाणगापुरला अडीच-तीन शेर सामग्री घेऊन आला व श्रीगुरुंना भिक्षा करावी एवढाच त्याचा हेतू होता. पण रोज तेथे कोणाची ना कोणाची समाराधना चालू असल्यामुळे तीन महिने त्याला संधीच मिळाली नाही. तो शांतपणे प्रतीक्षा करीतच राहिला. सारेच ब्राह्मण त्याची टिंगल-टवाळी करीत होते. टोमणे मारत होते. पण त्याने कधीहि प्रत्युत्तर दिले नाही. आपले स्वतःचे समर्थन केले नाही वा श्रीगुरुंकडे तशी तक्रारही केली नाही. ज्या दिवशी श्रीगुरुंनी स्वतः त्याला भिक्षा करायला सांगितली तेव्हा अर्थातच भास्कर ब्राह्मणाला आनंद झाला आणि त्याने स्वयंपाकहि केला. त्याने एकट्या श्रीगुरुंना भिक्षा करण्याचा विचार केला होता आणि आज ब्राह्मणांसह जेवण्याचा आमचा नियम आहे असे श्रीगुरुंनी सांगितले.स्वयंपाक तर दोन-तीन माणसांनाच पुरेल इतका होता दुसरा कोणीही माणूस हा प्रकार पाहून गर्भगळीत झाला असता! पण भास्कर ब्राह्मण अविचल राहिला.

ही जी भास्कर ब्राह्मणाची मानसिक अवस्था आहे ती श्रीगुरुंविषयी असलेली भक्ति पूर्णपणे मुरण्याची खूण आहे. त्याचा स्वतःचा कोणताही राग-लोभ नाही. मान-अपमानाची तक्रार नाही. आमंत्रण देण्याबद्दल व ब्राह्मण ते आमंत्रण मानीत नाहीत याबद्दल कोणताही आग्रह,अट्टाहास नाही. तो श्रीगुरुंच्या पूर्ण अंकित आहे. तो सद्‌गुणी आहे म्हणून अधिक संतोष वृत्तीचा होता. श्रीगुरु सांगतील तसेच करायचे मग इतर लोक काहीहि म्हणोत. फक्त श्रीगुरुंना भिक्षा करायची एवढाच त्याचा हेतू होता.

आपल्या निस्सीम भक्तीने भास्कर ब्राह्मणाने श्रीगुरुंची कृपा व परमप्रेम प्राप्त करुन घेतले आणि श्रीगुरुंनीहि त्याची समस्या दूर करुन आपले 'भक्तवत्सल' हे ब्रीद साध्य केले.

## साठ वर्षाच्या वंध्या स्त्रीला कन्या-पुत्र प्राप्ति.

शौनक गोत्राचा, नैध्रुव प्रवराचा, आपस्तंब शाखेचा सोमनाथ नावाचा एक ब्राह्मण गाणगापुरात होता. त्याची 'गंगा' नावाची पत्नी मोठी पतिव्रता होती. आपले आचरण वेदशास्त्राला धरुन त्याप्रमाणे असावे याबद्दल ती फार खबरदारी घेत असे. साठ वर्षांचे वय झाले पण तरीहि तिच्या पोटी मूलबाळ झाले नाही. ती वांझोटी आहे अशी सर्वांची समजूत होती. तिचा नित्याचा नियम होता, श्रीगुरुंचे दर्शन करण्याचा! बरोबर तुपाची वात असलेले नीरांजन आणून श्रीगुरुंची आरती करीत असे. हा तिचा क्रम बराच काळ चालू होता. एके दिवशी तिच्या सेवेने संतुष्ट होऊन श्रगिुरु तिला म्हणाले, कोणती इच्छित प्रिय गोष्ट मनात धरुन रोज निरंजन घेऊन येतेस? तुझ्या मनी जे असेल ते सारे स्पष्ट करुन सांग. भगवान विष्णू व शिवशंकर हे दोघेहि गुरुप्रसाद देऊन तुझी मनोकामना पूर्ण करतील. हे श्रीगुरुंचे बोल ऐकून गंगाबाईनी श्रीगुरुंना प्रथम साष्टांग नमस्कार घातला. हात जोडून ती नम्रपणे म्हणाली, 'अपुत्रस्य लोको नास्ति' म्हणजे निपुत्रिकाला स्वर्गप्राप्ति होत नाही असे म्हणतात. मी पापी्हे, महादोषी आहे. मी निपुत्रिक आहे म्हणून माझे तोंड पाहू नये असे इतर बायका म्हणतात. मी रोज गंगेवर (नदीवर) जाते तेव्हा तेथे इतर स्त्रिया आपल्या मुलांना कडेवर घेऊन येतात पण ते भाग्य माझ्या कपाळी नाही. ज्यांना पुत्र-पौत्र असतात त्यांना परलोकात सद्‌गति मिळते. तर निपुत्रिकाला अधोगती प्राप्त होते. आता माझे साठ वर्षांचे वय झाले. आता मला जगायची इच्छा नाही. पुढे चांगला जन्म मिळून त्या जन्मांत तरी पुत्रवती व्हावे असा वर मला द्यावा, म्हणजे माझी अंतःकरणातील इच्छा पूर्ण होईल.

हे तिचे बोलणे ऐकून श्रीगुरु हसले व म्हणाले, 'पुढच्या जन्मीचे कोणी पाहिले आहे ? आणि तेव्हा तुला या जन्माची आठवण कसी राहणार ? तू भक्तिपूर्वक नित्य आमच्यासाठी आरती घेऊन येत आली आहेस त्यामुळे आम्ही फार समाधानी झालो आहोत. तुला सुलक्षणी कन्या व पुत्र होतील आणि तेहि याच जन्मांत होतील, हे तू निश्चितच समज'! हे श्रीगुरुंचे वचन ऐकून ज्ञानी गंगाबाईंनी आपल्या पदराला गांठ बांधली आणि हात जोडून अतिशय विनयाने म्हणाली, आपण ऐका! माझे आता साठ वर्षांचे वय झाले आहे, माझे विटाळ गेले आहेत, मला कसले पुत्र होणार ? पुत्रासाठी अनेक व्रते मी केली, नाना तीर्थे हिंडले, पुष्कळ काळ अश्वत्थाची सेवा केली. सेवा करता करता माझा जन्म गेला. अद्याप सुध्दा अश्वत्थाला प्रदक्षिणा घालते! आता स्वामी, आपण प्रसन्न होऊन याच जन्मी मला कन्या-पुत्र देण्याचे ठरविले आहे. आता आपले वचन व्यर्थ जाऊ देऊ नका. माझ्या मनाचा निश्चय झाला आहे आणि मी शकुन गांठ पदराला बांधली आहे! अतिशय प्रयासाने मी खूप काळ अश्वत्थ सेवा केली पण मला काय मिळाले ? जणू काही निव्वळ मूर्खपणानेच मी अश्वत्थाची सेवा केली की काय असे वाटू लागले आहे! तिचे बोलणे ऐकून श्रीगुरु म्हणाले, अश्वत्थाची सेवा म्हणजे महापुण्य आहे. ती कधीच व्यर्थ जाणार नाही. त्याची निंदा करु नकोस. आमच्या सह अश्वत्थाची सेवा कर. तुला पुत्र होईल. आता आम्ही सांगतो म्हणून रोज संगमावर (भीमा-अमरजा संगमावर) जेथे एक जुना अश्वत्थ आहे आणि जेथे आम्ही अनुष्ठानालानेहमी जातो, तेथे आमच्यासह अश्वत्थाची सेवा कर. असे म्हणून श्रीगुरुंनी गंगाबाईंना अश्वत्थाचा महिमा समजावून सांगितला. जो भक्तिभावाने अश्वत्थाची सेवा आचरेल त्याला शास्त्राप्रमाणे फळ मिळाल्याशिवाय राहणार नाही!

गुरुवाक्य हे कामधेनूप्रमाणे असते या वचनावर पूर्ण विश्वास ठेवून गंगाबाईंनी संगमावर जाऊन षटकुळ तीर्थात स्नान करुन अश्वत्थाला प्रदक्षिणा घातल्या. असे तीन दिवस झाले. तिसऱ्या दिवशी रात्री तिला स्वप्न पडले, त्या स्वप्नांत एक ब्राह्मण येऊन त्याने तिला अभिवचन दिले की, तुझी मनोकामना पूर्ण झाली आहे असे समज. गावात जाऊन तू श्रीगुरुंना सात प्रदक्षिणा घाल व भक्तिपूर्वक नमस्कार कर. ते तूला जे देतील ते तू भक्षण कर. मनात खात्री बाळग आणि लगेचच जा. गंगाबाई झोपेतून जाग्या झाल्या अश्वत्थ हा कल्पिलेले फळ देणारच असा तिला विश्वास निर्माण झाला. व्रत सुरु केल्यापासूनचा तो चौथा दिवस होता. त्या दिवसाची पूजा-प्रदक्षिणा इत्यादी सेवा करुन ती श्रीगुरुंच्या मठात आली. श्रीगुरुंना सात प्रदक्षिणा घालून आनंदाने नमस्कार केला. श्रीगुरु तिच्याकडे पाहून हसले आणि त्यांनी तिला दोन फळे खायला दिली. 'ही फळे तू खा. तुझी मनोकामना पूर्ण झाली असे समज. विधियुक्त पारणे करुन मग तू ही फळे खा. जे काय पूर्वी ठरविले असशील ते ब्राह्मणाला दान दे!' श्रीगुरुंच्या आदेशाप्रमाणे गंगाबाईंनी व्रत पूर्ण करुन ब्राह्मणाला दान दिले आणि त्यादिवशी संध्याकाळीच ती विटाळशी झाली. नियमाप्रमाणे तिने तीन दिवस मौन पाळले. हिरव्या खापरात (न भाजलेल्या मातीच्य भांड्यात) भोजन केले. पांढरे वस्त्र नेसून कोणाकडे न पाहण्याचा नियमही पाळला. असे तीन दिवस विटाळशीपणाचे नियम पाळून चौथ्या दिवशी स्नान करुन शुध्द होऊन मग ती पतीसह श्रीगुरुंच्या दर्शनाला आली. तेथे मनःपूर्वक श्रीगुरुंची पूजा केली. श्रीगुरुंनी संतोषाने 'तुम्ही पुत्रवती व्हावे' असे म्हटले. त्यांना पुनः नमस्कार करुन ती उभयतां आपल्या घरी आली. पती-पत्नी समागम पाचवे दिनी झाल्यामुळे कन्येचा गर्भ राहिला. साठ वर्षांची ती स्त्री गर्भवती राहिली आणि गावांतील सारी मंडळी विस्मयचकित झाली. वांझ स्त्रीला गर्भधारणा झालीच कशी ? असे नवल करु लागली.

गंगाबाईंचा पती सोमनाथही स्वतःला भाग्यवान समजून आनंद साजरा करु लागला. सातव्या महिन्यांत तिची ओटी भरली. श्रीगुरुंनी विनोदबुध्दीने तिच्याकडून कौतुकाने वाणे देवविली ! केस पांढरे झालेली म्हातारी वाणे देत होती आणि गावांतील सारी मंडळी आश्चर्य करीत होती. आठव्या महिन्यात तिचा सिमंतविधान नावांचा संस्कार करण्यात आला. नऊ मास पूर्ण झाल्यावर एका शुभ दिनी ती प्रसृत झाली. तिला कन्या झाली होती. ज्योतिषांनी येऊन तिचे जातक वर्तविले की ही शुध्द मनाची मुलगी असेल. तिला पुढे आठ पुत्र होतील आणि मुला-नातवंडासह चांगला संसार होईल. सोमनाथ ब्राह्मण आनंदित होऊन त्यान बराच दानधर्म केला. दहा दिवस उलटल्यावर स्नान वगैरे करुन आपल्या मुलीला कडेवर घेऊन गंगाबाई श्रीगुरुंच्या दर्शनासाठी मठात आली. त्यांना साष्टांग नमस्कार करुन मुलीला त्यांच्या पायावर ठेवले आणि म्हणाली, सरस्वती आमच्या घरी आली. तेव्हा आपला पुढील शब्द पाळावा. तेव्हा श्रीगुरु म्हणाले, तू मनात संशय धरु नकोस. तुला पुत्र होईल. श्रीगुरुंनी तिच्या मुलीला कडेवर घेऊन सर्व लोकांना तिचे लक्षण सांगितले. ही स्वतः शतायुषी होऊन हिला अनेक पुत्र होतील.सवाष्णपणी मुलाची नातवंडे पहाण्याचे भाग्य हिला लाभेल. हिचा पति चारी वेद जाणणारा ज्ञानी होईल. त्याला मोठा नावलौकिक मिळेल व अष्टऐश्वर्य प्राप्त होईल. दक्षिण देशाचा महाराजा हिच्या दर्शनाला येईल, असे त्या मुलीचे लक्षण सांगून श्रीगुरु गंगाबाईना म्हणाले, तुला आणखी एक मुलगा होईल. तुला पुत्र कसा व्हावा असे वाटते ?चांगला सद्गुणी हवा असेल तर तो तीस वर्ष आयुष्य असणारा होईल आणि शतायुषी पाहिजे तर मूर्ख असेल. हे श्रीगुरुंचे वाक्य ऐकून ती म्हणाली, मला चांगला सद्गुणी मुलगा व्हावा आणि त्याला पांच पुत्र व्हावेत. कृपाळू श्रीगुरुंनी तिला तसा वर दिला आणि संतोषाने, आनंदाने ते दांपत्य आपल्या घरी गेले. पुढे गंगाबाईला पुत्र झाला. वेदशास्त्र प्रसिध्द झाला आणि त्याला पांच पुत्रहि झाले.

श्रीगुरुंनी जसे गंगाबाईच्या कन्येचे लक्षण वर्तविले होते तसेच पुढे घडले. ती 'सरस्वती' कन्या पुढे खूप प्रसिध्द झाली. तिच्या पतीला 'दिक्षित' अशी पदवी मिळाली आणि चहूं राष्ट्रांत त्याची मोठी किर्ति झाली. त्याने मोठा यज्ञ केला.

गंगाबाई ही रजोगुणी होती. पण तिचा रजोगुण सत्वगुण मिश्रित होता. आपल्याला या जन्मी संतती होणार नाही हे तिला कळून चुकले होते. पण तरीसुध्दा अश्वत्थाच्या प्रदक्षिणा सोडल्या नव्हत्या. श्रीगुरुंसमोर या जन्मी नाही तर पुढील जन्मी आपण आई व्हावे हे तिचे मनोगत तिने लपवून ठेवले नाही. श्रीगुरुंनी तिला याच जन्मी कन्या-पुत्र होतील असा आशिर्वाद दिल्यावर तिने पदराला गाठ मारली ! यावरुन आपले प्रारब्ध आपल्याला अनुकूल नाही हे ओळण्याइतका विवेक आणि समज तिच्याजवळ होती. आणि श्रीगुरुंनी जाणले होते,तिची पुत्रेषणा अतृप्त होती आणि तीच तिच्या मोक्षातील अडसर होती. ती पूर्ण झाल्यास तिचा मोक्षाचा मार्ग मोकळा होणार होता. आणि अपूर्ण राहिल्यास तिला पुन्हा जन्म घ्यावा लागला असता. हे सर्व लक्षात घेऊन आणि तिचा रजोगुण लक्षात घेऊन श्रीगुरुंनी तिला अश्वत्थ प्रदक्षिणा चालू ठेवण्यास सांगितले. 'केवळ तुमचा शब्द आहे म्हणून मी तो पाळीन; नाहीतर अश्वत्थसेवा करणे मूर्खपणाचे आहे, आहे असे ती स्पष्टच श्रीगुरुंना म्हणाली.' श्रीगुरुंनी तिचा रजोगुण लक्षात घेऊन प्रथम तिला कन्या संतती दिली. आणि पुत्राबद्दल विचारले असता, तुला सद्गुणी अल्पायुषी की मुर्ख दीर्घायुषी हवा असे श्रीगुरुनी विचारले अर्थात तिची परिक्षा घेतली होती. पण अल्पायुषी चालेल पण ज्ञानी हावा असे

सांगून आपण प्रपंच मायेने आंधळे होणार नाही हे दाखवून दिले. या सर्व तपशीलावरुन तिचा सत्वगुणमिश्रित शुध्द रजोगुण दिसून येतो.

परंतु तिच्या मनातील श्रीगुरुंबद्दलची भक्ति खरी होती. आणि त्यामुळेच ती श्रीगुरुंना प्रिय झाली. ज्याने आपले मन व बुध्दि मला वाहिली तो भक्त मला प्रिय होतो, हे गंगाबाईच्या द्वारे खरे ठरले. भगवंतांनी भगवद् गीतेत दिलेले हे वचन श्रीगुरुंनी खरे केले.

## वाळलेल्या लाकडाला पालवी फुटली.

श्रीगुरुंचा निवास गाणगापुरात असताना गार्ग्य गोत्राचा आपस्तंभ शाखेचा, अंगावर कुष्ठ असल्यामुळे दुःखी असलेला नरहरी नामक ब्राह्मण तेथे आला. श्रीगुरुंना भक्तिभावाने नमस्कार करुन हात जोडून त्यांची स्तुति करुन म्हणाला, हे परमपुरुषा जगन्नाथा, आपण परमात्मस्वरुप असून भक्तवत्सल आहात, अशी आपली कीर्ति ऐकून मी येथे आलो आहे. हे सद्‌गुरु, मी या संसारात जन्मलो खरा, पण माझे जिणें दगडाप्रमाणे व्यर्थ झाले ! सगळे ब्राह्मण कुष्ठी म्हणून माझी निंदा करतात. मी यजुर्वेदाचे अध्ययन केले आहे. पण मी कुष्ठी असल्यामुळे मला ब्राह्मण म्हणून कोणी आमंत्रण देत नाहीत. सकाळी उठल्याबरोबर माझे तोंड पहावे लागू नये असे लोक मानतात. त्यामुळे मला फार दुःख होते. आता झालेत तेवढे जन्म पुरे झाले असे मला वाटू लागले आहे. हे पाप दूर व्हावे म्हणून मी अनेक व्रते केली, अनेक तीर्थे फिरलो. सर्व देवतांच्या पूजा केल्या पण माझी व्याधी गेली नाही. आता माझ्या मनाचा निश्चय झाला आहे की जर हे सद्‌गुरु आपली कृपा मजवर झाली नाही, तर मी प्राण देईन. त्याची ती करुणावाणी ऐकून भक्तवत्सवल श्रीगुरु त्या ब्राह्मणाला म्हणाले, ‘पूर्वजन्मी तू अनेक प्रकारचे महादोष केलेस म्हणून या जन्मी तू कुष्ठी झालास. आत मी जे सांगतो ते एकनिष्ठ बुध्दीने तू आचरशील तर तुझे पाप दूर होऊन तुला दिव्य देह लाभेल’ ! इतक्यात चार वर्षांपासून वाळत पडलेले औदुंबराचे एक वाळके लाकूड सरपणासाठी घेऊन कोणीतरी चालला होता, त्याच्याकडून ते मागवून घेऊन श्रीगुरु म्हणाले, ‘हे लाकडू घेऊन चटकन संगमावर जा. संगमेश्वराच्या पूर्वदिशेला भीमानदीच्या तीरावर हे लाकूड जमिनीत पुरुन ठेव. नंतर संगमात जाऊन स्नान करुन ये, तेथे असलेल्या अश्वत्थाची पूजा कर आणि पूनः स्नान करुन दोन कळशा भरुन पाणी आण आणि या वाळलेल्या लाकडावर तीन वेळा ओतून त्यालास्नान घाल. असे तू मनोभावे करीत रहा. ज्या दिवशी या वाळलेल्या लांकडाला पालवी फुटेल त्या दिवशी तुझे दोष-पाप नष्ट होऊन तुझे शरीर चांगले होईल.’

त्या नरहरी ब्राह्मणाच्याही मनांत विश्वास निर्माण झाला. धावत जाऊन त्याने ते वाळलेले लाकूड डोक्यावर घेतले आणि तो भीमा नदीच्या तीरावर गेला. संगमेश्वरापुढे ते लाकूड जमिनीत रोवले. जसे श्रीगुरुंनी सांगितले त्याप्रमाणे त्याने सर्वकाही मनोभावे, भक्तिपूर्वक आचरण केले. अशा तऱ्हेने सात दिवस उपवास करुन तो ब्राह्मण दोन-दोन कळशा भरुन पाणी आणून त्या वाळलेल्या लाकडावर दिवसांतून वेळोवेळी घालीत होता. ते पाहून इतर लोक त्याला समजावू लागले, अरे तूला काय झाले आहे ? या वाळलेल्या लाकडाला पालवी फुटावी अशी अपेक्षा तू मनात बाळगतोसच कशी ? श्रीगुरु कृपेचे सागर आहेत. ते सर्वांवर कृपा करतात. पण तुझ्या पापाला निष्कृति (नाश होण्याची शक्यता) नसावी म्हणून हे वाळलेले लाकूड तुला दिले. पण केवळ श्रीगुरुंनी सांगितले म्हणून तूं निष्कारण

का करतोस ?

परंतु असे सांगणाऱ्या त्या लोकांना नमस्कार करुन तो नरहरि ब्राह्मण उत्तर देई, श्रीगुरु सत्यसंकल्प आहेत. त्यांचे बोल असत्य ठरणारच नाही. ते बोल माझी कामधेनू आहेत. माझ्या मनांत मला पूर्ण खात्री आहे की या वाळलेल्या लांकडाचा पुनः वृक्ष होईल. आणि म्हणून गुरुवाक्यासाठी मी प्राणसुध्दा देईन! असे म्हणून त्याने आपला भक्तिपूर्वक लाकडाला पाणी घालण्याचा नित्यक्रम चालू ठेवला.

ही गोष्ट शिष्यांनी श्रीगुरुंच्या कानावर घातली. तो नरहरि ब्राह्मण आपल्या वचनावर निर्धाराने विश्वास ठेवून, भक्तिभाव एकवटून सात दिवस उपवासी राहून, वाळलेल्या लांकडाची सेवा करीत आहे. इतर लोकांनी त्याला अनेक तऱ्हेने सांगितले व त्याला मूर्खात काढले तरी तो आपल्या सेवेपासून ढळला नाही. श्रीगुरु आपले वचन सत्य करतील असे म्हणून तोंडात पाणीसुध्दां न घालता आपली सेवा त्याने चालू ठेवली आहे. हे ऐकून श्रीगुरु म्हणाले, 'जसा अंतःकरणात भाव तशी सिध्दि'. गुरुवाक्य शिष्यांना तारणारे असते. शिष्याने निर्धाराने गुरुवाक्याचे पालन करायचे असते. जन्म मरणरुप संसारातून तरुन जायचे असेल तर गुरुभक्तीशिवाय दुसरा सुगम पर्याय नाही. गुरुभक्ति हीच विशेष सुगम आहे. गुरु योग्य आहे वा अयोग्य, ज्ञानी आहे का अशिक्षित याची चिकित्सा करीत न बसता गुरु ब्रह्ममय आहे हे ध्यानांत ठेऊन भक्तीने गुरुंची सेवा करावी. एकनिष्ठेने भक्ति करावी. गुरु हेच त्रैमूर्ती आहेत हे समजून घ्यावे. ज्याच्याजवळ दृढ भक्ति असते त्याला सर्व धर्म साधतात. गुरु हाच ईश्वर असा भाव मनांत धरुन जे गुरुचरणांची सेवा करतात त्यांना ईश्वर तात्काळ प्रसन्न होतात. गुरु वाक्यावर जो विश्वास ठेवतो त्याला फळ हे मिळतेच. विश्वासपूर्वक निर्धाराने जर तो ब्राह्मण त्या वाळलेल्या लांकडाची सेवा करतो आहे तर त्याच्या भावाप्रमाणे त्याला सिध्दि मिळणार, हे त्रिवार सत्य आहे. असे म्हणून श्रीगुरु संगमावर तो ब्राह्मण काय करतो हे पाहण्यासाठी गेले. त्याच्या अंतःकरणातील भाव पाहून श्रीगुरुंना समाधान वाटले. आणि त्यांनी हातातील कमंडलू उचलून त्यातील पाणी त्या वाळलेल्या लांकडावर आपल्या हाताने ओतले आणि तत्क्षणीच त्या वाळलेल्या लांकडाला पालवी फुटली आणि तो औदुंबर वृक्ष दिसू लागला. लाकडाला पालवी फुटताच इकडे नरहरि ब्राह्मणाच्या अंगावरचे सर्व कुष्ठ जाऊन उत्तम देहधारी 'सुवर्णदेहि' असा मनुष्य बनला. अतिशय आनंदाने त्या ब्राह्मणाने श्रीगुरुंना साष्टांग नमस्कार केला. त्यावेळी त्याने श्रीगुरुंचे 'महास्तोत्र' रचून म्हटले.

### ।। महास्तोत्र ।।

इंदूकोटीतेज करुण-सिंधू भक्तवत्सलं। नंदनात्रिसूनुदत्त इंदिराक्षऽश्रीगुरुम्।
गंधमाल्यअक्षतादिवृंददेववंदित। वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।१।।

मायपाश अंधःकारछायदूरभास्करं ।आयताक्ष पाहि श्रियावल्लभेश नायकम् ।
सेव्य भक्तवृंद वरद भूय भूयो नमाम्यहं ।वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।२।।

चित्तजादिवर्गषट्क मत्तवारणांकुशम् ।तत्त्वसारशोभितात्म दत्त श्रियावल्लभ् ।
उत्तमावतार भूत कर्तृभक्तवत्सलं। वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।३।।

व्योमरापवायुतेज भूमिकर्तुमीश्वरम्। कामक्रोधमोहरहित सोमसुर्यलोचनम् ।
कामितार्थ दातृभक्त कामधेनु श्रीगुरुम् । वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।४।।

पुंडरीक आयताक्ष कुंडलेंदुतेजसम्। चंडदुरितखंडनार्थ दंडधारी श्रीगुरुम् ।
मंडलीकमौलिमार्तंडभासिताननं। वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।५।।

वेदशास्त्रस्तुत्यपाद आदिमूर्ति श्रीगुरुम् ।नादबिंदुकलातीत कल्पपादसेव्ययम् ।
सेव्यभक्तवृंदवरद भूय-भूय नमाम्यहं । वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।६।।

अष्टयोगतत्त्वनिष्ठ तुष्ट ज्ञानवारिधीम्। कृष्णावेणितीरवास पंचनदी संगमम् ।
कष्टदैन्यदूरीभक्त तुष्टकाम्यदायकम् । वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।७।।

नारसिंहसरस्वती नाम अष्टमौक्तिकम् । हारकृत शारदेन गंगाधरआत्मजम् ।
धारणीक-देवदीक्ष गुरुमूर्तितोषितम् । परमात्मानंदश्रियापुत्रपौत्रदायकम्।
वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।८।।

नारसिंहसरस्वतीय अष्टकं च यः पठेत् । घोरसंसार-सिंधुतारणाख्यसाधनम्।
सारज्ञानदीर्घ आयुरारोग्यादि-संपदम् । चारुवर्गकाम्यलाभ वारंवार यज्जपेत् ।
वंदयामि नारसिंह-सरस्वतीश पाहि माम् ।।९।।

अर्थ :

कोटी चंद्राप्रमाणे तेज असणाऱ्या, करुणासागर, अत्रिनंदन दत्तांना, नीलकमलाप्रमाणे डोळे असणाऱ्या श्रीगुरुंना, गंधपूल अक्षतादिकांनी देवसमुदाय ज्यांना नमस्कार करतो, त्या नृसिंहसरस्वती सद्‌गुरुंना नमस्कार करतो, हे सद्‌गुरु माझे रक्षण करा ।।१।।

मायापाशरुपी अंधःकारची छाया दूर करणारा सूर्य असणाऱ्या, विशाल नेत्र असणाऱ्या, भक्तगण ज्यांची सेवा करतात आणि अशा सेवक भक्तांना जे वर देतात त्या श्रीवल्लभेश नायक असणाऱ्या त्या नृसिंहसरस्वती सद्‌गुरुंना मी पुनःपुन्हा वंदन करतो; हे सद्‌गुरु माझे रक्षण करा ।।२।।

कामक्रोधादि षडरिपूं समुदाय म्हणजेच कोणी माजलेला हत्ती आणि त्या मत्त हत्तीला अंकुशाप्रमाणे असणाऱ्या, उपनिषदांतील तत्वांचे सार अखेर ज्या आत्मतत्वाचे वर्णन करते ते आत्मतत्व स्वतः असणाऱ्या श्रियावल्लभ दत्तांना, उत्तमावतारी, भूतांना उत्पन्न करणाऱ्या भक्तवत्सल श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंना मी वंदन करतो; हे सद्‌गुरु माझे रक्षण करा ।।३।।

आकाश-जल-वायु-तेज-पृथ्वी यांचा कर्ता असणाऱ्या, चंद्र-सूर्य हे ज्याचे डोळे आहेत अशा कामक्रोधमोहरहित असणाऱ्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी कामधेनूप्रमाणे असणाऱ्या, श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंना मी वंदन करतो; हे सद्‌गुरु माझे रक्षण करा ।।४।।

पांढऱ्या शुभ्र कमळाप्रमाणे प्रफुल्लित डोळे असणाऱ्या, ज्यांच्या कुंडलांची तेजस्विता चंद्राप्रमाणे आहे अशा, प्रचंड पापाचा नाश करणारा दंड धारण करणाऱ्या, ग्रह मंडळाच्या मध्यभागी असणाऱ्या सूर्याप्रमाणे प्रकाशमान मुख्य

असणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंना मी वंदन करतो; हे सद्‌गुरु माझे रक्षण करा ।।५।।

वेदशास्त्रे ज्यांच्या पायांची स्तुति करतात अशा, स्थूल-सूक्ष्म-कारण देहांच्या पलिकडे असणाऱ्या, वेदवेदांगांनी ज्यांचे पादसेवन केले आहे अशा, सेवा करणाऱ्या भक्तगणांना वरदान देणाऱ्या, अशा आदिमूर्ती श्रीगुरुंना मी पुन:पुन्हा: नमस्कार करतो, त्या श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंना मी वंदन करतो; हे सद्‌गुरु माझे रक्षण करा ।।६ ।।

अष्टांगयोगसंपन्न, ज्ञानसागर असणाऱ्या, कृष्णा-वेण्या-पंचगंगा यांच्या संगमावर म्हणजे श्रीनृसिंहवाडीत राहाणाऱ्या, भक्तांचे कष्ट व दैन्य दूर करुन त्यांच्यावर संतुष्ट होऊन त्यांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंना मी वंदन करतो; हे सद्‌गुरु माझे रक्षण करा ।।७।।

श्रीनृसिंहसरस्वतींचे नाम असणाऱ्या अष्टकरुपी आठ मोत्यांचा हार गंगाधरांच्या सरस्वती नामक पुत्राने केला आहे. हा हार धारण करुन म्हणजे हे अष्टक नित्यनियमाने म्हणून जे श्रीगुरुमूर्तींना संतुष्ट करतात त्यांच्यावर परमात्मा संतुष्ट होऊन श्रिया म्हणजे संपत्तीसह पुत्र-पौत्र देऊन अनुग्रह करीत असतो ।।८ ।।

या घोर संसारसमुद्रांतून तरुण जाण्याचे साधन असणारे हे अष्टक जे वारंवार पठण करतात त्यांना ज्ञानाचे सार (किंवा मर्म) दीर्घ आयुर्दाय,आरोग्य इत्यादी संपदा आणि चतुर्विध पुरुषार्थांची सिध्दी प्राप्त होत असते.

असे स्तोत्र रचून नरहरि ब्राह्मणाने म्हटले, हे श्रीहरी आपण मजवर मोठी कृपा केलीत. पुन:पुन्हा तो श्रीगुरुंना नमस्कार करु लागला! श्रीगुरुंनी त्याला अभयकराने आशिर्वाद देऊन उठविले आणि ‘ज्ञानराशी’ अशा शब्दाने त्याचा गौरव केला. तेथे जमलेली सारी मंडळी विस्मयचकित झाली. ते सर्व श्रीगुरुंना नमस्कार करु लागले. ग्रामस्थ लोकांनी श्रीगुरुंची आरती केली आणि प्रसाद घेऊन आपापल्या स्थानी गेले.

नंतर नरहरि ब्राह्मणाला जवळ बोलावून श्रीगुरुंनी त्याला आशिर्वाद दिला, ‘कन्या-पुत्र-धन-गोधन’ यांनी तू संपन्न होशील आणि तुझी संतती तुझा वंश वाढेल. आजपासून आम्ही तुझे नांव ‘जोगेश्वर’ असे ठेविले आहे. आमच्या सर्व शिष्यांमध्ये थोर भक्त म्हणून तुझा लौकिक होईल, असे म्हणून श्रीगुरुंनी त्याला निरोप दिला व सांगितले, की तू जाऊन आपल्या बायका-मुलांना घेऊन ये. गावांतच आमच्या जवळ वास्तव्य कर. तुला तीन मुलगे होतील. त्यांतील एक ‘योगी’ या नावाने प्रसिध्द होऊन आमची पुष्कळ सेवा करील. पिढ्यानपिढ्या तुझ्या घराण्यांत आमचे भक्त निर्माण होतील. असे नरहरिला सांगून श्रीगुरुंनी त्याला ‘विद्यासरस्वती’ नावांच्या मंत्राचा उपदेश करुन तो मंत्र त्याला दिला.

ज्याप्रमाणे श्रीगुरुंनी सांगितले होते त्याप्रमाणेच नरहरि (जोगेश्वर) ब्राह्मणाच्या घराण्यांत पुढे सर्व गोष्टी घडून आल्या असे गुरुचरित्रात सरस्वती गंगाधरांनी नमूद केले आहे.

नरहरि ब्राह्मण हा ज्ञानी आहे. त्याने यजुर्वेदाचे अध्ययन केलेले आहे. त्याची चित्तवृत्ती स्वच्छ, नितळ आणि श्रीगुरुंच्या ठिकाणी एकाग्र झाली होती. श्रीगुरुंनी सांगितलेले कर्म लौकिकदृष्ट्या हास्यास्पद दिसणारे असले तरी केवळ श्रीगुरुंवरील अपार प्रेमामुळे अगदी निरपेक्षपणे ते कर्म आचरिले.

नरहरि ब्राह्मणहि रजोगुणी होता. पण तो रजोगुण थोडा तमोगुणमिश्रित होता. त्याचे प्रारब्धहि खडतर होते. यजुर्वेदाचे अध्ययन केलेला विद्वान असूनहि सर्वांगावर कुष्ठ असल्यामुळे त्याला समाजात मान्यता नव्हती. त्याची त्याला फार खंत होती. ते कुष्ठ जावे म्हणून त्याने बरेच प्रयास केले होते. पुष्कळ व्रत-वैकल्ये, तीर्थयात्रा, तप वगैरे केले होते. पण त्याचे कुष्ठ गेले नव्हते. श्रीगुरुंची कीर्ति ऐकून तो त्यांचेकडे आला होता. पण तमोगुणी असल्यामुळे त्याने श्रीगुरुंजवळ आल्याबरोबरच त्यांना सांगितले, आपल्या कृपेने हे जाणार नसेल तर मी माझे प्राण देईन, यावरुन त्याचा तामसी स्वभाव दिसून येतो.

श्रीगुरुंनी तरी त्याला काय उपाय सांगितला, वाळलेल्या लांकडाला पालवी फुटेपर्यंत पाणी घालण्याचा! ही ती नरहरिची 'परीक्षा' होती. त्याचा रजोगुण शुध्दा होता म्हणून त्याने श्रीगुरुंनी सांगितलेला उपाय स्वीकारला आणि त्याप्रमाणे तो करु लागला. इतरांनी त्याला वेड्यात काढले पण नरहरिने त्यांना दाद दिली नाही आणि आपला नियम मोडला नाही. तो जर कच्चा असता तर श्रीगुरुंनी सांगितलेला उपाय ऐकूनच त्याने आत्महत्या केली असती. परंतु नरहरिची श्रीगुरुंवर श्रध्दा होती. अविचल भक्ति होती आणि अनेक व्रत-वैकल्ये, अनुष्ठाने करुन त्याचे शरीर तपश्चर्येच्या वा उपासनेच्या कष्टाला सरावलेले होते. म्हणून त्याने इतर मंडळी टिंगल करीत असताना श्रीगुरुंच्या शब्दावर अधिक विश्वास ठेवला. आणि आपल्या चिवट रजोगुणाच्या सहाय्याने श्रीगुरुंची कृपा संपादन करुन प्रारब्धाचा भेद केला.

## श्रीगुरुंनी सायंदेवाची परिक्षा पाहिली.

सायंदेव हा श्रीगुरुंचा प्रिय होता. त्याने भक्तिभावाने श्रीगुरुंची सेवा केली. मागे पहिल्या भेटीत श्रीगुरुंनी सायंदेवाला सांगितले होते, पुढील काळात आम्ही तुझ्या गावानजिक तुला भेटू. श्रीगुरु गाणगापुरास आल्यानंतर त्यांची कीर्ति चारी राष्ट्रांत पसरली होती. सायंदेवाच्या कानी श्रीगुरुंच्या लीला जाताच व ते गाणगापुरी आहेत हे कळल्यावर तो अत्यांनदाने गाणगापुरास येण्यास निघाला. त्याचे मन हर्षभरीत झाले, इतके की गाणगापुर लांबून दिसताच त्यांनी लोटांगण घातले. नमस्कार करीत करीतच ते श्रीगुरुंच्या मठात येऊन पोहोचले. समोर श्रीगुरुंना पाहताच त्यांनी साष्टांग नमस्कार घालून त्यांच्या चरणांवर लोळण घेतली. आपले केस मोकळे सोडून श्रीगुरुंच्या चरणांवरची धूळ झाडली. हात जोडून एकाग्र मनाने श्रीगुरुंची स्तुति केली. हे गुरुमूर्ती, आपल्या दर्शनाने माझ्या जन्माचे सार्थक झाले. मी धन्य झालो. माझे पितर उध्दरले आणि माझे अनेक जन्मांचे पातक धुवून निघाले. आपण विश्वपती आहात, आपण माझे रक्षण करावे. आपल्या कमंडलूतील पाणी हे अमृतच असते, त्याने प्रोक्षण केले तर प्रेतालासुध्दा जीव येतो. आपल्या हातातील दंड शरणगताचे रक्षण करण्यासाठी आहे. पाप व दारिद्र्य यांचे निवारण करण्यासाठी आहे. आपण भक्तवत्सल आहात म्हणून आपण हाती दंड धारण केला आहात. सारी तीर्थे आपल्या चरणांपाशी असतात आणि तेथे भक्तांच्यावासना कामना पूर्ण होतात. आपण वांझ महिषीला दुभती केलीत, वंध्या स्त्रीला कन्या-पुत्र दिलेत आणि वाळलेल्या लांकडाला वृक्ष बनविलेत.साक्षात अन्नपूर्णा आपल्याजवळ आहे. आपणच श्रीविष्णू आहात. त्यामुळेच आपण त्रिविक्रमभारतींना विश्वरुप दाखविलेत आणि पतिताकडून वेद म्हणविलेत.

अशी श्रीगुरुंची स्तुति करुन सायंदेवांनी त्यांना पुनःपुन्हा नमस्कार केला. तेव्हा श्रीगुरुंनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना आश्वासन दिले की तू माझा परमभक्त आहेस. तू जी ही स्तुति केलीस त्याने आमच्या मनास फार समाधान वाटले. तुझ्या घराण्यांत पिढ्यानपिढ्या माझे दास भक्त निर्माण होतील असा वर तुला आम्ही देत आहोत. त्यानंतर सायंदेव संगमावर स्नान करुन मठात आले. श्रीगुरुंची षोडशोपचारे पुजा केली आणि अनेक परीची पक्वान्ने करुन श्रीगुरुंची सर्व शिष्यांसह भिक्षा केली. त्यावेळी श्रीगुरुंनी अत्यंत प्रेमाने इतर शिष्यांमधून सायंदेवांना आपल्या शेजारी बसवून घेतले. भोजनानंतर श्रीगुरु मठामध्ये शिष्य-ब्राह्मणांसह आनंदात बसले होते. तेव्हा श्रीगुरुंनी सायंदेवांना प्रेमाने विचारले, तुझे गांव कोणते ? ते कोणत्या भागात आहे ? बायका-मुले कोठे असतात ? अशी श्रीगुरुंनी आपुलकीने चौकशी केली. तेव्हा सायंदेवानी मोकळेपणाने 'कन्या-पुत्र-बंधुजन सगळे क्षेम आहेत. उत्तरकांची (नंतरचे नांव कडगंची) नावाच्या गावी आम्ही राहतो. भाऊ व मुलगे घरांतील सर्व व्यवस्था बघतात.' तेव्हा आपण स्वतः श्रीगुरुंच्या सेवेत रहावे, अशी इच्छा आहे. ते ऐकून श्रीगुरु म्हणाले, आमची सेवा तशी कठीणच आहे. कारण आमचे राहाणे नाना ठिकाणी असते. कधी आम्ही गावांत, शहरांत राहतो तर कधी अरण्यांत असतो. आमच्या बरोबर राहायचे म्हणजे कष्ट खूपच पडतात. ते सगळे तुम्हांला कसे सोसतील? श्रीगुरुंचे हे बोलणे ऐकूनही सायंदेव श्रीगुरुंना म्हणाले, हे सर्व मी पत्करावयास तयार आहे. कारण गुरुसेवा करणाराच संसार सागराच्या पैलतीरी पोचतो. त्याला दुःख कोणतेच राहात नाही. उलट तोच नेहमी सुखी होतो. गुरुभक्ति हेच त्याच्या जीवनाचे मुख्य सूत्र असते! सायंदेवाच्या भक्तिपूर्वक विनंतीने श्रीगुरु समाधानाने म्हणाले, 'जसे तुझ्या मनांत असेल तसे कर! पण मनात दृढ भक्ति असेल तरच ही गुरुसेवेची जबाबदारी अंगावर घे'.

असे काही दिवस निघून गेले. सायंदेव स्थिर मनाने श्रीगुरुंची सेवा करीत तेथे गाणगापुरास राहिले. एकदा श्रीगुरु संगमावर जायला निघाले आणि सर्व शिष्यांना दूर सारुन सायंदेवांना मात्र एकट्याला त्यांनी बरोबर घेतले. त्यादिवशी सायंदेवांच्या मनांत भक्ति किती दृढ आहे याची जणू काही परिक्षा करायचेच श्रीगुरुंनी ठरविले होते. सायंदेव मनाने भोळे होते. तेहि लगेच श्रीगुरुंबरोबर निरागसपणे गेले. श्रीगुरु संगमावर जाऊन अश्वत्थवृक्षाखाली बसले आणि सायंदेवाशी गप्पा गोष्टी करु लागले. अंधार पडू लागला होता. जोराने वारा वाहू लागला, पाऊस पडू लागला.सायंदेवाचे अंतःकरण किती दृढ आहे हे पहावे, असा श्रीगुरुंच्या मनी विचार आल्यामुळे त्यांनीच ही लीला केली असावी. पाऊस वाढून मुसळीधार पडू लागला. तेव्हा सायंदेवाने आपल्या वस्त्राने श्रीगुरुं भोवती आवरण करुन आपण पुढे उभा राहून सगळा वारा-पाऊस त्याने स्वतः सहन केला. हे सर्व मनोभावे व भक्तिपूर्वक होते. मध्यरात्र होत आली, तशी पर्जन्यवृष्टी अधिक होऊ लागली. आणि जोराच्या वाऱ्याने थंडीही वाजू लागली. तेव्हा श्रीगुरु सायंदेवास म्हणाले, तू गावांत मठामध्ये जाऊन अग्नि (विस्तव) घेऊन ये. म्हणजे शेकोटी पेटवून आपल्याला शेकता येईल. श्रीगुरुंची आज्ञा होताच सायंदेव तत्क्षणी निघालेच. तेव्हा श्रीगुरु हसून म्हणाले, ''येताना आपल्या दोन्ही बाजूंकडे (उजवीकडे-डावीकडे) न पाहतां सरळ दृष्टी ठेवून अग्नि घेऊन ये, बरे का!''

श्रीगुरुंच्या सांगण्याप्रमाणे सायंदेव झपाझप चालत निघाले. अंधाराचे साम्राज्य पसरलेले होतेच, त्यात वारा आणि पाऊस! मध्येच वीज चमकली की थोडीशी वाट दिसत होती. तेवढ्या उजेडात अंदाज घेऊन गुरुस्मरण

करीत सायंदेव गावांच्या वेशीपाशी येऊन पोचले. त्याने द्वारपालाला (पहारेकऱ्याला) हाक मारुन उठविले. त्याला सगळी हकिकत सांगितल्यावर त्याने लगेच अग्नि आणला. तो भांड्यात घालून सायंदेव संगमावर निघाले. येतानाही तशीच परिस्थिती होती. वीज चमकली की तेवढ्या उजेडात चालत होते. तेवढ्यात त्यांच्या मनात विचार आला, 'दोन्हीबाजूकडे पाहू नको' असे श्रीगुरुंनी सांगितले आहे; तेव्हा याचे कारण काय असावे, असा मनात विचार करुन त्यांनी उजवीकडे (दक्षिणेला) पाहिले तेव्हा एक मोठा नाग दिसला. घाबरुन डावीकडे (उत्तरेला) पाहिले तेथेहि मोठा नाग दिसला. दोन्ही नागांना पाच-पाच फडा होत्या आणि ते धावून आपल्याकडे येतात असे सायंदेवांना वाटले. मग काय ? मनात भय निर्माण झाले आणि सायंदेव सैरावैरा पळत सुटले व चाट चुकले. पण ते दोन्ही सर्प ते जिकडे जातील तिकडे बरोबर असायचेच. त्यामुळे आणखी घाबरुन सायंदेव भराभर पळत राहिला. मनांत श्रीगुरुंचे स्मरण करुन मोठा धीर करुन कसातरी संगमावर येऊन पोचला! दुरुन त्याने पाहिले तेव्हा अनंत दीपज्योती उजळलेल्या, वेदध्वनी ऐकू येत असलेले आणि मध्ये श्रीगुरु बसलेले असे दृश्य दिसले. जवळ जाऊन पाहिले तेव्हा मात्र श्रीगुरु एकटेच बसलेले दिसले. तोपर्यंत ढग बाजूला जाऊन अंबर स्वच्छ झाले होते. वाराहि मंदावला होता. श्रीगुरुंजवळ गेल्यावर सायंदेवांनी अग्नि (शेकोटी) पेटवला. त्याने बराच प्रकाश पडला आणि सायंदेव सावध (भानावर) झाले. त्याने श्रीगुरुंकडे पाहिले तोच ते दोन सर्प येऊन श्रीगुरुंना नमस्कार करुन निघून गेले. परंतु सायंदेव पहिल्यासारखेच घाबरले होते. श्रीगुरु त्यांना म्हणाले, तूं एवढा भयभीत का झालास ? तुझ्या रक्षणासाठी मी त्या सर्पांना पाठविले होते. आता भिऊं नकोस. आमची सेवा कशी कठीण आहे ते पाहिलेस ना! चांगला पूर्ण विचार करुन मगच गुरुसेवे चा अंगिकार करावा. गुरुभक्ति कठीण आहेच. पण शिष्याने दृढ भक्तिने सेवा करावी व कळिकाळाला सुध्दा भिऊं नये. तेव्हा सायंदेवांनी श्रीगुरुंचे चरण धरुन आपल्यावर कृपा करावी अशी विनंती केली आणि म्हणाले, 'गुरुभक्ति कशा प्रकारे करावी ते आपण मला समजावून सांगा, जेणेकरुन माझे मन श्रीगुरुं चरणाशी स्थिर राहिल.' तेव्हा श्रीगुरुंनी त्वष्टा-ब्रह्मा (ब्रह्मदेवाने त्वष्टा-ब्रह्मा नामक अवतार धारण केला होता.) पुत्राची कथा सांगून काशियात्रेचे सुरस वर्णन केले.

त्या त्वष्टा ब्रह्माला एक अतिशय सुंदर, कामकाजात कुशल आणि शहाणा मुलगा होता. त्याचे मुंजीचे वय झाले तेव्हा त्याची मुंज करुन त्वष्टा-ब्रह्माने त्या मुलास गुरुसदनी विद्याभ्यासाठी पाठविले. तेथे तो मुलगा नानापरीने गुरुंची सेवा करु लागला. एके दिवशी मोठा पाऊस होऊन गुरुंची पर्णशाळा गळू लागली. तेव्हा ते गुरु त्या मुलाला म्हणाले, ही पर्णशाळा दरवर्षी जीर्ण होते, तेव्हा आमच्यासाठी पक्के आणि कधीहि जीर्ण होणार नाही असे (टिकाऊ) घर बनवावे. त्या घराचे दार पक्के,स्थिर राहिल, शिवाय दिसायलाहि रम्य मनोहर असेल आणि सर्व सोयींनी युक्त असेल असे घर तू त्वरित निर्माण कर. तेवढ्यात गुरुपत्नीहि तेथे आली व म्हणाली, माझ्यासाठी एक चोळी आणावी. ती शिवलेली किंवा विणलेली नसावी. पण अंगाला मात्र नीट बसली पाहिजे. आणि तिचा रंगहि चित्रविचित्र असावा. अशी चोळी तू लवकर घेऊन ये. तेथे गुरुंचा मुलगाहि आला आणि म्हणाला, माझ्यासाठी पाण्यावरुन चालता येतील अशा पादुका (खडावा) आण. त्या पादुका पायांत घातल्या की मनात येईल त्या ठिकाणी जाता आले पाहिजे. त्यांना चिखल लागता कामा नये आणि त्या माझ्या पायाला बरोबर बसतील अशा असल्या पाहिजे! इतक्यात गुरुकन्याहि

तेथे आली आणि तिने त्या मुलाच्या उपरण्याचा पदर पकडून आपणसाठीहि कांहीतरी आणावे म्हणून सांगू लागली; दोन्ही कानांत घालण्यासाठी तानवडे (कर्णभूषणे) आणावीत आणि खेळण्यासाठी एक घरकुल आणावे. ते हस्तीदंताचे बनविलेले, एका खांबावर उभे असलेले, कधी न तुटणारे आणि कधी जुने न होणार असावे. खेळताना मी जेथे ठेवीन तेथे ते नीट बसले पाहिजे आणि त्यांत सगळ्या सोई (पाट-अंथरुण-पांघरुण वगैरे) असल्या पाहिजेत. त्याच्यात मला वावरता आले पाहिजे. त्यात भांडी अशी असावीत की ज्यांच्यामध्ये स्वयंपाक केला की तो निवून गार पडला आणि शिळा झाला असे कधी होता कामा नये. तो स्वयंपाक नेहमी गरम-गरम ताजा राहिला पाहिजे. स्वयंपाकाच्या भांड्यांना विस्तवावर ठेवल्यावर काजळी लागता कामा नये. अशी भांडी खेळणी तू मला आणून दे.

त्वष्टा-ब्रह्मापुत्राने सगळ्यांनी मागितलेल्या सर्व गोष्टी आणण्याचे मान्य करुन तो गुरुंच्या घरुन निघून महारण्यात गेला. त्याला फार चिंता लागून राहिली होती. आपल्याला साधी पत्रावळ सुध्दा बनवता येत नाही आणि हे इतके सगळे कसे जमणार ? आता मी काय करु ? मला कोण आधार देईल ? अशा विचारांचे वादळ त्याच्या मनात निर्माण होऊन त्याचा जीव कासावीस झाला. आता आपल्याला मार्ग काय आहे ? आता कोणाला शरण जावे ? कोण आपले प्राण राखील ? अशा चिंताग्रस्त आणि जींवावर उदार झालेल्या मनस्थितीत त्या मोठ्या जंगलातून तो बालक पुढे जात असताना अचानक एक अवधूत त्याच्या समोर येऊन उभा राहिला. आणि त्याची विचारपूस केली. अरे बाळ, तूं कोण, कोठे निघालास ? एवढी चिंता तुला का लागून राहिली आहे ? आम्हांला सगळे सांग पाहू ! तेव्हा त्या बालकाने त्या अवधूताला नम्रतेने वंदन करुन त्याची स्तुति करुन म्हटले, मी अत्यंत दु:खी होतो आणि आपली भेट झाली व माझे मन एकदम शांत झाले. चुकलेल्या वासराला आपली जन्मदात्री गाय भेटावी तसेच आपण मला भेटला आहात. माझी कांही पूर्वपुण्याई होती म्हणूनच आपण मला भेटलात ! आपण कृपासिंधू परमपुरुष आहांत ! आपण कोण ? आणि या महारण्यात आपण मला कसे व कोठून येऊन भेटलांत ? आपण खचितच ईश्वर असाल ! कारण गुरुमहाराजांच्या कृपेनेच आपण मला भेटलांत ! तुम्ही खरोखरच भक्तवत्सल आहात आणि मी तुमचा दास असलेला बालक आहे. असे म्हणून त्या ब्रह्मचारी मुलाने त्या अवधूताचे पाय धरले. त्या अवधूतानेहि त्या बालकाला उठवून त्याला जवळ घेऊन कुरवाळून आश्वासन दिले. मग सगळा वृत्तांत विचारला, त्या बालकानेहि तो सविस्तर सांगितला. त्या अवधूताने त्याला अभय देऊन म्हटले, ज्यामुळे तुझे कार्य साधून हित होईल असा उपाय सांगतो. काशी विश्वेश्वराची आराधना वा सेवा हा एक मोठा आधार आहे. ते एक महास्थान असून तेथे गेल्यावर सर्व अभिष्ट साध्य होते. तेथेच सृष्टीची रचना करण्यासाठी ब्रह्मदेवाला आणि सृष्टीचे पोषण करण्यासाठी विष्णूला वर मिळाले. तुझी मनोकामना तेथेच गेल्यावर पूर्ण होईल. यांत संशय बाळगू नकोस.

हे ऐकून त्या ब्रह्मचारी मुलाने अवधूताला विचारले, ती काशीपुरी कोठे आहे ? आपण तर येथे अरण्यात आहोत. आपण सांगितलेल्या काशीपुरीला मला कोण नेईल ? आपणच मला काशीला न्यावे. मी बालक आहे. मला बुध्दी द्या असे म्हणून त्याने अवधूताच्या पायांना मिठी मारली. तेव्हा त्या तापशी अवधूताने, मी तूला काशीला घेऊन जातो. तुझ्यामुळे मलाहि काशी यात्रा घडेल. तर चल लवकर आपण लगेचच निघूं या ! असे म्हणत ते दोघे निघाले आणि

मनोवेगाने तात्काळ काशीला जाऊन विश्वेश्वरापाशी पोचले. अवधूत म्हणाले, बाळा आता यात्रा कर. तेव्हा तो मुलगा म्हणाला, मला यात्रा कशी करतात ते माहित नाही. इथे कोणकोणती तीर्थे आहेत, याबद्दल सविस्तर माहिती सांगा! तेव्हा अवधूताने त्या बालकाला काशीयात्रेचे सर्व विधान व क्रम सांगितला.

विश्वेश्वराचे दर्शन करावे व नंतर अंतर्गृहयात्रा क्रमाने करावी. दक्षिणमानस यात्रा, उत्तरमानस यात्रा, पंचक्रोशीची यात्रा इत्यादी विस्तारपूर्वक सांगितल्या. प्रत्येक ठिकाणी स्नान, दान, पूजन, श्राध्द इत्यादी विधीपूर्वक कराव्यात. त्यानंतर भवानी, विश्वेश्वर, माधव, गणपती, दंडधारी भैरव, गृहकाशी, गंगा इत्यादी दूर दूर पसरलेल्या शिवलिंगाची यात्रा करावी, त्यांचे पूजन करावे आणि शेवटी आपल्या नावांने महादेवाच्या लिंगाची (स्वनामांकित लिंगाची) स्थापना करावी. याप्रमाणे कर, तुझ्यावर विश्वेश्वर कृपा करील असे म्हणून तो अवधूत अंतर्धान पावला. त्या त्वष्टापुत्राने अवधूताने सांगितलेल्या प्रमाणे सर्व यात्रा केली व स्वनामांकित लिंगाची स्थापना केली. त्यावेळी काशी विश्वेश्वर त्याचेसमोर स्वतः प्रकट झाले आणि म्हणाले, हे वत्सा! तू गुरुंच्या निर्मळ भक्तीने पवित्र झाला आहेस. तू पुण्यवान आहेस आणि त्यामुळे वर देण्यास (अनुग्रह करण्यास) योग्य आहेस. तुला हवा असेल तो वर मागून घे.

प्रसन्न होऊन शंकर । म्हणे दिधला माग वर । संतोषोनि त्वष्टाकुमार । विनविता झाला वृत्तांत ।।

ज्या ज्या गोष्टी गुरु, गुरुपत्नी, गुरुपुत्र व गुरुकन्या यांनी आणावयास सांगितल्या होत्या त्या सगळ्या त्या लहान बालकाने भगवान शंकरांना मागितल्या. शिव शंकर संतुष्ट होऊन म्हणाले, 'तू जी गुरुभक्ती केलीस त्यामुळे मी तृप्त झालो. तुला सर्व विद्या देतो. तूं सकळ विद्यांत कुशल होशील. तू विश्वकर्मा होशील. तुला परमार्थ प्राप्त होऊन सृष्टीची रचना करण्याचे सामर्थ्य तुला प्राप्त होईल.' असा आशिर्वाद देऊन भगवान शंकर अंतर्धान पावले.

गुरुंकडे परत आल्यावर त्या बालकाने त्यांच्या घरातील सर्वांनी ज्या ज्या वस्तू मागितल्या होत्या त्या त्या सर्व करुन दिल्या आणि सर्व आपल्या गुरुंना अर्पण करुन त्याने सर्वांना वंदन केले. गुरुंना अपार संतोष झाला. त्यांनी आपल्या ह्या बालक शिष्यास आलिंगन देऊन म्हणाले, तुझ्या भक्तिने मी संतुष्ट झालो. तू ज्ञानराशी होशील. त्रैमूर्ती तुला वश होतील. तू चिरंजीव होशील. तिन्ही लोकांत तुझ्या चातुर्याची कीर्ति पसरेल. तुला चिंता व कष्ट कधीहि होणार नाहीत. असे वर त्या गुरुंनी त्वष्टापुत्राला दिले.

अशी जी कथा शंकरांनी पार्वतीस, तिने विचारलेल्या गुरुभक्ति म्हणतात ती कशी आहे ? या प्रश्नाला उत्तर देताना ही त्वष्टापुत्राची कथा सांगितली होती. तीच श्रीगुरुंनी त्या रात्री शेकोटीजवळ बसून सायंदेवांना सांगितली. कथा संपत असतानांच रात्र संपून उजाडू लागले. सूर्योदय झाला आणि इकडे सायंदेवाच्या ह्रदयांतला अंधःकारहि नाहिसा होऊन तेथे गुरुकृपेची ज्योत तेवूं लागली. सायंदेवांचे मन शांत व समाधानी झाले. त्यांनी श्रीगुरुंना भक्तिपूर्वक नमस्कार करुन म्हटले, स्वामी आपण कथा सांगत होतात व काशीयात्रेचे वर्णन करुन सांगत होतात, त्यावेळी मी आपल्यासह काशीतच होतो. मग ती अवस्था जागेपणची (जागृती) किंवा झोपेतली (सुषुप्ती) होती हे मात्र मला कळले नाही.

या दिव्य अनुभवामुळे सायंदेवाच्या मनात भक्तिभाव उफाळून आला. त्याने श्रीगुरुंची स्तुति करण्यास प्रारंभ केला, त्यावेळी त्याचेकडून एक स्तोत्र रचले गेले. त्याची आठ कडवी असून ''वंदेऽहं नरकेसरीसरस्वती श्रीपादयुग्मांबुजम्'' असे त्याचे पालुपद आहे. ''मी नरसिंहसरस्वतींच्या श्रीचरण कमलद्वयाला किंवा श्रीनृसिंहसरस्वती व (पूर्वीचा अवतार) श्रीपादवल्लभ या दोघांना नमस्कार करतो'' असा या पालुपदाचा अर्थ आहे.

## ।। आद्यो ब्रह्म स्तोत्र ।।

आद्यो ब्रह्म त्वमेक सर्व जगतां, वेदात्ममूर्ति विभूं। पश्चात क्षोणिजडा विनाश-दितिजां, कृत्वाऽवतारं प्रभो।
हत्वा दैत्यमनेकधर्मचरितं, भूत्वाऽत्मजोऽत्रेर्गुहे। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।१।।

भूदेवाखिलमानुषं विदुजना, बाधायमान कलिं। वेदादुष्यमनेकवर्णमनुजाभेदादि भूतोन्नतम् ।
छेदःकर्मतमान्धकारहरणं श्रीपाद-सूर्योदये। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।२।।

धातस्त्व हरि शंकर प्रति गुरौ, जाताग्रजन्मं विभो। हेतु सर्वविदोजनाय तरणं ज्योतिःस्वरुपं जगत्।
चातुर्थाश्रमस्थापितं क्षितितले, पातुः सदा सेव्ययं। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।३।।

चरितं चित्रमनेककिर्तिमतुलं, परिभूतभूमंडले। मूकं वाक्यं दिवांधकस्य नयनं, वंध्या च पुत्रं ददौ।
सौभाग्यं विधवा च दायक श्रियं, दत्वा च भक्तं जनं। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।४।।

दुरितं घोरदरिद्रदावतिमिरं, हरणं जगज्जोतिषं। स्वर्धेनुं सुरपादपूजितजना, करुणाब्धि भक्तार्तितः।
नरसिंहेद्र-सरस्वतीश्वर विभो, शरणागतं रक्षकं। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।५।।

गुरुमूर्तिश्चरणारविंदयुगलं, स्मरणं कृतं नित्यसो। चरितं क्षेत्रमनेकतीर्थसफलं, सरितादी भागीरथी।
तुरगामेध-सहस्त्रगोविंदुजनाः, सम्यक् ददन् तत्फलं। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।६।।

नो शक्यं तव नाममंगल स्तुवं, वेदागमागोचरं । पादद्वं हृदयाब्जमंतरदलं, निर्धार मीमांसतं।।
भूयोभूयः स्मरन नमामि मनसा, श्रीमद्गुरुं पाहि मां। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।७।।

भक्तानां तरणार्थ सर्वजगतां, दीक्षा ददन् योगिनां। सुक्षेत्रं पुरगाणगस्थित प्रभो, दत्वा चतुष्कामदं।।
स्तुत्वा भक्तसरस्वती गुरुपदं, जित्वाद्यदोषादिकं। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।८।।

एरां श्रीगुरुनाथमष्टकमिदं स्तोत्रं पठे न्नित्यसौ। तेजोवर्चबलोन्नतं श्रियकरं आनंदवर्ध वपुः।।
पुत्रापत्यमनेकसंपदशुभा, दीर्घायुमारोग्यतां। वंदेऽहं नरकेसरीसरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।९।।

स्तोत्राचा अर्थ :

सृष्टीची उत्पत्तीपूर्वी तूं एकटाच ब्रह्मरुपाने होतास. मग आपण अनेक रुपांनी प्रकट व्हावे असा संकल्प धरुन ब्रह्मदेवास उत्पन्नकरुन त्याच्याकडून सर्व सगुण, सधर्म विश्व निर्माण करविलेला आणि त्या विश्वामध्ये पृथ्वीला भारभूत होणाऱ्या दैत्यांचा विनाश करण्यासाठी, हे प्रभो, तुम्ही अत्रींच्या घरी पुत्ररुपाने उत्पन्न होऊन अवतार धारण करुन अधर्माचरण करणाऱ्या दैत्यांना मारुन धर्माचे आचरण आपण केलेत. त्या श्रीनृसिंहसरस्वतींच्या श्रीचरण कमलद्वयाला मी नमस्कार करतो ।।१।।

कलिदोषामुळे लोकांनी धर्म सोडून दिला. देवानांहि उपवास पडू लागले तेव्हा तूं अवतार घेऊन, सूर्याने अंधःकाराचा नाश करावा त्याप्रमाणे महामोहरुप अंधःकार ग्रासून टाकलास आणि धर्मरुप सेतू म्हणजे पूल शिथिल झाला होता तो दृढ केलास. अशा श्रीनृसिंहसरस्वतींच्या पदयुगुलाला मी वंदन करतो ।।२।।

हे सर्वांनदनिधाना! तूंच धाता म्हणजे ब्रह्मदेव, तूंच विष्णू व तूंच शंकर असून सर्व शास्त्रज्ञ, विद्वान अथवा ज्ञानी लोकांना तारण्याच्या हेतूने तू ब्राह्मणकुळांत जन्म घेतलांस. संन्याश्रमाचा लोप होत चालला होता, त्याची पुनःस्थापना तू केलीस, अशा त्या श्रीनृसिंहसरस्वतींच्या पदयुगुलाला मी वंदन करतो ।।३।।

निजचरित्राने व अतुल कीर्तिने सर्व भूमंडळ तूं भरुन टाकलेस. मुक्याला वाचा, आंधळ्याला डोळे, वांझेला पुत्र, विधवेला सौभाग्य, भक्तांना ऐश्वर्य दिलेस, अशा श्रीनृसिंहसरस्वतींच्या पदयुगुलाला मी वंदन करतो ।।४।।

अघोर पातक, दारिद्र्याचा वणवा व अज्ञान-अंधःकार नाहीसा करुन जगाला प्रकाश देणारा तू आहेस. तूंच कामधेनू व कल्पतरु असून भक्तपीडा नाहीशी करणारा व भक्तेच्छा पूर्ण करणारा करुणेचा सागर आहेस. शरणागताचे रक्षण करणारा आहेस. त्या श्रीनृसिंहसरस्वतींच्या पदयुगुलाला मी वंदन करतो ।।५।।

श्रीगुरुमूर्तीच्या चरणकमलद्वयाचे नित्यशः स्मरण करणाऱ्याला भागीरथ्यादी अनेक पुण्यवान तीर्थांची व क्षेत्रांची यात्रा केल्याचे फळ मिळते. हजारो अश्वमेध यज्ञ किंवा गोप्रदाने केल्याचे उत्तम पुण्य विद्वजनांना लाभते. अशा श्रीनृसिंहसरस्वतींच्या पदयुगुलाला मी वंदन करतो ।।६।।

निगमागमाला अगोचर अशा तुझ्या मंगल नामाचे यथार्थ स्तवण करणे कोणालाही शक्य नाही. हृदयकमलगर्भामध्ये तुझे पदयुगुल धारण करुन मी मनानेच तुला नमन करतो. हे गुरुदेव, आपण माझ्याकडे पहा, माझे रक्षण करा. त्या श्रीनृसिंहसरस्वतींच्या पदयुगुलाला मी वंदन करतो ।।७।।

जगांतील सर्व भक्तांना तारण्याकरिता व योग्यांना दीक्षा देण्याकरितां तुझा अवतार आहे. सेवा करणाऱ्याला सर्व पुरुषार्थ देण्याकरिता तू श्रीक्षेत्र गाणगापुरांत राहिला आहेस. तुझी स्तुति केल्याने भक्त सरस्वतीने एकंदर दोष जिंकून टाकले. अशा श्रीनृसिंहसरस्वतींच्या पदयुगुलाला मी वंदन करतो ।।८।।

याप्रमाणे श्रीगुरुनाथांचे अष्टक स्तोत्र जो नित्यशः पठण करितो, त्याला तेज, ओज, बल, श्री, आनंवर्धक शरीर, पुत्रसंतति, अनेक प्रकारची शुभ संपत्ति, दीर्घायुष्य व दृढ आरोग्य लाभत असते. अशा त्या श्रीनृसिंहसरस्वतीं - श्रीपाद चरणकमल युगुलाला मी वंदन करतो ।।९।।

अशा तऱ्हेने सायंदेवांनी श्रीगुरुंची स्तुति केल्यावर श्रीगुरु अति प्रसन्नतेने म्हणाले, तुला आम्ही काशीक्षेत्र दाखविले त्यामुळे यापुढे तुझ्या वंशात एकवीस पिढ्यातील लोकांना काशीयात्रेचे फळ मिळेल. तू आमचा जवळचा भक्त आहेस. तेव्हा निष्काम बुध्दीने आमची सेवा करीत तू आमच्या जवळ रहा. आणि आमच्यापाशी जर तू राहाणार असशील तर यवनाची सेवा आतां तू सोडून दे. असे सायंदेवांना सांगून श्रीगुरु संगमावरुन मठात गेले.

श्रीगुरुंच्या आदेशाप्रमाणे सायंदेवांनी आपल्या गावी जाऊन बायकां-मुलांना घेऊन आले. सायंदेव सहकुटुंब गाणगापुरास आले तो दिवस भाद्रपद शुध्द चतुर्दशीचा (म्हणजे अनंत चतुर्दशीचा) होता. त्यांनी सर्वांनी श्रीगुरुंना

लोटांगण घालू नमस्कार केला व मनोभावे, भक्तिपूर्वक श्रीगुरुंची स्तुती केली. त्यावेळी त्यांनी कानडी भाषेत गायन केले. ती दोन कानडी पदे सरस्वती गंगाधरांच्या मराठी 'श्रीगुरुचरित्रात' समाविष्ट आहेत. त्यांचा मराठी भाषेत अर्थ श्री.रा. कृ. कामत यांनी पुढीलप्रमाणे दिला आहे.

कानडी पद पहिले :

कंडेनिंदु भक्तजनर भाग्यनिधिया, भू- । मंडलोळगे नारसिंहसरस्वतीया ।।ध्रु ।।

कंडेनिंदु दृष्टियिंदु वारिजदळपादवन्नु ।
हृदयकमलदल्लि भजिसे सुखवनीव जगत्पतीया । कंडेनिंदु..(अनु. ध्रुव.)।।

भोगिजनरि-गेल्ल - काम्य - फलगळित्तु सलहुतिरुव ।
योगिनीय -रोडेय नार-सिंहसरस्वतिय पाद। कंडे..।।१।।

वाक्यकारण नगि जगदि-हिडिदु दंडकमंडलवनु।
वगुणनेनेनिसि सुजनरिंगे वलिद श्रीगुरु यतिवरन्न। कंडे..।।२।।

धरेगे गाणगापुर कैला-स हरिदासरोडेय नेनिसि।
करुणदीवरवित्तु पोरेव अनुदिन गुरुचरणवन्नु। कंडेनिंदु..।।३।।

अर्थ :

भूमंडलामध्ये भक्तजणांचा भाग्यनिधि अशा 'नारसिंहसरस्वती' स्वामींना आज मी पाहिले ।।धृ।।

हृदयकमलामध्ये आराधिले असतां सुख देणाऱ्या जगत्पपतीच्या चरण कमलांना डोळे भरुन मी आज पाहिले ।। (अनुध्रुवपद) संसारी भक्तजणांच्या सर्व इच्छा पुरवून रक्षण करीत असणारा, योगिनींचा स्वामी नृसिंह सरस्वती यांचे चरण मी आज पाहिले ।।१।।

महावाक्यलक्षित (तत्वमस्यादिलक्ष्यं) निर्गुणस्वरुपी असतांना दंडकमंडलु धारण करुन सगुण म्हणवून घेऊन,सज्जनांना प्रसन्न होणाऱ्या श्रीगुरुयतिश्रेष्ठांना मी आज पाहिले ।।२।।

पृथ्वीवरचा कैलासच असे जे गाणगापूर क्षेत्र त्याचा व हरिभक्तजणांचा स्वामी म्हणवून घेणारा, तसेच कृपेने वर देऊन नेहमी सांभाळणारा, असा जो श्रीगुरु, त्याचे चरण मी आज पाहिले ।।३।।

कानडी पद दुसरे :

कंडेनम्मा। इंदु कंडेनम्मा। मंडलदोळगे यतिवरराय चंद्रमन्ना । कंडेनम्मा.।।ध्रु.।।
तत्त्वबोधेय उपनिषत्‌तत्त्वचरितना। व्यक्तवाद परब्रह्म मूर्तियनिसुवना । कंडेनम्मा..।।१।।
शेषशयन परवेशकायकना । लेसुकृपेय निमेषनेंब भाषापालकना । कंडेनम्मा...।।२।।
गंधपरिमळदिद शोभितानंदसागरना । छंदवुळ्ळ योगींद्रगोपी-वृंदवल्लभना । कंडेनम्मा..।।३।।
मंत्रकुटदि मरेदु स्वा-तंत्रनादवना । इंतु निगमागमद सकलकांतियुळ्ळवना । कंडेनम्मा..।।४।।
करियराय नेनिपंगे वरद गुरुरायना । नरसिंहसरस्वत्यंब नारी-पुरुषकामना । कंडेनम्मा..।।५।।

<u>अर्थ :</u>

यतिवरमंडलामध्ये चंद्राप्रमाणे शोभणाऱ्याला आज मी पाहिले ग बाई पाहिले ।।धृ।।

तत्त्वोपदेशप्रधान अशा उपनिषदांतील तत्वासारखे ज्यांचे चरित्र आहे व व्यक्त झालेले मूर्तिमंत परब्रह्मच असे जो म्हणवून घेतो, त्याला मी आज पाहिले ।।१।।

शेषशायी असून श्रेष्ठ (यति) वेष धारण केलेला ज्याचा देह आहे अशाला व 'उत्तमकृपाकटाक्षवंत' हे ब्रीद सार्थ करणाऱ्याला अर्थात ज्याचा कृपाकटाक्ष कधी वाया जात नाही अशाला मी आज पाहिले ।।२।।

गंधपरिमळाने शोभित व आनंदाचा सागरच जणूं अशा योगींद्र गोपिजनप्रिय सौंदर्यसंपन्न श्रीकृष्ण परमात्म्याला मी आज पाहिले ।।३।।

सर्व मंत्र शास्त्रात निष्णातपणे मिरवून, स्वतंत्र झालेल्याला, त्याचप्रमाणे वेदशास्त्रातील सर्व कांति म्हणजे तेज धारण करणाऱ्या यतिवर्याला मी आज पाहिले ।।४।।

गजेंद्र म्हणविणाऱ्याला मोक्षरुप वर देणाऱ्या 'नारसिंहसरस्वती' असे पुरुष व स्त्री वाचक नाम धारण करणाऱ्या गुरुश्रेष्ठाला मी आज पाहिले ।।५।।

अशी सायंदेव व त्याच्या कुटुंबियांनी श्रीगुरुंची पुष्कळ स्तुति केली. त्यामुळे श्रीगुरुंनाहि संतोष झाला आणि अतिशय आनंदाने श्रीगुरुंनी सर्वांना आश्वासन दिले. सर्वांना प्रेमाने जवळ बसवून घेतले. प्रेमभावाने सर्वांची चौकशी केली. घरच्या गोष्टी विचारल्या. बायका-मुलांचे क्षेम विचारले. सायंदेवांच्या पत्नीने श्रीगुरुंना मनोभावे नमस्कार करुन आपल्या दोन्ही मुलांना त्याच्या चरणांवर ठेवले. थोरला मुलगा नागनाथ याच्या डोक्यावर हात ठेवून श्रीगुरु सायंदेवांस म्हणाले, तुमच्या या थोरल्या मुलाला पुर्णायुष्य लाभून संतति मिळेल. हाच आता भक्त होऊन श्रियायुक्त (संपन्न) होईल. तेव्हा तू आता यवनाची सेवा करुन त्यांना वंदन (सलाम) करण्याची जरुरी नाही. तुला आणखी एक पत्नी आहे. तिला चारपुत्र होतील. तेहि संपन्न स्थितीत राहतील. ज्या दिवशी तू म्लेंच्छांकडे वंदन करण्यास जाशील त्या दिवशी तुझ्या जीवाला घात होईल. तुझा थोरला मुलगा आमचा मोठा भक्त होईल. त्याची कीर्ति पुष्कळ वाढेल.

त्यानंतर श्रीगुरु सायंदेवाला म्हणाले, आज अनंत चतुर्दशीचे व्रत आहे तेव्हा तुम्ही सर्व ब्राह्मण मिळून अनंताची पूजा करा. पूर्वी कौंडिण्य ऋषींनी हे व्रत केल्याची गोष्ट प्रसिध्द आहे. तेव्हा सायंदेवांनी व्रताचे आचरण कसे करावे ? हे पूर्वी कोणी केले ? त्याचे काय पुण्य घडते ? काय लाभ प्रत्यक्षात मिळतो, ते सविस्त सांगा. श्रीगुरु सांगू लागले;

हे व्रत पूर्वी अनेकांनी केले आहे. वनवासांत असताना जेष्ठ पांडव धर्मराज युधिष्ठिराने हे व्रत करुन आपले राज्य परत मिळविले. बारा वर्षे त्यांनी वनवास भोगला. वनवासाची दु:खे भोगत असताना सुध्दा कौरवांनी कपट करुन दुर्वास ऋषींना त्यांच्या सत्वपरिक्षेसाठी पाठविले. तेव्हा श्रीकृष्ण परमात्म्यांनी पांडवांचे रक्षण केले. त्यावेळी द्रौपदीसह सर्व पांडवांनी श्रीकृष्णाला विनंती केली की कोणत्या उपायाने आमचे राज्य आम्हांला परत मिळेल ते

सांग. तेव्हा श्रीकृष्णांच्या मनात दया उत्पन्न होऊन त्याने पांडवांना 'अनंतव्रत' करण्यास सांगितले. तेव्हा युधिष्ठिराने हात जोडून नम्र विनंती केली, हे व्रत कोणत्या दिवशी कोणत्या पध्दतीने करावे, काय दान द्यावे. पूर्वी या व्रताचे आचरण कोणी केले हे सर्व विस्तारपूर्वक सांगा. तेव्हा 'भाद्रपद शुध्द चतुर्दशी' या दिवशी अनंत व्रताचे आचरण कर म्हणजे तुला तुझे राज्य परत मिळेल असे सांगून भगवान श्रीकृष्णांनी पूर्वी हे व्रत कोणी आचरले ते सुशिला व कौंडिण्य ऋषींच्या कथेने सांगितले.

पूर्वी कृतयुगामध्ये वसिष्ठ गोत्रातील 'सुमंतु' नावाचा ब्राह्मण होता. त्याचा भृगु ऋषींची कन्या 'दीक्षा' हिच्याशी विवाह झाला होता. त्यांना एक कन्या होती 'सुशीला' नावाची. या सुशीलेचा विवाह कौंडिण्य ऋषींशी झाला होता. एके दिवशी ती दोघे एका रथात (बैलगाडीत) बसून निघाले. दुपारच्या वेळी एका नदीच्या काठांवर येऊन पोचले. कौंडिण्य ऋषी अनुष्ठानासाठी उतरले. सुशीला रथाजवळच होती. तिला नदीकाठी अनेक स्त्रिया समुदायाने येऊन निरनिराळे कलश मांडून पूजा करीत असलेल्या दिसल्या. ते पाहून सुशीला ही हळूहळू त्यांच्याजवळ गेली आणि तिने तुम्ही हे काय व्रत करीत आहांत ? असे त्या स्त्रियांना विचारले. त्या स्त्रियांनी आम्ही 'अनंतव्रत' करीत असून त्याचे फळ त्वरीत मिळते व त्यामुळे सर्व अभिष्ट प्राप्त होते, असे सांगितले. तेव्हा सुशीलानेहि त्यांना पूजेचे सर्व विधान सविस्तर विचारुन घेतले. त्या स्त्रियांनी ते सविस्तर सांगितले.

हे व्रत भाद्रपद शुध्द चतुर्दशी दिवशी करावे. तांबड्या रेशमी धाग्याचा चौदा गाठींचा अनंत करावा. नदीवर स्नान करुन शुचिर्भूत होऊन, चांगले वस्त्र नेसून, दोन कलश त्यांना गंगा-यमुना समजून भरुन आणावेत व त्यांना हळदी-कुंकू लावावे. त्या कलशांमध्ये पंचपल्लव रत्नासहित घालून त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. गंगा-यमुनांची नाना प्रकारे आरती करावी. त्यानंतर दर्भाचा नाग बनवून त्याची शेष म्हणून पूजा करावी. दोन्ही कलशांवर नूतन वस्त्रे ठेवून त्यांच्यापुढे पंचरंगी रांगोळी काढावी. त्यांत शंख पद्म वगैरे आकृत्या काढाव्यात. दर्भाच्या शेषाची षोडशोपचारे पूजा करुन रेशमाच्या चौदा ग्रंथी (गाठी) असलेला दोरा 'शेषशाई' म्हणून ठेवून त्याच्यामध्ये विष्णू म्हणून ध्यान करावे. सप्तफणींच्या शेषाजवळ भगवान विष्णू नेहमी असतात आणि म्हणून त्यांना 'अनंत' या नावाने संबोधितात. चतुर्भूज श्रीविष्णूंचे ध्यान करावे. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय्' या मंत्राने नवीन दोऱ्याची षोडशोपचारे पूजा करुन 'अनंतगुण रत्नाय' अशा मंत्राने ते कलशावर ठेवावेत. तेथे पुरुषसुक्त म्हणून पूजा करावी व मग 'अतोदेवा' मंत्र म्हणावा. 'संसारगव्हरेति' मंत्र म्हणून तो अनंताचा दोरा उजव्या हातात बांधावा व 'नमस्ते वासुदेवाय्' असा मंत्र म्हणून जीर्ण दोरा विसर्जित करावा. 'दाताच विष्णूर्भगवान' असे म्हणून गोधूम-घृताचे (गव्हाचा रवा व तूप योग्य प्रमाणात घेऊन एकत्र करुन बनविलेला पदार्थ) अनारशांचे वाण द्यावे. अनारसे वगैरे विशेष पदार्थांपैकी अर्धे ब्राह्मणांस देऊन उरलेल्या अर्ध्याने आपण भोजन करावे. असे व्रत चौदा वर्षे करावे आणि मग ब्राह्मण भोजन घालून उद्यापन करुन चौदा कलश ब्राह्मणांना द्यावेत. त्यामुळे सर्व कामना पूर्ण होऊन चतुर्विध पुरुषार्थांची सिध्दी प्राप्त होते. अशा तऱ्हेने व्रताचे विधान सांगून, आज चतुर्दशी आहे, तूंही आमच्यासोबत अनंताचे व्रत कर, असे सुशीलेस म्हटले. त्याप्रमाणे सुशीलेने त्या स्त्रियांसोबत 'अनंतव्रत' केले. तोपर्यंत आपले अनुष्ठान संपवून कौंडिण्य ऋषीहि तेथे आले. दोघेही रथात बसून पुढे निघाले व अमरावतीसारख्या नगरापाशी येऊन पोचले. तेथे नगरांतले लोक त्यांना सामोरे आले आणि म्हणाले, हे तपोनिधि स्वामी आपण या नगराचे अधिपति आहात! आमच्या बरोबर नगरात

चला. नानाप्रकारचे समारंभ होऊन सुशीला व कौंडिण्य नगरांत प्रवेशले आणि तेथे श्रीमदनंताच्या आशिर्वादाने त्यांना ऐश्वर्य भोगावयास मिळाले.

एक दिवस सहज सुशीलेबरोबर बसले असता कौंडिण्यांना तिच्या हातात बांधलेला अनंत दिसला. तेव्हा त्यांनी तिला विचारले, हे हातात तू काय बांधले आहेस? मला वश करण्यासाठी तांबडा दोरा बांधलास वाटते? तेव्हा सुशीला म्हणाली, हा अनंत आहे. याच्याच कृपाप्रसादाने हे अष्टऐश्वर्य प्राप्त झाले आहे. ज्या दिवशी मी अनंताचे व्रत केले त्या दिवसापासून त्या व्रतामुळे तुमचे दैव उजळले, आम्हांला 'अनंतच प्रसन्न झाले.' हे सुशीलेचे बोलणे ऐकल्यावर कौंडिण्यांचा मनात क्रोध उफाळून आला. त्याने तिच्या हातून दोरा हिसकावून घेतला व अग्निकुंडात फेकून दिला आणि संतापाने म्हणाला, कसला आलाय अनंत! मी एवढे तप केले म्हणून त्या सकृताने हे ऐश्वर्य मिळाले आहे. मला वश करण्यासाठी हातात तांबडादोरा बांधला आहे आणि अनंत म्हणून सांगतें काय? ते पाहून सुशीलेने 'हा हा' म्हणत तेथे धावत गेली आणि तिने अग्निकुंडातून तो पेटलेला दोरा बाहेर काढून दुधांत टाकून विझविला.

अनंताचा क्षोभ झाल्यामुळे कौंडिण्याचे ऐश्वर्य लवकरच नाहिसे झाले आणि त्यांना दारिद्र्य प्राप्त झाले. त्यांचे सर्व घर जळून गेले. नेसावयास एक वस्त्रहि उरले नाही. श्रीमदनंताची अवकृपा होताच साऱ्या गोष्टी फिरल्या.

मग मात्र कौंडिण्यांना पश्चाताप झाला. अनंत आपल्यावर रुष्ट झाला आहे. आता अनंताचे दर्शन झाल्याशिवाय आपण अन्नोदक घ्यायचे नाही असा निर्धार करुन ते सुशीलाला घेऊन अरण्यामध्ये गेले. सारखे 'अनंत, अनंत' असे म्हणत विलाप करीत होते आणि अरण्यात पुढे जात होते. वाटेत त्यांना एक मोठे आंब्याचे झाड दिसले. त्यावर पुष्कळ आंब्याची फळे लागली होती.पण कुणीही पक्षी त्या झाडावर जात नव्हता.इतकेच काय, पण किडमुंगीसुध्दा त्या झाडाला स्पर्श करीत नव्हती. त्याला कौंडिण्यांनी विचारले, तू अनंताला पाहिलेस का? तेव्हा तो आम्रवृक्ष म्हणाला नाही. पण तुला जर तो दिसला तर त्याला माझ्याबद्दल तू सांग! हे ऐकून कौंडिण्य पुढे गेले. तेव्हा त्यांना वासरासह असलेली गाय दिसली. कौंडिण्यांनी त्या गाईला अनंताला पाहिले का? असे विचारले. गाय म्हणाली, मी अनंत पाहिला नाही. पण तुमची व अनंताची भेट झाली तर माझ्याबद्दल त्यांना सांगा. अशा तऱ्हेने कौंडिण्य पुढे पुढे जात राहिले आणि त्यांना बैल, दोन सरोवरे इत्यादिंची भेट झाली आणि सर्वांनी त्यांना अनंत पाहिला नसल्याचे सांगून तुमची भेट झाली तर आमच्याबद्दल सांगा असे उत्तर मिळाले. पुढे गाढव व हत्ती भेटले. त्या दोघांकडे अनंताविषयी चौकशी केली पण दोघांनीहि काही उत्तर दिले नाही.

आता मात्र कौंडिण्याची सहनशक्ती संपली. ते निर्वाणीला येऊन 'अनंत अनंत' असा आक्रोश करु लागले आणि जमिनीवर गडबडा लोळू लागले. आता प्राण शरीर सोडून जातात की काय अशी अवस्था प्राप्त झाली. इतक्यात तेथे एक वृध्द येऊन त्याने कौंडिण्यांना सावध करुन म्हटले, तुम्ही अनंताला शोधत आहात! मी तुम्हांला अनंत दाखवतो, चला माझ्याबरोबर! असे म्हणून कौंडिण्याचा हात धरुन चालू लागल्याबरोबर जी नगरी सोडून कौंडिण्य आले होते ती नगरी पूर्वीसारखी झाली होती. त्या वृध्दाने कौंडिण्यांना नगरात नेऊन रत्नखचित सिंहासनावर बसविले आणि आपले स्वतःचे रुप प्रकट केले. अनंतच त्या वृध्द ब्राह्मणाच्या रुपाने आले होते. ते

पाहिल्यावर कौंडिण्यांनी अनंताची अपार स्तुति केली. आणि म्हटले, मी पापी आहे. मी तुझी भक्ति व धर्म न जाणणारा आहे. तरीसुध्दा हे उदारा, तूं मला क्षमा कर! माझे सर्व पाप तू हरण कर! तुमच्याशिवाय माझे कोणतेही दैवत नाही; म्हणून मी तुम्हांला शरण आलो आहे. तुमच्या दर्शनाने माझा जन्म सफळ झाला, माझे जीवन धन्य झाले. अशा पश्चाताप व्यक्त करताच भक्तांचे चिंतामणी श्रीमदनंत प्रसन्न झाले व त्यांना कौंडिण्यांना तीन वर दिले. ते असे; धर्मप्राप्ति, द्रारिद्र्यनाश व वैकुंठलोकामध्ये शाश्वत वास.

त्यावेळी कौंडिण्यांनी अनंताला प्रश्न केला, मला वाटेत आम्रवृक्ष भेटला पण त्याचे फळ कोणीही खात नाही. सवत्स धेनू जिला इतके गवत असून खाता येत नाही, दोन सरोवरे, ज्यांचे जल एकमेकांत मिसळत नाही, त्यांत कमळ-फुले-फुलवेली असूनही कोणी त्यांचे पाणी पित नाही. एक मोठा थोरला बैल की ज्याच्या तोंडाला सर्वत्र गवत उगवले असूनही एक घांस सुध्दा पोच नाही. एक गाढव, एक मदोन्मत्त हत्त व एक वृध्द इतक्या सर्वांना पाहिले. त्यांची प्रत्येकाची अशी स्थिती का याचा मात्र उलगडा झाला नाही. त्या सर्व दृश्यांचा अर्थ काय? तेव्हा अनंतानी सविस्तर सांगितले;

तो वृक्ष म्हणजे पूर्वी वेदशास्त्र जाणणारा विद्वान ब्राह्मण होता. फार गर्विष्ठ व उन्मत्त होता. त्याने आपली विद्या शिष्यांना शिकविलीच नाही. त्या पापामुळे तो वृक्ष झाला. वासरासकट जी गाय होती, तिने पूर्वजन्मी नापिक जमीन ब्राह्मणाला दान दिली होती. मोठा थोरला बैल, तो पूर्वी महाधनिक असा ब्राह्मण होता, पण त्याने दानधर्म केला नाही. दोन सरोवरे, त्यापूर्वी दोन बहिणी होत्या. त्यांनी दान करण्याच्या नावाखाली दानाच्या वस्तु एकमेकींनाच दिल्या होत्या.

गाढव म्हणजे तुझा क्रोध! मदोन्मत्त हत्ती म्हणजे तुझा मद होय. हे तुझे दोष तुझ्या लक्षात येऊन तू मनांतून काढून टाकल्यावर तुझे मन शुध्द झाले व त्यामुळे तुला वृध्द ब्राह्मणाच्या रुपाने मी स्वतःच भेटलो. तूं ज्यांना पाहिलेस त्या सर्वांना त्यांच्या त्यांच्या दोषातून सोडविले आहे. त्या सर्वांना या जन्मी सगळे ऐश्वर्य मिळून मृत्युनंतर स्वर्गात जाता येईल.

हे कौंडिण्या, तूं नक्षत्रामध्ये पुनर्वसु बनून रहा (पुनर्वसु नक्षत्राजवळ कौंडिण्य नावांचा तारा आहे).

वासर ब्रह्मेश्वरला श्रीगुरुंची सायंदेवाशी भेट झाली होती. त्यावेळी पंधरा वर्षांनी तुझी व आमची भेट होईल असे श्रीगुरुंनी त्यांना आश्वासन दिले होते. आम्ही तुमच्या ग्रामासमीपत । वास करुं हे निश्चित। कळत्र पुत्र इष्ट भ्रात। मिळोनी भेटा तुम्ही आम्हां ।।

कडगंची हे सायंदेवाचे मूळ गांव गाणगापुरापासून जवळच आहे आणि श्रीगुरु गाणगापुरास येऊन वास्तव्य करु लागले होते. सायंदेवांना दिलेले आश्वासन पुरे केले होते.

सायंदेवांना दोन बायका होता याचा उल्लेख येतो. श्रीगुरु जेव्हा वासर ब्रह्मेश्वरला असताना त्याच्या घरी जेवायला गेले होते तेव्हा सायंदेवाची पत्नी 'जाखाई' हिने रांगोळ्या काढून सर्वांना सुग्रास जेवण दिले होते. तेथे त्यांच्या दुसऱ्या पत्नीचा वा मुलांचा उल्लेख नाही. त्यावेळी श्रीगुरुंनी त्यांना आशिर्वाद दिलेला होता; तुझी संतती

होईल ख्याती । गुरुभक्ति वंशोवंशी । पुत्रपौत्र नांदाल हर्षी । गुरुभक्ति येणेपरी ।।

त्यामुळे सायंदेवास त्यावेळी मूलबाळ नव्हते हे स्पष्ट होते. जेव्हा सायंदेव गाणगापुरात श्रीगुरुंच्या भेटीला आले तेव्हा त्यांची पहिली पत्नी जाखाई, दोन मुलगे व त्यापैकी नागनाथ हा थोरला होता. त्याचवेळी 'तुला जी दुसरी बायको आहे तिला चार मुलगे होतील', असा श्रीगुरुंनी त्यांना आशिर्वाद दिला आहे.

सायंदेव गाणगापुरी श्रीगुरुंच्या सेवेत राहिल्यानंतर साहजिकच श्रीगुरुंनी सेवा कठीण आहे असे सांगितले होते. तरीही मन पक्के करुन ते श्रीगुरुंच्या सेवेत राहिलेच. साहजिकच श्रीगुरुंनी त्याची परिक्षा पाहणे आलेच.

श्रीगुरुंनी त्याला इकडे तिकडे पाहू नकोस असे सांगितले होते पण त्याने पाहिले व दोन्ही बाजूंना महाभयानक सर्प पाहून तो घाबरला. म्हणजे तो परिक्षेला नापास झाला असे नाही. दोन्हीकडे साप, पुढे रस्ता दिसत नाही, मग सायंदेवांनी काय केले ? मनोमन श्रीगुरुंचे स्मरण केले आणि स्मर्तृगामी सद्‌गुरुंनी लगेच त्यांना हजार दिव्यांचा प्रकाश व वेदध्वनी यांच्या साह्याने संगम कोणत्या दिशेने आहे ते दाखवून दिले. कोणत्याही कार्यात विघ्ने ही येतातच. तशी ती गुरुभक्तितही येतात. अशा वेळी गुरुभक्ताच्या मनाची प्रतिक्रिया काय घडते, हा मुद्दा महत्वाचा असतो. दोन्हीकडे साप आहेत, पुढे रस्ता दिसत नाही, संगमावर श्रीगुरु थंडीने गारठले आहेत, त्यांना हा विस्तव तेथे नेऊन शेकोटी पेटवून द्यायची आहे आणि संगम कोठे आहे हेच समजेनासे झाले होते. अशा परिस्थितीत सायंदेवांनी मनापासून श्रीगुरुंचेच स्मरण केले होते.

तेव्हा अडचणीच्यावेळी आपल्या सद्‌गुरुंचे स्मरण ही खऱ्या भक्ताची कसोटी आहे. त्या कसोटीत सायंदेव उतरले आणि म्हणूनच त्यांनी सायंदेवांचा 'निजभक्त' म्हणून स्वीकार केला.

असे हे सायंदेव, श्रीगुरुंच्या भक्तांपैकी एक भक्त! त्यांच्याच वंशात सरस्वती गंगाधर झाले व त्यांच्यामुळेच 'श्रीगुरुचरित्र' हा सिध्दग्रंथ दत्तभक्तांना मराठी भाषेत उपलब्ध झाला.

त्वष्टाब्रह्मा पुत्राची कथा ही पौराणिक व रचनात्मक आहे. सर्व प्रथम 'गुरुभक्ति कशी करावी' याचे सविस्तर वर्णन असल्यामुळे साधनेच्या दृष्टीने ही कथा मोठी उद्‌बोधक ठरते. पक्क्या गुरुभक्ताचा दृष्टीकोण कसा असावा, त्याची मनोवृत्ती कोणत्या बाबतीत कशी विकसित झालेली असावी, कोणती गुणवत्ता त्याचे जवळ असावी याचे सारे वर्णन त्वष्टापुत्राच्या कथेत मांडलेले आहे. गुरुंच्या आज्ञेचे पालन करणे हा आपला धर्म आहे आणि तो निभावण्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी त्वष्टापुत्राची होती. शिवाय तो लहान बालकच होता. त्याची भक्ति दृढ व स्थिर होती. त्याचप्रमाणे त्याचा स्वभाव गोड व दुसऱ्यांना आनंद देणारा होता. म्हणूनच गुरुंनी त्याच्याकडे काय मागितले;

कधी जीर्ण नव्हे ऐसे । घर पाहिजे - याचा अर्थ गुरुभक्ति नेहमी ताजी टवटवीत व नित्य नूतन असली पाहिजे. कधीही जीर्ण शीर्ण नसावी.

गुरुपत्नीने चोळी मागितली, अंगाला धरुन बसणारी, विचित्र रंगाची, पण शिवलेली किंवा विणलेली नको. याचा अर्थ गुरुभक्ताचा स्वभाव, गुरुंनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी जी परिस्थिती प्राप्त होईल

त्यांत चपलख बसणारा पाहिजे. 'चपलखपणा' हा गुरुभक्तिचा मोठा गुण आहे. (चपलख म्हणजे चपळ, तरतरीत, काटेकोर अशा अर्थाने) तो अगदी नैसर्गिक, अकृत्रिम असा असला पाहिजे. चोळी विचित्र रंगाची म्हणजे आकर्षक असावी. म्हणजे शिष्याच्या सर्व गुणांमध्ये आकर्षकता असली पाहिजे. हा त्याचा मतितार्थ होता.

गुरुपुत्राला हव्या असलेल्या खडावा पाण्यावरुन चालत जाता येईल अशा आणि जिथे जाण्याची इच्छा होईल तिथे घेऊन जाणाऱ्या आणि पुनः त्याला चिखल लागता कामा नये. याचा अर्थ असा होतो गुरुंनी सोपविलेल्या जबाबदारीसाठी त्या शिष्याची कोठेही सुखरुप जाण्याची आणि कोणत्याही कामांत मनोभावे उतरण्याची तयारी हवी. त्याचप्रमाणे सोपविलेले कार्य पूर्ण करुन त्यातून वेगळे (अलिप्त) होण्याची म्हणजेच त्यापासून कोणताही दोष वा डाग न लागता मोकळे होण्याची तयारी पाहिजे.

गुरुकन्येला तिच्या भातुकलीच्या खेळांतल्या भांड्यांना चुलीवर ठेवल्यावर काजळी लागता कामा नये व खेळातल्या बाहुल्या सजीव हव्यात. शिवाय हवे असलेले घर पाहिजे तेथे ठेवता आले पाहिजे; याचा अर्थ असा, जिवंत माणसांच्या सोबतीने आपण जो प्रपंच वा संसार करतो तो सारा भातुकलीचा खेळ आहे, हे चांगल्या शिष्याला समजले पाहिजे. हा सगळा त्या भगवंताने मांडलेला खेळ आहे. प्रत्येक गोष्ट धैर्याने, संयमाने, उत्साहाने, प्रेमाने, आनंदाने केली पाहिजे. प्राप्त परिस्थितीत जी काही जुळवाजुळव करणे जरुर पडेल ती करुन पुनः नेटकेपणा, आकर्षकपणा, चपळता अशी सारी तयारी शिष्याची असायला हवी. आपले कार्य करुन झाले की गुरु सांगतील तेव्हा आणि त्याप्रमाणे शिष्याने मागे वळायचे आहे, अशी त्याची तयारी असली पाहिजे.

पत्नी सुशीला हिने केलेल्या 'अनंतव्रतामुळे' कौंडिण्यांना ऐश्वर्य प्राप्त झाले होते. पण कौंडिण्यांनी अनंतव्रताचा अपमान केल्याने प्राप्त झालेले ऐश्वर्य नाहिसे झाले. कौंडिण्यांना त्याचा पश्चाताप होऊन त्यांनी आत्मपरिक्षण केले. ज्या अनंतामुळे ऐश्वर्य प्रथम मिळाले व नंतर नाहिसे झाले. त्या अनंताला प्रत्यक्ष भेटण्याचा त्यांनी प्राणपणाने प्रयत्न केला. अरण्यांत दिसेल त्याच्या जवळ त्यांनी अनंतविषयी विचारणा केली, त्यांना दिसलेल्या दृश्यांतून त्यांना आपले दोष समजून आले आणि त्यामुळे कौंडिण्य ऋषींचे चित्त शुध्द होऊन त्यांना अनंताचे प्रत्यक्ष दर्शन झाले. गेलेले ऐश्वर्य परत मिळाले.

ही कौंडिण्याची कथा मुळांत श्रीकृष्णांनी वनवासातल्या पांडवांना विशेषतः धर्मराज युधिष्ठिराला सांगितली आहे. त्या कथाभागांत 'अनंत' म्हणजे कोण ? हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

'अनंत' म्हणजे सर्व ठिकाणी सर्व काळी सातत्याने असणारा विभू व प्रभू असा परमेश्वर होय! थोड्क्यात, आपल्या अवतीभवती पसरलेले जे अमर्याद विश्व आहे त्यांतील लहानात लहान भागापासून मोठ्यांत मोठ्या भागापर्यंत सर्वांना व्यापून शिवाय अमर्याद स्वरुपांत बाकी राहिलेला असा तो भगवंत, त्याला अनंत म्हटले आहे.

कौंडिण्य ऋषींना अकल्पितरित्या मोठे ऐश्वर्य प्राप्त झाल्याने त्यांचा अहंकार वाढला व आपल्या तपश्चर्येने हे ऐश्वर्य मिळाले असे ते मानू लागले. त्यांचा अहंकार इतक्या थराला गेला की, आपल्या पत्नीने हातात बांधलेला (अनंताचा) दोरा आपल्यावर वशीकरण करण्यासाठी बांधला आहे, अशी मनधारणा झाली. एवढेच नव्हे, कौंडिण्यांनी तो अनंताचा दोरा सुशीलेकडून हिसकावून घेऊन अग्निकुंडांत टाकला! केवढा हा क्रोध, केवढा तो उन्मत्तपणा!

ऐश्वर्य गेले ! ज्या तपश्चर्येचा कौंडिण्यांना अभिमान होता ती त्यांच्या उपयोगास आली नाही. पण पतिव्रता स्त्री त्यांच्या बरोबर होती. ती खरी भक्त होती. संकटाच्या वेळी तिला स्मरण झाले ते फक्त अनंताचे (भगवंताचे). कारण ती अनंताला नुसता 'लाल रेशमी दोरा' समजत नव्हती तर प्रत्यक्ष परमेश्वर मानत होती. आपण 'अनंताला' शरण गेले पाहिजे हे तिचे म्हणणे, आता कौंडिण्याने मान्य केले होते. शिवाय ते मूळचे सात्विक प्रवृत्तीचे होते. आपली चूक लक्षात आल्याबरोबर त्यांनी 'अनंत, अनंत' म्हणून आकांत केला. त्यांना खरा पश्चाताप झाला होता व 'अनंता'च्या भेटीची खरी तळमळ लागली होती.

## तंतुकाला श्रीगुरुंनी श्रीशैल्यास नेले.

श्रीगुरु गाणगापुरात असताना अनेक भक्त त्यांच्या सेवेत होते. त्या सर्वांमध्ये एक तंतुक (कापड विणणारा कोष्टी) अत्यंत मनोभावे श्रीगुरुंची भक्ति करीत होता. संसार-प्रपंचाची कामे तीन प्रहर (नऊ तास) पर्यंत करुन तो मठात येऊन मठापुढचे अंगण झाडून काढीत असे. आणि श्रीगुरुंना दुरुन नमस्कार करुन घरी जात असे.

अशाप्रकारे त्या तंतुकाची सेवा बरेच दिवस चालू होती. तेवढ्यात महाशिवरात्री आली.सर्व लोक त्या तंतुकाचे आई-वडिलसुध्दा श्रीशैल्यपर्वतावरील मल्लिकार्जूनाच्या यात्रेला निघाले. सर्वांनी त्याला यात्रेला येण्याचे सांगितल्यावर तो मी येणार नाही असे म्हणाला. लोकांनी जास्त आग्रह केल्यावर त्याने उत्तर दिले, तुम्ही लोक वेडे व मुर्ख आहात. माझा श्रीपर्वत येथेच आहे आणि श्रीगुरु हेच माझे मल्लिकार्जुन आहेत. श्रीगुरुंचा मठ हाच माझा श्रीपर्वत आहे. तेव्हा श्रीगुरुंचे चरण सोडून मी काही तुमच्याबरोबर यात्रेला येणार नाही. सर्व लोक हसून म्हणू लागले, याला वेड लागले आहे. बसू द्या त्याला इथेच! चला, आपण आपले जाऊ या! असे म्हणून त्याचे आई-वडिल, भाऊ व इतर मंडळी निघाले. गावांतील बहुतेक सगळेजण गेले.

तंतुक एकटाच गावांत राहिला आणि श्रीगुरुंच्या मठात आला. श्रीगुरुंनी त्याला विचारले, 'तू कां रे यात्रेला नाही गेलास ?' तेव्हा तंतुक म्हणाला, स्वामी आपल्या चरणांजवळच माझी यात्रा आहे! आपल्या चरणांजवळच सगळी तीर्थे असताना ते चरण सोडून बाहेर का जाऊ! असे म्हणून त्याने श्रीगुरुंना नमस्कार केला आणि दररोज मठात येऊन सेवा करण्याचा, श्रीगुरुंना नमस्कार करण्याचा क्रम ठेवला.

असे होता होता महाशिवरात्रीचा दिवस उजाडला. श्रीगुरु संगमावर गेले होते. दुपारच्या दरम्यान तंतुकहि संगमावर गेला होता. त्या दिवशी त्याने उपवासहि केला होता. संगमावर स्नान करुन व श्रीगुरुंना नमस्कार करुन तंतुक त्यांच्याजवळ भक्तिभावाने हात जोडून उभा राहिला. श्रीगुरु त्याला म्हणाले, तूंहि तुझ्या आई-वडिल-बधू सोबत जाऊन श्रीपर्वताची मजा बघायची होतीस! पूर्वी कधी श्रीपर्वत पाहिला आहेस का ? तेव्हा तंतूक म्हणाला, नाही, मी तेथे कधीच गेलो नाही. माझ्या सर्व यात्रा आपल्या चरणांपाशीच आहेत. त्याचा भक्तिभाव पाहून त्याला जवळ बोलावून बसायला सांगितले. त्यांच्या मनात तंतुकाबद्दल कृपा उपजली आणि त्यांनी त्याला श्रीशैल्य पर्वत दाखविण्याचे ठरविले. त्यांनी तंतुकाला डोळे झाकून आपल्या पादुका घट्ट धरुन ठेवण्यास सांगितल्या आणि मनोवेगे त्याला क्षण न लागता श्रीशैल्यास घेऊन गेले. त्याला डोळे उघडण्यास सांगितले. त्या तंतुकाला जणूं काही क्षणभर झोप लागली होती. व त्यातून तो लगेचच जागाही झाला. डोळे उघडताच त्याला समोर श्रीशैल्य पर्वत दिसू

लागला. हे स्वप्न आहे का सत्य आहे हेच त्याला कळेना!

श्रीगुरु त्याला म्हणाले, अरे भ्रांतिष्टासारखा नुसता पहात काय बसला आहेस? क्षौर स्नान करुन चटकन दर्शनाला जा. श्रीगुरुंचे बोल ऐकून तंतुक लगेच स्नानाला गेला. तेथे त्याला त्याचे आई-वडिल, भाऊ, गांवातील सारी मंडळी भेटली. ते त्याला विचारायला लागले, तूं कोणत्या रस्त्याने आलास? आम्हांला का भेटला नाहीस? लपून-छपून येण्यांत काय मोठा धर्म असतो काय? तंतुक म्हणाला, हा आतांच मी श्रीगुरुंसोबत आलो. दुसऱ्या प्रहरी आम्ही निघालो आणि वाटेत फक्त एक क्षण लागला. काहीजण हसून म्हणाले, हा खोटे बोलतो आहे. आमच्या बरोबर लपत छपत आला आहे. हे त्यांचे बोलणे ऐकून तंतुकाने कोणाशीही न बोलण्याचे ठरवून क्षौर स्नान करुन फुले, अक्षता, बेल वगैरे घेऊन पूजेसाठी गेला. पूजा करीत असताना त्याला मल्लिकार्जुन लिंगाच्या ठिकाणी श्रीगुरुच दिसू लागले. आश्चर्याने चकित होऊन तंतुकाने एकाग्र मनाने पूजा केली. तेच सगळ्यांची पूजा घेत आहेत असे त्याला दिसले. तंतुक मनात म्हणू लागला, आपले श्रीगुरुराज स्वतःच ईश्वर आहेत म्हणायचे! तसा निर्धार करुन दर्शन घेतल्याची खूण म्हणून दवणा वगैरे घेऊन तो तंतुक श्रीगुरुंच्या जवळ आला. तेव्हा ते पाताळगंगेपाशी बसलेले होते, त्यांना म्हणाला, आज मी एक नवल पाहिले, लिंगाच्या ठिकाणी आपणच बसलेले आहात आणि सगळे आपलीच पूजा करीत आहेत. आपणच जर सर्व काही आहात आणि तुम्ही जवळ आहात मग इतके कष्ट निष्कारण करुन एवढ्या लांबच्या ठिकाणी लोक कशासाठी येतात. आपण आम्हांला माणसाच्या रुपाने दिसत असलांत तरी आपणच प्रत्यक्ष ईश्वर आहात. आपला महिमा आम्हांला काहीच समजत नाही. सगळेजण मूर्खासारखे या ठिकाणी का येतात आणि आपले महात्म्य त्यांना का समजत नाही? हे मला समजून सांगा. तेव्हा श्रीगुरु म्हणाले, सर्व ठिकाणी ईश्वर परिपूर्ण भरलेला असला तरी प्रत्येक स्थानाचा स्थान महिमा वेगळाच असतो. तो इतरत्र कोठेही जाऊन सुध्दा मिळत नाही. असे म्हणून श्रीशैल्य पर्वताचा स्थानमहिमा तंतुकाला कळावा म्हणून श्रीगुरुंनी त्याला विमर्षण राजाची कथा सांगितली.

किरात देशाचा राजा विमर्षण हा महाशिवरात्रीचे व्रत करुन भीमा-अमरजा संगमात स्नान करुन श्रीशैल्यपर्वतावर जाऊन मल्लिकार्जुनाची यात्रा करीत असे. तो मोठा शूर, पराक्रमी होता व त्याने आपले सर्व शत्रू जिंकले होते. त्याला शिकारीचा नाद होता. मांस भक्षणाची त्याला आवड होती आणि तऱ्हेतऱ्हेचे मांस तो खात असे. मग ते योग्य-अयोग्य याचा विचार करीत नसे. त्याचबरोबर तो मनाने चंचल व अनेक स्त्रियांबद्दल आसक्ति असणारा होता. तरीहि तो ईश्वर भक्त होता. त्या ईश्वर भक्तीने, मल्लिकार्जुन यात्रेने त्याचा उध्दार झाला. राजाला मिळालेल्या श्वान जन्मात त्याने शिवपूजा पाहिली. त्याला प्रदक्षिणा घडाल्या, महाशिवरात्रीचा उपवास घडला, दीपमाळेवर उजळलेले दिवे त्याच्या दृष्टीस पडले आणि लोकांनी त्या कुत्र्याला शिवमंदिरातच ठार मारले म्हणजे तेथेच त्याचे प्राण गेले. अशा तऱ्हेने अनेक पुण्याचा भाग त्या श्वानाला प्राप्त झाला आणि पुढील सात जन्म त्याने राज्यपद भोगले. असा श्रीशैल्याचा महिमा आहे. तो लक्षात घेऊन व आपल्या गुरुंच्या मुखातून मिळालेला उपदेश समजून तू ईश्वर पूजा करीत जा. गाणगापूर गावांजवळ जे कल्लेश्वर मंदिर आहे तेथे जाऊन तू कायम-नेहमी पूजा करीत जा. कारण कल्लेश्वर म्हणजे मल्लिकार्जुन समान आहे. हे लक्षात ठेव. त्याचप्रमाणे भीमा-अमरजा संगमात स्नान करुन संगमेश्वराची पूजा करीत जा. संगमेश्वरहि मल्लिकार्जून इतकाच महत्वाचा आहे.

एवढे सर्व ऐकूनही तंतूक श्रीगुरुंना म्हणाला, स्वामी, सर्वच ठिकाणी आपणच एकटे व्यापक बनून संचरुन राहिलेले आहांत! उगीचच आपण कल्लेश्वर व संगमेश्वर यांचे वर्णन करीत आहात!

हे ऐकल्यावर श्रीगुरु हसून म्हणाले, चल पादुका पकड आणि डोळे झाक, असे म्हणून त्याला क्षणार्धात पुनः गाणगापुरात संगमावर परत घेऊन आले. तेवढ्यात गाणगापुरातील मंडळी श्रीगुरु आता संगमावर होते आणि एकदम कोठे गेले म्हणून शोधाशोध करु लागले. त्याचवेळी श्रीगुरु संगमावर प्रगट झाले आणि तंतुकाला मठात जाऊन शिष्यांना बोलावून आणण्यासाठी पाठविले. तंतुक गावात आला तर त्याच्याकडे पहात सगळे हसूं लागले व 'क्षौर कां केलेस ?' असे त्याला विचारु लागले. तंतुक त्यांना सांगू लागला, मी श्रीशैल्यापर्वतावर गेलो होतो. असे म्हणून तो दवणा, प्रसाद, विभूती सर्वांना दाखवूं लागला. निरनिराळे हार दाखवू लागला.सर्वजण आश्चर्याने म्हणू लागले, 'अरे हा तर दोन प्रहरी घरी होता!' कोणी त्याचे खरे मानू लागले तर कोणी खोटे मानूं लागले. आणि त्याला पुन:पुन्हा 'खरे काय ते सांग' असे म्हणू लागले. तेव्हा त्याने सर्वांना सांगितले, मी श्रीगुरुंबरोबर वायुवेगाने गेलो होतो. श्रीगुरु आता संगमावर मला घेऊन परत आले आहेत. आज बहुतेक ते संगमावरच राहातील असे वाटते. मला शिष्यांना बोलावण्यासाठी गावांत पाठविले आहे, असे म्हणून तंतुक सरळ मठात गेला आणि त्याने मठातील शिष्यांना श्रीगुरु संगमावर असल्याची खबर देऊन त्यांना सगळा वृत्तांत सांगितला. सर्व शिष्य संगमावर गेले तेथे त्यांनी श्रीगुरुंची मोठी पूजा केली.

आणखी पंधरा दिवसांनी यात्रेला गेलेले लोक परत आले आणि त्यांनीही तंतुक महाशिवरात्रीचे दिवशी श्रीशैल्य पर्वतावर होता असे खात्रीपूर्वक सांगितले. त्यामुळे श्रीगुरुंच्या भक्तांना मोठा आनंद झाला.

तंतुक हा श्रीगुरुंचा भक्त होता. श्रीगुरु हेच परमेश्वर आहेत हे त्याला समजले होते. पण त्या एका रुपाखेरीज भगवंताची इतर रुपे मानण्यास तो तयार नव्हता. म्हणून त्याला श्रीगुरुंनी शैल्यपर्वत दाखविला व मल्लिकार्जुनरुपी भगवंताचे माहात्म्यहि समजावून दिले. तंतुकाप्रमाणे इतर हक्कदार शिष्यही श्रीगुरुंना सद्‌गुरु मानत होते. पण श्रीगुरु हे परमेश्वर आहेत याची त्यांना जाणीव नव्हती. ती तंतुकाकडे होती. अशा या भक्ताला परमेश्वराचे अस्तित्व सर्वत्र असते हे समजविण्यासाठीच श्रीगुरुंनी तंतुकाला श्रीशैल्याला नेऊन त्याचे क्षौर करवून, श्रीशैल्याचे माहात्म्य समजावून सांगितले आणि श्रीशैल्याची यात्रा व कल्लेश्वराचे पूजन अशी साधना नेमून दिली.

## श्रीगुरुंनी नंदीनामाचे कुष्ठ नाहीसे केले.

नंदी नावांचा एक ब्राह्मण होता. त्याचे सर्वांग कोडाने पांढरे झाले होते. म्हणून त्याने तुळजापुरास जाऊन तीन वर्षे आराधना केली. तीन वर्षेपर्यंत उपास-तपास केल्यावर त्याला चंदला परमेश्वरीच्या ठिकाणी जाण्याचा आदेश झाला. तेव्हा भवानी देवीचा निरोप घेऊन नंदीनामा चंदला परमेश्वरीच्या क्षेत्री आला. तेथे सात महिने पुनः उपास करुन पुरश्चरण केले. असे नाना प्रकारचे कष्ट केल्यानंतर एके दिवशी अकस्मात त्याला स्वप्न पडले आणि तूं गाणगापूरास जावे. तेथे त्रयमूर्तीचा अवतार असलेले मनुष्यरुपांत श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरु आहेत, त्यांच्याकडे जा म्हणजे तुझे कोड जाऊन तुझा देह उत्तम होईल. ते ऐकून नंदीनामा ब्राह्मण म्हणू लागला, तुझ्या हाती जर काही नव्हते तर तूं मला सात महिने पर्यंत घोळांत का पाडलेस? बरे जगदंबा भवानी, तिने सांगितले म्हणून, आणि तूं

(कुल) दैवत म्हणून तुझ्याकडे आलो! हे तुझे दैवतपण चांगले समजले. स्वतःला जगदैवत जगदंबा म्हणवून घेतेस आणि मला मात्र मनुष्याकडे जा म्हणून सांगतेस! तुला लाज तरी कशी वाटत नाही ? पहिल्यांदाच जरी सांगितले असतेस तर मला इतके कष्ट तरी पडले नसते. अशा तऱ्हेने नंदीनामा दुःख करु लागला आणि मी पुन्हा पुरश्चरण करीन असा हट्ट करु लागला. एक तर मी बरा होईन नाहीतर प्राण देईन असे म्हणून त्याने देवीच्या दारातच धरणे धरले. त्याला पुन्हा स्वप्न दृष्टान्त झाला, तुला सांगितले होते तसेच तूं करावे.इतर भोपे मंडळी होती त्यांनाहि स्वप्नात तसेच सांगितले गेले. सर्व भोपे नंदीनामा ब्राह्मणाला म्हणाले, आज आम्हांला देवीचा दृष्टान्त झाला आहे. तू देवीचा विनाकारण छळ करु नकोस, तुला सांगितल्याप्रमाणे तूं येथून लगेच निघून जा, नाहीतर तुला बाहेर घालवून द्यावे लागले आणि देवळात पुनः येऊ देणार नाही. इतके झाल्यावर नंदीनामाने पारणे केले, पूजा केली आणि तेथून तो निघून गाणगापुरास आला.

गाणगापुरांत मठात जाऊन त्याने श्रीगुरुंची चौकशी केली असता श्रीगुरु संगमावर असल्याचे सांगण्यात आले. थोड्याच वेळात ते पारण्यासाठी येतील, काल शिवरात्रीचा उपवास होता ना! तेवढ्यात श्रीगुरु साक्षात तेथे येऊन पोचलेच! तत्पूर्वी गावांतील लोकांनी नंदीनामाला, 'दूर उभा रहा, अगदी एकदम समोरच येऊ नकोस,' असे सांगून ठेवले होते. त्याप्रमाणे तो चिंता करीत दूर उभा राहिला होता. शिष्यांनी श्रीगुरुंना 'एक ब्राह्मण आला आहे', अशी खबर दिली. त्याच्या सर्वांगावर पांढरे कोड आहे आणि स्वामींच्या दर्शनासाठी आपण आलो आहोत असे तो म्हणतो आहे.

श्रीगुरु लगेचच म्हणाले, आम्हांला माहिती आहे. तो मनांत संशय धरुन आला आहे. त्याला मठात बोलवा. भक्तांनी धावत जाऊन त्याला बोलाविले. आणि नंदीनामा मठाच्या अंगणात आला. त्याने दुरुनच श्रीगुरुंना पाहिले आणि जमिनीवर लोळण घेऊन त्यांना नमस्कार घातला. श्रीगुरु त्याला म्हणाले, 'देवीपासून माणसाकडे काय कामाने येणे केलेत ? आणि हे ब्राह्मणा मनांत संशय वाटत होता, तरीदेखील आपण येथे कसे आलात ?' श्रीगुरुंनी आपल्या मनांतील गोष्ट ओळखली हे नंदीनामाच्या लक्षात येऊन तो वरमला व म्हणाला, हे स्वामी, मी मोहाने अंध झालो होतो पण आपल्या दर्शनाने थोडा सावध (शहाणा) झालो. आपण साक्षात परब्रह्म आहात, हे माझ्या तमोगुणामुळे मला समजत नाही. आज माझ्या आयुष्यात सुदिन उगवला आणि आपल्या दर्शनाने मी पुनीत झालो. पवित्र झालो. आपण भक्तांचे आधार आहात. आपणच त्रैमूर्ती आहात. पण अवतार धारण करुन मनुष्य रुपाने पृथ्वीवर आलेले आहात. आपले पूर्ण स्वरुप जाणण्यास कोण समर्थ आहे ?

माझा व्रतबंध-विवाह झाल्यावर माझ्या शरीरांत व्याधी उत्पन्न झाली आणि माझा स्पर्श होऊ नये म्हणून माझी स्त्री माहेरी राहिली. आई-वडिलांनी सुध्दां मला हाकलून दिले. मला अपरिमित दुःख होऊन मी संसार सोडून तुळजापुरास जाऊन पुष्कळ उपास-तापास केले. भवानीने 'सन्नती' गावी असलेल्या चंदला परमेश्वरीदेवीकडे तेथे माझे पाप जाईल म्हणून पाठविले. तेथेहि पुष्कळ कष्ट केले. देवीला माझा उबग आला आणि तिने मला, हे कृपाळूनाथा, तुमच्यापाशी पाठविले. असा मी दैवहीन आहे. देवता देखील मला कंटाळतात. जर देवतांनाहि माझा कंटाळा येतो, तर मग माणसे माझ्याकडे काय लक्ष देणार ? त्यामुळे अशा निकरावर येऊन मी तुमच्याकडे आलो आहे. आतां मरुन जाण्याचा मी निर्धारच केला आहे. आता माझी आपणाला एकच विनंती आहे, माझे काम होईल

किंवा नाही हे निश्चितपणे आणि लगेचच सांगा. मला या देहाची काही पर्वा नाही. मी सुखाने प्राण देईन. आपण शरणागताचे रक्षण करणारी माऊली आहात. तेव्हा हे उदारहृदयी सद्‌गुरु आपण निश्चित काय ते सांगावे.

नंदीनामाचे हे कारुण्यपूर्ण बोलणे ऐकून श्रीगुरु किंचित हसले आणि सोमनाथ ब्राह्मणाला (हा वृध्दवंध्या गंगाबाईचा पति) बोलावून म्हणाले, याला संगमावर न्या, चांगला व्यवस्थित संकल्प सांगून याला षट्‌कुल तीर्थाच्या ठिकाणी स्नान करायला लावा. अश्वत्थाला प्रदक्षिणा करायला सांगा आणि याची वस्त्रे दूर टाकून द्या. याला नविन वस्त्रे देऊन चटकन पारण्यासाठी मठांत घेऊन या!

ते ऐकल्यावर सोमनाथ व नंदीनामा त्वरीत संगमाकडे गेले. षट्‌कुल तीर्थात स्नान करुन नंदीनामा बाहेर येताच त्याच्या देहाचा रंग पालटला, अश्वत्थाला प्रदक्षिणा करीत असतांनाच त्याचा देह सोन्यासारखा चमकू लागला. सोमनाथाने त्याला नविन वस्त्रे दिली आणि त्याची जुनी वस्त्रे दूर फेकून दिली. ती वस्त्रे जेथे पडली तेथील जमीन लगेच क्षार भूमि (वाळवंटासारखी) झाली. त्याला घेऊन सोमनाथ ब्राह्मण मठात आला आणि त्याने नंदीनामाला श्रीगुरुंच्या पायावर घातले. सर्व लोक अंचबित झाले. नंदीनामाने श्रीगुरुंना नमस्कार करुन त्यांची स्तुति केली. आनंदाने बेभान होऊन श्रीगुरुंच्या पादुकांवर लोळू लागला.

श्रीगुरु त्याला म्हणाले, तुझ्या मनाप्रमाणे झाले ना! तुझी इच्छा पूर्ण झाली ना! सर्व अंग कसे झाले आहे ते तपासून पहा. नंदीनामाने तसे केले तेव्हा सगळे अंग चांगले झाले असले तरी थोडेसे कोड पोटरीवर राहिलेच होते. ते पाहतांच त्याचे मन भ्याले आणि तो श्रीगुरुंना म्हणाला, स्वामी अजून थोडे शिल्लक आहेच की! आपली कृपादृष्टी झाल्यावर हे थोडे तरी कुष्ठ का राहिले ?

श्रीगुरु म्हणाले, 'मनुष्य काय करील हा संशय मनांत धरुन तू आलास म्हणून थोडे राहिले आहे. त्याचेहि निवारण करण्यासाठी तूं अपरिमित असे कवित्व कर, आमची स्तुति निरंतर कर, त्यामुळे ते राहिलेले कुष्ठ जाईल.'

तेव्हा नंदीनामा श्रीगुरुंना म्हणाला, लिहायला वाचायलासुध्दा मला येत नाही, मी मंदमती आहे, मी कवित्व कसे करु ? काव्यशास्त्राचे ज्ञान-अभ्यास,. कवित्व करण्याची शक्ती अशी माझ्याजवळ काहीच नाही. असे असता हे सद्‌गुरु आपण मला काव्य करण्यास कसे सांगता ? तेव्हा श्रीगुरुंनी नंदीनामाला तोंड उघडून जीभ बाहेर काढण्यास सांगितले आणि त्याच्या जीभेवर श्रीगुरुंनी विभूती टाकली. त्याबरोबर नंदीनाम्याला ज्ञान झाले तो काव्य करु लागला.

तो प्रकार पाहून लोक आश्चर्यचकित झाले. त्यांना उद्देशून नंदीनामा म्हणाला, लोकहो, श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरु म्हणजे साक्षात परब्रह्म आहेत हे लक्षात ठेवा. मी पुष्कळ पाप केले, पण यांच्या केवळ दर्शनाने त्यांचा नाश झाला. 'चरणं पवित्रं विततं पुराणम्' असे वेद स्वतःच सांगतात, म्हणून हे लोकहो, श्रीगुरु चरणांची सेवा करा होत करा! गुरुपेक्षा देव वेगळा नाही. अरे तुमच्याजवळ हा केवढा मोठा ठेवा आहे, तो तुम्ही कां बरे ओळखत नाही ? श्रीगुरु ही कामधेनू आहे. त्यांना तुम्ही सर्वजण भजा हो भजा! त्यामुळे इहलोकी सौख्य व ज्ञान मिळून मृत्युनंतर वैकुंठलोक मिळतो. यात मुळीच संदेह नाही. हे माझे बोलणे अगदी सत्य आहे हे तुम्ही समजून घ्या हो!

नंदीनाम्याची स्तुति-स्तोत्र ऐकून श्रीगुरुंना परम संतोष झाला आणि यापुढे त्याला 'कविश्वर' म्हणावे असे त्यांनी आपल्या भक्तांना सांगितले. त्याला कवि 'बसवराज' असे नांव श्रीगुरुंनी दिले. जे काही थोडे कुष्ठ त्याच्या जांघेवर (पोटरीवर) राहिले होते तेहि तात्काळ निघून गेले. नंदीनामाला अतिशय आनंद झाला. आणि तो श्रीगुरुंची कथा-भजने वगैरे सेवा करीत तेथेच राहिला.

नंदीनामा गाणगापुरात आल्यावर व श्रीगुरुंनी त्याला पाहिल्याबरोबरच म्हटले होते;

देवीपासूनी मनुष्यापाशी। येणे झाले काय कार्येसी। संदेह करोनी मानसी। कैसा आलासि द्विजवरा।।

अशा तऱ्हेने आपल्या मनातले ओळखल्यामुळे नंदीनामा, श्रीगुरुंना, हे कोणी विशेष पुरुष आहेत हे समजून चुकला होता. त्यावेळी त्याने आपल्या जीवनातील प्रत्यक्षात घडलेली वस्तुस्थिती त्याने श्रीगुरुंसमोर कथन केली.

पुढे संगमात स्नान केल्यावर सर्वांगाचे कुष्ठ गेले तरी जांघेवर राहिले तेव्हा श्रीगुरुंनी त्याला कवित्व करायला सांगितले आणि तेव्हाहि त्याच्या जीभेवर विभूती टाकून त्याला ज्ञानी बनविले.

श्रीगुरुंनी हे कशासाठी केले ? त्याची देहबुद्धि लोप पावून आत्मबुद्धि जागृत व्हावी यासाठी! कारण नंदीनामाचे कुष्ठ दूर करण्याबरोबरच त्याच्या मनोवृत्तींची दिशा बदलावी हा श्रीगुरुंचा उद्देश होता,आम्ही नंदीनामाच्या काव्यामुळे (स्तुतिमुळे) श्रीगुरुंना उद्देश सफल झाल्याचे दिसून आले. म्हणून श्रीगुरुंनी आपल्या शिष्यांना, ग्रामस्थ मंडळींना सांगितले,

नंदीनामा स्तोत्र करिता। श्रीगुरु संतोषी अत्यंता। भक्तासी ऐसा निरोप देत। 'कविश्वर' म्हणा यांसी।।

## <u>नरहरी कवीला वर दिला.</u>

श्रीनृसिंहसरस्वती स्वामी गाणगापुरात असताना त्यांची प्रसिध्दी, नावलौकिक सर्वत्र झाला होता. थोर-थोर मंडळी त्यांच्या दर्शनाला येत असत. त्यातील पुष्कळजण श्रीगुरुंचे भक्त झाले. नंदीनामा कवीने जाऊन लोकांना त्यांची महती सांगितली. अनेकजण नंदीनामाकडून अनेक गोष्टी शिकून गेले. त्यामुळे श्रीगुरुंची कीर्ति चहुं राष्ट्रांत प्रकाशित झाली होती.

एके दिवशी एका भक्ताने श्रीगुरुंना आपल्या घरी काही मंगल कार्य होते म्हणून 'हिपरगी' गावी नेले. तेथे नेऊन श्रीगुरुंची त्या भक्ताने मोठी साग्रसंगीत पूजा समारंभ पूर्वक केली. त्याच हिपरगी गावांत 'श्रीकल्लेश्वर' नावाचे प्रसिध्द आणि जागृत स्थान होते. त्याठिकाणी 'नरहरि' नामक एक चांगला विद्वान ब्राह्मण तेथे नित्य सेवा करीत असे. स्वतः कवि असल्यामुळे रोज पांच कवणे नवीन रचून तीं तो श्रीकल्लेश्वरास अर्पण करीत असे. एकाग्र मनाने व भक्तिपूर्वक नरहरि, कल्लेश्वराची सेवा करी आणि कल्लेश्वराशिवाय दुसरे कांही फारसे बोलत नसे.

अशा त्या नरहरि कवीला भक्तजण म्हणाले, 'तुझी कवित्वासाठी प्रसिध्दी आहे आणि श्रीनृसिंहसरस्वती सद्गुरुंना कवित्वाची फार आवड आहे, तर तूं त्यांचे (श्रीगुरुंचे स्मरण करणारे) असे कांही काव्य कर.' तेव्हा तो नरहरि त्या लोकांना म्हणाला, 'माझी जीभ आणि वाणी मी कल्लेश्वराला अर्पण केली आहे. इतरही देव पुष्कळ

आहेत, त्यांची आणि मर्त्य माणसांची स्तुति मी करणार नाही.' असे बोलून तो कल्लेश्वराच्या पूजेला निघुन गेला.

पण पूजा करताना त्याला झोप आली. वास्तविक पूजा करतानाचा नवीन काव्य रचून म्हणण्याची त्याची रोजची पध्दत होती. पण त्या दिवशी त्याला अनिवार अशी झोप आली आणि तो तेथेच (देवाजवळ) झोपी गेला. त्या झोपेत त्याला स्वप्न पडले, श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरु श्रीकल्लेश्वराच्या पिंडीवर बसलेले असून आपण त्यांचीच पूजा करीत आहोत. असे दृश्य त्याने पाहिले. इतकेच नव्हे तर श्रीकल्लेश्वराचे शिवलिंग अदृश्य झाले आणि श्रीगुरु मात्र दिसतच राहिले! श्रीगुरुंनी हसून त्यांस विचारले, तुझी माणसावर भक्ति नाही म्हणतोस, मग आमची पूजा का बुवा करतोस ? आणि तेवढ्यात नरहरि ब्राह्मणाला जाग आली.

आता मात्र नरहरि समजून चुकला श्रीगुरु अवतार घेऊन आलेले प्रत्यक्ष शिव आहेत आणि मी माझ्या दैवताचीच निंदा केली! श्रीगुरुंच त्रैमूर्ती आहेत आणि आता त्यांची भेट घेतलीच पाहिजे; असा मनांत निर्धार करुन नरहरि श्रीगुरुंपाशी आला आणि त्यांना लोटांगण घालून म्हणाला, स्वामी मी अज्ञानाने आंधळा झालो आहे. आपण माझ्यावर कृपा करावी. आपले स्वरुप मला समजले नाही. आपण साक्षात शिवमुनी आहात याची खात्री पटली आहे आणि म्हणूनच आपल्या चरणांना मिठी घालण्यासाठी मी आलो आहे! आपल्या चरणकमलांतील मधरुपी अमृत पिण्यासाठी मी भुंगा होऊन आलो आहे. पूर्वी सर्व ऋषी हजारो वर्षे तप करीत, अनेक कष्ट सोशित आणि तरीहि त्यांना आपले दर्शन होत नसे. पण मला मात्र तपानुष्ठान न करता आपण नुसते भेटला नाही, तर आपल्या रुपाने एक मोठा ठेवा आमच्या हाती लागला. माझ्या सर्व मनोकामना पूर्ण झाल्या. माझ्यावर कल्लेश्वर प्रसन्न झाले. आता आपण माझ्यावर कृपा करावी. असे म्हणून नरहरिने श्रीगुरुंचे चरण पकडले.

श्रीगुरु नरहरिला म्हणाले, 'आमची नेहमी निंदा करणारा तूं आणि आज एकदम तुझ्या मनांत आमच्याबद्दल एवढी भक्ति कशी उपजली ?'

नरहरि म्हणाला, आम्ही अज्ञानरुपी अंध:कारात चाचपडत होतो. आपण ज्योती रुपाने प्रकट झाल्याशिवाय आम्ही आपणांस कसे ओळखणार ? मी कल्लेश्वराची पूजा केली आणि त्या पुण्याने मला आज आपली भेट घडली. मी पूजा करायला गेलो तेव्हा कल्लेश्वराच्या ठिकाणी मला आपलेच दर्शन झाले. स्वप्नावस्थेत मी आपणांस पाहिले. पण आता प्रत्यक्ष आपली भेट झाली. आता माझे मन स्थिर झाले आहे. मला आपल्या शिष्यांमध्ये आपण समाविष्ट करावे.

अशी श्रीगुरुंना विनंती करुन नरहरि कवीने श्रीगुरुंची स्वप्नामध्ये जशी षोडशोपचार पूजा केली होती तिचे काव्यांत वर्णन करणारे एक मानसपूजा स्तोत्र म्हटले. तेव्हा श्रीगुरु हसून म्हणाले, 'आम्ही प्रत्यक्ष असताना लोकांना स्वप्नरुप भासतो (अर्थात आमचे स्वप्नरुप दर्शन खरे मानतात व प्रत्यक्ष दर्शन स्वप्न मानतात.) आम्ही प्रत्यक्ष असताना या भक्ताने स्वप्नामध्ये सर्व काव्यरचना करुन आमचे 'मानसपूजास्तोत्र' म्हटले' असे म्हणून श्रीगुरुंनी शिष्यांकडून वस्त्रे देऊन नरकहरि कवीचा सत्कार करविला. आणि त्याला म्हणाले, आमच्यापेक्षा कल्लेश्वर श्रेष्ठ आहे. तू नित्य कल्लेश्वराची पूजा करीत जा. आमचे वास्तव्य तेथे नेहमी राहिल. पण नरहरि मानेना. तो म्हणाला, प्रत्यक्ष तुम्हांला सोडून कल्लेश्वराची पूजा करण्यांत काय अर्थ ? त्याच्या जागी मला आपणच दिसता. आपणच

कल्लेश्वर आहात, आपणच त्रयमूर्ती आहात, याबद्दल माझी खात्री झाली आहे. आता मी आपले चरण सोडणार नाही.

अशा रीतीने नंदीनामा व नरहरि हे दोघे कवीश्वर श्रीगुरुंजवळच राहिले. आणि त्यांनी श्रीगुरुंची खूप भक्ति केली. ज्यांना सद्‌गुरु प्रसन्न होतात त्यांच्या धामी (घरी) जणूं कल्पवृक्षच असतो, आणि त्यांना ज्याची कल्पना करावी, त्याची सहज प्राप्ती होते.

नरहरि कवी हा सुध्दां श्रीगुरुंना मर्त्य मानव समजत होता. परंतु स्वप्नावस्थेत श्रीगुरुंचे त्याला दर्शन होऊन भगवंताची प्रचिती आली. दृश्याच्या पलीकडे अनुभूती नरहरिने घेतली. तो एक सच्चा भक्त होता आणि बुध्दिमानही होता. त्याची साक्ष म्हणजे स्वप्नात रचलेले व जागेपणी पुनः व्यक्त केलेले मानसपूजास्तोत्र होय. त्यांत त्यांची विद्वत्ता, भाषाशैली, उत्साह व मनापासूनची आवड इत्यादी गोष्टी दिसून येतात.

मानसपूजास्तोत्र हे बावन्न कडव्यांचे असून ते उपलब्ध आहे.

कौंडिण्य, तंतुक, नंदीनामा, नरहरि इत्यादी सर्वांची भक्ति अहंकारामुळे दडपली गेली होती. भक्तीशिवाय आपापल्या कल्पनांच्या मर्यादा त्यांना समजणाऱ्या नव्हत्या. त्या मर्यादा त्यांना त्यांना दाखवून देऊन, त्यांच्यावर (गुरु) कृपा करुन, त्यांना योग्य साधन लावून देण्याचे कार्य श्रीगुरुंनी केले आणि त्यांचा उध्दार केला. गुरुकृपेनंतर वरील सर्व भक्तांचा भक्तिभाव प्रकट झाला आणि तो भक्तिभाव त्यांच्या चित्तशुध्दीला कारणीभूत झाला.

## श्रीगुरुंनी एकाच वेळी आठरुपे धारण केली.

श्रीगुरुंचे गाणगापुरी वास्तव्य असताना एकदा दिपावलीच्या सणाला काही शिष्य श्रीगुरुंना आपल्या घरी भिक्षेला या असे बोलावणे करण्यासाठी आले. एकापेक्षा एक श्रीगुरुंच्या आवडीचे असे सात शिष्य श्रीगुरुंना पाया पडून आपापल्या घरी बोलावू लागले. प्रत्येकजण वेगवेगळ्या गांवचा. श्रीगुरु त्यांना म्हणाले, 'सर्वांच्या घरी कसे जाता येईल ? तुमचा तुम्हीच विचार करुन पहा. तुम्ही जशी वाटणी कराल त्याप्रमाणे तुम्ही म्हणाल तेथे आम्ही जाऊ. आमचा स्वतःचा आग्रह असा कांही नाही, आम्ही शिष्याधीन आहोत.'

तेव्हा प्रत्येकजण आमच्याच घरी या असे म्हणून एकमेकांशी भांडू लागले. त्यावेळी त्यांना थांबवून श्रीगुरु म्हणाले, 'तुम्ही भांडता कशाला ? आम्ही तुम्हां सातही जणांचे गुरु आहोत. आम्ही एका घरी जाऊ !' तेव्हा ते सातहि शिष्य हात जोडून श्रीगुरुंना विनंती करु लागले, सद्‌गुरु आपण भेदभाव करु नये. श्रीमंत-गरीब, लहान-मोठा असा विचार करु नये. सर्वांना समान दृष्टीने पहावे. आम्ही गरीब-दुर्बळ म्हणून आमची उपेक्षा केलीत तर आम्ही गंगेत प्राण देऊ, असे म्हणून सर्वांनी श्रीगुरुंना दंडवत घातले.

तेव्हा श्रीगुरुंनी विचार केला हे अज्ञानी लोक आहेत त्यांना काही समजणार नाही. म्हणून एकेकाला बोलावून त्याच्या कानात सांगितले, आम्ही तुझ्या घरी येऊ, पण हे कोणाला तू सांगू नकोस. असे सांगून श्रीगुरुंनी त्या सर्वांना त्यांच्या त्यांच्या गावी पाठवून दिले. ते सातहि जण एकमेकांला कांही न सांगता आपापल्या ठिकाणी निघून गेले.

ते सातजण निघून गेल्यावर गांवातील भक्तगण श्रीगुरुंना हात जोडून विनवू लागले, स्वामी, दिपावलीच्या सणाला आम्हांला सोडून कसे जाता? श्रीगुरु त्यांना म्हणाले, तुम्ही चिंता करु नका. 'आम्ही येथेच राहणार आहोत.'

दिवाळीच्या त्रयोदशीची संध्याकाळ जवळ येत चालली आणि त्रयोदशीची रात्र व चतुर्दशीची पहाट यांच्यामध्ये मंगल स्नान करायची वेळ आली तेव्हा श्रीगुरुंनी एकदम आठ रुपे धारण केली. त्या सातहि शिष्यांकडे सातहि गावांत गेले आणि शिवाय गाणगापुरांत होतेच! सगळ्यांकडे जाऊन श्रीगुरुंनी पूजा घेतली. पुन:पूर्वीसारखे एकाच रुपांत गाणगापुरात दिसू लागले. इतर ठिकाणी गेल्याचे कोणासही माहिति पडले नाही.

पुढे कार्तिकी पौर्णिमेला सारे शिष्य गाणगापुरात श्रीगुरुंकडे दीपोत्सव करण्यास आले. सगळ्यांनी एकमेकांना वंदन केले आणि दहा दिवसानंतर भेट होत असल्याचा उल्लेखहि केला. तसेच श्रीगुरु दिवाळीत आपल्याकडे आले होते असे कौतुकाने सांगू लागले.

साहजिकच कोण खरा, कोण खोटा असा वाद उद्‌भवला. जो तो आपल्या घरी श्रीगुरुंना दिलेल्या वस्तूंच्या खूणा दाखवू लागला. (म्हणजे मी जे वस्त्र दिले होते ते आता सद्‌गुरुंच्या अंगावर आहे.) पण असे सर्वच जण दाखवित होते. त्यावेळी ग्रामस्थ भक्त त्यांना म्हणाले, श्रीगुरु गाणगापूरातच होते. मग मात्र सर्वांच्या डोक्यात प्रकाश पडला, श्रीगुरु सर्वांकडे गेले होते. सर्वजण म्हणू लागले, श्रीगुरु त्रयमूर्ति आहेत. श्रीहरिचा अवतार आहेत. त्यांचा महिमा अपार आहे.

मग सर्वांनी श्रीगुरुंची अपार स्तुति करुन दीपाराधना (दीपोस्तव) करुन ब्राह्मण भोजन घातले. श्रीगुरुंचा महिमा सर्वत्र पसरला.

## श्रीगुरुकृपेने पर्वतेश्वर शेतकऱ्याचे पीक अनंतपटीने वाढले.

गाणगापूरात 'पर्वतेश्वर' नावांचा एक गरीब शेतकरी श्रीगुरुंचा मोठा भक्त होता. त्याने कायावाचामनाने, स्थिरबुध्दीने श्रीगुरुंची भक्ति केली. श्रीगुरु रोज संगमावर स्नानसंध्यादि अनुष्ठानास जात असत तेव्हा वाटेत हा पर्वतेश्वर आपल्या शेतांत त्यांची वाट पहात उभा असे. श्रीगुरु येताना दिसले की तो शेतांतून पुढे येऊन त्यांना साष्टांग नमस्कार करी व पुनः आपल्या शेतात कामाला जात असे. असे खूप दिवस चालले होते.

एक दिवस तो नेहमीप्रमाणे नमस्कारास आला, तेव्हा श्रीगुरुंनी त्याच्या भक्तिभावाने संतुष्ट होऊन पर्वतेश्वरास म्हणाले, रोज एवढे कष्ट कां बरे करतोस? रोज मुद्दाम शेतांतून येऊन लोटांगण का घालतोस? तुझ्या मनात इच्छा जी काही असेल ती मोकळेपणाने सांग.

तेव्हा तो शेतकरी हात जोडून श्रीगुरुंना म्हणाला, 'माझे शेत चांगले पिकावे.' श्रीगुरुंनी शेतात काय पेरले आहे याची चौकशी केली तेव्हा 'जोंधळा' पेरला असून आपल्या कृपेने पीक चांगले आहे. आपल्याला रोज नमस्कार केल्यामुळे पीक बहरले आहे. आता थोड्याच दिवसात कणसे येतील आणि मग आपल्या आशिर्वादाने आम्ही पोटभर खाऊ! स्वामी, आपण शेताजवळ येऊन अमृतदृष्टीने पिकाकडे पहावे. आपण कृपाळू आहात. मी शुद्र आहे म्हणून

उपेक्षा करु नका. त्याचे बोलणे ऐकून श्रीगुरु त्याच्या शेताजवळ गेले, त्यांनी त्याचे शेत पाहिले आणि म्हणाले, ‘तुझा विश्वास असेल आणि मी सांगितलेले तूं ऐकणार असशील तर तुला एक गोष्ट सांगतो आणि तू ते भक्तीने ऐकणार असशील तरच आम्ही ते सांगू!’ तेव्हा शेतकरी विनयाने म्हणाला, मला गुरुवाक्य प्रमाण आहे. गुरुवचन पाळणे यापेक्षा माझ्या मनांत दुसरा भाव नाही. तेव्हा श्रीगुरुंनी त्याला सांगितले आम्ही संगमावर जात आहोत, तेथून आम्ही मध्यान्ही परत येऊं तोपर्यंत तूं हे सगळे पीक कापून टाक! असे सांगून श्रीगुरु संगमावर गेले.

इकडे पर्वतेश्वराने श्रीगुरुंनी सांगितल्याप्रमाणे करण्याचा निर्धार करुन गावात आला. ‘माझे शेत खंडाने द्या, गेल्या वर्षी दिले तेवढे धान्य देईन, अशी त्याने अधिकाऱ्यांना विनंती केली. तेव्हा अधिकारी म्हणाले, शेतांत पीक भरपूर आले आहे, हे आम्हाला माहिती आहे. म्हणून गेल्यावर्षी इतके देऊन पीक कापण्याचा मक्ता मागतोस होय! आम्ही तुझे म्हणणे ऐकणार नाही. तेव्हा विनवणी करुन सांगितले, गेल्यावर्षी पेक्षा दुप्पट धान्य देईन व तसे करारपत्र त्याने अधिकाऱ्याला लिहून दिले. कापणी करणारी माणसे गोळा करुन त्यांना शेतावर घेऊन गेला आणि आपल्या शेतांतील पीक कापण्यास सुरुवात केली. त्याच्या बायका-मुलांच्या कानावर ही गोष्ट गेल्यावर ती पीक कापण्यापासून आपल्या धन्याला परावृत्त करु लागली. पण त्यांना ‘दगड मारीन’ असे धमकावून घरच्या लोकांना गप्प बसविले. त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांकडे जावून त्यांची मनधरणी करुन आपल्या धन्याला पीक कापण्यापासून रोखावे. त्या संन्याशी बुवाच्या नादाने सर्व पीक कापतो आहे असे म्हणू लागताच अधिकारी त्यांना म्हणाले, ‘तो काही कां करेना! त्याचे शेत तो कापतो आहे तर कापू द्या. आमच्याजवळ त्याचे करारपत्र आहे, गेल्या वर्षीच्या दुप्पट धान्य सरकारात जमा करीन. तेव्हा आम्हांला काही पर्वा नाही.’

इतका सगळा प्रकार झाल्यावर पर्वतेश्वराने राहिलेले पीक व्यवस्थीतपणे सगळेच्या सगळे कापून टाकले. तोवर मध्यान्ह होत आली होती म्हणून श्रीगुरुंची वाट पहात मार्गात थांबला. तेवढ्यात श्रीगुरु आलेच. पर्वतेश्वराने त्यांना नमस्कार केला आणि शेतांतले पीक कापल्याचे त्यांना दाखविले. श्रीगुरु म्हणाले, अरे उगीचच तूं पीक कापलेस. आम्ही सहज गंमतीने तुला सांगितले. तर तूं खरोखरीच सगळे पीक कापलेस होय! पर्वतेश्वर श्रीगुरुंना म्हणाला, आपले वाक्य म्हणजे कामधेनू समजून मी वागलो. श्रीगुरु संतुष्ट होऊन म्हणाले, तुझ्या मनातील भाव पक्का असेल तर तुला चांगले फळ मिळेल. तूं काही काळजी करु नकोस. असे म्हणून श्रीगुरु मठात आले. पर्वतेश्वरहि आपल्या घरी निघून गेला. घरी सर्व ‘आमच्या तोंडचा घास गेला’ म्हणून रडत होते. पर्वतेश्वराने सर्वांना समजावून सांगितले, सद्‌गुरुंचे वाक्य म्हणजे कामधेनू असते. तुम्ही चिंता न करता सुखाने रहा. सद्‌गुरुंच्या कृपेने आपल्याला हजारपटीने मिळेल. काही नुकसान होणार नाही, अशी माझी खात्री आहे. पुढे काही तरी विशेष घडणार असेल म्हणूनच त्यांनी मला असे करावयास सांगितले आहे. ही आपल्यावर मोठी कृपाच आहे हे तुम्ही समजून घ्या. त्याने आपल्या भाऊबंदांना इष्टमित्रांनाहि विश्वासात घेऊन शांत राहण्यास सांगितले.

असा एक आठवडा गेला. मोठे वादळ झाले. सगळीकडे थंडी पडली आणि गाणगापूर गांवच्या आसपासच्या शेतांमधले पीक नासले. कारण मूळ नक्षत्रावर अचानक मोठा पाऊस पडला. सगळ्या गांवचे पीक बुडाले. पण पर्वतेश्वराच्या शेतांतील पीक मात्र दसपटीने वाढले. जोंधळ्याची रोपे चांगलीच फोफावली. वरचा भाग कापलेल्या एकेका रोपाला अकरा-अकरा फाटे फुटून त्याला जोंधळ्याची कणसे लागली. भरघोस पीक आले. राज्यात इतर

भाग मात्र दुष्काळग्रस्त झाला.

आता मात्र पर्वतेश्वराची बायको त्याला नमस्कार करुन हात जोडून आर्जवी भाषेत क्षमा मांगू लागली. मी अज्ञानात गुरफटले होते. काहीही न समजता मी तुमची निंदा केली, कोण-कुठला सद्‌गुरु असे म्हणाले, त्याबद्दल, हे पतिदेवा, आपण मला क्षमा करा. मग तिने शेतांत जाऊन शेतांतल्या पिकांची पूजा केली आणि दोन्ही उभयता पूजा आरतीचे सर्व साहित्य घेऊन श्रीगुरुंकडे आली. तेव्हा श्रीगुरुंनी 'काय कसे काय?' म्हणून त्यांची चौकशी केली. दोघांनी श्रीगुरुंची पुष्कळ स्तुति केली. प्रत्यक्ष शिवमुनी म्हणून जयजयकार केला. आपण आमची कामधेनू आहात. आपणच आमचे कुळदैवत आहात. आमच्या सर्व कामना पूर्ण झाल्या, आम्ही आपणांस शरण आहोत. आपले 'भक्तवत्सल' हे ब्रीद ऐकले होते, ते आज आम्ही प्रत्यक्षात अनुभवले. डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिले, असे म्हणून त्या दोघांनी श्रीगुरुंचे चरण धरले. त्यांची भक्तिपूर्वक आरती केली. श्रीगुरुंना संतोष झाला. त्यांनी अतिशय प्रेमाने 'तुमच्या घरी लक्ष्मीचा वास अखंड राहिल' असा त्या उभयतांना आशिर्वाद दिला. श्रीगुरुंचा निरोप घेऊन दोघे आनंदाने घरी परतले.

पुढे महिन्याभराने सगळे पीक पदारात पडले. गतवर्षीपेक्षा शतपटीने जास्त पीक पर्वतेश्वराच्या पदरी आले होते. त्याने अधिकाऱ्यांना बोलावून अर्धे धान्य देण्याची तयारी दर्शविली. तसा मी दुप्पट देण्याचा करारच केला आहे. पण अधिकारी त्याला म्हणाले, आम्ही धर्महानी कशी करावी? तुझ्यावर सद्‌गुरुंची कृपा आहे, म्हणून तुझ्या शेतांत अमाप पीक आले आहे ते तू खूशाल घरी घेऊन जा व तुला हवा तसा त्याचा उपयोग कर.

तेव्हा पर्वतेश्वराने सरकारात जमा करायचे धान्य सोडून इतर धान्य ब्राह्मणांना व गरीबांना वाटून दिले.

पर्वतेश्वराची ही कथा अतिशय विलक्षण अशी आहे. 'भरघोस आलेले पीक कापू टाक' अशा श्रीगुरुंच्या विचित्र आज्ञेचे पालन पर्वतेश्वराने अगदी भक्तीप्रेमाने केले. त्याची ही कृती शुध्द वेडेपणाची वाटली तर त्यांत आश्चर्य कांहीच नव्हते. बरे, श्रीगुरु संगमावरुन परत आल्यानंतर मी सहज गमतीने तुला सांगितले होते, असे म्हटल्यावरहि पर्वतेश्वर जरासुध्दा विचलीत झाला नाही. उलट 'आपले वाक्य म्हणजे कामधेनू समजून मी वागलो' असे उत्तर देऊन त्याने श्रीगुरुंवरील आपला विश्वास, दृढ निष्ठाच प्रकट केली. तो आपल्या निश्चयाला दृढपणे चिकटून राहिला आणि श्रीगुरुंनी 'तुझा भाव पक्का असेल तर तुला चांगले फळ अवश्य मिळेल,' हे आपले वाक्य खरे करुन दाखविले. कारण पर्वतेश्वर हा श्रीगुरुंचा एकनिष्ठ भक्त होता. तो अशिक्षित होता आणि सामान्य संसारी माणसासारखाच होता. तो दरिद्री नव्हता पण विवेकी व सदाचरणी होता. तसेच सदाचरण टिकविण्यासाठी जो दृढ निश्चय लागतो, तो त्याच्याकडे होता. श्रीगुरुंच्या आज्ञापालनात धोका अधिकच होता पण पूर्ण विश्वासाने त्याने तो स्वीकारला होता. श्रीगुरुंच्या आज्ञेचे पालन केले होते.

असे अनेक आदर्श व श्रेष्ठ भक्त श्रीगुरुंच्या अवतार काळी समाजात प्रत्यक्ष विद्यमान होत्या. त्यापैकी पर्वतेश्वर हा एक होय. श्रीगुरुंचा नित्य जाता-येता नमस्कार करणे व त्यांचा शब्द प्राण पणाला लावून पाळणे ही पर्वतेश्वराची श्रेष्ठ भक्ति होती.

## गाणगापूर अष्टतीर्थ महिमा.

अश्विन वद्य चतुर्दशीला म्हणजे दिवाळीच्या दिवशी (नरक चतुर्दशीला) श्रीगुरुंनी आपल्या शिष्यांना त्रिस्थळीचे (गया-प्रयाग-वाराणसी) स्नान करण्यास सांगितले. तेव्हा गाणगापुरातील ब्राह्मण श्रीगुरुंना म्हणाले, या त्रिस्थळी यात्रेसाठी तयारी करावी लागेल! तेव्हा श्रीगुरु हसून म्हणाले, ही सर्व तीर्थे या गाणगापुर गावाजवळच आहेत. तेथे जाण्यासाठी मोठी तयारी करावयास नको. चला मी तुम्हांला ती तीर्थे दाखवितो, असे म्हणून श्रीगुरु भक्तांना घेऊन भीमा-अमरजा संगमावर घेऊन गेले आणि तेथे त्यांनी शिष्यांसह मोठ्या आनंदाने स्नान केले व म्हणाले 'या संगमाचा महिमा अमर्याद आहे.' या तीर्थात म्हणजे षट्कुल तीर्थात स्नान करणे म्हणजे प्रयागतीर्थात स्नान करण्याच्या तोडीचे आहे. विशेषतः भीमा नदी जेथे उत्तरेकडे वाहाते, तेथे जो भीमा-अमरजा यांचा संगम आहे, तो गंगा-यमुनांचाच संगम आहे हे तुम्ही पक्के समजा ते संगमक्षेत्र अतिशय चांगले आहे हे लक्षांत ठेवा! उत्तर वाहिनी भीमेचे महत्व अपरिमित आहे, तेथे स्नान केल्याने काशीपेक्षा शताधिक पुण्य मिळते. याशिवाय आणखी आठ तीर्थे आहेत त्यांचाहि महिमा मोठा आहे. तो एकाग्रतेने तुम्ही सारे ऐका. तेव्हा भक्तांनी श्रीगुरुंना विनंती केली, या नदीला 'अमरजा' असे नाव का मिळाले ? आणि तिचा उगम कोणापासून कोठे झाला ते सांगावे. बरे झाले तुम्ही विचारले असे म्हणून श्रीगुरुंनी जालंधर पुराणातील एक प्रसिध्द कथा सर्वांना सांगितली.

जालंधर राक्षसाने उन्मत्त होऊन सगळी पृथ्वी जिंकली. इंद्राचा पराभव केला व सर्व देवांना पळवून लावले. ही गोष्ट इंद्राने भगवान शंकरांना सांगून म्हटले, शिवशंकरा आपले बरेच देव मारले गेले आहेत आपण जालंधराचा शीघ्र प्रतिकार करावा.स्वर्ग-मृत्यु-पाताळ या तिन्ही लोकांत दैत्यांचे साम्राज्य पसरले आहे. हे ऐकून शिवाला क्रोध आला आणि त्यांनी रौद्ररुप धारण करुन ते दैत्यांचे निर्मुलन करण्यास निघाले. तेव्हा इंद्राने त्यांना विनवणी केली, देवांना जिवंत करण्याचा काही उपाय करावा. त्यावेळी भगवान शंकरांनी इंद्रावर प्रसन्न होऊन संजीवनी उदक भरलेला एक घट त्याच्या हाती दिला व अमृतमंत्र उच्चारला. इंद्राने लगबगीने जाऊन ते संजीवनी जल देवांवर शिंपडले आणि त्या सर्वांना जिवंत केले. त्या घटामध्ये जे थोडे संजीवनीजल उरले होते ते घेऊन इंद्र जात असता त्याच्या हातून ते अवचित (अचानक) भूमीवर पडले आणि त्याचा प्रवाह बनला. त्यातून 'संजीवनी' नावाची नदी उगम पावली आणि त्याच कारणाने तिला 'अमरजा' असेहि नांव प्राप्त झाले. त्यामुळे या नदीत जो स्नान करतो त्याला 'अपमृत्यु' कसा येईल ? त्यांना रोगराई होणार नाही. ते शतायुषी होतील! हिला 'अमृतनदी (अमरजा)' असे नाव असून तिचा भीमरथी (म्हणजे भीमा) नदीशी संगम झाला आहे. या संगमापाशी प्रयागाचा त्रिवेणी संगमाच्या तोडीचे तीर्थ निर्माण झाले आहे. कार्तिक, माघ त्याचप्रमाणे चंद्र-सूर्य ग्रहणाच्या वेळी, संक्रांतीच्या दिवशी, सोमवती अमावस्येला, एकादशी व अन्य पुण्यतिथींना या ठिकाणी स्नान केले असता अनंत पुण्य लाभून इहलोकी व परलोकी मोक्ष मिळतो. हे पर्वकाळाचे दिवस साधले नाहीत तरीसुध्दा इतर दिवशीहि जेव्हा शक्य होईल तेव्हा स्नान केल्याने सगळे दोष जाऊन मनुष्य शतायुषी होतो असा या संगम स्थानाचा महिमा आहे.

उत्तरवाहिनी भीमा व अमरजा यांचा संगम हेच षट्कुळ तीर्थ होय. यांस जालंदर पुराणाचा इतिहास आहे.

तेथेच पुढे अश्वत्थाच्या समोर 'मनोरथ' तीर्थ आहे. तेथे स्नान केल्याने सर्व मनोरथ सिध्दिस जातात. अश्वत्थ

म्हणजेच कल्पवृक्ष! त्यामुळे हे कल्पवृक्षस्थान आहे. ज्या ज्या फलाचे मनांत चिंतन करुन इथे स्नान केल्याने पुरे होतात. यांत संदेह बाळगूं नका असे सांगून श्रीगुरु म्हणाले, आम्ही येथे नेहमी असतो, याची एक खूण म्हणजे तेथे गरुडपक्षी किंवा गिधाडे दिसतात. कल्पवृक्षाची पूजा करुन संगमावर जे शिवशंकरांचे मंदिर आहे तेथे जाऊन त्या संगमेश्वराची पूजा करावी. 'जसा श्रीशैल्य पर्वतावर मल्लिकार्जुन आहे तसा या संगमावर मी रुद्ररुपाने आहे.' नंदिकेश्वराला नमस्कार करुन चंडीस्थानापाशी जाऊन वंदन करावे. तीन प्रदक्षिणा करुन नंदीपाशी येऊन श्रीशंकराचे दर्शन घेतल्यावर मनुष्य इंद्रासमान होतो. संगमेश्वराचे पूजन केल्याने धनधान्यादी संपत्ति, अखंड लक्ष्मी, पुत्र-पौत्र यांची प्राप्ती होते.

भीमा-अमरजा संगमाच्या समोरचा अश्वत्थ (पिंपळ) हा कल्पवृक्ष असल्यामुळे तेथे श्रीगुरु नेहमी असतात आणि त्यामुळे तेथे सेवा करणाऱ्यांचे निश्चितच मनोरथ पूर्ण होतात. यांस 'नृसिंहतीर्थ' असेहि म्हणतात. येथे दिसणारी गिधाडे ही या तीर्थाची खूण म्हणून सांगितली आहे. हे पक्षी गाणगापुरांत दिसतात.

संगमेश्वर हे मल्लिकार्जूनाच्या तोडीचे क्षेत्र आहे असे श्रीगुरुंनी सांगितले आहे. चंडीस्थान व सोमसूत्र यांचाहि संगमेश्वरातच समावेश असून या सर्वांना ती प्रदक्षिणा घालाव्यात व नंदीपाशी येऊन नंदीच्या वृषणापासी डावा हात व उजव्या हाताचा अंगठा व तर्जनी नंदीच्या शिंगावर ठेवून त्यांच्यामधून शिवलिंगाचे दर्शन घ्यावे असे सांगितले आहे.

पुढे अर्ध्या कोसापर्यंत 'वाराणसी (भागीरथी)' तीर्थ आहे. नागोशी म्हणून गांग आहे तेथे या तीर्थाचा उद्गम होतो. पूर्वी भारद्वाज गोत्राचा, विरक्त ईश्वरभक्त असा एक ब्राह्मण होता. तो सर्वसंग त्यागून अनुष्ठान करी व महादेवांचे नेहमी ध्यान करीत असे. त्याला शिव प्रसन्न झाले होते. त्यामुळे तो ब्राह्मण देहभान विसरुन सर्वत्र हिंडत असे. लोक काय तर त्याचे दोन बंधू एक ईश्वर व दुसरा पांडुरंगेश्वर हे दोघेहि बंधू त्याला वेडा समजत. एके दिवशी परिवारातील सर्व काशीस जाण्यास निघाले आणि त्या वेड्यापिशा भावाला येणार असशील तर चल असे म्हणाले, तेव्हा तो आपल्या बंधूंना म्हणाला, काशीला जाण्याची काय गरज ? माझ्याजवळच विश्वेश्वर आहे, मी लगेच तुम्हांला त्याचे दर्शन घडवीन! त्यांनी लगेच विश्वेश्वर दाखविण्यास सांगितले. काशीला जायचे म्हणजे केवढा त्रास व दगदग! येथेच दर्शन झाले तर बरे होईल अशा उत्सुकतेने व हर्ष मिश्रित भावनेने ते दोघे बंधू बोलले. तेवढ्यात त्या वेड्यापिशा ब्राह्मणाने नदीत स्नान केले व तो ध्यानाला बसला. भगवान शिव (ध्यानात) त्याच्या प्रत्यक्षजवळ येऊन बोलू लागले. त्याने त्यांना विनंती केली, 'आम्हांला काशी व विश्वनाथ यांचे नित्य दर्शन होईल अशी व्यवस्था पाहिजे'. भक्तवत्सल भोळ्या शंकरांनी तशी व्यवस्था केली. त्यामुळे सर्वांना काशीक्षेत्र तेथेच दिसू लागले. मणिकर्णिका कुंडहि दिसले. त्या कुंडातून एक विश्वेश्वराची मूर्ति प्रकट झाली. जेथे भीमा उत्तरवाहिनी आहे तेथे काशी प्रकट झाली. त्या कुंडातील पाणी भागीरथीच्या पाण्यासारखे होते आणि काशीतील सर्व खूणा तेथे दिसू लागल्या. तेव्हा ईश्वर व पांडुरंगेश्वर दोघा बंधूंनी काशी तीर्थांत करावयाच्या सगळा आचार मनोभावे आचारला. आपला थोरला बंधू खरोखरच ईश्वराचा महान भक्त असून ज्ञानी आहे हे त्यांना उमजले आणि तसे त्यांनी बोलून दाखविले. त्यावेळी त्यांच्या त्या वेड्यापिशा (थोरल्या) ब्रह्मज्ञान्याने आपल्या दोन्ही बंधूंना सांगितले, 'आपल्या घराण्यांतील कोणीही काशीला जाण्याचे कारण नाही. सर्वांनी काशी तीर्थक्षेत्रातले आचार येथे करावेत, असे भगवान महादेवांनी मला सांगितले आहे. तुम्ही मला वेडापिसा म्हणता, पण माझे नांव वास्तविक 'गोसावी' असे

आहे. तुम्ही दोघे 'आराध्ये' असे आडनांव लावत चला. तुम्ही दोघांनीहि पंढरपुरास जाऊन तेथे पांडुरंगाची नित्य पूजा करीत रहावे. तेथे तुम्ही 'आराध्ये' नांवाने प्रसिध्द व्हाल. दरवर्षी काशीला म्हणून तुम्ही पंढरपुरहून येथे येत जावे. हे गाणगापुराचे 'वाराणसी तीर्थ' म्हणून विशेष तीर्थ समजले जाईल.' अशी सगळी हकिकत सांगून श्रीगुरु पुढे म्हणाले, 'गाणगापुरातच काशीक्षेत्र प्रकटले आहे. ही प्रत्यक्ष वाराणसी आहे याबद्दल मनात संशय बाळगू नका.' तेव्हा त्या साऱ्या भक्तांनी तेथे स्नान करुन दानधर्म केला.

त्यानंतर पुढे श्रीगुरुंनी 'पापविनाशी' तीर्थ दाखविले. जेथे केवळ स्नान केल्याने अग्निने गवत जळावे तशी पापे नाहिशी होतात. आपली पूर्वाश्रमातील बहिण रत्नाई हिला श्रीगुरुंनी बोलावून घेऊन तिला म्हटले, तुझे पूर्वजन्मीचे पातक बरेच आहे! तुझ्या हातून पांच मांजरांचा वध झालेला आहे. हे तुला माहित नसेल पण आता लक्षात ठेव. मांजरी गर्भारशी होती व ती प्रसृत होऊन एका भांड्यात तिची पिले तिने ठेवली होती. पण ते कांही न पहाता त्या भांड्यात पाणी ओतून तू ते भांडे झांकून अग्नीवर ठेवून दिलेस. त्या पांच मांजरांच्या हत्येखेरीज आणखीही दोष तुझ्याकडून घडले आहेत.

श्रीगुरुंचे हे बोलणे रत्नाई ऐकत असतानाच तिचे शरीर श्वेतकुष्ठाने पांढरे पडत चालल्याचे तिने पाहिले. त्यामुळे ती भयभीत झाली आणि श्रीगुरुंच्या चरणांवर लोळण घेऊन विनवणी करु लागली, हे गुरुमूर्ति आपण करुणाकर आहात. क्षमा आपणच करु शकता, आपण माझ्यावर कृपा करावी. सर्व लोक पापाचे क्षालन करण्यासाठी काशीला जातात. पण मी मात्र आपल्या दर्शनाने पापांतून मोकळी होईन अशा आशेने आपल्या चरणांपाशी आले आहे.

श्रीगुरु आपल्या बहिणीस म्हणाले, तुझी पापे पुष्कळ आहेत. जर तूं ती पुढिल जन्मी भोगायला तयार असशील, तर हे श्वेतकुष्ठ आतांच जाईल. पण रत्नाई म्हणाली, मला पुढिल जन्म नको आहे. जन्मांच्या या चक्रांतून मला मुक्ति मिळावी या अपेक्षेने मी आपणांस शरण आले आहे. आता मला आणखी जन्म नको. याच जन्मांत जो काही पापभोग असेल तो मी भोगून संपवीन.

तेव्हा श्रीगुरु तिला म्हणाले, 'पापविनाशी तीर्थात जाऊन त्वरित स्नान कर. त्या तीर्थाच्या प्रभावाने तुझे श्वेतकुष्ठ जाईल. नित्य या तीर्थांत तू स्नान करीत जा. त्यामुळे साता जन्मांचे पाप निघून जाईल. याबद्दल मनात शंका धरु नकोस.'

त्याप्रमाणे रत्नाईने तीन दिवस तीन रात्री 'पापविनाशी' तीर्थांत स्नान केल्याने तिचे पांढरे कोड सर्वच्या सर्व निघून गेले! तीर्थाचे हे महात्म्य अनुभवून रत्नाई तेथेच मठी बांधून पापविनाशी तीर्थाजवळ राहिली.

त्यानंतर श्रीगुरुंनी पुढे 'कोटीतीर्थ' दाखविले. तेथेहि केवळ स्नान केल्याने फळ मिळते. तसेच त्या तीर्थाचासुध्दां महिमा मोठा आहे. जंबद्वीपामध्ये (भारतवर्षामध्ये) जितकी तीर्थे आहेत, त्या प्रत्येक तीर्थाचा महिमाहि अमर्याद आहे. पण ती सर्व तीर्थे या कोटीतीर्थाच्या ठिकाणी आहेत. सूर्य व चंद्र ग्रहणकाळी, संक्रांतीच्या दिवशी, पर्वकाळी, अमावास्या-पौर्णिमा-प्रतिपदा या दिनी (तीर्थांना) या कोटितीर्थात स्नान करावे. सवत्स धेनू (वासरासह गाय) येथे सालंकृत दान दिली असता कोटी गायी दान दिल्याचे फळ मिळते. म्हणून या तीर्थावर दान

करण्याचे फार महत्व आहे. प्रत्येकाने येथे आपल्या शक्तीप्रमाणे काही ना काही दान येथे करावेच.

पुढे 'रुद्रपाद' या नावांचे तीर्थ आहे. हे गयेच्या तोडीचे क्षेत्र आहे. त्यामुळे जे जे आचार गयेला करतात. ते सर्व येथे करावेत आणि रुद्रपादाची पूजा करावी. त्यामुळे कोटी जन्मांची पापे नाहीशी होतात.

त्याच्यापुढे 'चक्रतीर्थ' आहे, तेथे केशवाचे (विष्णूचे) वास्तव्य आहे. ते फार मोठे पुण्यप्रद स्नान असून त्यांत स्नान केले असतां पतितसुध्दा ज्ञानी होतात. आणि तेथे अस्थिविसर्जन केले असतां त्या द्वारावतीप्रमाणे (म्हणजे द्वारकेप्रमाणे) चक्रांकित होतात. या चक्रतीर्थात स्नान करुन केशवाचे पूजन केले असता द्वारकेच्या चौपट पुण्य जोडले जाते असे त्या तीर्थाचे महात्म्य श्रीगुरुंनी सांगितलेले ऐकून त्यांच्या बरोबर असलेल्या भक्तांनी चक्रतीर्थांत स्नान करुन दानहि केले.

पुढे श्रीगुरुंनी सर्वांना 'मन्मथ' तीर्थ येते. गाणगापुर गावच्या पूर्वभागी कल्लेश्वर देव असून त्याच्याजवळच हे तीर्थ आहे. गोकर्ण महाबळेश्वराच्या तोडीचे तीर्थ आहे. मन्मथ तीर्थात स्नान करुन कल्लेश्वराची पूजा केली असता वंशाची वाढ होऊन अष्टैश्वर्य प्राप्त होतात. श्रावण मासात कल्लेश्वरावर अखंड अभिषेक करावा. कार्तिक मासात दीपराधना करावी. त्याचे अनंत पुण्य आहे.

अशी ही अष्टतीर्थे आहेत आणि त्यांचा महिमा हा असा आहे. पुरुषोत्तम श्रीगुरुंनी तो भक्त-शिष्यांना समजावून दिला. श्रीगुरुंच्या कृपेने भक्तांना फार धन्यता वाटली. ते सारे श्रीगुरुंना म्हणाले, हे कृपाळूनाथा, हे तीर्थांचे महात्म्य आम्हांस ठावूक नव्हते. आपण आम्हां सर्वांना हे महात्म्य सांगून आम्हांला पुनीत केलेत. पावन केलेत. ही सारी तीर्थे आम्हांस जवळ असताना यात्रेला जाण्याचा खटाटोप करण्याचे कारणच काय ? अष्टतीर्थांची माहिती त्या त्या तीर्थावर सांगून भक्त-शिष्यांसह श्रीगुरुंनी स्नान करुन श्रीगुरु मठात परत आले. त्यावेळी भक्तांनी तेथे मोठी समाराधना केली.

गाणगापुर क्षेत्रांतील अष्टतीर्थांची माहिती वा महिमा श्रीगुरुंनी स्वतः आपल्या भक्तांबरोबर प्रत्येक ठिकाणी समक्ष जाऊन सांगितला आहे. म्हणूनच त्यांच्याविषयी कोणीहि मनात संशय बाळगू नये, असे श्रीगुरुंनी बजावून सांगितले आहे. अशी सारी महत्वाची तीर्थे गाणगापुरात असल्यामुळे श्रीगुरु इतर स्थाने सोडून श्रीक्षेत्र गाणगापुर येथे येऊन राहिले असे समजून येते. किंबहुना ही कथाच तसा निष्कर्ष काढते.

ही सारी तीर्थे गाणगापुरात पूर्वीपासूनच होती. पण काळामानानुसार ती लोप पावली होती. ती श्रीगुरुंनी गाणगापुरात वास्तव्य करुन पुनः प्रकाशांत आणली. त्यामुळे गाणगापुरातच काशीयात्रेचे श्रेय मिळविण्याची, पुण्याईची, पापांचे क्षालन होण्याची सोय झाली !

अष्टतीर्थ महात्म्यात दोन विशेष कथा वाचावयास मिळतात, ज्या ऐतिहासिक आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. पहिली कथा आहे ती 'गोसावी' नामक ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणाची, ज्याचे दोन्ही भाऊ त्याला भ्रांत म्हणजे वेडापिसा समजत असतात. हा ब्राह्मण खरे तर जीवनमुक्तच होता. त्याला नित्य शिवशंकराचे दर्शन घडत असे. त्या पुण्याईवर त्याने आपल्या ईश्वर व पांडुरंगेश्वर या बंधूंना प्रत्यक्ष काशीचे दर्शन घडविले आणि त्यांना 'आराध्ये' हे नांव लावून

पंढरपुरात रहावे व काशीयात्रा म्हणून गाणगापुरात यावे असे ठरवून दिले. काशीस न जाण्याची परंपरा त्यांच्या घराण्यात अद्यापहि आहे.

श्रीगुरुंनी स्वतः अष्टतीर्थाचा महिमा आपल्या भक्तांना सांगितला आहे. त्यावरुन असा निष्कर्ष निघतो, गोसावी नावाचा ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण, श्रीगुरु गाणगापुर येथे येऊन स्थिर होण्यापूर्वी, त्या स्थानात राहात होता. ही सारी अष्टतीर्थे श्रीगुरुंनी पुनः प्रकाशित केली आणि त्याचबरोबर ब्रह्मनिष्ठ गोसावी ब्राह्मणाची आठवण आपल्या भक्त-शिष्यांना करुन द्यावी लागली.

यावरुन असेही सिध्द होते की सद्गुरुंनी आपल्या भक्तावरील कृपा जन्मांतरीहि कायम राहाते. श्रीगुरु इ.स.स १४३५ मध्ये गाणगापुरात आले व अवतार समाप्तीपर्यंत म्हणजे इ.स. १४५८ पर्यंत तेथे राहिले असे इतिहास संशोधकांनी, तज्ज्ञांनीहि निश्चित केले आहे. अष्टतीर्थ दर्शन व त्याचा महिमा हा त्याच कालावधीतला. गोसावी ब्रह्मनिष्ठ त्यापूर्वी म्हणजे शंभर वर्षे पूर्वी असे मानले तर त्याकाळी कदाचित श्रीपादश्रीवल्लभ विद्यामन असावेत असेहि इतिहास तज्ज्ञ निष्कर्ष काढतात. असे असेल तर गोसावी ब्रह्मनिष्ठ हा श्रीगुरुनृसिंह स्वामींच्या पूर्वावतारी होता आणि त्याची आठवण श्रीगुरुंनी अष्टतीर्थ महिमा सांगताना केली असेच म्हणावे लागेल.

दुसरी कथा आहे ती श्रीगुरुंच्या पूर्वाश्रमीच्या बहिणीची, रत्नाईची. रत्नाईच्या प्रारब्धात काही भाग दुषित होता. तिने पूर्व जन्मी आपल्या शेजारी राहणाऱ्या दांपत्यास विरोध निर्माण करवून दिला होता. गाईला लाथ मारली होती. अजानतेपणे का होईना पांच मांजरांचा मृत्यु घडून आला होता. या सर्वांचा परिणाम म्हणून या जन्मी तिचा पति संन्यास घेणार होता व त्यानंतर तिचे सर्वांग पांढऱ्या कोडाने फुलून जाणार हे श्रीगुरुंनी जेव्हा ते बाल नरहरि असताना घर सोडून गेल्यावर आपल्या वयाच्या अडतिसाव्या वर्षी पुनः आपल्या आई-वडिलांना भेटण्यासाठी कारंजास आले होते, त्यावेळी रत्नाई त्यांना भेटली होती तेव्हा पुढे होणाऱ्या ह्या दोन गोष्टी रत्नाईला सांगितल्या होत्या. त्यापैकी पतीने संन्यास घेणे ही गोष्ट अटळ होती आणि आता तिच्या अंगावर श्वेतकुष्ठ उठले होते. श्रीगुरुंनी तिला ह्या पापकर्माची समज दिली, तसे सांगितले. त्यामागे त्यांना रत्नाईची परिक्षा घेण्याचा हेतू होता. कशा तऱ्हेने आणखी जन्म घेऊन ऐहिक जीवन भोगण्याची वासना अद्यापहि शिल्लक आहे का ? अथवा ती अंतर्मुख होऊन तिला काही विरक्तता आली आहे. या दोनपैकी तिची मानसिक अवस्था कोणती आहे हे श्रीगुरुंनी पाहावयाचे होते. म्हणून त्यांनी रत्नाईला, 'आता भोगणार का पुढे ?' असे विचारले.रत्नाईने आपणांस पुनः जन्म नको, या जन्मीच जो भोग असेल तो आपण भोगू असे सांगितल्यावर श्रीगुरुंनी तिला पापाविनाशी तीर्थात स्नान करण्याचा उपाय सांगितला. त्याप्रमाणे तीन दिवस तीन रात्री स्नान केल्याने रत्नाईचे श्वेतकुष्ठ निघून गेले. यावरुन पापविनाशी तीर्थामध्ये असे सामर्थ्य होते असे आपणांस दिसून येते.

पापविनाशी तीर्थाचा महिमा जितका महत्वाचा तितकीच रत्नाईची मनोभूमिकाही महत्वाची ठरते. तिला या अशाश्वत, मिथ्या अशा जीवनांतून मोकळे होण्याची तीव्र इच्छा गहोती. आपले जीवन सार्थक करण्याची तळमळ खदखदत होती. योगायोगाने प्रत्यक्ष ईश्वर श्रीगुरुंच्या रुपाने समोर होता आणि त्याच्या आज्ञेचे पालन करायचेच ही तिची श्रध्दा व दृढ निश्चय होता. आणि तिने तसे करताच तिचे श्वेतकुष्ठ नाहीसे झाले.

## यवनराजाचा स्फोटक घालवून श्रीगुरुंनी त्याला पूर्वजन्मीचे ज्ञान दिले.

या कथेचा पूर्वारंभ आहे तो म्हणजे एका रजकाला श्रीगुरुंनी पुढील जन्मी राजा होण्याबद्दल वर दिल्याच्या प्रसंगाने झालेला आहे. 'वैदूर नगरीत तूं जन्म घेशील व तुझ्या अंतकाळी तुला आपण भेट देऊं. तेव्हा आमची भेट झाल्यावर तुझ्या मनांत ज्ञान प्रकट होईल.' असे श्रीपादश्रीवल्लभांनी त्याला आश्वासन दिले होते. त्याची पूर्तता श्रीनृसिंहसरस्वती या अवतारात पूर्ण केली गेली. त्याच्यात पुढची ही यवनराजाची कथा आहे.

पूर्वजन्मीच्या संस्कारानुसार हिंदुधर्माबद्दल त्याच्या ठायी आपुलकीचा भाव होता. देवालये, तीर्थक्षेत्रे, मठ इत्यादींना अथवा त्यांच्या उत्कर्षासाठी तो द्रव्येहि अर्पण करीत असे. साधू-संत, संन्याशी यांच्याविषयी त्याच्या ह्रदयी सद्‌भाव होता. त्यांचा मान-सन्मान राखीत असे. परंतु त्याच्या राज्यातील मुल्ला-मौलवी बादशहाच्या वृत्तीचा धिक्कार करीत. संधी मिळाली की ते त्याला उपदेश देत. हिंदुधर्माच्या धर्मवृध्दित व्यत्यय निर्माण करणे हे यवनधर्माचे कर्तव्य आहे. तुमचे हिंदुधर्माबद्दल आदरणीय वागणे, त्यांना द्रव्य सहाय्य करणे हे म्लेंच्छधर्मास मान्य नाही. तेव्हा तुमच्या वृत्तीत, वागण्यात बदल करा आणि सच्चा म्लेंच्छ म्हणून आपला लौकिक वाढवा. पण उघड उघड विरोध करण्यास त्यांना धैर्य नव्हते.

बादशहा त्यांना म्हणे, तुमचे सांगणे अगदी चूकीचे आहे. कोणत्याही धर्माची निंदा न करता, कोणा परधर्मीयाला त्रास न देता आपल्या धर्मपध्दतीनुसार वागावे आणि आपले जीवन चांगले बनवावे. सर्वधर्म ग्रंथच काय! यवनधर्महि तेच सांगतो. सर्वच एकाच ईश्वराची,अल्लाची लेकरे आहेत. सर्वांच्या शरीरात जे रक्त आहे त्याचा रंग लालच आहे. शिवाय मी बादशहा आहे हे विसरु नका. मला माझ्या धर्माबरोबर राजधर्माचेहि पालन करायचे आहे. सर्व प्रजा मला मुलांप्रमाणेच आहे. त्यांच्यात भेदभाव केला तर ते अल्ला घरी पापच ठरेल. धर्म कोणताही असो, त्याचा आदर करण्याची, त्या त्या धर्माच्या लोकांची रक्षा करणे, त्यांना मान-सन्मान देणे हा राजधर्म आहे. तो मला पाळावाच लागेल. अशा तऱ्हेने सांगून बादशहा आपल्या लोकांना गप्प बसवी.

असे होता होता बादशहा वृध्दत्वाकडे झुकु लागला. दुर्दैवाने त्याच्या जांघेवर एक फोड (स्फोटक-गळू) आला. त्याने त्याला खूप वेदना होऊ लागल्या. वैद्य-हकिम, मंत्र-तंत्र, गंडे-दोरे, ताईत असे सर्व उपाय योजून झाले. कोण सांगेल त्या पध्दतीने उपचार केला गेला. मंदिरामध्ये, मशिदीत बादशहाच्या आरोग्यासाठी प्रार्थना केल्या गेल्या. पण फळ काही मिळाले नाही. वेदना अधिक वाढून जास्त त्रास होऊ लागला. अंती बादशहाने राज्यातील विद्वान ब्राह्मणांना राजवाड्यावर बोलावून घेतले आणि तुम्ही तरी एखादा उपाय सुचवावा अशी विनंती केली. ब्राह्मण म्हणाले, आम्ही तुम्हांला उपाय सांगू पण तो उघडपणे सांगता येणार नाही. तेव्हा बादशहाने आपल्या शयनगृहात सर्व ब्राह्मणांना नेऊन हुकुम सोडला, ब्राह्मण येथून बाहेर पडेपर्यंत आत कोणी येऊ नये. मग ब्राह्मणांनी बादशहास सांगितले, पूर्वजन्मी केलेल्या पापांचा हा परिणाम आहे. याला कोणताही भौतिक उपाय साध्य होणार नाही. आध्यात्मिक शक्तीद्वारेच तुमचा स्फोटक क्षणार्धांत नष्ट होईल. एखादा तपस्वी, सत्पुरुष वा साधु-संत यांची भेट घडली तर केवळ त्यांच्या कृपादृष्टीने तुमची या व्याधीतून मुक्तात होईल. तसा कोणी आढळतो का ते पहा आणि त्याला शरण जा. ब्राह्मण पुढे म्हणाले, 'पापविनाशी तीर्थ' (हे बेदरजवळील मूळ तीर्थ) म्हणून उत्तम स्थान आहे.

तेथे एकांत स्थान पाहून, मनापासून तळमळीने आपले पाप जावे म्हणून स्नान करावे. ते ब्राह्मणांचे बोलणे ऐकून बादशहास बरे वाटले. आणि तो त्वरीत सर्व लोकांना दूर सारुन पापविनाशी तीर्थावर गेला. तेथे त्याने स्नान केल्यावर एक यति (संन्यासी) दिसला. बादशहाने त्या यतिला नमस्कार करुन आपल्या मांडीवरचा फोड दाखवून हा कशाने बरा होईल असे विचारले. संन्याशाने उत्तर दिले, महान सत्पुरुषाच्या दर्शनाने तुझा हा फोड जाईल. तुला एक आख्यान सांगतो ते एकाग्र मनाने ऐक.

अवंती (उज्जैनी) नावाच्या थोर नगरात एक नतभ्रष्ट ब्राह्मण रहात होता. त्याने स्नान-संध्या इत्यादिंचा त्याग करुन भलत्याच मार्गाने जीवन जगत होता. अनेक स्त्रियांशी त्याने संबंध ठेवले होते. असा हा दुराचारी ब्राह्मण एका पिंगलानावाच्या वेश्येकडे रहात होता. तिथेच अन्न खात होता. अचानक एके दिवशी त्या पिंगला वेश्येचा घरी 'ऋषभ' नावाचा एक मोठा योगी आला. त्या योग्याला पाहून त्या भ्रष्ट ब्राह्मणाने व पिंगला वेश्येने भक्तिभावाने साष्टांग नमस्कार घातले. त्या योग्याची चांगल्या आसनावर बसवून षोडशोपचारे पूजा केली. हार फुले वाहून सुंगधी द्रव्ये अर्पण केली. त्याच्या पायाचे तीर्थ भक्तीपूर्वक प्राशन केले. नान तऱ्हेचे पक्वांन्नाचे भोजन त्याला दिले. भोजन झाल्यावर त्याला तांबूल देऊन पलंगावर त्याच्या झोपण्याची व्यवस्था केली. त्याचे पाय रगडून तो योगी झोपी गेल्यावर त्याच्याजवळच हात जोडून (केव्हा जागा होऊन काय आज्ञा देईल याची वाट पहात) उभे राहिले. अशा तऱ्हेने चार प्रहर या दोघांनी त्या तपस्वी पुरुषाची अतिशय तत्परतेने सेवा केली. दुसरे दिवशी उजाडल्यावर तो संतुष्ट झालेला योगी त्या दोघांचा निरोप घेऊन निघून गेला. कालांतराने पिंगला वेश्येच्या घरी राहूनच त्या ब्राह्मणाचे तारुण्य ओसरले, तो म्हातारा झाला आणि पुढे मरण पावला. पिंगला वेश्याहि नंतर मरण पावली. एवढ सांगून तो संन्यासी बादशहाला म्हणाला, पिंगला वेश्या पुढील जन्मी वज्रबाहू राजाची जेष्ठ राणी झाली. ती गरोदर असताना तिच्या सवतीने तिला सर्पाचे गरळ पाजले. ते तिच्या अंगातच भिनले. पण ती मेली नाही. पण तिच्या सर्वांगावर व्रण उठले. ती प्रसृत झाली, तो मुलगा म्हणजे तो भ्रष्ट ब्राह्मण पुनः जन्माला आला. त्याच्याही अंगावर व्रण उठले होते. आई आणि मुलगा दोघेही अत्यंत क्लेश भोगत होते. रात्रंदिवस आक्रोश करीत होते. राजाने देशोदेशीचे वैद्य आणून औषधोपचार केले. बरेच द्रव्य खर्ची घातले. पण गुण आला नाही. अखेर राजाने या मायलेकरांना अरण्यात सोडून दिले. त्या भयानक अरण्यातून अन्न-पाणी नसलेली ही मायलेकरे एका वैश्याच्या नगरीत पोचली. तो धार्मिक वृत्तीचा असल्याने त्याने या मायलेकरांना एका घरात राहण्याची व्यवस्था केली. कपडे दिले. खाण्याची व्यवस्था करुन दिली. एके दिवशी तो मुलगा मृत्यु पावला. सुमती राणीने मोठा आक्रोश केला. त्याचवेळी पूर्वजन्मीचे उपकार स्मरुन महाज्ञानी ऋषभ योगी तेथे येऊन पोचला आणि त्याने त्या राजस्त्रीला मदत केली.

ऋषभ योग्याने आपल्या झोळीतून भस्म काढून त्या मुलाच्या प्रेताच्या कपाळावर लावले आणि थोडे त्याच्या मुखांतहि टाकले. त्याचबरोबर त्या मुलाचा प्राण परत आला. तेव्हा सुमती राणी व मुलगा दोघांनी योग्याला भक्तिभावाने दंडवत घातले. तेव्हा योगीराजांनी आणखी भस्म त्या दोघांच्या अंगावर प्रोक्षण करताच दोघांचीही कांती सुवर्णाप्रमाणे झाली. एवढेच नव्हे तर ऋषभ योग्यांनी त्या दोघांनाहि असा वर दिला, तुम्हांला कधी म्हातारपण येणार नाही. हा मुलगा दिर्घायुषी होईल. आपल्या वडिलांपेक्षा अधिक काळ राज्य करुन मोठा कीर्तिवंत होईल.

अशी कथा सांगून यतिवर्याने बादशहाला सांगून म्हटले हे राजन सत्पुरुषाचा सहवास फलदायी असतो. तूं सत्पुरुषाची सेवा करशील तर तुझा स्फोटक लगेच बर होईल. तू चिंता करु नकोस. श्रध्दा मात्र दृढ पक्की ठेव. बादशहाने यतिला नमस्कार करुन विचारले सत्पुरुष कोठे आहेत ? ते मला सांगा. मी तेथे त्वरीत जाईन. त्यांच्या चरणदर्शनाने मी बरा होईन. यतिवर्य म्हणाले, भीमा नदीकाठावर गाणगापूर गांव आहे. तेथे परमपुरुष असा महात्मा आहे. त्यांच्यापाशी तू जा, त्यांच्या केवळ दर्शनाने तू बरा होशील ! हे ऐकून बादशहाने मनात निश्चय केला, गुरुदर्शन घेतल्याशिवाय आता राहायचे नाही असे ठरवून निघाला. आणि मजल दरमजल करीत गाणगापुरांत येऊन पोचला. तेथे येऊन लोकांना विचारु लागला, येथे एक संन्यासी रुपातील तपस्वी आहे, असे ऐकले आहे. ते संन्यासी कोठे आहेत ? सर्व लोक भयभीत झाले, आता काही खरे नाही. बादशहाच सद्गुरु कोठे आहेत म्हणून विचारतो आहे. मग काय करील आणि काय नाही ? अशा विचाराने घाबरुन कोणी बादशहास उत्तर देईना. त्यामुळे बादशहा चिडून लोकांना म्हणाला, मी त्यांना भेटायला आलो आहे, ते कोठे आहेत ते मला दाखवा. तेव्हा सर्वांनी मिळून सांगितले, आता ते भीमा-अमरजा संगमावर आहेत.मध्यान्हाच्या सुमारास ते गावांत येतात. हे ऐकून बादशहा सर्वांना दूर सारुन पालखीत बसून संगमावर जाण्यास निघाला. तेथे पोचल्यावर समोरुन श्रीगुरु येताना बादशहाने दुरुन पाहिले. आणि लगेच तो पालखीतून उतरुन पायी चालू लागला. श्रीगुरुंच्या जवळ त्यांना नमस्कार करुन हात जोडून उभा राहिला. श्रीगुरु म्हणाले, 'कां रे रजाका कोठे असतोस तू? आमचा भक्त असूनसुध्दा बऱ्याच दिवसांनी भेटतो आहेस?' हे श्रीगुरुंचे बोलणे ऐकले मात्र आणि बादशहाच्या डोक्यात प्रकाश पडला. त्याला आपला पुनर्जन्म आठवला. (आपण पुर्वजन्मी रजक होतो. सद्गुरुंनीच आपल्याला बादशहाबनविले. याची त्याला आठवण झाली.) तो श्रीगुरुंच्या पायावर लोळू लागला. त्याच्या अंगावर रोमांच उठून डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. पूर्व जन्माची आठवण होऊन तो रडू लागला. (त्याला दुःख झाले ते सद्गुरु आपल्याच राज्यात असून आपण मात्र आजपर्यंत त्यांना भेटलो नाही.) तो श्रीगुरुंना विचारु लागला, स्वामी, माझी का बरे उपेक्षा केलीत ? मला परका-परदेशी बनविलेत आणि आपल्या पायापासून दूर लोटलेत ! मी मदोन्मत्त होऊन तुमचे चरण विसरलो. तुम्ही इतके जवळ होता पण माझी बुध्दिच निकामी झाल्यामुळे मी आपणांस ओळखले नाही. आता माझा उध्दार करा, त्यासाठीच मी आलो आहे. तुमच्या चरणाची धूळ होऊन मी पाडून राहिन, आता मला जन्म पुरे झाले. बादशहाने आपले मन श्रीगुरुंकडे मोकळे केले.

श्रीगुरु बादशहास म्हणाले, तूं आमचा खरा भक्त आहेस. तुझ्या इच्छा वासना पूर्ण होतील ! तेव्हा बादशहा म्हणाला, मला एक मोठा फोड झाला आहे. त्याने मी पुष्कळ त्रासून गेलो आहे, तरी आपण कृपादृष्टीने पहावे. श्रीगुरु लागलीच म्हणाले, फोड कोठे आहे ? दाखव पाहू ? बादशहा फोड दाखविण्यासाठी पाहूं लागला तर त्याला फोडच कोठे सापडेना. जणू काही तो जागच्या जागीच जिरुन गेला ! बादशहाला आश्चर्य वाटले. त्याने श्रीगुरुंच्या चरणी मस्तक ठेवले. तो श्रीगुरुंना म्हणाला, आपण प्रसन्न होऊन मजवर कृपा केल्यामुळे मला राज्यप्राप्ती झाली, मी अष्टैश्वर्ये भोगली. मुले नातवंडे पाहिली, माझे अंतःकरण तृप्त झाले. आता माझी एकच इच्छा आहे ती अशी की माझे ऐश्वर्य आपण एकवार पहावे. 'भक्तवत्सल' हे आपले ब्रीद आहे, माझी एवढी वासना-इच्छा आपण पुरी करावी. त्यानंतर संसाराचे इंद्रियांच्या आसक्तीचे सर्व ओझे उतरुन ठेवून मी आपल्या चरणी लीन होईन.

श्रीगुरु बादशहाला म्हणाले, आम्ही तपस्वी संन्यासी, तुझ्या नगरांत अनेक पातकें-महापतके घडत असणार, नेहमी गोहत्या होणार, तेथे आम्ही येणें बरें नाही! तुझी यवनांची जाति! जीवहिंसा व पापकृत्ये त्या जातीत चालायचीच, पण तू मात्र निर्धाराने या सगळ्या गोष्टी वर्ज्य कर.

बादशहाने श्रीगुरुंचे मान्य करुन त्यांना विनंती केली, स्वामी, मी पूर्वीचा रजक! आपला सेवक-दास आहे. आपल्याच वचनामुळे मला राज्य व ऐश्वर्य प्राप्त झाले. एकच वैगुण्य राहिले ते म्हणजे ती म्लेंच्छ जातीत जन्मलो! आता माझ्या मुला-नातवंडांवर एकदां आपली दृष्टी पडूं द्या! अशी काकुळतीने विनंती करुन बादशहाने श्रीगुरुंचे पाय धरले. श्रीगुरुंनी मनी विचार केला पुढे दुर्जनांचेच राज्य होणार हे ठरलेले आहे. तेव्हा आता येथे गुप्त व्हावे. सिंह राशीला गुरु आल्याच्या निमित्ताने गोदावरीच्या तीर्थयात्रेला जावे आणि येथून (गाणगापुरातून) आता गुप्त व्हावे. असा मनात विचार करुन श्रीगुरु भीमा-अमरजा संगमावरुन निघाले. बादशहाने मोठ्या प्रेमाने त्यांना पालखीत बसविले. त्यांच्या पादुका आपल्या हातांत घेतल्या आणि त्यांच्या पालखीबरोबर आपण पायी चालू लागला. श्रीगुरु त्याला म्हणाले, घोडा वगैरे वाहनावर तू आरुढ व्हावेस. तू पायी चालू लागलास तर लोक तुझी निंदा करतील. तू राष्ट्राधिपती-बादशहा आहेस, त्यांतून म्लेंच्छ जातीचा आहेस. तू ब्राह्मणाची सेवा करतोस हे पाहून तुझ्या जातीतले लोक तुझी निंदा करतील. बादशहास वदला स्वामी मी कसला राजा! अहो मी मूळचा रजक! केवळ आपल्या कृपेने मी रजकाचा राजा झालो. सर्वांच्या दृष्टीने मी राजा आहे, हे खरे असले तरी, मी खरा आपला भक्त असलेला रजकच आहे. आपल्या पुनःर्दर्शनाने माझे मनोरथ पूर्ण झाले.

तेवढ्यात बादशहाचे सर्व सैन्य-लवाजमा-मदोन्मत्त हत्ती-रंगीबेरंगी घोडे, सैनिक तेथे येऊन पोचले. ते पाहून बादशहाला आनंद झाला. मोठ्या उत्साहाने व आनंदाने त्याने आपले ते ऐश्वर्य श्रीगुरुंना प्रेमाने दाखविले. तेव्हा श्रीगुरु बादशहास म्हणाले, तू घोड्यावर स्वार हो. तूला दूर नगराला (बेदरला) जायचे आहे. आमचे सांगणे तू मोडू नकोस. तेव्हा मग तो यवन बादशहा घोड्यावर आरुढ झाला आणि श्रीगुरुंच्या शिष्यांनाहि त्याने बसावयास घोडे दिले. श्रीगुरु त्याला म्हणाले, आम्ही तापसी संन्यासी तुझ्या बरोबर आलो तर आमची संध्येची, अनुष्ठानाची वेळ साधणार नाही. आम्ही चटकन पुढे जातो आणि तुम्ही सावकाशीने मागून या. तुझी आणि आमची भेट बेदरला पापविनाशी तीर्थापाशी होईल. असे म्हणून श्रीगुरु लगेचच सर्व शिष्यांसह अदृश्य झाले आणि बेदरला येऊन पोचले. तेथे सायंदेव साखरे यांचा पुत्र नागनाथ होता. त्याने श्रीगुरुंना आपल्या घरी नेऊन ओवाळले. तोवर सायंकाळ झाली. श्रीगुरु नागनाथास म्हणाले, आम्ही म्लेंच्छ राजास पापविनाशी तीर्थावर भेटण्यास सांगितले आहे. तेथेच तुला भेटू. आम्ही येथे राहिलो तर ब्राह्मणांच्या घरात म्लेंच्छ येऊन सर्वांनाच उपद्रव होईल. असे नागनाथास सांगून श्रीगुरु पापविनाशी तीर्थावर जाऊन शुभासनावर अनुष्ठान करीत बसले.

इकडे बादशहा, श्रीगुरु एवढ्या सैन्यांमधून एकदम अदृश्य झाल्यामुळे चिंतेत पडला. असे अचानक काय बरें झाले, माझ्या हातून काय चूक झालेली श्रीगुरुंना दिसली, म्हणून ते असे अचानक निघून गेले ? मग पुनः त्याच्या मनात विचार आला, आपण पुढे जात आहोत आणि पापविनाशी तीर्थावर पुनः भेट होईल असे श्रीगुरुंनी मला सांगितले आहे. त्यांचा महिमा कोणालाहि कळत नाही. आपले दैव चांगले होते म्हणून श्रीगुरुंचे चरणदर्शन झाले.

आणि त्यासाठीच खरे तर आपण आलो होतो. पण श्रीगुरु पुढे गेले हे निश्चित! असा विचार करुन बादशहा एका चांगल्या दमदार घोड्यावर स्वार होऊन शीघ्र बेदरच्या दिशेने निघाला. चव्वेचाळीस कोस म्हणजे सुमारे ८८-९० मैल (सुमारे १४४ किलोमीटर) अंतर बादशहाने घोड्यावरुन जाऊन एका दिवसांत कापले आणि तो पापविनाशी तीर्थावर येऊन पोचला. पाहतो तर श्रीगुरु आधीच तेथे येऊन बसलेले दिसले. त्याने श्रीगुरुंच्या चरणांना वंदन करुन भक्तिभावाने विनंती केली, 'आपण माझ्या घरी (राजवाड्यात) यावे.' सगळे नगर पोवळी-मोत्यांच्या तोरणांनी सजवले गेले. गुढ्या-ध्वज उभारले गेले. श्रीगुरुंना पालखीत बसवून, बादशहा स्वतः पायी चालत निघाला. त्याने सद्‌गुरुंवरुन नवरत्ने ओवाळून टाकली. नगरवासीयांनी आरत्या आणून सद्‌गुरुंना ओवाळले. अशा मोठ्या समारंभाने बादशहाने श्रीगुरुंना राजवाड्यात घेऊन गेला. सर्व लोकांना मोठा आश्चर्याचा धक्का बसला. हे एक महदाश्चर्यच असल्याचे सगळेजण बोलू लागले. म्लेंच्छ म्हणू लागले, म्लेंच्छ जातीचे लोकही आता ब्राह्मणांची पूजा करु लागले. आपला बादशहा अनाचारी आहे, त्यानेच यवनांचा जातिधर्म सोडला! काम म्हणावे या नतद्रष्टाला! ज्यांचे मुखसुध्दा पाहू नये अशाची मोठ्या आनंदाने हा बादशहा सेवा करतो आहे.

या उलट ब्राह्मणांना मोठा संतोष झाला. राजाच ब्राह्मणांची सेवा करणारा झाला, आता सर्व राज्याचेच भले होईल. असा राजा असणेंच चांगले. असे ब्राह्मणलोक म्हणू लागले. बादशहा पायी चालतो आहे, ही आश्चर्यकारक घटना पाहण्यासाठी सारे नगरवासी आपापल्या घरांतून बाहेर आले आणि बादशहाला प्रेमाने वंदन करु लागले. काहीजण म्हणू लागले हे (श्रीनृसिंहसरस्वती) देव असले पाहिजेत आणि म्हणूनच यवनांचा राजासुध्दा त्यांना भजतो आहे. कलियुगांत हे फार मोठे आश्चर्यच होय!

बादशहाने श्रीगुरुंना दरबारात नेऊन उच्च सिंहासनावर बसविले. सर्व लोक बाहेर थांबले. श्रीगुरु एकटेच आपल्या चार शिष्यांना घेऊन आंतमध्ये गेले. तेथे अंत:पुरातल्या कुलस्त्रियांनी, बादशहाच्या पुत्र-पौत्रांनी, भाऊबंदांनी श्रीगुरुंचे दर्शन घेऊन त्यांना साष्टांग नमस्कार घातले. बादशहाने श्रीगुरुंचे पाय धरुन म्हटले, आम्हां सर्वांवर कृपादृष्टी असावी. माझ्या सर्व मंडळींना आपल्या पवित्र चरणांचे दर्शन मिळाले. श्रीगुरु संतुष्ट झाले. त्यांनी सर्वांना आशिर्वाद दिले. त्यांनी त्याच्या घरांतील सर्वांची चौकशी करुन त्याला विचारले, 'तुझे मन संतुष्ट झाले का? अजून कांही तुझी इच्छा शिल्लक आहे का? असेल तर सगळे मोकळेपणाने सांग.' तेव्हा बादशहा श्रीगुरुंना म्हणाला, 'पुष्कळ दिवस राज्य भोगले आणि आपल्या चरणांना अंतरलो. आता आपल्या चरणांची सेवा करण्याचे भाग्य मला मिळावे. तसी संधी मला द्यावी.' तेव्हा श्रीगुरु म्हणाले, 'आता तुझी माझी भेट श्रीपर्वतावर होईल. आता तुझे पुत्र-पौत्र राज्य करतील. तू श्रीशैल्यपर्वतावर आम्हांला भेटायलाये.' असे बादशहाला सांगून श्रीगुरु तेथून निघाले. तेव्हा बादशहाने 'मला ज्ञान असावे' अशी प्रार्थना केली. कृपाळू श्रीगुरुनी 'ज्ञान होईल' असे म्हणून श्रीगुरु तेथून गोदावरीच्या यात्रेला गेले. गोदावरीमध्ये स्नान करुन मग गाणगापुरास परत आले. तेव्हा श्रीगुरुंना पाहून सर्वांना आनंद झाला. सारे त्यांना वंदन करु लागले. मनोभावे श्रीगुरुंची आरती केली. श्रीगुरुंनी सर्व शिष्यांना बोलावून सांगितले, प्रकट रुपाने झाली एवढी प्रसिध्दि पुरे, आतां आम्ही गौप्य रहावे हे बरे! उघडपणे बोलायचे तर आम्ही श्रीपर्वतावर चाललो आहोत. पण खरे बोलायचे तर आम्ही गुप्तरुपाने गाणगापुरातच राहू! आता कठीण दिवस येणार आहेत. नवीन युगात सर्वत्र यवनांचे राज्य होऊन सगळीकडे क्रूरकर्मे घडणार आहेत. यवन बादशहाच

येथे येऊन गेला म्हटल्यावर इतर यवनहि येथे येतील आणि अधर्म घडेल! तेव्हा आता गुप्त राहाणे बरे! केवळ लौकिकार्थाने श्रीगुरु श्रीशैल्य पर्वतावर गेले.

ही कथा साधकाच्या वा साधनेच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे. श्रीपादगुरुंनी ज्या रजकाला पुढील जन्मी राजा होशील असा वर दिला होता, तो रजक यवन राजा म्हणून जन्म घेता झाला. त्याच्या मांडीवरील फोड उठल्यानंतर कोणत्याही औषधांचा परिणाम झाला नाही व ब्राह्मणांच्या सल्ल्यानुसार बादशहा गाणगापुरास भीमा-अमरजा संगमावर श्रीगुरुंकडे आल्यानंतर त्यांनी 'रजका' म्हणून हांक मारल्याबरोबर तो म्लेंच्छ ज्ञानी होऊन त्याला आपला पूर्वजन्म आठवला. हा अर्थातच बादशहाच्या जीवनांतील 'परिवर्तन बिंदू' आहे. आणि त्यानंतर श्रीगुरुंबरोबरचा त्याचा प्रवास म्हणजे बादशहाची 'आत्मनिवेदन भक्ति' आहे.

दुसरे म्हणजे बादशहाच्या जीवनातील आणखी दोन पैलू समोर येतात. एक भाग आहे तो बादशहाच्या मांडीवर फोड उठण्यापूर्वीचा आणि दुसरा फोड उठल्यानंतरचा आहे. फोड उठण्यापूर्वीसुध्दा धर्मांच्या बाबतीत बादशहाचा दृष्टीकोण सहिष्णू व समजूतदारपणाचा होता. यवन मुल्ला-मौलवी त्याला हिंदू धर्माचा द्वेष करण्याचा सल्ला देत, ब्राह्मणांची निंदा करण्यास, त्यांना मूर्ख ठरविण्याच्या प्रयत्न करीत. पण बादशहा त्यांच्या आहारी न जाता त्यांना गप्प बसवित असे. देव-ब्राह्मणांना चांगली वागणूक देऊन त्यांना मदत, दानधर्महि करीत असे. याचे कारण काय? त्याचे उत्तर आपल्याला असे मिळते की बादशहावर पूर्वजन्माचे हिंदूधर्माचे संस्कार होते. पूर्वजन्मात तो सश्रध्द हिंदू होता आणि श्रीपादगुरुंची सेवा त्याच्याकडून घडली होती.

जेव्हा श्रीपादगुरुंनी त्याला तू पुढील जन्मात राजा होशील असा आशिर्वाद दिला होता तेव्हाच आपणास सद्‌गुरुंनी उपेक्षू नये व ज्ञान द्यावे असे मागणे त्याने मागून घेतले होते. येथे ज्ञान याचा अर्थ होतो 'पूर्वजन्मीचे ज्ञान'. ते त्याला श्रीगुरुंची भीमा-अमरजा संगमावर भेट झाली आणि तो जवळ आल्यावर श्रीगुरुंनी त्याला 'रजका' म्हणून हाक मारली तेव्हा झाले. नाहीतर त्या यवन असलेल्या राजाला हिंदूधर्माविषयी इतके सहिष्णू विचार,आदर व प्रेम हे केवळ असंभवनीयच होते.

दुसरा भाग आहे तो, मांडीवर फोड उठल्यावर आणि तो अनंत औषधोपचाराने बरा होत नाही म्हटल्यावर बादशहाने पुनः विद्वान ब्राह्मणांशीच एकांतात सल्ला मसलत केली. शिवाय त्यांच्या सल्ल्यानेच बादशहाने पापविनाशी तीर्थावर जाऊन आपल्याला बरे वाटावे म्हणून स्नान करुन बाहेर आल्यावर त्याला तेथे एक संन्यासी भेटला. त्याच्याशी बादशहाने चर्चा केली. त्या संन्याशाने सुध्दा 'सत्पुरुषाची कृपा' हाच उपाय सांगितला. त्यावेळी बादशहाने याबद्दलचा पूर्वीचा दाखला उदाहरण सांगा असे म्हटले. याबद्दल सत्पुरुषाच्या कृपेने कोणाची व्याधी यापूर्वी दूर झाली ते सांगा.

तेव्हा संन्याशाने बादशहाला विश्वास वाटावा म्हणून पिंगला वेश्या, आचारभ्रष्ट ब्राह्मण व ऋषभ योगी यांची कथा सांगितली. आचारभ्रष्ट ब्राह्मण व पिंगला वेश्या यांच्यावर महायोगी ऋषभ यांनी केलेल्या 'विशेष अनुग्रहाची' कथा असून विशेष अनुग्रह जन्मांतरी केलेला आहे, हे कळून येते. या दोघांनीहि ऋषभ योग्याची मनोभावे सेवा केली. जर त्यांचा भाव शुध्द प्रेमाचा आदरपूर्वक अतिथ्याचा नसता तर ऋषभ तेथे क्षणभरहि थांबले नसते. ऋषभांचे त्यांच्या

घरी येणे, आतिथ्य स्वीकारुन रात्रभर तेथे मुक्काम करणे व दुसऱ्या दिवशी सकाळी उठून निघून जाणे या साऱ्या गोष्टी अगदी सहज घडल्या होत्या. बरे ऋषभ योगी निघून जाताना त्यांनी पिंगला व आचारभ्रष्ट ब्राह्मणाला काही वर, आशिर्वादहि दिला नव्हता. पुढेही दोघे मरण पावली. यात काही जगावेगळे असे काही नाही. परंतु त्या दोघांना एकमेकांबद्दलची खरी ओढ होती आणि म्हणून ते पुढील जन्मी 'मायलेक' म्हणून जन्माला आली. तेहि राजकुलांत. याचे कारण त्यांच्यात विषयोपभोग यांखेरीज चांगुलपणा, उच्चभाव, एकनिष्ठा, शुध्द प्रेम इत्यादी भाव होते.

श्रीगुरुंकडून ही कथा ऐकल्यावर बादशहाने साहजिकच असे सत्पुरुष कोठे आहेत, असा प्रश्न विचारला आणि संन्याशाच्या सांगण्याप्रमाणे बादशहा भीमा-अमरजा संगमावर जाताच त्याला श्रीगुरुंची भेट झाली. आणि केवळ रजका या शब्दाबरोबर त्याला मागील जन्म आठवला. हा तो महान विभूतींनी केलेला विशेषानुग्रह होय. बरे श्रीगुरुंनी फोड कोठे तो दाखव म्हटल्यावर बादशहाला आपल्या जांघेवर फोड सापडेना. आश्चर्य वाटणे हे साहजिकच! ज्या फोडाला इतके वर्षे हैराण केले तो क्षणार्धात गायब झाला. तेव्हा बादशहा श्रीगुरुंना म्हणाला, हे स्वामी हा फोड जणू काही तुमचा सेवक असावा असे मला वाटते. मी अपराधी म्हणून मला दंड करण्यासाठी त्याने येथे आणून सोडले आणि आपले काम संपले म्हणून तो दुसरीकडे निघून गेलेला दिसतो.

त्यानंतर बादशहाने श्रीगुरुंना आपल्या राजवाड्यात नेऊन त्यांची उत्तम प्रकारे पूजा-अर्चा केली. सर्व कुटुंबियांना त्यांच्या पायी घातले. बादशहाच्या इच्छेप्रमाणे श्रीगुरुंनी त्याचे सगळे ऐश्वर्य अतिशय प्रेमाने पाहिले, त्याचा आदर सत्कार स्विकारला आणि शेवटी निघताना त्याला अजून काही इच्छा शिल्लक आहे का? सगळे मोकळेपणाने सांग! असे विचारताच तो (ज्ञानी) बादशहा म्हणाला, ऐश्वर्य खूप भोगले पण माझे समाधान झालेले नाही. केवळ आपल्या चरणाजवळ फार श्रेष्ठ असे साम्राज्य आहे, त्या दुष्प्राप्य अशा साम्राज्याची मला अपेक्षा आहे. आजच मी माझे सर्व कांही हा देहसुध्दा आपणांस समर्पित करतो,

अशा तऱ्हेने बादशहाने संकल्पपूर्वक 'आत्मनिवेदन' सद्‌गुरु चरणी अर्पण केले. त्याच्या या समर्पित भावावर श्रीगुरु संतुष्ट झाले आणि त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे देण्याचे आश्वासन देऊन श्रीशैल्य पर्वतावर भेटीला येण्याचे सांगितले.

नवविधा भक्तित 'आत्मनिवेदन' ही एक अत्यंत श्रेष्ठ अशी अवस्था मानली जाते. ती नवविधा भक्तीचा कळस आहे. बादशहाने आत्मनिवेदन भक्तीपर्यंत मजल मारुन त्याने जीवनाचे सार्थक केले.

तमोवृत्तीने विषयोपभोग भोगण्याची इच्छा असलेल्या आपल्या रजक भक्ताला यवन राजाचा जन्म श्रीगुरुंनी दिला होता. त्याचा भोग संपत आल्यावर त्याला आपल्याकडे आणण्यासाठी त्याच्या मांडीवर फोड येऊन तो कशानेही बरा होणार नाही अशी व्यवस्थाहि श्रीगुरुंनीच केली होती. हे जे सद्‌गुरु आणि भक्त (बादशहा) यांच्यामधील देणे-घेणे आहे ते फक्त आणि फक्त 'भक्तीचे वैभव' आहे. बादशहा सद्‌गुरुंचा 'भक्त' होता आणि सद्‌गुरु 'भक्तवत्सल' होते. यांत काही राजकीय खेळी नव्हती वा कोणती मुसद्देगिरी नव्हती. होते ते केवळ 'गुरुशिष्यांचे भक्ति प्रेम' होय.

## श्रीनृसिंहसरस्वती सद्गुरु निजानंदगमन.

बेदरच्या बादशहाची भेट घेऊन (त्याच्या राजवाड्यात जाऊन) श्रीगुरु गाणगापुरास परत आले. आणि आता येथे गुप्त व्हावे असा बेत त्यांनी केला. प्रसिध्दी पुष्कळच झाली होती. शिवाय बादशहाच भेटायला आला होता. तेव्हा इतर म्लेंच्छहि मनात तसेच भाव ठेवून येतील, त्याचबरोबर नाना तऱ्हेचे नाना जातीचे लोक गाणगापुरात येऊ लागतील, तेव्हा आपण गुप्त व्हावे असे ठरवून लौकिक दृष्टीने श्रीशैल्याच्या यात्रेच्या निमित्ताने सहज म्हणून शिष्यांसह श्रीगुरु निघाले.

सर्व भक्त-शिष्यांना वाईट वाटले. ते सद्गुरुंच्या पाया पडून विनवनी करु लागले, आपण भक्तजणांची कामधेनू आहात, आमचे आश्रयस्थान आहात, आम्हां बालकांना सोडून जाऊ नका. लहान बालकाला सोडून-झिडकारुन आई कधी जाते काय ? तुम्ही तर आमचे माता-पिता आहात. आमचा अव्हेर करु नका.

तेव्हा श्रीगुरुंनी त्या सर्वांची समजूत काढून म्हणाले, 'तुम्ही चिंता करु नका. आम्ही या गावीच असणार आहोत. नित्य अमरजा संगमावर स्नानास जाणार आहोत. पण गुप्तरुपाने ! जे आमच्या प्रेमांतले भक्त आहेत त्यांना आम्ही प्रत्यक्षच दिसू; अज्ञानी लोकांच्या दृष्टीने मात्र आम्ही श्रीशैल्य यात्रेला जात आहोत. प्रातःस्नान कृष्णा-पंचगंगा संगमावर करुन, अनुष्ठान तेथेच करुन, मध्यान्ही आम्ही भीमातटावर येऊन संगमावर स्नान करुन पूजा घेण्यासाठी मठात येऊ. तरी तुम्ही चिंता करु नका. आमच्या बोलण्याचा अनमान (अविश्वास) करु नका.

आम्ही रात्रंदिवस गाणगापुरी असणारच आहोत. हे त्रिवार सत्य, हे लक्षात घ्यावे. जेथे आमचे स्थान आहे त्याठिकाणी 'निगुण पादुका' आम्ही ठेवित आहोत. त्यांची मनोभावे पूजा करीत जावे. विनायकाची पूजा करुन अष्टतीर्थांची मनोभावे यात्रा करावी. मठात त्रिकाळ आरती करावी, त्यामुळे आम्हाला संतोष होत राहिल.'

असे सर्व लोकांना समजावून श्रीगुरु श्रीशैल्ययात्रेस (पर्वतावर) जावयास निगाले. त्यानंतर भक्तमंडळी तेथून मागे फिरुन मठांत परत आली, तेव्हा तेथे त्यांना श्रीगुरुनाथ येथेच आहेत असे दिसले. असा भक्तांना दृष्टान्त दाखवून श्रीगुरु श्रीपर्वतापाशी आले आणि पाताळगंगेपाशी थांबले.

त्यांनी शिष्यांना फुलांचे आसन बनविण्यास सांगितले. त्या आसनावर बसून 'आम्हांला पलिकडे मल्लिकार्जूनाशी एकरुप होण्यासाठी जायचे आहे,' असे ते शिष्यांना म्हणाले. श्रीगुरुंच्या आज्ञेप्रमाणे शिष्यांनी शेवंतीची फुले आणली. कमळ, कल्हार, मालती ही फुले कर्दळीच्या (केळीच्या) पानांत गुंडाळून एक विचित्र असे आसन बनविले. व ते गंगेच्या पवित्र पाण्यांत अंथरले.

श्रीगुरुंनी शिष्यांना, तुम्ही गावांत परत जा असे सांगताच ते शिष्य दुःख करु लागले, तेव्हा श्रीगुरुंनी पुनः सांगितले, जवळच गाणगापुर गावी आम्ही असणार आहोत, याबद्दल तुम्ही संशय बाळगु नका. लौकिकदृष्ट्या आम्ही जात आहोत असे दिसत असले तरी भक्तजणांच्या घरी आम्ही असतो हे निश्चितच समजा. असे म्हणून श्रीगुरु उठले आणि फुलांच्या आसनावर बसून त्यांनी भक्तांना निरोप दिला.

त्यावेळी गुरु कन्या राशीत असल्याने 'कन्यागत' काळ होता. शालिवाहन शकाचे 'बहुधान्य' नावाचे संवत्सर चालू होते. सूर्य कुंभ राशीत होता आणि 'उत्तरायण' चालू होते. माघ महिना शिशिर ऋतु, वद्य पक्षातील प्रतिपदा तिथी व शुक्रवार असा योग होता.

त्या दिवशी श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरु निजधामास गेले, निजानंदी स्थिर झाले. त्यांनी जाताना सांगून ठेवले होते, आम्ही निजधामाला पोचल्याची खूण म्हणून शेवंतीची फुले येतील ती प्रसादपुष्पे म्हणून तुम्ही घ्यावीत. त्या पुष्परुपाने सद्‌गुरुंची अखंड पूजा करावी. म्हणजे लक्ष्मीचा वास तुमच्या घरी नेहमी राहिल.

आणखी एक खूण तुम्हांला सांगतो ती अशी, मला गायन फार प्रिय आहे. त्यामुळे जे गायनामध्ये माझे स्मरण करतील त्यांच्या घरी मी असतो, हे तुम्ही लक्षात ठेवा. त्यांच्या घरात व्याधी राहणार नाहीत, दारिद्र्य राहणार नाही, ते शतायुषी होतील आणि त्यांचे पुत्र-पौत्र समृध्द राहतील.

जे लोक माझे चरित्र ऐकतील अथवा निरंतर वाचतील त्यांच्या घरी लक्ष्मीचा वास राहिल यांत संशय बाळगू नका.

असे सर्व शिष्यांना सांगून श्रीगुरु अदृश्य झाले. सारे शिष्य चिंतातुर होऊन गंगेमध्ये पाहू लागले.

त्याचवेळी काही नावेकरी तेथे आले आणि म्हणाले, आम्ही गंगेच्या पैलतीरावर होतो, तेथे आम्ही मुनीश्वर श्रीसद्‌गुरुंना पाहिले. त्यांनी संन्यासी वेष धारण केलेला होता. हातात दंड होता, त्यांचे नांव 'नृसिंहसरस्वती' असे होते.

तुम्हांला सांगण्यासाठी त्यांनी आम्हांला निरोप दिला की, आम्ही कर्दळीवनात जात आहोत, पण तरीहि गाणगापुरात आमचा वास राहिल. तरी तुम्ही शोक सोडून गाणगापुरास जावे.

श्रीसद्‌गुरुंना जाताना आम्ही पाहिले तेव्हा त्याच्या पायात 'सुवर्णपादुका' होत्या. तुम्हांला श्रीसद्‌गुरुंचा निरोप आहे की तुम्ही सर्वांनी आपापल्या स्थानी जावे आणि पिढ्यानपिढ्या माझी (श्रीगुरुंची) भक्ती करुन सुखी व्हावे. प्रसाद पुष्पे येतील तेव्हा शिष्यांनी ती काढून घ्यावीत असे आम्हांला सांगून श्रीसद्‌गुरु गेले, असे नावेकरी म्हणाले.

तेवढ्यात तेथे प्रसादपुष्पे आली ती तेथे असलेल्या सायंदेव साखरे, नंदीनामा, नरहरि आणि सिध्दमुनी या चार शिष्यांनी काढून घेतली व ते चौघे शिष्य परत आले.

अशा तऱ्हेने दत्तप्रभूंचे दुसरे अवतार श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरु आपला कार्यभाग आटोपून कर्दळीवनात दीर्घ तपश्चर्येकरीता निघून गेले. लौकिकदृष्ट्या! पण भक्तांना आजहि गाणगापुरात श्रीगुरुंचे अस्तित्व जाणवतेच!

त्या उत्कट भक्तिभावानेच भक्त गाणगापुर क्षेत्री त्यांच्या दर्शनासाठी धाव (यात्रा करतात) घेतात!

## इतिहासकालीन सत्य :

श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती हे दत्तगुरुंचे दोन महान अवतार झाले तो कालखंड होता मुसलमानी राजवटीचा. श्रीपादगुरुंचा काळ (म्हणजे इ.स. १३२० ते १३५०) अर्थात चौदाव्या शतकाचा पूर्वाध होय! यादवांच्या अपकर्षाचा व यवनी आक्रमणांच्या चढत्या कमानीचा काळ होता. श्रीपादगुरुंच्या काळात बहामनी राज्य स्थिर झाले होते. पुढे श्रीनृसिंहसरस्वतींचा काळ म्हणजे इ.स. १३७८ ते १४५८ असा होतो. म्हणजे चौदाव्या शतकाची शेवटची दोन दशके आणि पंधराव्या शतकाचा सर्व पूर्वाध व पुढचे दशक असा होतो. श्रीनृसिंहगुरुंच्या कालखंडात सहा बहामनी सुलतानांच्या कारकीर्दि होऊन गेल्या. त्यातील पहिले जे चार सुलतान आहेत ते अशा तऱ्हेने;

पहिला सुलतान - महंमूद याने १९ वर्षे राज्य केले.

दुसरा सुलतान - ग्यासुद्दीन व तिसरा श्यासुद्दीन हे फार कमी वेळ राज्य करु शकले.

चौथा सुलतान - फेरोजशहा याने २५ वर्षे राज्य भोगले.

या सर्वांची राजधानी गुलबर्ग्यास होती.

पांचवा सुलतान - अहंमदशहा (पहिला) करकिर्द १३ वर्षांची होती. यानेच राजधानी गुलबर्ग्याहून बेदर येथे नेली.

सहावा सुलतान - अल्लाऊद्दीन (दुसरा) याने २३ वर्षे राज्यभोग घेतला. याच्याच पायाला फोड झालेला होता, याची इतिहाात नोंद आहे. हाच बादशहा गेल्या जन्मातील रजक होय.

मागे सायंदेवाची कथा आली आहे त्याला श्रीगुरुंनी यवन बादशहाच्या भयापासून वाचविले. तो बादशहा म्हणजे बहामनीचा पाचवा सुलतान अहंमदशहा (पहिला) हा होय. याचीही नोंद इतिहासात केलेली आहे.

अहंमदशहा मोठा क्रूर, ब्रह्मद्वेषी व कपटी होता. त्याच्या कालखंडात विशेषतः गोदावरी व कृष्णा यांच्या मधल्या गावांत सूफींचा धर्मप्रचार चालला होता. त्यावेळी श्रीनृसिंहगुरु कृष्णा-पंचगंगा संगमावर होते. नंतर ते गाणगापुरला आले. गाणगापुर हे गुलबर्ग्यापासून जवळच आहे. अहंमदशहाने इ.स. १४३२ मध्ये राजधानी गुलबर्ग्याहून बेदरला नेली. श्रीनृसिंहगुरु गाणगापुरला आल्यानंतर एका वर्षानंतर अहंमदशहा मरण पावला व त्याचा मुलगा अल्लाउद्दीन (दुसरा) हा राजा बनला. हा सहिष्णु, उदार, हिंदूच्या धर्मकल्पना व देवता यांचा आदर बाळगणारा होता. स्फोटकाच्या निमित्ताने तो श्रीगुरुंजवळ येऊन पोचला आणि श्रीनृसिंहगुरुंनी त्याचा उध्दार केला.

श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंनी त्याकाळातल्या समाजातील लोकांना यवनी राजवटींपासून भयमुक्त केले. विविध उपाय योजना केल्या;

१) श्रीनृसिंहगुरुंनी संन्यासाश्रमाचा उध्दार केला.

२) वेद अध्ययनाला (वेदाभ्यासाला) प्रोत्साहन दिले.

३) गुरुंचे महत्व प्रस्थापित केले.

४) ब्राह्मण समाजाला आचारनिष्ठ बनवून समाजाभिमुख बनण्यास शिकविले.

५) सर्व सामान्य लोकांना भक्ति शिकविली.

६) अध्यात्माची व धर्माची तत्वे स्थानिक प्राकृत भाषांमध्ये प्रसारित केली.

७) निर्गुणाची उपासना लोकांना समजावून देऊन त्यांना तत्वनिष्ठे शिकविली.

श्रीगुरुंचे अनेक श्रेष्ठ संन्यासी शिष्य होते. त्यांना त्यांनी देशाच्या निरनिराळ्या भागांमध्ये संचार करीत राहून बहुधान्य संवत्सरात सर्वांनी श्रीशैल्याला यावे अशी व्यवस्था लावून दिली होती. इ.स. १४१८ पासून १४५८ पर्यंत म्हणजे चाळीस वर्षे हे सारे संन्यासी सर्व भारतभर निरपेक्षपणे सर्व सामान्य जनतेला स्थानिक प्राकृत भाषेत मार्गदर्शन करीत होते.

वास्तविक श्रीनृसिंहगुरुंचे एकापेक्षा एक श्रेष्ठ असे अनेक थोर शिष्य होते. त्यापैकी कोणालाही त्यांनी वारस म्हणून, गादी अथवा पीठ स्थापन करुन त्या पीठावर बसविले नाही. त्यांनी आपल्या 'मनोहर पादुका' नृसिंहवाडीत आणि 'निर्गुण पादुका' गाणगापुर येथे ठेवून दोन्ही क्षेत्राचे महत्व वाढविले.

ही दोन्ही क्षेत्रे आजहि श्रीदत्तसंप्रदायाची अत्यंत महत्वाची क्षेत्रे म्हणून जगभर नावलौकिक पावली आहेत. आपल्या इच्छा, आकांक्षा, मनोकामना पूर्ण होण्यासाठी भक्तगण या क्षेत्री जातात त्या पूर्ण होतात.

त्याचप्रमाणे उपासना करण्यासाठी जाणाऱ्या भक्तांच्या स्वप्नांत दृष्टान्त, आदेश वा दर्शन मार्गदर्शन अद्यापहि मिळते असा आजवरचा अनुभव आहे.

औदुंबर हे क्षेत्रहि श्रीनृसिंहगुरुंच्या प्रभावानेच झाले असल्याने त्या स्थानाचा महिमाहि अगाध आहे. आपली 'अदृश्य कारकशक्ती' श्रीगुरुंनी वाडी, औदुंबर व गाणगापुर क्षेत्रांत ठेवलेली आहे.

श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंनी जेथे पूर्वी केवळ जंगल होते अशा ठिकाणी स्वतःच्या वास्तव्यामुळे नवी प्रभावी अशी क्षेत्रें निर्माण केली.

केवळ पुराणांतच आढळणारी दत्तभक्ति पुनः प्रकट करुन इतर सर्व संप्रदायांना 'गुरु' रुपाने मार्गदर्शक ठरेल असा सर्व समावेशक 'दत्तसंप्रदाय' महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या देशभागांत स्थापन करुन वाढविला.

## श्रीनृसिंहसरस्वती सद्‍गुरुंचा जीवनपटः

| जीवन पट | शके | इसवी सन |
|---|---|---|
| जन्म | १३०० | १३७८ |
| मौजीबंधन | १३०७ | १३८५ |
| गृहत्याग (घरातून बाहेर पडले) | १३०८ | १३८६ |
| संन्यासग्रहण | १३१० | १३८८ |
| पुनरागमन (आपल्य घरी आले) | १३३८ | १४१६ |
| गौतमी तटाक यात्रा | १३४० | १४१८ |
| परळी वैजनाथ वास्तव्य | १३४२ | १४२० |
| औदुंबरी क्षेत्री निवास | १३४३ | १४२१ |
| कृष्णा-पंचगंगा संगमावर वास्तव्य | १३४४-५६ | १४२२-१४३४ |
| भिमा-अमरजा संगमावर निवास | १३५७-८० | १४३५-१४५८ |
| श्रीशैल्य पर्वताकडे निजानंदगमन | १३८० | १४५८ |

श्रीगुरुंची गुरुपरंपरा - यातहि काही ग्रंथकारांचे मतभेद आहेत. तूर्तास श्रीगुरुचरित्रानुसार जी गुरुपरंपरा मांडली आहे त्यानुसार उल्लेख केलेला आहे.

शंकर-विष्णू-ब्रह्मा-वशिष्ठ-पराशर-व्यास-शुक-गौडपादाचार्य-गोविंदाचार्य-शंकराचार्य-विश्वरुपाचार्य-ज्ञानबोधगिरी-सिंहगिरी-ईश्वरतीर्थ-नृसिंहतीर्थ-देवतीर्थ-विद्यातीर्थ-शिवतीर्थ-भारतीतीर्थ-विद्यारण्य-मळीयानंद-देवतीर्थसरस्वती-यादवेंद्रसरस्वती-कृष्णसरस्वती-नृसिंहसरस्वती.

या गुरुपरंपरेतील विद्यारण्य यांचे नांव समाविष्ट आहे. त्यांचा काळ आहे तो इ.स. १२९५ ते १३८६ असा. शृंगेरी पीठावर ते जीवनाच्या अखेरीस सहा-सात वर्षे होते. अर्थात श्रीनृसिंह सरस्वतींच्या जन्माच्या सुमारास ‘विद्यारण्य’ शृंगेरी पीठाचे शंकराचार्य बनले होते. त्यांच्याच पुढील परंपरेत श्रीनृसिंहसरस्वती आपल्या परात्पर गुरुंची जीवनप्रेरणा तेवत ठेवण्यासाठी उदयास आले होते. म्हणजेच एकाचा अस्त व दुसऱ्याचा उदय झाला होता. आपल्या या परात्पर गुरुंच्या संगीत प्रियेतेचा वारसाहि श्रीनृसिंहसरस्वतींनी जपला होता.

गुरुपरंपरेत काही वेळा शंका घेतली जाते. येथेही विद्यारण्य यांच्या नंतर मळियानंद सरस्वती, देवतीर्थ सरस्वती, यादवेंद्र सरस्वती आणि कृष्ण सरस्वती अशी चार नावे येतात. मग हे कसे शक्य आहे ? त्यांचीहि आध्यात्मिक परंपरा असेलहि. परंतु त्या संदर्भात विशेष अशी माहिती उपलब्ध नाही. परंतु विद्यारण्य यांचा पारमार्थिक परंपरेचा ठसा श्रीनृसिंहसरस्वतींवर उमटलेला होता, हे सर्वमान्य आहे. गुरुपरंपरेतील पिढ्यांचा विचार वंशपरंपरेतील पिढ्यांप्रमाणे करुन चालत नाही.

कृष्णसरस्वती हे वयोवृध्द, बहुकाळचे संन्याशी अशी बिरुदावली त्यांना होती. त्यावेळी नरसिंह सरस्वती केवळ दहा वर्षांचे होते आणि त्याच कोवळ्या वयात नरसिंह सरस्वतींनी प्रयागच्या परिसरात सात जणांना संन्यास दीक्षा दिल्याची साक्ष श्रीगुरुचरित्रात मिळते. अर्थ असा दीक्षा देणारा कोवळा मुलगा असू शकतो आणि दीक्षाग्रहण करणारा वयोवृध्दहि असू शकतो. श्रीज्ञानेश्वरांच्या शिष्य परंपरेतील त्यांना पित्याच्या जागी शोभतील अशी वयोवृध्द शिष्य मंडळी होती. इतकेच काय! पण चौदाशे वर्षे जगलेला चांगदेवही कोवळ्या मुक्ताईंचा शिष्य झाला होता. त्याचप्रमाणे सायंदेव, नागनाथ हे पितापुत्र एकाच काळात श्रीनृसिंहसरस्वती सद्‌गुरुंचे शिष्य होते.

कालामानाप्रमाणे विद्यारण्यांच्या कार्याचा आणि कर्तुत्वाचा वाटा श्रीनृसंहिसरस्वती सद्‌गुरुंनींच सांभाळला, असे पूर्वकालिन इतिहासच सांगतो.

## करुणा त्रिपदी

श्रीगुरुदत्ता जय भगवंता । तें मन निष्ठुर न करी आतां ।।धृ।।

चोरें द्विजासी मारीतां मन जें । कळकळले ते कळकळो आतां ।। श्रीगुरु दत्ता ।। १।।

पोटशूळाने द्विज तडफडतां । कळकळले ते कळकळो आतां ।। श्रीगुरु दत्ता ।। २।।

द्विजसुत मरता वळलें तें मन । हो कीं उदासीन न वळे आतां ।। श्रीगुरु दत्ता ।। ३।।

सतिपती मरता काकुळति येतां । वळले ते मन न वळे कीं आतां ।। श्रीगुरुदत्ता ।। ४।।

श्रीगुरुदत्ता त्यजि निष्ठुरता । कोमल चित्ता वळवी आतां ।

श्रीगुरु दत्ता जय भगवंता । तें मन निष्ठुर न करी आता ।। ५।।

## गाणगापुर श्रेत्री मठाची उभारणी.

श्रीदत्तप्रभूंनी आपल्या दुसऱ्या अवतारात श्रीनृसिंहसरस्वती नाव धारण करुन औदुंबर, कृष्णा-पंचगंगा परिसर (नंतरचे नाव नरसोबावाडी) आणि गाणगापुर पवित्र पावन केले. ही आज तिन्ही क्षेत्रे प्रसिध्द असून दत्तभक्तांची ती पंढरी आहे.

अशा या गाणगापुरी भाऊ कित्येक वर्षे (भक्त समुदाय जमा होण्या अगोदर) गाणगापुरात अष्टतीर्थ यात्रेला जात असत. तेथे गुळवणी महाराज मठात तीन दिवस रहात. संगमावर श्रीगुरुचरित्र पारायण, अनुष्ठान करीत. गावात माधुकरी मागित आणि भस्माच्या डोंगरावर ध्यान-धारणा करुन तेथे भिक्षाहि मागीत. हे व्रत त्यांनी कित्येक वर्षे आधि (राजकारणात असताना) लावून घेतले होते. त्याचे गुपित होते, षडरिपूंवर काबू मिळविण्यासाठी. अहंकार छाटण्यासाठी!

एकदा गाणगापूरमध्ये असताना भाऊंना स्वप्न पडलं. एका सुंदर जागेमध्ये भाऊ महाराज उभे आहेत, तिथं स्वतःचं असं काही उभं राहात आहे. स्वप्नातून भाऊ महाराज जागे झाले. काय अर्थ असेल ? स्नान वगैरे आटपून भाऊ महाराज वामन भटजी (आमचे गाणगापूर मधील उपाध्याय) यांच्या घरी गेले. समोर वामन भटजी उभे! या भाऊ, मी तुमचीच वाट पाहतो आहे. भाऊ महाराज चकित झाले. त्यांनी भाऊंना बसायला सांगितलं, चहा मागवला आणि ते म्हणाले, ‘‘ भाऊ महाराज मला एक स्वप्न पडलं, एका जागेमध्ये तुम्ही उभे आहात, आणि तेथे काही बांधकाम चालू आहे. तुम्ही कामगारांना सांगत आहात, मला असं हवं आहे. ती जागा माझ्या परिचयाची आहे, आजच तुम्हांला नेऊन दाखवतो.’’ भाऊ महाराज पटकन वामन भटजींना म्हणाले, मलाही तेच स्वप्न पडलं.

त्याचवेळेस आमचा एक गुरुबंधू तो ही गाणगापूरात होता, त्यालाही तेच स्वप्न पडलं जे वामन भटजींना पडलं होतं. वामन भटजी भाऊंना म्हणाले, ‘‘ दत्त महाराजांचे मनी येथे तुमची वास्तू व्हावी असाच या स्वप्नाचा अर्थ दिसतो. आपल्या हातून त्यांना काही वेगळी कार्ये करुन घेण्याचा मला त्यांचा मनसुबा वाटतो.’’ भाऊ महाराज पटकन तयार झाले. जागा पाहिल्याबरोबर, स्वप्नातील जागा आणि ही जागा एकच असल्याचा तिघांनीही निर्वाळा दिला. ती जागा तेथील एक भटजी दिपक नामे याची होती. त्यावेळी तेथे एक अद्‌भूत घटना घडली जी वामन भटजींनी वर्षांनंतर आम्हां काही जणांना सांगितली ती अशी; जेव्हा भाऊ महाराज, वामन भटजी आणि दिपक भटजी त्या जागेवर उभे होते. त्याचवेळेस गुरु दत्तात्रेयांनी (श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज) धावत येऊन भाऊ महाराजांना कडकडून मिठी मारली व म्हणाले, ‘‘बाळ ही तूझी जागा आहे. येथूनच तू माझ्या कार्यास प्रारंभ कर. मी सदोदित तुझ्या बरोबर आहे.’’ हे दृश्य वामन भटजींनी पाहिलं (किंबहूना ते दृश्य फक्त त्यांनाच दिसलं) कारण तेही दत्त महाराजांचे परमभक्त होते. त्यांचे डोळे अश्रूंनी भरुन आले. भाऊ महाराजांविषयी असलेला आदर आणखी फुलून आला.

दिपक भटजींबरोबर बोलणीही झाली. व्यवहारही जमून आले. टोकन मनी (अनामत रक्कम) रु. ४०००/- देण्याचं ठरलं! त्यातही समस्या पैशाची! भाऊ महाराजांनी संध्याकाळी सर्वांना एकत्र केलं. कुणाकडून ५००,

कुणाकडून २०० असं गोळा करता रक्कम बरोबर ४००० रुपये झाली. लगेच त्यांनी ती दिपक भटजींना पोचती केली, आणि गाणगापूरसारख्या महाक्षेत्रात स्वतःची जागा होऊन आपल्याला पडलेलं स्वप्न साकार होणार याचा भाऊ महाराजांना अतिशय आनंद झाला.

मुंबईस आल्यानंतर त्या जागेची हजारो रक्कम कशी द्यायची, याचाच भाऊ महाराजांना वेध लागला. हळूहळू अनेक हात पुढे झाले. संपूर्ण जागा पूर्ण रक्कम देऊन ताब्यात घेण्यात आली. नुसती जागा घेऊन काय उपयोग? त्यावर काहीतरी उभं राहिलं पाहिजे. त्यासाठी भाऊ महाराजांची तळमळ वाढू लागली. बांधकामासाठी पुष्कळ पैसा हवा. कुठून जमा करायचा? त्यावेळी अनेक हात पुढे आले. त्यांनी उदारहस्ते भाऊ महाराजांना आर्थिक मदत केली. त्यात प्रामुख्याने श्रीमती रश्मी (अंटी) गोसावी, सौ. प्रभाताई चाफेकर आणि कुटुंबिय (पुणे), सौ. दिपाली चव्हाण, कै. द्रौपदीबाई तावडे, श्री. प्रकाश पाचणेकर, श्री. दयानंद सावंत, श्री. एकनाथ चव्हाण अशी किती नावे घ्यावीत जी लिहिता लिहिता पूर्ण होणार नाहीत. परंतु भाऊंनी गाणगापुर भालचंद्र महाराज उपासना मठात ज्यांनी त्यांना जी आर्थिक मदत केली त्या सर्वांचे स्मरण म्हणून देणगीदारांची नावे मठात लावली आहेत.

मठाचे बांधकाम सुरु असताना भाऊंनी एक योजना राबवली होती ती म्हणजे 'अक्षय माधुकरी योजना'. वर्षातील एक दिवस पूर्ण प्रसाद त्या भक्ताच्या नावे गाणगापुर येथील सेवेकऱ्यांना वाढला जाईल. या योजने मध्ये श्रीमती रश्मी गोसावी यांनी अल्पावधीतच ५० सभासद गोळा करुन भाऊ महाराजांना मोठा दिलासा दिला.

त्यावेळी भायखळा परिसरात दोन तरुण मुले गरीब, होतकरु मुलांना 'साई ट्युशन क्लास' मार्फत अगदी (१० रु.) जुजबी फी घेऊन शिकवणी देत होते. ती दोन तरुण मुले होती विजय भांदिर्गे आणि नितीन चव्हाण. त्यांच्या क्लासचा गुणगौरव सोहळा होता.

त्या कार्यक्रमासाठी त्यांना एक चांगले व्यक्तिमत्व प्रमुख पाहुणे म्हणून हवे होते. त्यांचे एक मित्र सत्यवान उभे यांनी विजय व नितीन या दोघांना घेऊन अशोक सदरेंच्या घरी आले. (भाऊ नेहमी संध्याकाळी तेथे असायचे.) व या दोघांची ओळख करुन देऊन थोडक्यात सविस्तर सांगितले. भाऊंनीहि त्यांचे आमंत्रण आनंदाने स्वीकारले व त्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले.

तो अगदी छोटेखानी कार्यक्रम होता. पण भाऊ त्याने प्रभावित झाले व विजय भांदिर्गेना म्हणाले, तुम्ही माझ्याबरोबर रहा. मी देवाचे मोठे कार्य हाती घेतले आहे. तूर्तास (आजच) मला पैशाच्या स्वरुपात तुमच्याकडून काहीतरी हवेच आहे. तेव्हा विजय व नितिन या दोघांनी रुपये दोनशे एकावन्न भाऊंच्या हाती ठेवले. भाऊंना आनंद झाला! त्याच बरोबर त्या दोघांनाही!

पुढे १९९५ साली डॉ. शिरोडकर हायस्कूलमध्ये क्लासमधिल आजी-माजी विद्यार्थ्यांचा 'गुणगौरव' सोहळा आयोजित करण्यात आला, त्या कार्यक्रमासाठी विजय व नितीन यांनी प्रेमपूर्वक भाऊंना आमंत्रण दिले.

भाऊंनाहि आनंद झाला व भाऊ आपल्या दोन सहकाऱ्यांसह त्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. तेथे जे घडले, त्याने भाऊ आश्चर्यचकित झाले.

सभागृहाच्या दरवाजातच भाऊंचे मोठे पूजन करुन त्यांना ओवाळण्यात आले. (अर्थात मुलींनी भाऊंचे औक्षण करुन ओवाळले.) त्यांना सन्मानपूर्वक सुशोभित आसनावर बसविण्यात आले आणि एक मोठा भरलेला बटवा (पाच रुपयांचा), रुपये पाच हजारांचा भाऊंच्या हाती सुपूर्द केला गेला. भाऊ या प्रसंगाने अवाक् झाले आणि त्यांना मोठा संतोष झाला.

पुढे भाऊंनी विजय भांदिर्गेंना आपल्यासोबत घेऊन संस्थेची पहिली स्मरणिका काढली त्यातून चांगला फंड मिळाला तो भाऊंनी गाणगापुर मठासाठी वापरला.

त्यानंतर पहिला दिवाळी अंक (साल होते १९९८) दिवाळीच्या दिवशी गाणगापुर मठातच प्रकाशित करण्यात आला, त्याचे प्रकाशन भाऊंनी छोटूच्या (दयानंद-आसावरी सावंत यांचा मुलगा) हस्ते केले. छोटू त्यावेळी चार वर्षांचा होता.

त्यावर्षी अंकाच्या सर्व प्रती (एक हजार) मठातच संपल्या होत्या.

त्या साली प्रथमच एक संगीतज्ञ, उत्तम गायक पांडुरंग पाटकर उर्फ पप्पा पाटकर मठात आले होते. प्रकाशन सोहळ्यानंतर भजन झाले. पप्पा पाटकरांनी आपल्या गायनाने अवघा मठच संगीतमय करुन टाकला होता.

त्याच साली (१९९८) 'गाणगापूर दर्शन दिनदर्शिका' प्रसिध्द झाली. त्याच्या ३०,००० प्रती संपल्या गेल्या. त्यात गाणगापूरची इतंभूत माहिती छापली होती. गाणगापूर येथील लोकांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता.

हे सर्व कथन करण्याचे प्रयोजन असे की, छोट्या छोट्या योजनेतून भाऊ महाराजांनी मठासाठी निधी उभा केला होता.

## करुणा त्रिपदी

जय करुणाघन निजजनजीवन । अनसूयानंदन पाहि जनार्दन ।।धृ।।

निज अपराधें उफराटी दृष्टी । होउनि पोटीं भय धरुं पावन ।। जय करुणाघन ।।१।।

तूं करुणाकर कधी आम्हांवर । रुसशी न किंकर-वरदकृपाघन ।। जय करुणाघन ।।२।।

वारी अपराध तूं मायबाप । तव मनीं कोपलेश न वामन ।। जय करुणाघन ।। ३।।

बालकापराधा गणे जरी माता । तरी कोण त्राता देईल जीवन ।। जय करुणाघन ।। ४।।

प्रार्थी वासुदेव पदिं ठेवी भाव। पदी देवो ठाव देव अत्रिनंदन ।।


जय करुणाघन निजजन जीवन । अनसूयानंदन पाहि जनार्दन ।।५।।


## काही गाणगापुरातील जुन्या आठवणीना उजाळा.






## काही गाणगापुरातील जुन्या आठवणीना उजाळा.

















SADGURU BH

## काही गाणगापुरातील जुन्या आठवणींना उजाळा.






|| श्री गुरुदेव दत्त ||
SADGURU BHAU MAHARAJ TRUST'S
SADGURU BHALCHANDRA MAHARAJ
UPASANA MATH
BM
DEVAL GANGAPUR



# काही गाणगापुरातील जुन्या आठवणीना उजाळा.






# काही गाणगापुरातील जुन्या आठवणीना उजाळा.














## काही गाणगापुरातील जुन्या आठवणीना उजाळा.











NILESH PAWASKAR
SANDEEP PEDNEKAR
JAYWANT JADHAV
VIKAS TAKEKAR
NITIN DUPATTE
NANDAN TIKAM
SHILPA PEDNEKAR
YOGESH MULE
MANDAR MULE
JAYASHREE PEDNEKAR
SANGEETA SUTAR
MASCHINDRA KOLI
AMOL LAD
SANTOSH PATOLE
DEVOTEES DEVOTED
TIME & ENERGY
PRAKASH TUKRUL
MEENA KOLI
ANKUSH SAWANT
ROOF - DONATED BY
KETAN CHAPHEKAR
(POONA)
TEMPLET
AND WALL
DECORATION
BY
RAJU SAWANE
DEVOTEES DEVOTED
TIME & ENERGY
SITARAM RANE
RAJA RANE
DEVENDRA BHABAL
SAMIR CHAVAN
NARAYAN KOLI
KRISHNA KOLI
BHAUMAHARAJ-TRUST
BHANUDAS GAWDE
RASHMI GOSAVI
ANNA MHATRE



SHREE DATTA PRASANNA
SHREE SADGURU BHAU
MAHARAJ CHARI-TABLE TRUST
DEVAL-GANGAPUR. Tq-AFZALPUR.
DIST-GULBARGA.
- TRUSTEE'S -
SHREE. BHANUDAS GAWDE (CHAIRMAN)
SMT. RASHMI GOSAVI (VICE-CHAIRMAN)
DRAWPADIBAI TAWDE
YOGESH PUJARI
MEMBER
SEVA SANGH.



COMPLET TILING BY.
SATISH NAIK



DONERS. OF THIS BUILDING
RS.
YESHWANT CHAPHEKAR FAMILY. (POONA) 50,00
DIPALI CHAVAN. 45,000.
RASHMI GOSAVI. 40,000
DRAUPADI BAI. TAWDE. 40,000.
DAYANAND SAWANT. 20,000.
„ EKANATH CHAVAN. 20,000.
„ J. PRAKASH KARGUTAKAR. 20,000.
„ LAVOO GAWDE. 20,000.
„ PRAKASH PACHNEKAR. 20,000.
„ RAMDAS SAWANT. 20,000.
„ SHRIKANT MHATRE. 20,000.
„ VASANTRAO RAUT. 20,000.
„ ANIL MAINAK. 10,000.
„ ANNA MHATRE. 10,000.
ANANDI GAWDE.


SPECIAL ROOM FOR WOMEN FOLK
CONSTRUCTED BY
SUDHA GODE
DRAUPADIBAI TAWDE
SARASWATI TUKRUL
DEEPALI CHAVAN
SWATI MAHADIK
ROHINI INDAP
SULOCHANA BHURKE
SHAILAJA CHAVAN
VARSHA PALAV
SONAL PACHANEKAR
NARMADA MEENA KOLI
SUNAYANA GOSAVI
REKHA DEVLEKAR
SUNANDA NAIK
SANJEEVANI CHAVAN
VANITA BAGWE
ANKITA MAYNAK
SNEHA NAIK
NILIMA RAWLE
SUVARNA WARIK
SUJATA BHUTE
SHUBHANGI PANCHAL
REKHA PEDNEKAR
NIVEDITA WARANG
VANITA MAYEKAR
AKSHATA SARANG
SHILA DHURI
ASHA GAWDE
ASAWARI SAWANT
RASHMI GOSAVI
CHARUSHILA REDKAR
DONATED TO BHAUMAHARAJ TRUST
(GANGAPUR)



TILED BY
DIPALI CHAVAN
PADMAKAR KOLI
ARUN SARANG
Amount Donated By
Sow. DRAUPADIBAI TAWDE 10.000
Smt. RASHMI GOSAVI 10.000
Shri. VASANT RAO RAUT 5.000
" PRAKASH PACHNEKAR 5000
" ANIL LAD 4.000
" SHARAD PRABHU 1.000


BHAU MAHARAJ TRUST (DEVAL GANGAPUR)
ANNEX BUILDING SUBSCRIBER
MRS. RUKMINI V. ACHREKAR.
MRS. SAVITA BAMNE.
MR. SHREYAS K. BHAGWE.
M/S. IMUR BROTHERS.
SHREE SAI TUTION CLASSES.
MRS. SNEHALATA B. CHAVAN.
MRS. DEEPALI V. CHAVAN.
MRS. SANJIVANI CHAVAN.
MR. KIRAN K. CHAVAN.
MR. SITARAM K. CHAUGULE.
MR. RAMESH N. DALVI.
MR. GAJANAN N. DALVI.
MRS. MANISHA M. GODE.
MISS. PRACHI A. GOKHALE.
MR. PRAKASH G. GANDRE.
MR. ANKUSH GHUGRE.
MR. GOPAL GHADGE.
MR. BALKRISHNA JAVKAR.
MR. SITARAM B. KHAMKAR.
MR. SHANKAR KADAM.
MR. RAMCHANDRA KOLI.
MRS. SHILPA M. KADAM.
MR. KIRAN M. MESTRY.
MRS. TRIPURI S. MHATRE.
MRS. SWATI R. MAHADIK.
MRS. KUMUDI P. MANJREKAR.
MR. VAMAN R. NAIK.
MR. SANJAY NAIK.
MRS. INDIRA M. PAWAR.
MR. KRISHNA M. PAWAR.
MRS. VIJAYA V. PATADE.
DR. MADHUSUDAN B. PRABHU.



BHAU MAHARAJ TRUST (DEVAL GANGAPUR)
ANNEX BUILDING SUBSCRIBER
MISS. SAMRUDHI V. PATIL.
MRS. ARCHNA V. PATIL.
MR. VASANT E. PADLEKAR.
MR. SUNIL D. PANINDRE.
MR. RAJENDRA K. PAWASKAR.
MR. BABAN V. PANCHAL.
MR. DILIP PATIL.
KUM. AMEY J PARADKAR.
MR. BALU A PATIL.
MR & MRS. REDKAR.
MR. VIJAY S RAJIWADEKAR
MRS. MANISHA M. RANE.
MR. UDAY V. RANE.
MR. GAJANAN S. RAHATE.
MR. MARUTI P. SADHYE.
MRS. SUCHITA A SAWANT.
MRS. SHILPA SAWANT.
MR. RAMKRISHNA SAWANT.
MRS. SWAPNA U. SAVE.
MISS. SHRIYA P. SAWANT.
MRS. NALINI N. SHENDE.
MRS. APARNA N SAWANT.
MR. VITTHAL D. SWAR.
MR. SHIVAJI N. SHENDE.
MR. APPAJI S. SAWANT.
MRS. VASUDHA A. TIKAM.
MR. NANDAN A. TIKAM.
MR. CHETAN A. TIKAM.
MR. ARJUN A. TIKAM.
MR. ANANT S. UTEKAR.
MR. VIJAY V. WAIKAR.
MR. SHYAMSUNDER S. WARIK.



SHRI SWAMI SAMARTHA IDOL
DONATED BY :-
ARUN SAWANT


ROOF - DONATED BY
SONAL PACHNEKAR
PRAGATI BHATTE


HALL TILED BY
YASHRAJ GOSAVI


ARCHTECT: BABA GAWDE
MASON WORK BY: DATTAPPA KEENI
CENTERING: SHIDDAPPA WADGIRI
ANEX BUILDING
SUBSCRIBER
1. MADAN SAWANT
2. MALU MALWANKAR
3. WASUDHA TIKAM
4. PANDURANG INDAP
5. LATE PARWATIBAI SAWANT
6. CHANDRAKANT MAYEKAR
7. JAYPRAKASH PARADKAR
8. SHIVAJIRAO SATAM
9. RAJENDRA NAIK
10 CHARUSHILA REDKAR
11 SUNITA CHAVAN


BHAU MAHARAJ IDOL
IN MEMORY OF LATE
BABAJI DHONDU
BHINGARDE


BHAUS EXT ROOM
CONSTRUCTION
DONATION BY
NANDAN TIKAM
YOGESH MULE
MANDAR MULE
SAMIR SARODE


KALASH DONATERS
MRS. DEEPALI VIJAY CHAVAN
MR. SHAILESH SHANTARAM ZANJ
MR. VIJAY VISHNU TIKAM
MRS. GEETA GOVIND BAGAITKAR
MR. MAHENDRA GOVIND BAGAITKAR
MRS. DEEPALI SANDIP CHIKNE
MRS. NALINI VISHNU MADAKAIKAR
MRS. SHUBHADA MAHESH SURVE
MRS. SMITA SURESH PANGE
MR. SUNIL RAMCHANDRA GAIKWAD
MRS. VIJAYA SUNIL GAIKWAD
MR. AVINASH SHANKAR RANE
MRS. VEDIKA AVINASH RANE
LATE.MRS. NAMRATA VIJAY KAPADE


DATTA MANDIR/BHAU MAHARAJ KOTHI
SUBSCRIBERS
MR. ACHREKAR VITHOBA
DR. PARMAR FAMILY
MR. DHOPTE TATOJI
DATTA BHAKTA
MR. KORGAONKAR MADHAVRAO
MR. SHAH SHANTILAL RANMAL
MR. MANJREKAR KISHOR
MRS. PACHNEKAR SONAL
MR. BAPNANA NARESH
MR. CHAVAN EKNATH
MR. CHAVAN SATYAVAN
MR. GAWDE ANANDA SONU
MR. KHAMBAL MANOJ SADASHIV
MR. MAHADIK RANJAN CHANDRAKANT,
MR. MASURKAR VIPIN
MR. MULE YOGESH SURYAKANT
MR. PANINDRE SUNIL DHONDU
MR. RANE MEGHSHYAM
MR. WADKAR RUPALI VIJAY
MR. CHAVAN NEAL AMIT
MR. MULE NITESH SURYAKANT
MRS. CHAVAN DIPALI VIJAY
MR. RAUT VASANTRAO
LATE PANCHAL SURESH
MRS. NAIR YAMINI
MRS. BAGAITKAR GEETA GOVIND
MR. BHANDIRGE VIJAY
MR. CHAVAN NITIN BHIVAJI
MRS. FOR ALL CLEARING &
FORWARDING SERVICES
LATE. MULE JANAKIBAI BHANUDAS
MR. MANCHEKAR GANESH
MR. MULE MANDAR SURYAKANT
MR. PALAV PANKAJ PRABHAKAR
MR. RAJBHAR SANTOSH
MR. TUKRUL BHANUDAS

# सेवाव्रत

गाणगापुर क्षेत्री जागा घेतल्यानंतर मठ उभारणीसाठी मनुष्यबळाची अत्यंत गरज होती. त्यावेळी अगदी तरणीबांड मुले पुढे आली. आणि त्यांनी आपला बराचसा वेळ भाऊ महाराजांसाठी अर्पण केला. यामध्ये काही शाळकरी, काही १८ ते २० वर्षातील मुलांचा सहभाग होता. भाऊ महाराजांनी टप्प्या टप्प्याने मुलांना सेवेची संधी दिली. काही वेळेला भाऊ महाराजांकडे पैशाची कमतरता भासायची, त्यावेळी तेथे राहणारी मुले माधुकरी मागून दिवस पुढे ढकलायचे. परंतु भाऊंना जाणवू द्यायचे नाहीत.

काही मुले तेथे व्यवस्थापक म्हणून काम पहात होती (जे २-३ वर्षे तेथे राहिले होते). त्यांना सोन्याची अंगठी देऊन भाऊंनी त्यांचा गौरव केला. त्याचबरोबर भाऊंनी जे (मुले-मुली) दिड दोन वर्षे केवळ सेवेत होते, त्यांनाहि सोन्याची अंगठी देऊन त्यांचा गौरव केला.

व्यवस्थापक :

श्री. सिताराम लाडोबा राणे (३ वर्षे) - सोन्याची अंगठी मिळवणारा पहिला मानकरी.

श्री. देवेंद्र नथुराम भाबल (दीड वर्षे) - सोन्याची अंगठी मिळवणारा दुसरा मानकरी.

श्री. अंकुश सहदेव सावंत - सोन्याची अंगठी मिळवणारा तिसरा मानकरी.

श्री. प्रकाश सहदेव टुकरुल - सोन्याची अंगठी मिळवणारा चौथा मानकरी.

श्री. कृष्णा महादेव कोळी - सोन्याची अंगठी मिळवणारा पाचवा मानकरी.

सेवेकरी : (सोन्याच्या अंगठीचे मानकरी)

श्री. मंदार सुर्यकांत मुळे

सौ. जयश्री विजय पेडणेकर

कु. मीना महादेव कोळी (आताची पूर्वी प्रकाश टुकरुल)

श्री. मच्छिंद्र (बारक्या) कोळी

या सर्वांबरोबरच एक वृध्दा कै. सौ. द्रौपदीबाई तावडे हिने एक तप (१२ वर्षे) निरपेक्ष वृत्तीने भाऊ महाराजांची सेवा केली.

वरील पैकी काही जणांनी (आपल्या सेवेतील) अनुभव 'भालचंद्र महाराज उपासना मठाच्या रौप्य महोत्सवी' वर्षानिमित्त कथन केले ते येथे संकलित केले आहे.

## प्राप्त झाली सद्गुरु सेवा!

त्यावेळी भाऊ आमच्या चाळीत श्री. अशोक सदरेकडे यायचे. तेथे मी, अंकुश सावंत, दयानंद सावंत ( हे आमच्यापेक्षा वयाने थोडे मोठे), राजा राणे, हेमंत झाडे, बाबा तावडे इत्यादी सर्व तेथे जमायचो. विशेषतः आम्ही मुले भाऊंना भेटायला जायचो. कशाला ? भाऊ भरपूर खायला आणायचे ते खाण्यासाठी. अशोकच्या घरी त्यावेळी भाऊंनी श्रीगुरुचरित्र पारायण सप्ताह केला. आम्ही मुले पारायणाला बसलो. हे पारायण म्हणजे कडक नियम पाळून करायचे असते. आम्हांला ते काय माहित ? चटर फटर खायचे नाही! बाहेरचे पदार्थ खायचे नाहीत! सोवळ्यात घरी बनविलेलेच खायचे! भाऊं आम्हांला दोन केळी किंवा एखादे फळ द्यायचे. कसे बसे आम्ही मुलांनी पारायण पूर्ण केले. त्यानंतर मात्र अशोक सदरेकडे पारायण करायला गेलो नाही. कारण भूक हो! ती आवरायची कशी ? बाहेरचे पदार्थ खायचे नाहीत! पण भाऊंनी अगदी सहजपणे आम्हांला परमार्थाची गोडी लावली. अशातऱ्हेने आम्ही भाऊंकडे वळले गेलो.

त्यावेळी पिंपळेश्वर दत्त मंदिरात आम्ही बरीच मुले रहात असू. तेथे संध्याकाळी आरती झाली की भजन व्हायचे. भाऊंना संगिताची फार आवड! विशेषतः रागधारी! त्यात त्यांचा किती हातखंड होता ते खूप वर्षांनी कळून आले. भाऊंनी अनेक रागांमध्ये अभंग, गवळणी, भारुड, जानपद गीते बसविली आणि ती जवळजवळ सर्वांनाच शिकविली. ज्यांना गाणे म्हणजे काय ते माहित नव्हते ते सुध्दा त्याला शिकविलेले अभंग वा गवळण उत्तम प्रकारे गाऊ लागले. पिंपळेश्वर दत्त मंदिरात असतानाच 'गाणगापुर' क्षेत्री मठ बांधायचा भाऊंचा निर्णय झाला. तेथे राहून मठाच्या बांधकामाची देखरेख करण्यासाठी मनुष्यबळाची समस्या उभी राहिली आणि विशेषतः मी त्यासाठी (स्वतःहून) तयार झालो. माझे वीस एक वर्षाचे वय होते. माझ्याबरोबर एक लहान वयाचा (शाळकरी) मुलगा समीर चव्हाण आणि आणखी एक लहान शाळकरी मुलगा यशराज (बैजू) गोसावी, असे आम्ही तिघेजण भाऊंसोबत गाणगापुरला गेलो. आमची व्यवस्था भाऊंनी आश्रित धर्मशाळेत केली होती. तेथून मठाची जागा थोडी दूर होती. दिवसभर आम्ही तेथे कामकाज पहात म्हणजे कामावर लक्ष ठेवून असायचो.

एकदा काय झाले, मठाच्या कामात वेळ कधी निघून गेला ते कळले नाही. त्यादिवशी जेवणाची व्यवस्था नव्हती. त्यामुळे आम्ही माधुकरी मागून खायचे ठरविले होते. गाणगापुरात दुपारी १२ ते १२.१५ पर्यंत माधुकरी दिली जाते. पण त्या दिवशी कामाच्या नादात दुपारचा एक वाजून गेला होता. आता माधुकरी मिळणार नव्हती,म्हणून आम्ही तिघे शंकरगिरी (जवळच होता) मठात गेलो. समीरला भूक आवरत नव्हती. लहानच होता तो! तेथे गेल्यावर तेथीलहि जेवण (वेळेनुसार) बंद केले होते. आम्ही निराश होऊन परत फिरणार होतो. पोटात खूप भूक होती आणि मनात विचार चालू होते ते त्या दिवशीच्या उपवासाचे. उपवास घडणार होता. आम्ही निघणार इतक्यात आतून एक माणूस आला आणि म्हणाला, या आत जेवण वाढले आहे, चला! आमच्या आनंदाला उधाण आले! आम्ही आत गेलो तर खरोखरच पाने वाढली होती. अगदी पोटभर जेवलो. तृप्त झालो. आज त्या आठवणीने मन भरुन येते. सद्गुरु माऊली किती दयाळू आहे, हे आता कळून येते. गुरुंच्या कार्यात झोकून दिले की श्रीगुरु आपल्या मुलांची किती काळजी घेतात.

मी तसा रागीट स्वभावाचा होतो. काम करुन कोणी बोलले की राग यायचा. तेव्हा एक घटना घडली आणि मी

भाऊंवरच रागावलो (मनात हो!) त्याचे काय झाले, भाऊंचे बंधू बाबा यांनी मठाच्या इमारतीचा प्लॅन दिला होता. (बाबा हे वास्तुविद्या विशारद आहेत.) तो हो मला कसला कळतो, मी माझ्या मनाप्रमाणे त्या कामगारांकडून काम करुन घेतले. मी माझ्या स्वतःवर खूष होतो. दोन दिवसांनी भाऊ मम्मासोबत गाणगापुरला आले आणि त्यांनी ते काम पाहून माझ्यावर रागावले. तुझ्याकडे प्लॅन होता आणि हे काय केलेस? त्याचे असे झाले, दरवाजांच्या खिडकींचे माप एकाच उंचीवर (समान) असे ठेवले. तेव्हा भाऊ रागावले, म्हणाले, हवा सुटली की सर्व धुळ आंत खोलीत येणार! हे काय केलेस? त्यांनी बाबाला तसे विचारले असता बाबा म्हणाले, ते बरोबर आहे, धूळ नाही येणार. मग भाऊ शांत झाले. पण माझ्या रागाचा पारा चढला. मनात म्हणालो, एवढे राबून सुध्दा शिव्या खायच्या. येथे न राहिलेले बरे असा विचार करुन सर्व हिशोब तयार केला. दत्त मंदिरात नमस्कार करण्यासाठी गेलो आणि दत्त महाराजांची क्षमा मागितली. इकडे भाऊ चिंतेत होते. मी भाऊ भडकताच बाहेर पडलो होतो. थोड्यावेळाने आलो तर भाऊ आनंदात असलेले दिसले. मला पाहताच म्हणाले, ढोल्या कुठे गेला होतास! अरे मस्त काम करुन घेतले आहेस. माझा राग कोठच्या कोठे पळून गेला होता. भाऊंचे प्रेम पाहून मला रडू कोसळले. आज त्याची आठवण झाली. हृदय गुरुप्रेमाने भरुन आले. त्यातून हा प्रसंग लिहिला.

आणखी एक घटान घडली, त्यावेळी मात्र भाऊंनी खूप कौतुक केले होते;

मठात दत्तमंदिराचे बांधकाम सुरु होते. त्यावेळी राजेश राणे माझ्या बरोबर होता. राजा तसा माझ्यापेक्षाही लहान होता. मात्र कोणत्याही कामात त्याचे डोके एकदम जबरदस्त चालायचे. नवीन कृप्त्या काढायचा आणि काम झकास करायचा. दत्त मंदिराच्या कामाची जबाबदारी राजाने स्वतः उचलली. रात्रभर आम्ही दोघे काम करीत होतो. छोटेसे मंदिर उभे राहिले. दत्तमूर्ती ठेवायची होती. विशेषतः मूर्ती मध्यभागी ठेवायची असते. मी ती मागे ठेवली व पुढे जागा मोकळी सोडली. सकाळी भाऊ दत्त मंदिर बघायला आले. राजाने मला अगोदरच सांगितले होते, सीताराम, तू मूर्ती मागे ठेवली आहेस, भाऊ रागावणार! भाऊंनी नेमके तेच पाहिले, दत्तमूर्ती मागे ठेवली आहे. पुढील जागा मोकळी आहे! त्यांनी काकांना हाक मारुन बोलावले (काका गाणगापुरला पाहणी करण्यासाठी येत-जात असत.) व म्हणाले, बघ काका, ढोल्याने मूर्ती मागे ठेवली आहे. तेव्हा माझे हात-पाय कापायला लागले. तेवढ्यात भाऊ म्हणाले, काका माझ्या मुलाने बघ, देवाची पूजा बसून करता यावी म्हणून चांगले डोके चालवले आहे. शाब्बास, ढोल्या म्हणून त्यांनी शाबासकीची थाप माझ्या पाठीवर दिली. मग काय! आनंदाच्या उकल्या फुटल्या!

आज यासर्व गोष्टी लिहितो आहे, याचे कारण आपल्या गाणगापुर मठाला २५ वर्षे होत आहेत. ही वर्षे कधी निघून गेली ते कळलेच नाही. त्यावेळी भाऊंचे गुरुतत्व कळले नाही. मात्र आज आपल्या सद्‌गुरुंचे महात्म्य कळू लागले आहे. इतरांप्रमाणे माझ्या नशिबात त्यावेळी ३ वर्षांचा सहवास जुळून आला होता. या माझ्या सेवेचा गौरव म्हणून दिवाळीला मठाच्या उद्‌घाटन सोहळ्याच्या दिवशी भाऊ महाराजांनी 'सोन्याची आंगठी' देऊन माझा स्नमान केला, कौतुक केले! ती ३ वर्षे गाणगापुरला व्यवस्थापक म्हणून काम केले (सेवा केली). सुवर्णाने गौरव झालेला पहिला भक्त म्हणून मला मान मिळाला. अशी ही सद्‌गुरुंची माया! सद्‌गुरुंचा कृपाळूपणा!

- श्री. सिताराम (नाना) राणे
व्यवस्थापक - भाऊ महाराज उपासना ट्रस्ट,
श्रीक्षेत्र दहागांव, वाशिंद

# सद्गुरु कृपेने दत्त दर्शन

माणसाचा जन्म हा फार दुर्लभ आहे असे म्हणतात. ते सत्य आज पटू लागले आहे. कारण माणसाच्या जीवनाला जोवर अध्यात्माची जोड लागत नाही, त्याला गुरुंचा सहवास लाभत नाही तोवर जीवनाचा खरा आनंद कळणार नाही. मी त्या मानव प्राण्यातील एक ! म्हणजे सद्‌गुरुच आपल्याकडे येतात, हे पारमार्थिक सत्य अनुभवास आले.

मी ज्या नेकजात मराठा सदनमध्ये माझ्या बंधूकडे (दयानंद सावंत) राहात होतो तेथे श्री. अशोक सदरे राहात होते (अजूनही ते तेथे राहतात.) त्यांच्याकडे भाऊ महाराज येत असत. त्यांच्याकडे श्रीसाईचरित्र, श्रीगुरुचरित्र अशी सात दिवसांची पारायणे होत असत. हळूहळू आम्ही काही मुले सदरेंच्या घरी भाऊ आले की जमत असू. भाऊ तेथे येताना रिकामी हाताने येत नसत. गरमागरम वडा-पाव, भजी इ. खमंग खाद्य पदार्थ घेऊन येत. आमही सर्व आनंदाने खायचो. मग भाऊ एक दुसऱ्याची सहज टर उडवून चांगल्या गोष्टी सांगत. मंत्राची, स्तोत्राची महती सांगत. काही पौराणिक गोष्टी सांगून देवाचे महत्व पटवून देत. आम्हांला त्याची गोडी वाटू लागली. मग पुढे पुढे भाऊ केव्हा येतात त्याची वाट बघत असायचो. असो.

पुढे पिंपळेश्वर दत्त मंदिर, डॉकयार्ड येथे भाऊ महाराज कार्यक्रम घेऊ लागले. तेथील विश्वस्तांनाहि भाऊंचे पारमार्थिक महत्व समजले होते. त्यांनी ते मंदिरच भाऊंच्या स्वाधीन केले होते असे म्हणावयास हरकत नाही. तेथे आम्ही काही मुले रहात होतो. अशी पाच वर्षे तेथे भाऊंनी अनेक आध्यात्मिक कार्यक्रम सुरु केले आणि रुजवलेहि. त्याचवेळी गाणगापुरला भाऊंनी मठासाठी जागा घेऊन मठाची उभारणी चालू होऊन काही काळातच मठ उभा राहिला. काही मुलांनी मठ उभारणीच्या वेळी आपली भरपूर सेवा दिली. मठाची स्थापना झाल्यानंतरहि भाऊंनी तेथे काही मुलांना व्यवस्थापक म्हणून नेमले होते. मी त्यातील एक होय.

प्रत्येक व्यवस्थापक दोन-तीन वर्षे आपली सेवा ऋजू करत होता. माझ्या वाट्याला अडीच-तीन वर्षांचा काळ आला. मठ उभा राहिल्यानंतर दत्त महाराजांची तेथे उपस्थिती जाणवू लागली. किंबहूना त्यांचीच इच्छा होती भाऊ महाराजांचा तेथे मठ उभा रहावा.

मठात भाऊंनी मंत्र-स्तोत्र, परायणे, रुद्राभिषेक सुरु केले. श्रीगुरुचरित्राची पारायणे सुरु केली ती अशा अर्थाने आपल्या भक्तापैकी कोणी संकटात असेल, आजारी असेल तर ते दूर होऊन त्याचे भले व्हावे. त्याप्रमाणे अनेक भक्तांचे संकल्प येऊ लागले. आम्ही मठात राहणारे आळीपाळीने श्रीगुरुचरित्र पारायण करायचो.

एकदा मी पारायण करीत होतो. ग्रंथाची दोन कांडे (३७ अध्याय) झाली होती. पुढे वाचताना मला अचानक झोप आली आणि मी झोपी गेलो. स्वप्नात महाराज येऊन म्हणाले, मी दुपारी जेवायला येतो आहे. उठ! मी ताडकन उठलो आणि धावत जाऊन तावडे आईला (ही आमच्या नेकजात सदनमध्ये राहणाऱ्या बाबा तावडे यांची आई. आम्ही सर्व मुले तिला तावडे आई म्हणत असू. हिने जवळ जवळ बारा वर्षे त्या मठात सेवा केली) जाऊन सांगितले. ती एवढी खूष झाली. आज महाराज जेवायला येणार ! असे म्हणून जेवणाला लागली.

तेव्हा परायणे मठाच्या पहिल्या इमारतीत, कोपऱ्याच्या खोलीत भाऊंनी सुरु केली होती. मी आंघोळ करुन पारायणाला जाऊन बसलो. पडलेल्या स्वप्नाने आनंदात होतो. त्या आनंदात तिसरे कांड केव्हा वाचून पूर्ण झाले ते कळले नाही. त्यावेळी मठाची ती एकच इमारत होती. त्यामुळे ती बंदिस्त नव्हती.

मी पारायण करुन खोलीच्या बाहेर आलो तर तेथे तीन माणसे उभी होती. एक सहा फुट उंच असा, दुसरा थोडा कमी उंचीचा आणि तिसरा आणखी कमी उंचीचा! त्यांच्यातील मधल्याने विचारले, आत कसली उपासना चालली आहे. मी म्हटले, श्रीगुरुचरित्र पारायण चालले होते त्याची आज समाप्ती झाली आहे. तोच ते तिघेहि म्हणाले, त्याच्याच प्रसाद घ्यायला आम्ही आलो आहोत. तावडे आईने छान जेवण बनविले होतेच आणि त्रयमुर्ति अतिथीहि प्रसादासाठी हजर होते.

त्यावेळी ह्या घटनेचे काही वाटले नव्हते. परंतु भाऊंना जेव्हा हे सांगितले तेव्हा ते म्हणाले, अंकुश प्रत्यक्ष महाराज आपल्या तीन रुपांनी तू केलेल्या पारायणाची समाप्ती करण्यास आले होते.

त्यावेळचा दुसरा एक मोठा अनुभव सांगावसा वाटतो, त्यावेळी मठात पाण्याची सोय नव्हती. आम्ही (तेथे राहणारी) मुले भागिरथी कुंडावरुन पाणी भरत असू. हे मठापासून थोडे दूरच आहे. पण एक वेगळा आनंद असायचा.

एके दिवशी मी पाण्याचा हंडा डोक्यावर घेऊन येत असताना एक भटका कुत्रा धावत येऊन माझ्या पायाला चावला. थोडे फार रक्त आले. मठात येऊन भाऊंना सांगितले. भाऊंनी कुत्र्याने चावलेल्या भागाकडे पाहून जोरात बोलले, काही एक औषध घ्यायचे नाही. आपोआप बरे वाटेल. आणि खरोखरच दोन-तीन दिवसात मला बरे वाटले. जखमहि भरुन गेली होती.

आज पंचवीस वर्षांनी ह्या गोष्टी आठवल्या. त्यावेळी १८-२० वर्षांचा असेन. कित्येक वर्षांनंतर गुरुसेवेचे महत्त्व पटत आहे. ती सेवा भाऊ महाराजांच्याच कृपेने माझ्याकडून चालू आहे, किंबहुना सद्गुरुच ती करुन घेत आहेत.

माझ्या सेवेचे भाऊ महाराजांनी मला सोन्याची अंगठी देऊन कौतुक केले. भाऊंचा तो निश्चय होता. जो मनोभावे जास्तीत जास्त काळ महाराजांच्या स्थानात राहून सेवा करतो त्याचे दिवाळीच्या उत्सवात, मठामध्ये सर्वांच्या समक्ष भाऊ महाराज सोन्याची अंगठी देऊन त्या भक्ताचा गौरव करीत.

मी तिसरा भक्त होतो, भाऊंच्या हस्ते मला सोन्याची अंगठी प्राप्त झाली.



- श्री. अंकुश सावंत
श्रीक्षेत्र दहागांव, वाशिंद.

# मिळाली संधी दत्त सेवेची

सन १९८९, मार्च ला १० वीची परिक्षा संपली आणि भाऊ महाराजांनी मला गाणगापुर अष्टतीर्थ यात्रा करावयास प्रथम दिवाळीला नेले. मुंबईची दिवाळी सोडून प्रथमच मी भाऊंसोबत गाणगापुरला गेलो. किती भाग्याचा क्षण एवढ्या लहान वयात देवाधर्माचा काहीही गंध नाही फक्त माझ्या आई-वडिलांच्या पुण्याईने सद्‌गुरु भाऊ यांचा सहवास लाभला. स्वतः भाऊंनी माझी तिकिट काढून मला प्रथम गाणगापुर दाखवले. त्यावेळी चिदानंद धर्मशाळेत राहात असून अष्टतीर्थ, भजन, पारायण, पालखी सेवा करुन घेतल्या. मुंबईत पिंपळेश्वर दत्त मंदिर (माझगांव) मध्ये सहजयोग साधना, सत्संग प्रवचन भजन व प्रसाद, तिथे होत असत. भाऊ रोज लालबाग वरुन सकाळ संध्याकाळी येत असत. मी माझगांवमध्ये पिंपळेश्वर दत्त मंदिरच्या समोरील बि.एम्.सी. बिल्डिंगमध्ये राहात होतो. परंतु कॉलेज व्यतिरिक्त इतर वेळ दत्त मंदिरामध्ये सेवेमध्ये जात होते.

१२वीची परिक्षा झाल्यावर १९९२ मार्च मध्ये ज्या दिवशी मुंबईमध्ये बॉम्ब स्फोट झाले त्याच रात्री मला एकट्याला भाऊंनी मद्रासमेल ने गाणगापुरला पाठवले. त्यावेळी आश्रीत धर्मशाळेत राहात होतो. त्याच दरम्यान भागिरथी तीर्थाच्या समोर संगम रोडवर दिपक भटजीकडून दोन-तीन गुंठे जागा घेतली होती. परंतु ती जागा संपूर्ण काटेरी बाभळीचे जंगल होते. भाऊंच्या सोबत आपले सर्व शिष्य परिवार त्या ठिकाणी जंगल साफ-सफाई करत असत. त्याचवर्षी दिवाळीमध्ये भूमिपूजन होऊन मठाची पाया भरणी करण्यासाठी आपले सर्व गुरुबंधु-भगिनी शारिरीक श्रमदान करत असत. सकाळी लवकर उठून कडक उन्हाच्या अगोदर श्रमदान करुन परत आश्रीतमध्ये येत असत. पुन्हा दुपारी जेवन झाल्यावर परत श्रमदानासाठी जात असत.

सर्व गुरुबंधूंनी इमारतीसाठी लागणारे खड्डे (फाऊंडेशन) मारले आहेत. त्यावेळी कामाची सवय नसल्यामुळे बरेच बंधू जखमी झाले होते. सेवा कामे करताना भाऊ आम्हांला खूप खायला द्यायचे. कलिंगड, काकडी भरपूर प्रमाणात पोटभर द्यायचे. भाऊंनी आम्हाला खाण्या-पिण्यामध्ये केव्हाच कमतरता भासू दिली नाही. या सेवेमधून भालचंद्र महाराज उपासना मठासाठी ६०/४५० जागेत तळमजला बांधकामास सुरुवात केली. ज्यामध्ये ५ खोल्या व १ हॉल असा १९९१-९२ ला सुरुवात करण्यात आली. त्यावेळी अनंत अडचणी आल्या. एकतर भाषेची अडचण व स्थानिक लोकांचा त्रास. अनेक बांधकाम कॉन्ट्रक्टर चंद्राप्पा, हिराप्पा, साहेबराव गावातील सरपंच मटेरियल सरकावीत. कारण मुंबईहून (महाराष्ट्र) प्रथमच गावडे महाराज यांनी काम चालू केले होते. गाणगापुरात गावडे महाराज मठ म्हणूनच गावांमध्ये ओळखत असत. परंतु कामाच्या ठिकाणी मुत्या म्हणून देखरेखीसाठी त्याला ठेवले होते. कारण जंगल असल्यामुळे त्या ठिकाणी चोरी होत होती. तसेच रानटी जनावर उदा. साप भरपूर प्रमाणात असायचे. त्याचवेळी भाऊं स्वतः हजर रहायचे. भाऊंसोबत काही तरुण मुले जमेल तेवढी सेवा करायचे. दुपारी माधुकरी जेवण मागून खायचे. दुपारी उरलेले रात्री जेवन करायचे. असा नित्यक्रम करुन मठाची, कामाची देखभाल होत असे.

त्यावेळी बांधकामाच्या ठिकाणी पाण्याची कमतरता होती. भागिरथी तीर्थावरुन पाणी आणावे लागे. किंवा दिपक भटजी यांच्या शेतामधून. दोन तीन वर्षात मठाचे बांधकाम पूर्ण होऊन १९९४ साली मठाची व दत्त मंदिर येथे

महापुजा करुन उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी गाणगापुर येथे कडक उन, पाऊस, नदीला पूर, कडाक्याची थंडी अशा त्रासाची काळजी न करता भाऊ महाराजांनी आपल्या शिष्यांना घेऊन मठाची उभारणी केली. त्यावेळी मुंबईवरुन दुपारी एस्.टी. महामंडळाची बस चालू झाली होती. बरेच सामान एस्.टी.मधून गाणगापुरला घेऊन येत असत. त्यामधून अंटीदेखील सकाळी पहाटे पहाटे येत असे. भाऊंना झाडाची खूप आवड. मुंबई, गुलबर्गा, सोलापूर, आंध्रप्रदेश, हैद्राबाद येथून अनेक प्रकारची झाडे मठामध्ये लावली आहेत. दिवाळी मठामध्ये जागेची कमतरता भासू लागल्याने भाऊंनी पहिल्या मजल्यवर पत्रा शेड लावून वरील माळा पारायणासाठी बनवून घेतला. त्यामध्ये हॉल व स्टेज करुन कार्यक्रम होत असत. दिवाळीत, अष्टतीर्थ, पारायण, नामघोष, त्याचप्रमाणे भाऊबीज, बलिप्रतिपदा, पाडवा, नृत्य कार्यक्रम असा भरगच्च सात दिवस कार्यक्रम चालायचा. दांडिया नृत्य, डान्स मठाच्या बाजूला भलेमोठे मंडप स्टेज घालून ३ दिवस कार्यक्रम चालत असे. दिवाळी, कार्तिकी पौर्णिमा, दत्तजयंती, माघी पौर्णिमा,अधिक मास, पितृपंधरवडा या दिवशी भाऊंनी मठामध्ये अन्नदान, संगमावर अन्नदान चालू केले. या काळामध्ये भक्त गणांसाठी भाऊंनी मठाच्या बाजूला ॲनेक्स इमारत बांधायला सुरुवात केली. हि इमारत दोन वर्षामध्ये पूर्ण झाली.

या इमारतीवेळी मात्र भाऊंनी व्यवस्थापक काम पाहण्याची सेवा करण्याची मला संधी दिली. या काळामध्ये आम्ही तरुण मुले मोठ-मोठे मातीचे ढिगारे, दगडी धुमास उचलणे असे दिवस रात्र करायचो. त्यावेळी भाऊ आमच्या सोबत असायचे. भाऊ मुंबईहुन येताना आम्हांला खूप खाऊ आणायचे. मठामध्ये तावडे आई, सुलुची आई जेवण करायचे. रात्रीचे जेवण झाले की भाऊ अध्यात्मिक गोष्टी सांगायचे. त्यांचे दत्तमहाराजाबरोबर होणारे संवाद, अनुभव सांगायचे. दिवसभर श्रमदान व रात्री सद्गुरु सहवास किती आनंद-आनंद असायचा. त्यावेळेचे दिवस आयुष्यामधले न विसरण्यासारखे आहेत. भाऊं आमच्यावर रागवायचे, ओरडायचे, शिव्या घालायचे परंतु तेवढीच प्रत्येकाची काळजी घ्यायचे. कारण मुंबई सोडून आम्ही गाणगापुरला रहायचो. त्यावेळी आमचे आई-वडिल भाऊंच होते. भाऊ ज्या ज्या वेळी गाणगापुरला यायचे त्यावेळी आम्ही त्यांना स्टेशनवर जीप करुन आणायला जायचो.

परंतु एक वेळ अशी माझ्यावर आली की भाऊ मठात यायच्या आदल्या दिवशी सर्व कामे साफ-सफाई पूर्ण करायचो. पण भाऊ येणार त्यादिवशी आम्ही सर्व मुले मठामध्ये काम करत राहिलो. व मी भाऊंना आणायला स्टेशनला गेलो नाही. त्यांच्यासोबत संतोष मयेकर होता. म्हणून मी त्यांना आणायला गेलो नाही. मठातील शिल्लक कामे करत राहिलो. जी प्रथा होती ती मी पूर्ण करु शकलो नाही व भाऊं माझी वाट पाहत होते. भाऊ दुपारी जीप करुन मठामध्ये आले. त्यावेळी मठाच्या समोर रस्त्यावर उतरले. एवढे संतापले होते की माझ्यावर शिव्यांचा वर्षाव सुरु केला. या माझ्या चुकीमुळे भाऊंना त्रास झाला. त्याचा परिणाम म्हणजे भाऊ माझ्याबरोबर तीन महिने बोलले नाहीत. मला ती शिक्षा होती. परंतु माझी कामाची जबाबदारी मी तेवढीच संभाळत होतो. परंतु सद्गुरु आपल्याशी काहीही बोलत नाही याची खंत मनाला लागून होती. कदाचित माझी परिक्षा सुध्दा असू शकेल. पण नंतर त्यांचा इतका जिव्हाळा मिळाला की मागी सर्व पुसले गेले. भाऊंचे प्रेम हृदयात साठून राहिले.

- श्री. प्रकाश टुकरुल
(डोंबिवली)

# गतजन्मांच्या पुण्याईने सद्‌गुरु माऊली मिळाली.

गतजन्मी काही सत्कार्य घडले असेल तर सद्‌गुरुंची भेट होऊन परमेश्वर भक्तीचा मार्ग सुकर होऊन जातो. इतकेच काय! पिढ्यान पिढ्या सद्‌गुरुंची कृपा त्या शिष्यावर राहते. सद्‌गुरु रुपात भाऊ माऊली मिळाली आणि आमचे अख्खे कुटुंब दत्तभक्तीत लीन झाले. त्यांची कृपाहि प्राप्त झाली.

सन १९९६ मध्ये भाऊ महाराजांचे ताडवाडीत आगमन झाले. तेथे दत्तमंदिराच्या पटांगणात आरती व प्रवचन होऊ लागले. आम्ही मुळे कुटुंबीय तेथेच राहणारे! भाऊ महाराजांच्या सहवासात आलो. आम्ही तीन भावंडे, आई आणि बाबा. मी योगेश सर्वांत मोठा. माझे बाबा सुर्यकांत भानुदास मुळे हे एका कंपनीत काम करीत होते. अचानक कंपनीत संप झाला आणि मालकाने कंपनी बंद केली. घरी एकटे कमावणारे फक्त बाबा आणि आम्हां भावंडांचे शिक्षण सुरु होते. आमच्यावर आभाळच कोसळले होते. पण भाऊ माऊलींनी आम्हांला धीर दिला. त्याचवेळी गाणगापुरला मठाचे काम सुरु होते. भाऊंनी मला आपल्याबरोबर गाणगापुरला चला म्हणाले. अज्ञानपणा कसा असतो पहा (म्हणजे जोवर चमत्कार दिसत नाही तोवर नमस्कार घातला जात नाही) मी त्यावेळी मॅकेनिकल इंजिनिअरींगला होतो. परिक्षेचे कारण सांगून मी भाऊंना नकार दिला. मला फटका बसलाच. मी आजारी पडलो. इतका की मला रुग्णालयात भरती करावे लागले. आजारपण वाढत गेले आणि मी मृत्युच्या दारात उभा होतो. भाऊ माऊलींना साकडे घातले, मला बरे वाटले की तुमच्या सेवेला गाणगापुरला येईन. अगदी थोड्या दिवसांत मी खडखडीत बरा झालो. हा तो चमत्कार! भाऊ महाराजांची इच्छा होती मी दत्त सेवेत दाखल व्हावे पण अज्ञानपणाने मी भाऊ माऊलींचे सांगणे नाकारले. देवाने माझी चांगलीच खोड मोडली. यात एक गोष्ट माझ्या लक्षात आली एवढ्या मोठ्या आजारपणातहि देवाने (सद्‌गुरु माऊलीने) माझे रक्षण केले. माझी जणू परिक्षाच पाहिली. आणि जेव्हा मी मनोभावे त्यांना प्रार्थना करुन सेवेत येईन म्हटल्यावर लागलीच माझे आजारपण दूर झाले. भगवंत आपल्याला जवळ घेऊ पहात असतो पण आपल्या आखूड बुध्दीने आपणच त्याच्यापासून दूर होत असतो. मग त्याची कृपादृष्टी आपल्यावर कशी राहील?

एके दिवशी काकाश्री गाणगापुरला जायला निघाले. भाऊ माऊलींनी त्यांना सांगितले, योगेशला बरोबर घेऊन जा आणि मला तसा निरोप कळविला. मग मात्र मी आणि घरच्या मंडळींनी उशीर केला नाही. मी लागलीच तयारी करुन काकाश्रींबरोबर गाणगापुरला गेलो. साल होते १९९९ एप्रिल महिना! त्यानंतर जून महिन्यात माझा छोटा भाऊ मंदारदेखील गाणगापुरला आला. अशा तऱ्हेने आम्ही दोघे बंधू भाऊ माऊलींच्या (अर्थात दत्तगुरुंच्या) सेवेत ऋजू झालो. आमचे सेवाव्रत सुरु झाले.

१९९९ मधील कारकिर्द :

जून - मठाची साफ-सफाई, नामघोष, आरती, खड्डे खणणे, झाडू लावणे, व कलर काम

जुलै - गुरु पौर्णिमा उत्सव. तिथे सद्‌गुरुंची पूजा, देखावा करायचो. सजावट मध्ये बाबा म्हापसेकरला मदत करायचो. मिनाताई, जयुताई, आवशी, आंटी इ. मंडळीहि तेथे होती. खूप मजा असायची. आम्हांला लागणाऱ्या वस्तूंची काळजी भाऊ घ्यायचे. अगदी कपडा लत्ता व लागणारे सगळ्या वस्तु भाऊंनी पुरवल्या. अंदाज नव्हता.

पुढच्या गाणगापुरचा प्रवास खूप मोठा आहे. त्यावेळी भाऊंचा लाकडी दरवाजा बनवायचं काम घेतलं. विठ्ठल मुळ्ये, योगेश, व मी कामाला लागलो व गुरुपौर्णिमाच्या आधी पूर्ण केलं. भाऊ खूष झाले. मुलांनी स्वतः मेहनतीने दरवाजा बनवला.

ऑगस्ट - योगेश मुळे ला बॉनसाय बनवायला शिकवले. त्यांनी काम तर सुरु केलं पण भाऊंच्या मनात जसे होते तसे काय जमेना मग मी मदत करायला गेलो व उत्कृष्ट बॉनसाय झाड बनवलं. ते पण मठात असलेल्या सामानापासून. पुढे जन्माष्टमी आली. मठात साजरी करण्याचं ठरलं. मग काय सगळी मुले कामाला लागली. अंकुमामा, विकास टाकेकर, नितिन दुपटे, प्रकाश टुकरुल, नारायण कोळी, कृष्णा कोळी, रमाकांत लोटणकरपण आले होते. आमच्या बरोबर आंटी, जयुताई, आवशीपण सामील झाली. रात्री पाळण्याचा कार्यक्रम भाऊंच्या उपस्थितीत पार पडला. रात्री १२ वा. विष्णूसहस्त्र नामावली व श्रीकृष्ण जन्माख्यान वाचून झाल्यावर अंटीने पाळणा गायला. खूप धमाल रात्री. गोपाळकाला करुन पुन्हा सकाळी भाऊंनी उठवले.

आता जिथे गोसावी मठ आहे तिथे हंडी बांधण्यात आली. अंकुमामाने खूप वर पर्यंत हंडी खेचली. मग काय गोपाळ मंडळी तयार. त्याचवेळी भाऊंची पूजा चालू होती. मुलांना भाऊं बरोबर हंडीची मज्जा लुटायची होती.

मग सगळ्यांनी मिळून जोरात ओरडा घातला, 'ओ भाऊ तुमच्या घरात नाही पाणी-घागर उतानी हो गोपाळा'! तेवढ्यात भाऊ उठले. मुले पाठी पळणार इतक्यात भाऊंनी बादली उचलली व सगळ्या मुलांना भिजवले.

भाऊंच्या भवती प्रदक्षिणा घालून गोविंदा पथक तयार झाले हंडी फोडायला. साखळी घालून हळूहळू हंडी खाली दाखल झालो. मग काय मस्ती सुरु. नितिन व विकास थर रचूनच द्यायचे नाही. खांदा वाकवून पाडायचे. असे बराच वेळ चालले. भाऊ कंटाळले व परत निघाले.

तेव्हा मात्र मुलांनी थर रचायला सुरुवात केली व ठरवले पहिल केळी काढूया. खालचा थर सज्ज झाला. रमाकांत लोटणकर, नितिन दुपटे, विकास टाकेकर व नारायण कोळी त्यांच्या वर मंदार मुळे व योगेश मुळे आणि तिसऱ्या थरात कृष्णा कोळी. केळी यशस्वी पद्धतीने काढण्यात आली. भाऊ बेहद खूष. पुन्हा बाहेर आले. मग काय मुलांचा जोष शिगेला पोहचला. पुन्हा तिच रचना करुन तीन थराची हंडी फोडण्यात आली. त्याचा फोटो नंतर पेमा दादाने एका दिवाळी अंकात छापला.

नंतर फोटो काढताना भाऊ अचानक आमच्या घोळक्यात आले आणि पटकन मंदारच्या खांद्यावर चढून बसले. अभुतपूर्व क्षण! न भुतो ना भविष्यती. नेत्रातून अश्रू वाहू लागले. केवढे मंदारचे थोर भाग्य! अजून हे सारे क्षण डोळ्यासमोर तरंगत आहेत. गोकूळ अष्टमीचा सण अशाप्रकारे साजरा होऊ लागला तो आजतागायत गाणगापुरातील मठात साजरा होत आहे.

सप्टेंबर- अतिशय आनंददायी महिना. ह्या महिन्यात आमचा लाडका भाचा, गुंडूचा जन्म झाला. गुंडू म्हणजे नृसिंह विजय पेडणेकर! सौ. जयश्री विजय पेडणेकरने गाणगापुरात गुंडूला जन्म दिला. ७ सप्टेंबर १९९९.अतिशय आनंदाचा दिवस. भाऊंनी स्वतः आम्हांला साखर वाटून म्हटले, माझा नातू मठाधीश आला. मग काय मठामध्ये आनंदाचे वातावरण. गुंडू आमच्या आयुष्यात खूप आनंद घेऊन आला. लगेच पुढे मठाला रंगरंगोटी

सुरु करण्याला सुरुवात कारण पुढच्या महिन्यात दिवाळी. त्यावेळी अगदी मोजके पैसे असायचे. त्यात सगळं आटपायचं. कृष्णा कोळी, मी व मंदार आम्ही संपूर्ण मठ घासून काढायला सुरुवात केली. कूर्पी घेऊन १५ दिवसात संपूर्ण मठ घासून काढला व पुढच्या १० दिवसात संपूर्ण मठाला रंगकाम करुन झाले. भाऊ जेव्हा आले तेव्हा मठाची रंगरंगोटी बघून खूष झाले. माझ्या मुलांनी संपूर्ण मठ रंगवून काढला.

मग काय गुलबर्गावरुन खास आमच्यासाठी कश्मिरी कुंदा १ किलो. कृष्णाला खाण्याची फारशी आवड नव्हती. व मला पण! मग काय मंदारची मज्जाच मज्जा! उरलेला त्या कुंदावर त्याने ताव मारला. जयूताई व मिनाताई अगदी लहान भावाप्रमाणे आमचे लाड पुरवायची. पुढे नारायण दादा महिनाभरासाठी गाणगापुरात दाखल झाला. भाऊ व आम्ही मुलं खूप धम्माल करायचो. संपूर्ण दिवस परिश्रम करुन सुध्दा कधी थकल्यासारखे वाटले नाही. भाऊ रात्री रोज फळांची मेजवाणी द्यायचे व आम्हांला शिवाजी महाराजांची व हिटलरची गोष्ट सांगायचे.

एकदा असेच घडले ऑगस्ट महिन्यात दुपारच्या वेळेला अचानक एक भगवा वस्त्रधारी मठात येऊन बसला. शुभ्रकांती! उंची ७ फूट,पायात खडावा, हातात ब्रह्मदंड व कमंडलू,उजव्या काखेत झोळी,पायात खडावा. अतिशय तेजस्वी! मी व जयुताई होतो. त्यांना पाणी प्यायला दिले व विचारले, आपण कोण? कोठून आलात? ते म्हणाले, मै काशीपर्वत से आया हुँ! आपके गुरु बहुत बडे तपस्वी है। आप बच्चे लोग भाग्यशाली हो की आप उनकी सेवा मे हो। तेथून थेट त्यांनी दत्त मंदिरात जाऊन नमस्कार केला. व पुन्हा बाहेर आले. आम्ही, मी व जयुताई त्यांना नमस्कार केला. ते आशिर्वाद रुपात म्हणाले, बहुत अच्छा होगा. ऐसेही आप गुरु की सेवा मे लगे रहो! मग काय मी आणि जयुताई खूप खूष झालो.

भाऊंनी आल्यावर विचारले, जयू इथे कोणी सत्पुरुष आले होते का? जयूताई म्हणाली, हो. भाऊंनी आम्हांला सांगितले, तुम्ही खूप भाग्यवान आहात, साक्षात दत्तप्रभू तुम्हांला आशिर्वाद देऊन गेलेत.

आमच्यासाठी हा मोठा धक्काच होता. साक्षात दत्तप्रभू! आम्ही अतिशय आनंदित भावाने भाऊंचे आभार मानले. आपल्यामुळे दत्तगुरु आज आम्हांला भेटले.

ऑक्टोबर - दिवाळी व कार्तिक पौर्णिमा उत्सव. सगळी भक्त मंडळी गाणगापुरात दाखल होत असे. भाऊ स्वतः मंडळींच्या स्वागतासाठी मठाच्या दरवाज्यावर उभे असत. माझी मुले, मुली, सुना व नातवंडे येणार. नितिन व विकास ढोल-ताशा जोरदार वाजवून स्वागत करीत असत. टेम्पो दाखल झाला की खूप धमाल असायची. आठवडाभर पारायण, भजनसेवा, अन्नदान, रोशणाई, इत्यादी कार्यक्रम मठात असत. मठ पूर्णपणे गजबजून जायचा. आरडा-ओरड. रात्री फराळ झाला की लगेच मैदानात नृत्य, गरबा चालायचा! आमच्या बरोबर काका, काकू, आंटी, बैज्या, भाऊ,मम्मा सगळे! खूप धम्माल करत.

त्याच काळात नृत्य स्पर्धा असायची. विजेत्याला सोन्याची अंगठी, तसेच तिथे वर्षभर सेवा ऋजू करणाऱ्याला पण अंगठी. त्यावर्षी १९९९ सालची अंगठीची विजेती होती जयूताई (जयश्री विजय पेडणेकर). दिवाळी झाली की लगेच कार्तिक पौर्णिमेची तयारी. वनभोजन व पालखी सोहळा साक्षात प्रभूंची पालखी मठासमोर दोन दिवस थांबायची.

एकदा असेच रात्री बसलो असताना भाऊंनी म्हटलं, आपण श्रीदत्त जयंतीला चहा वाटप सुरु करुया. मग काय बापू कोळी लगेच कंबर बांधून तयार! बोला भा। किती जणांसाठी चहा बनवूया. भाऊंनी सांगितले पहिल्या वर्षी आपण बघूया. हळूहळू वाढवूया.

डिसेंबर - श्रीदत्त जयंतीजवळ आली. आदल्या दिवशी गुलबर्गा वरुन चहापत्ती, मसाला व दुधाची व साखरेची ऑर्डर देण्यात आली. चहा वाटप सुरु झाले. बघता बघता लोकांची संख्या वाढत गेली. एकूण हजार ग्लास अशीच संपली. त्या वर्षीपासून चहा वाटप जो सुरु आहे तो आजतागायत!

आता साधारण दहा हजार माणसं चहा पिऊन जातात. २२ डिसेंबर १९९९ माझा वाढदिवस मठात भाऊंच्या हजेरीत साजरा झाला. त्यावेळी दत्त जयंती २२ डिसेंबरला आली होती. भाऊंनी बेडशिट भेट म्हणून मला दिली. खूप आनंदात भाऊंनी माझा वाढदिवस साजरा केला.

सन २०००

जानेवारी - भाऊंनी मठामध्ये गणेश जंयती साजरी करण्याचे ठरविले. संपूर्ण गाणगापुरामधल्या ब्राह्मणवर्गाला आमंत्रणे दिली.

अन्नदान - रात्रभर मंडप सजावट न झोपता करायचो. भाऊ ५ ते ६ वेळा रात्रभर विचारपूस करायचे. या कामात महेश सुतार, ज्ञानेश्वर शिर्के, मी, जयवंत जाधव, कृष्णा कोळी यांनी फार मदत केली.

दोन वर्षे कशी गेली कळलेच नाही.

सोनेरी क्षण - दिवाळी २०००

भाऊंनी दिवाळीच्या रात्री जेव्हा बक्षिस समारंभ असतो त्या दिवशी स्वतः माईक हाती घेऊन आम्हां दोघा बंधूना (मला व मंदारला) स्टेजवर बोलावले व स्वतः जाहीर केले २००० सालाचा आदर्श कार्यकर्ता कु. मंदार सुर्यकांत मुळे ह्याला जाहिर करतो व सोन्याची अंगठी त्याच्या हातामध्ये घातली.

अनमोल अशी भेट सद्‍गुरुकडून मिळाल्यावर मंदारला अतोनात आनंद झाला. त्याच बरोबर मला न चुकता त्याच्या दोन वर्षे मठातील नामघोष न चुकवल्या बद्दल काकाश्रींनी मला घड्याळ भेट म्हणून दिलं. आम्हां दोघा भावंडांना कुटुंब चालविण्या करता मुंबईला आणले व आज परमार्थ व प्रपंचाची जोड करुन आम्हा संपूर्ण कुटुंबाचा उध्दार केला.

माझ्या आठवणीतील आणखी काही अनुभव

बाबा म्हापसेकर - विलक्षण अनुभव एकदा आम्ही भाऊंबरोबर रात्री गप्पा-गोष्टी करायला बसलो होतो. तेव्हा भाऊंनी बाबाला सांगितले, अरे बाबा काल मला मठाच्या बाहेर जिथे माधुकरी वाढली जाते तेथे एक व्यक्ती दिसली, तिने मला सांगितले, एक तर मला 'मालपोहे' तरी दे किंवा 'बाबा' दे.

हे ऐकून बाबाच्या पायाखालची जमीन सरकली. मग काय लगेच दुसऱ्या दिवशी माधुकरीसाठी 'मालपोहे' बनवून दत्तभक्तांना वाढली गेली.

नितिन दुपटे - ज्यावेळी सगळी भक्त मंडळी नरसोबावाडीला जायचे तेव्हा दोन मित्र (नितिन व विकास) गाणगापुरला जाऊन रहायचे. गंमत अशी की भाऊ व्यवहाराला ३०० रु द्यायचे. ही मंडळी पहिल्याच दिवशी सगळे पैसे संपवायची. गोड-धोड खाऊन व उरलेले सगळे दिवस बिचारे फक्त माधुकरी मागून खायचे.

अतिशय कष्ट व मज्जा करत भर मे महिन्याच्या ऊन्हात अख्खा महिना हसत-खेळत घालवून शाळेसाठी मुंबईला जूनमध्ये रवाना व्हायचे.

द्रोपदीबाई तावडे (आवशी) अशीच आमची आवशी होती. तिला भाऊंनी आपली बहिण म्हणुन वचन दिले होते. त्याप्रमाणे सदा तिचा संभाळ केला, जसा भगवान श्रीकृष्णाने द्रौपदीचा संभाळ केला!

भाऊ व आवशीची थट्टा मस्करी पाहिली की साक्षात श्रीकृष्ण व द्रौपदीची आठवण यायची.

ॲनेक्स बिल्डिंग १९९६ ते १९९८ विकास टाकेकर, नितिन दुपटे, बंड्या पेडणेकर, निलेश पावसकर, पोशीराम कोळी ह्या मुलांनी प्रकाश टुकरुल मॅनेजर असताना अतिशय सुरेख काम करुन ॲनेक्स बिल्डिंगमध्ये आपला घाम गाळला. भाऊंच्या एका शब्दावर ही सगळी मुले गाणगापुरात राहिली आणि पुढे आपलं कुटुंब साभाळण्यासाठी मुंबईला आले.

कृष्णा कोळी - मॅनेजर कारकिर्द ( १९९८ ते २०००) असताना मंदार मुळे, यशराज गोसावी, संगिता सुतार, शिल्पा पेडणेकर, नंदन टिकम, माच्छिंद्र कोळी, जयवंत जाधव, विभावरी पाचपुते, जयश्री पेडणेकर, द्रौपदीबाई तावडे, बाबा म्हापसेकर यांनी ॲनेक्स बिल्डिगचे वाढीव बांधकाम, हॉल, बापू किचन, काकाश्रींची रुम, टेरेस रुम, एम्.सी. रुम रिपेअरींग, दत्त मंदिर नुतनीकरण , पत्राशेड इ. कामे ह्या सगळ्या मंडळीने खूप कष्ट करुन वरील सर्व कामामध्ये आपला खूप घाम गाळला.

कृष्णाच्या संगतीने सद्गुरु भाऊंच्या आशिर्वादाने वरील सगळी कामे पूर्ण झाली. आपला योगदान देऊन ही सर्व मंडळी आता मुंबईत आपला प्रपंच सांभाळत आहेत.

तसेच अमोल लाड, गणेश आचरेकर ह्यांनी सुध्दा दोन-तीन वर्षे आपली सेवा सद्गुरु चरणी गाणगापुरात ॠजू केली.

सद्गुरु श्री भाऊ चरणार्पणमस्तु



- श्री. योगेश सुर्यकांत मुळे
(भायखळा - मुंबई)

# सद्गुरुंशी नाते

मनुष्य जन्मात सद्गुरुंना भेटावे, असे म्हटले आहे. परंतु सद्गुरु प्रत्येक मानवाला भेटतीलच असेहि नाही. पूर्व जन्मीचे सुकृत असेल वा त्यांची भेट झालेली असेल तर पुढील मनुष्य जन्मात त्याच सद्गुरुंची (रुप वेगळे असेलहि) भेट होतेच. कारण ऋणानुबंध होय. त्या साठी कारण घडावे लागते, नाही तर कोणीतरी निमित्त होतो.

मला अशी सद्गुरु माऊली भेटली; ती म्हणजे माझी मैत्रिण मीना कोळी हिच्यामुळे. आम्ही दोघी शालेय मैत्रिणी. तिच्या संगे माझे डॉकयॉर्ड येथील दत्तमंदिरात जाणे घडले आणि मला भाऊ महाराजांची भेट झाली. त्यांच्या सहवासात रमली.

पुढे गाणगापुर येथे भाऊ महाराजांनी मठ उभारला. मीनाबरोबर मीहि तेथे सेवेला ऋजू झाले. जीवनातील तो सुवर्णकाळ होता. असेच म्हणावे लागेल (आताहि आहेच आणि पुढेहि राहिल याचे कारण सद्गुरुंचे असलेले आशिर्वाद).

सद्गुरुंच्या कार्यात आपल्याकडून घडलेली सेवा हेच खरे मानवी जीवनाचे भाग्य असते. किंबहुना सद्गुरुंचीच ती इच्छा असते आणि त्यांच्याच योजनेप्रमाणे घडत असते. माझ्याच काय तर इतर बऱ्याच गुरुबंधू-भगिनींच्या जीवनात हा भाग्यकाळ आला.

गाणगापुरला मठात सेवेतला असताना भाऊंच्या सहवासात अगदी सहज माझ्याकडून सेवा घडत होती. अगदी पहाटे पाच वाजता उठल्यापसून रात्री झोपेपर्यंत! मठात असतानाच माझे लग्न ठरले. त्यासाठी भाऊंनी मला मुंबईला पाठविले. तत्पुर्वी भाऊंनी सांगून ठेवले होते, लग्न झाल्यावर लगेच इकडेच यायचे.

त्याप्रमाणे मी लग्न झाल्यावर त्याच रात्री आपल्या जोडीदारा बरोबर गाणगापुरला निघाले आणि मठातच दाखल झाले. जोडीदार मिळाला तोहि भाऊंचा सेवक! त्यामुळे परमार्थाची गोडी अधिक वाढली. आम्ही दोघे उभयता (विजय आणि मी) मठात सेवेत राहिलो.

ती भाऊ महाराजांचीच इच्छा होती. त्यांनीच आम्हांला तेथे ठेवून घेतले होते. पुढे आम्हाला पुत्र रत्नाचा लाभ झाला. भाऊंना खूप आनंद झाला होता. ते सहज म्हणाले, त्याला शोधून आणलाय. हा जगभर फिरेल आणि शेवटी माझ्याकडेच येईल!

त्याचवेळी भाऊंची बायपास सर्जरी झाली होती. भाऊ बराच काळ गाणगापुरात होते. मी सकाळी उठलेकी कामात असायचे. बराच वेळ स्वयंपाक घरात जायचा. मुलगा गुंडू (भाऊंनीच त्याला टोपण नाव ठेवले होते.) सर्व त्याला गुंड्या म्हणायचे. गुंडूला खोलीत ठेवलेले असायचे. तो उठला की जोरात रडत असे. भाऊ तेथेच बाहेर खूर्चीत बसलेले असायचे. मग मला हाक मारायचे. मी खाली जाऊन त्याला दूध पाजले की तो गप्प व्हायचा.

एकदा भाऊ मला म्हणाले, मला जर तुझ्यासारखे शक्य असते तर मीच त्याला दूध पाजले असते. त्याची तळमळ पाहून मी कासावीस होतो. भाऊंचे हे वाक्य ऐकून मला भरुन आले.

काय ती त्यांची ममता! आजहि त्या आठवणीने हृदय भरुन येते.

गुंड्या जेव्हा हळूहळू चालू लागला तेव्हा तो सर्व मठात फिरत असे. त्यावेळी स्वयंपाक घर उंचावर होते. गुंड्या चढून कधी वर आला ते कळले नाही. भाऊ तेथेच होते. त्यांनी त्याला पाहिले. माझा भाऊंकडे लक्ष गेला तेव्हा भाऊ काही तंद्रित आपल्या उजव्या हाताची तर्जनी समोर धरुन उभे होते.

काही क्षणातच ते मोठ्याने बोलले, अरे गुंड्या वर ग्रीलमध्ये अडकला आहे, त्याला काढा. मग आमची धावाधाव झाली. पाहतो तर खरोखरच गुंड्याचा उजवा पाय ग्रीलमध्ये अडकला होता. मग भाऊ तेथे आले आणि म्हणाले, तो खाली पडणार होता म्हणूनच त्याचा पाय ग्रीलमध्ये अडकवून ठेवला.

तेव्हा मला कळून चुकले; भाऊंची तंद्री कशात होती! त्यांनी बोटानेच गुंड्याला तेथे अडकवून ठेवले.

सद्गुरु आपल्या भक्ताची, त्याच्या मुलाबाळांची कशी काळजी घेतात, रक्षण करतात ते त्यावेळी अनुभवले.

गुंड्या जन्मला त्यावेळी भाऊंनी म्हटले होते, हा जगभर फिरणार आहे! त्यांचे ते वचन खरे ठरले. भाऊंचा लहानपणापासून सहवास लाभलेला, त्यांचे संस्कार झालेला गुंड्या आज फ्रान्सला आहे.

हे फक्त गुंड्याच्याच बाबतीत घडलेले नाही. तर आपल्यापैकी अनेक भक्तांच्या जीवनाचे सोने भाऊं महाराजांनी केलेले आहे.

अशी ही सद्गुरु भाऊ माऊली! त्यांचा सहवास आम्हां उभयतांना आणि मुलाला (गुंड्याला) लाभला. गुंडूचे बाबा नंतर भाऊंसोबत वाशिंदला होते. इकडे गाणगापुर मठात मी आणि गुंडू पाच वर्षे होतो. एका दिवाळीला भाऊंनी मला सोन्याची अंगठी देऊन माझा गौरव केला. धन्य सद्गुरु भाऊ माऊली!

आमचे जीवन धन्य झाले!

- सौ. जयश्री विजय पेडणेकर
श्रीक्षेत्र नरसोबावाडी, कोल्हापूर.



# आनंदाचा कंद हरि हा

म्हणजे प्रत्यक्ष भाऊ महाराज ! ज्यांना जवळून पाहिलं त्यांच्या सहवासात राहिलो. अनेक जन्मोनजन्मीचे भाग्य होते त्यामुळे मला भाऊ महाराजांचा सहवास लाभला. सन १९९२मध्ये बारावीच्या परिक्षेच्या निमित्ताने नारायणाच्या आग्रहाखातर सूर्योदयापूर्वी भाईमामा (दहावी, बारावी परिक्षेला बसणाऱ्या मुलांना) मंत्र शिकवत असत. असे ते शिकण्यासाठी मी गेले आणि मला देवाची आवड निर्माण झाली. नंतर गुरुवारी आरतीसाठी पिंपळेश्वर दत्त मंदिरात जाऊ लागले. नंतर मी जे. जे. हॉस्पीटलमध्ये जनरल नर्सिंग डिप्लोमा करु लागले. जेव्हा वेळ मिळे तेव्हा मंदिरात जात असे. भाऊ महाराज असायचे. परंतु एवढे बोलणे किंवा भाऊ महाराज नक्की कोण आहेत हे एवढें काही कळत नव्हतं. केवळ माझा भाऊ नारायण कोळी हा आग्रह करत असे म्हणून जायचे. प्रसाद घ्यायचा एवढेच करीत असे.

परंतु जेव्हा माझे ट्रेनिंग संपले तेव्हा भाऊंनी मला सांगितले की तुला गाणगापुरला राहून दत्तसेवा करावी लागेल. कारण गेल्या जन्मीच्या ज्या चूका तुझ्याकडून झाल्या आहेत, त्या केवळ दत्त महाराजच दुरुस्त करु शकतात. मग भाऊंनी माय-बापूला (माझे आई-वडिल) सांगितले की हि मुलगी आजपासून माझी आहे ही ची संपूर्ण जबाबदारी माझी आहे. माय-बापूंनी कसलाहि आड पडदा न ठेवता मला भाऊंच्या सूर्पद केले.

त्यानंतर १९९५ साली भाऊंनी गाणगापुरला नेले. मी द्रौपदी तावडे, देवेंद्र भाबल, सुनिल आचरेकर आम्ही चौघे भालचंद्र महाराज उपासना मठात होतो. त्यानंतर भाऊंनी ॲनेक्स बिल्डिंगचे काम हाती घेतले तेव्हा भाऊंनी ज्या मुलांचे शिक्षणपूर्ण झाले आहे परंतु नोकरी नाही. जी मुले ऐकत नाही, घरी त्रास देतात अश्या सगळ्यांना घेऊन म्हणजे जवळ जवळ २० मुले, मी, जयश्री पेडणेकर, द्रोपदी तावडे, सुलोचना मावशी, उपासना मठात राहत होतो.

त्याकाळात लाईटचा बराच त्रास असे. सतत लाईट जात असे. रात्रीच्या वेळेत तर जवळ जवळ नसायचीच. गाणगापुर म्हणजे उन्हाळा भयंकर असे. आज ज्या ॲनेक्स बिल्डिंगमध्ये राहतो ती इमारत बांधण्यापूर्वी १४ फुट खाली सर्व मुलांनी खोदली व तेवढीच भर घालून धुम्मस स्वतः मुलांनी केला. मुलं खोदत असत व आम्ही मुली डोक्यावर घमेला घेऊन माती दुसरीकडे नेऊन टाकत असू. दिवसभर मुल न दमता, न थकता सतत काम करत असत.

या दरम्यान भाऊ बिचारे सतत मुंबई-गाणगापुर प्रवास करत असत. मुंबईला येऊन वेगवेगळे कार्यक्रम करुन, दक्षिणा गोळा करुन कामासाठी घेऊन येत असत. येताना न विसरता मुलांना खाऊ व गोडधोड घेऊन येत असत. मला व जयश्रीला पावाचे पदार्थ बनवायला शिकवायचे व नंतर आम्हांला करायला सांगायचे. प्रत्येक वेळी वेगळे पदार्थ बनवायला सांगायचे.

भाऊ येणार म्हटले की सगळे झटून कामाला लागायचे, कोणी बागेत काम करायचे तर कुणी मठाची स्वच्छता करायचे. कारण स्वच्छता म्हणजे भाऊंना फार प्रिय. भाऊंचा जो कोणी मॅनेजर त्या काळात असे त्याला घेऊन कोपरा-कोपरा तपासत असत. यातले काय काय काम पूर्ण करायचे, कशा पध्दतीने करायचे, याचा संपूर्ण

आराखडा मॅनेजरला सांगून जायचे.

भाऊ गाणगापुरला ज्या दिवशी येत ते जायच्या दिवशीपर्यंत सगळे आनंदात, उत्साहात रोज जणूकाही दिवाळी-दसरा असायचा. रात्री जेवण झाल्यावर मुलांना फळे असायची. कधीकधी आईस्क्रिम बनवायला सांगायचे. कारण त्यांना माहित होते की गाणगापुरला तस वाग्यांच्या भजी शिवाय काही मिळत नसे म्हणून ते येताना बरेच काही घेऊन येत असत. एवढेच नव्हे तर ते आमच्यासाठी कपडे, टॉवेल पासून सगळे न विसरता घेऊन यायचे.

रात्री जेवण झाले की सर्व मुलांना ते जवळ घेऊन बसायचे. प्रत्येक जण एक एक करुन भाऊंचे पाय स्वच्छ पाण्याने धुवून मलम लावत असत. त्यावेळी भाऊ एखादा विषय समजावत असत. विषय कोणताही असला तरी ते विज्ञानाला धरुन सांगत. कुठेहि अंधश्रध्दा नसे. बऱ्याचदा आश्चर्य वाटत असे, भाऊंना ऐवढे ज्ञान येते कुठून ? कारण कोणताही विषय असो ध्वनी, पाणी, अग्नी, माती, देव, देवतां, अध्यात्म, मंत्र, विज्ञानशास्त्र, शरीरशास्त्र, इतिहास, भुगोल, गणित, थ्री डायमेन्शन, फोर डायमेन्शन, आत्मा इ. कोणत्याहि विषयावर तासनतास न दमता, न थकता, न थांबता ते बोलायचे. इतके अफाट ज्ञान ! कधी कधी बोलता बोलता सहज साधनेतील एखादी साधना शिकवायचे.

संगमावर जे नृत्य मुली दत्त महाराजांसमोर करतात ते सर्वात प्रथम नृत्य भाऊंनी स्वतः गाण रचून स्वतः ते नृत्य बसवले.

गाणे असे ; कुणी नाही ग कुणी नाही । आम्हांला पाहत बाई । हि पहिली दुसरी मन । कितीतरी जमल्या भोवताली ।

एक स्टेप त्यात तव्यावर गिरकी घेण्याची होती. प्रत्येक मुलीचा फुल बनवले होते. उदा. गुलाब, मोगरा इ. सकाळी मंदिरात रुद्र तसेच संध्याकाळी ६.३०वा. नामघोष, आरती, मंत्र, त्यानंतर अजून बरीच भजने भाऊंनी स्वतः रचून ज्यांना चाली लावल्या. तेव्हा आमच्याकडे तबला, पेटी नव्हती. भाऊ आम्हांला जवळ घेऊन तल्लीन होऊन भजन शिकवत. भजन त्यांना अतिशय प्रिय ! ते म्हणत देवाजवळ जाण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे भजन ! संसार करता करता आनंदाने परमार्थ करायला शिकविले. संकटे आलीच तर त्यातून मार्ग काढायचे असे अनेक मंत्र शिकवले. सहजयोग साधनेतील अनेक साधना बोलता बोलता ते शिकवत असत.

भाऊ जेव्हा गाणगापुरला असत तेव्हा रोज सकाळी सहा वाजता पायवाटेने ३ कि.मी. संगमावर चालत येत-जात असत. वाचनाची त्यांना भयंकर आवड होती. सतत वाचत असत. त्यांनी गाणगापुरला छोटीशी लायब्ररी (ग्रंथालय) उघडली व अनेक पुस्तकांचा संच बनवला. संध्याकाळी त्यांना आम्ही स्पंज करत असू. तेथे देवाजवळ औदुंबराच्या झाडाखाली दगड होता. त्या दगडावर बसून ते स्पंज करुन घेत असत.

मुलांना तर त्यांनी ऑलराऊंडर बनवले होते. जेवणापासून ते प्लंबर, गवंडी, इलेक्ट्रीशन इत्यादी मठातील छोटी मोठी कामे तर मुले स्वतःच करीत असत. मुलांना क्रिकेट खेळण्यासाठी सांगत व स्वतः देखील सामील होत असत. कधीकधी आम्हां मुलीना देखील खेळण्यास घेत असत.

अथर्वशीर्ष, घोरत्कष्टोध्दरण स्तोत्र, पारायण अश्या अनेक गोष्टी मुलांकडून करुन घेत असत. कधीकधी सहज बसल्या बसल्या एखाद्या व्यक्तिच्या मागील जन्माबद्दल किंवा पुढिल भविष्याबद्दल पटपट सांगत असत. भाऊंनी आम्हांला कधी काहीहि कमी पडू दिले नाही. आईची माया दिली. चुकलो तर वडिलांचा धाक दिला. कधी ते सख्या झाले, मनातील दु:ख जाणायचे व ते दूर करायचे. तर कधी ते बंधू झाले व मोठ्या भावाप्रमाणे पाठीशी उभे राहिले. आम्हांला कधीच भाऊ असताना अशा कोणत्या गोष्टीची भीती वाटत नसे. ते नेहमी म्हणत, अरे तुमचा बाप येथे बसला आहे! तेव्हा असे वाटे अरे आपल्या एवढा भाग्यवान कोणी नाही! नेहमी आनंदी असत. ते मठात असले की अख्या मठ आनंदाने उजळून निघत असे.

ते नेहमी म्हणत असत आज तुम्हांला माझी किंमत कळणार नाही मी गेल्यावर तुम्हांला कळेल. मी कोण आहे! तुम्हाला रोज आठवण येईल आणि खरेच आज क्षणोक्षणी सकाळी उठल्यापासून रात्री झोपे पर्यंत सतत त्यांची आठवण येते. असे वाटते काहीतरी चमत्कार घडावा व भाऊ परत यावे.

भाऊ खरचं तुम्ही परत या! पोरके झाले आहेत सर्व! प्रेमाने, मायेने, चुकांवर पांघरुण घालणारे, जवळ घेणारे असं कोणी नाही आहे. कधीच त्यांनी आम्हांला विचारलं नाही तू माझा नास्ता, जेवण, आंघोळ करुन केलेस का? त्यांना माहित होते, ह्या मुली मला खाण्यास देण्याच्या आधी टेस्ट करुन बघतात, तरी ते कधी बोलत नसत. कारण त्यांना माहित होते की ते कसं झालं आहे? भाऊंना आवडेल का? मीठ बरोबर आहे का? व सगळ्यात महत्वाचं त्यात प्रेम ओतून बनवतात! हे त्यांना माहित होतं!

भाऊंनी जे आपल्याला शिकवले, जी वाट दाखवली, त्या वाटेवर जर आपण प्रामाणिकपणे चाललो तर आयुष्यात कधीच कमी पडणार नाही. दु:खी होणार नाही.

अजून बरेच अनुभव, बऱ्याच गोष्टी आहेत. जर लिहायचेच झालं तर प्रत्येक व्यक्तिचा एक ग्रंथ होईल.

भाऊ तुम्ही लावलेली वेल गगनावर चालली आहे. परंतु तेथे आनंद, हिरवळ दिसत नाही. परंतु हा जीव कासावीस झाला आहे. डोळे तुम्हांला पाहण्यास ताटकळत आहेत. तुमच्या आशिर्वादाने सर्व आहे. परंतु तुम्ही नसल्यामुळे सर्व भकास वाटत आहे.



- सौ. मीना (पूर्वी) प्रकाश टुकरुल
(डोंबिवली)

# सुवर्ण काळ

गाणगापुरला निर्गुण पादुकांचे जेव्हा तुम्ही दर्शन घेता, त्यावेळी गाणगापुरला तुम्ही परत कधी येणार याची तारीख स्वतः दत्त महाराज ठरवतात. ते आपल्या हातात नसते. म्हणून गाणगापुरला येणे आणि त्याहीपेक्षा तिथे राहून सेवा करणे हे आपले परम भाग्य! हे भाग्य मला माझ्या सद्‌गुरुंमुळे लाभले. सुवर्ण काळ म्हणजे सोनेरी दिवस. खरचं माझ्या आयुष्यातील ते सोनेरी दिवस होते, जे मी माझ्या सद्‌गुरुंबरोबर गाणगापुरला घालवले. भाऊ महाराज हे फक्त माझे सद्‌गुरुच नव्हे तर माझे आई-वडील, मित्र आणि सर्वस्व होते अर्थात आहेत.

मी आठवीत असताना भाऊंकडे आलो, त्यांच्या सहवासात रमलो. शाळेत मे महिन्याची, दिवाळीची सुट्टी पडल्यानंतर भाऊ मला गाणगापुरला घेऊन जायचे. गाणगापुरात संगम रोडला, 'भालचंद्र महाराज उपासना मठ' भाऊंनी उभारला, कामे सुरुच होती. आम्ही मठात पोहोचलो. प्रथम भाऊंनी स्वतःबरोबर तेथे राहणाऱ्या मुलांसाठी खूप खाऊ आणला होता, ते नेहमी आणत. भाऊंसोबत राहणे म्हणजे खाण्याची धम्माल! तो खाऊ त्यांनी किचनमध्ये दिला व मला पूर्ण मठ स्वतः फिरवून दाखवला व त्यांनी स्वतःसुध्दा निरीक्षण केले. नंतर भाऊंनी कपडे बदलले, अगदी साधी राहणी फक्त सफेद हाफ पॅन्ट! मी आपला फुल पॅन्ट घालूनच उभा होतो. भाऊंनी सांगितले, बाळ, हाफ पॅन्ट घाल, आणि तो फावडा व घमेला घेऊन मागच्या बागेत ये. मी पोहोचलो. पूर्ण बागेत ढोपराएवढे गवत वाढले होते. मला व माझा मित्र आशिष मयेकर याला भाऊंनी काम दिले हे गवत पूर्ण खापरुन काढा. जास्त मोठे काम नव्हते फक्त १० दिवस लागले. १० दिवसांनी त्या कर्नाटकातील उन्हात आम्ही सुध्दा गवताप्रमाणे करपून निघालो, पण काम पूर्ण झाले. भाऊंनी कौतुक केले. दिवाळीच्या सुट्टीत मठात मज्जाच मज्जा! अष्टतीर्थ, नृत्यस्पर्धा, श्रीगुरुचरित्र पारायण सप्ताह, रांगोळी स्पर्धा, कार्तिक पौर्णिमा, वनभोजन, संगमावरती महाराजांसमोर गरबा नृत्य ह्या सगळ्या कार्यक्रमांमध्ये मी रमून गेलो. भाऊ प्रत्येकातील सुप्त गुण अचूक हेरायचे. माझ्यामधील व माझा मित्र नितीन दुपटे यांच्यामधील नाशिक बाजा, ढोल-ताशा वाजवण्याचा गुण त्यांनी अचूक हेरला. त्यांनी आम्हांला देवळात, संगमावर तसेच मठात नाशिकबाजा वाजवायला सांगत गेले. हळूहळू हा बाजा पूर्ण गाणगापुरात प्रसिध्द झाला. केवढे मोठे भाग्य हे देवासमोर वादन सादर करणे. आनंद हि व सेवा हि!

गाणगापुरात येणे जाणे चालूच राहिले. काही वर्षांनी, मी मुंबईत होतो. भाऊ मला बोलले तू गाणगापुरला ये. मी गेलो नाही. पुन्हा दीड महिन्यांनी भाऊ मला बोलले, विकास तू गाणगापुरला ये नाहीतर भोसडीच्या तुला मुळव्याध होईल. मी ऐकले नाही. मी आपला मुंबईतच काम करत होतो. नंतर पंधरा दिवसांनी मला मुळव्याध झाला. रक्त पडू लागले. मी भाऊंना म्हणालो मी गाणगापुरला येतो. भाऊ म्हणाले, झाला ना मुळव्याध! चल आता, गाणगापुरला पोहचलो. नंतर त्यांनी मला स्वतः वापरलेले धोतर दिले व सांगितले हे घाल. आजार बरा होईल. दोन दिवसातच माझा बराच त्रास कमी झाला. पुन्हा मी गाणगापुर सेवेत रमलो. मी एक महिना राहून निघणार होतो पण यावेळी भाऊंना मला जास्त काळ थांबवायचे होते, त्यांनी मला ॲनेक्स बिल्डिंगमधील पाच रुमच्या लाद्या काढून नवीन लाद्या लावण्याचे काम दिले. मीहि ते स्वीकारले. मला वाटले मी २०-२५ दिवसांत हे

काम संपवून मुंबईला जाईन. दोन महिने झाले तरी मी लाद्याच लावत होतो. भाऊ पुन्हा गाणगापुरला आले फक्त दोन रुम पूर्ण झाल्या होत्या. त्यानंतर भाऊंनी काम बघितले, शाब्बासकी दिली व सर्व मुलांना मदतीला पाठवले. कृष्णा कोळी, मच्छिंद्र कोळी (बारक्या), नितीन दुपटे, विनायक मेस्त्री, पोशिराम कोळी सर्व मुले मदतीला आली व दहा दिवसात काम पूर्ण झाले. भाऊंनी निर्गुण मठातील हॉलमधल्या लाद्या लावण्याचे कामहि आमच्या कडून करुन घेतले. ते मोठे भाग्य भाऊंनी आम्हांला दिले.

लादी लावण्याचा अजून एक किस्सा; मठाच्या बागेतील एका पट्ट्यात लाद्या लावायच्या होत्या. भाऊंनी मला व कृष्णा कोळीला बोलावले व विचारले ह्या पट्ट्यात मला लाद्या लावायच्या आहेत किती वेळात लावून होतील ? मी सांगितले, भाऊ, संध्याकाळी ४ वा. पर्यंत होतील. भाऊ म्हणाले,नाही होणार! मी पण भाऊंना बोललो, लावा पैज! भाऊ पण एकदम खेळकर वृत्तीचे, लगेच पैज लावली. लाद्या जर ४ वाजेपर्यंत पूर्ण झाल्यातर मी तुम्हांला बक्षीस देईन. सकाळचे ११ वाजले होते. आम्ही जोशाने कामाला लागलो. नारायण कोळी सुध्दा आमच्या मदतीला आला. दुपारचे २ वाजले अजुन अर्ध्या लाद्या पण पूर्ण झाल्या नव्हत्या. आम्ही जेवलो नाही, काम करत राहिलो. दुपारीचे साडे तीन वाजले, अजून २५ टक्के काम बाकी होते. मी कृष्णाला म्हणालो, मी मठातील सर्व घड्याळे १ तास मागे करतो. मी निघालो सर्व घड्याळे मागे केली. आणि शेवटी भाऊ ज्या ठिकाणी बसतात ते घड्याळ मागे करण्यास गेलो. मला वाटले भाऊ झोपले असतील, पण आमचे बापचं ते! ते घड्याळाच्या खाली खुर्ची टाकून बसले होते. मला बोलले विकास अजून १५ मिनिटे बाकी आहेत. माझे लक्ष्य आहे. नंतर बरोबर ४ वाजता भाऊ बागेत आले. त्यांनी काम बघितले. १० टक्के काम बाकी होते. पण त्यांनी आम्हांला शाब्बासकी दिली व म्हणाले, माझी मुले जेवली नाहीत आणि त्यांनी इतके काम पूर्ण केले. त्यांना मी बक्षीस देणार. नंतर त्यांनी आम्हांला स्वतः वापरलेले वस्त्र देऊन आमचा सत्कार केला. असे होते भाऊ! खूपच दयाळू, खेळकरसुध्दा. भगवान कृष्णासारखे! समोरचांच्या वयाप्रमाणे ते समरस होऊन समोरच्याचे मन चोरायचे.

१२वी नंतर माझे वडील वारले. भाऊ मला भेटायला आले. त्यांचे वाक्य अजूनहि मला माझ्या वडिलांची कमी भासू देत नाही. ते वाक्य म्हणजे 'विकास तू घाबरलास, घाबरु नकोस, तुझ्या बापाचा बाप इथे बसला आहे, घाबरु नकोस सर्व ठिक होईल. मी घेतो तुझी जबाबदारी.' ह्या एका वाक्याने मी माझ्या वडिलांचे दु:ख विसरुन गेलो. त्यांनी मला त्यांचे पाय चोळायला सांगितले, त्यावेळी माझ्या मनात फक्त विचार आला की, आज वडील जाऊन ३ दिवस झाले, मला सुतक आहे आणि भाऊ लगेच मला बोलले, 'मी सुतक वगैरे काही मानत नाही. ये पाय चोळ.' मी माझे सर्वस्व त्यांच्या चरणी अर्पण केले. वयाच्या ज्या वळणावरती मुले वाया जातात, त्यांना मार्गदर्शनाची गरज असते, त्यावेळी भाऊंनी मला गाणगापुरला सतत ३ ते ४ वर्षे ठेवून सेवा करुन घेतली. मीहि रमत गेलो. कधी रंगकाम, कधी डेकोरेशन, कधी कारंजा बनवणे अश्या विविध कामात व रुद्र पठण, गुरुचरित्र पारायण, माधुकरी वाढणे, आरती, नामघोष,भजन विविध कामात मी व्यस्त झालो. अहो झालो कसला भाऊंनी ते एखाद्या जादुगाराप्रमाणे माझ्याकडून करुन घेतले. भाऊ सांगायचे 'विकर्म कर्म कर्मज्ञाम'. मी चांगली कर्मे तुमच्याकडून करुन घेऊन तुमची वाईट कर्म त्यातून वजाकरुन घेतो व तुमचे जन्मोनजन्म सुधारतो, ते हि अगदी सहज! हीच सहजयोग साधना!

भाऊंची सेवा करताना दिवस जात होते, सेवा नाही म्हणता येणार! कारण सेवा म्हटली की बंधने येतात, पण भाऊंवरील प्रेम हे सगळे करवून घेत होते. ते वय आध्यात्म समजण्याचे नव्हते. पण काही गोष्टी ते नकळत शिकवत होते त्यांचे उत्तर काही वर्षांनी आता काही गोष्टी घडतात तेव्हा समजतात. एकदा मठातील एका झाडाच्या फांद्या तोडायच्या होत्या. भाऊंनी मला बोलावले व सांगितले, विकास ह्या झाडाच्या जेवढे टोकावर जाता येईल तेवढे जा. स्वतः काठी घेऊन झाडाखाली उभे राहिले. मी झाडावर चढलो. मला म्हणाले, अजून वरती जा, अजून, अजून. मी वरती चढत होतो. खालून कृष्णा कोळी भाऊंना म्हणाला, भाऊ, पडेल तो. तेव्हा भाऊ गालात हसले व म्हणाले, 'अरे मी असताना कसा पडेल तो.' आजही भाऊंचे ते वाक्य, मी कोणत्याही संकटांत असलो आणि त्या वाक्याचे स्मरण झाले की एक वेगळाच आत्मविश्वास येतो. आणि तेहि खरेच आहे भाऊ असताना मी कसा पडेन!

एक वेगळाच अनुभव! मठात राहत असताना सकाळी उठल्यानंतर भाऊ मला मठापासून संगमाकडे जाताना उजव्या बाजूला एक तेल्लूर गावाकडे रोड जातो त्या ठिकाणी एक नाला आहे. त्या ठिकाणी भाऊ हाफ सफेद पॅन्ट घालून बसलेत. मी त्यांच्या जवळ जातोय, व भाऊ स्वतःच्या जीभेवरती भस्म चोळतायत असे मला रोज दिसत होते. त्यावेळी भाऊ मुंबईला होते. नंतर मला ते दृश्य सारखे दिसू लागले. दिवसातून चार-पाच वेळा. वाटले भाऊंना फोन करुन सांगूया. पण हिम्मत नाही झाली. नंतर सात आठ दिवसांनी भाऊ गाणगापुरला आले. मी ठरवले आता भाऊंना विचारायचे, पण दिवस कामात गेला. रोज रात्री जेवून झाल्यावरती भाऊंचे पाय चोळताना वेगवेगळे विषय सांगायचे. त्यावेळी थोडे वेगळे विषय झाल्यावर भाऊंनी माझ्याकडे बघितले व म्हटले, संगमरोडकडे जाणारा जो नाला आहे, (माझे कान टवकारले) त्या नाल्यावरती दत्त महाराजांनी स्वतः माझ्या जीभेवरती भस्म चोळले. मी थक्क झालो. भाऊंना काही न विचारता त्यांनी माझे उत्तर देऊन टाकले. असे खूप जणांच्या प्रश्नांची उत्तरे भाऊ प्रवचनातून देऊन टाकत.

असो, असे बरेच सोनेरी दिवस भाऊंबरोबर घालवले आहेत. त्यातील अगदी अल्प असे किस्से मी मांडले आहेत. स्वतः सर्व श्रेष्ठ असून, आमच्या सर्व चुका पोटात घालून, आमची लायकी नसतानाही त्यांनी आम्हांला निर्मळपणे घडवण्याचा प्रयत्न केला. माणसांची मने बदलणे हे सर्वात मोठे कठीण काम आणि भाऊंनी तर आमची मने परिवर्तित केली, म्हणून आजही त्यांनी शिकवलेली कामे, सेवा अजूनहि सुरु आहे. त्यात त्यांची न दिसणारी मेहनत व कष्ट आहेत. पण त्यांनी कधी चेहऱ्यावरती व वागण्यातून ती जाणवू दिली नाहीत.

भाऊ हे गहन आहेत. आपण जस जसा त्यांचा अभ्यास करु लागतो तेव्हा ते आपल्याला थोडे थोडे उलगडू लागतात. जसे भगवान श्रीकृष्ण पूर्ण स्वरुपात कोणालाच पकडता आले नाहीत, त्याचप्रमाणे भाऊ हे अथांग सागर आहेत. त्यांच्या पोटात बरीच गुपितं लपलेली आहेत. आपण थोडं थोडं त्यांचा अभ्यास करु व त्यांना समजण्याचा प्रयत्न करु!

- श्री. विकास टाकेकर
(काळाचौकी - मुंबई)

# गाणगापुरातील सुवर्ण दिवस

मागील जन्माच्या पुण्याईने सद्‌गुरु भेट होत असते, असं म्हणतात. मला वयाच्या १२ वर्षीच सद्‌गुरुंची भेट झाली. त्या वयात सद्‌गुरु, गुरु हे शब्दच फक्त माहित होते, पण अर्थ कळत नव्हता. अशा वयात अकस्मिक रित्या गुरुंची भेट झाली. साल होतं १९८८. आमच्या बाजूला राहणारे कै. श्री. बाबा तावडे (मोठे बंधूच म्हणा). यांनी आम्हांला चिंचपोकळी द. वि. सा. गणेशोत्सव मंडळात अर्थवशीर्ष शिकवणारआहेत असं सांगितले. आम्ही बरेच जण शिकायला गेलो. बाबाने भाऊंबद्दल थोडेफार सांगितलं होतं. मनामध्ये भगवे कपडे, माळा, दाडी असे रुप होते. परंतु प्रत्यक्षात फक्त सदरा लेंगा घातलेले भाऊ पाहिले व धक्काच बसला. असे पण गुरु असतात? अशा पध्दतीने भाऊंची भेट झाली. पण पुढे वाटले नव्हते की आयुष्यभर याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून पुढे चालायाचे आहे. इथूनच गोकूळचा प्रवास सुरु झाला. भाऊ आमचे श्रीकृष्ण व आम्ही त्यांचे गोप-गोपी. श्रीगुरुगीता सौ. दिपाली काकूंनी शिकविली व एक दिवस स्वतः भाऊंनीपण शिकविली. आज त्या घटनेचे अप्रूप वाटते. आमच्या नेकजात मराठा सदन चाळीतील मुले दर गुरुवारी आरतीला लालमैदानात जाऊ लागली. दर गुरुवारी भाऊंचे प्रवचन कानावर पडू लागले. पुढच्या गुरुवारी ओढ लागायची. आज भाऊ काय सांगणार? नविन अद्‌भूत काय ऐकायला मिळणार?त्यांच्या शब्दात जादू होती. श्रोते देहभान हरपून भाऊंचे बोलणे ऐकत बसायचे. बोलता बोलता भाऊ गाणगापुरबद्दल बोलायचे.

तसा माझा स्वभाव आस्तिक व नास्तिक यांचे विचित्र मिश्रण. माझे बाबा मला नेहमी शिरडीला घेऊन जायचे. मात्र परमार्थातील भंपक कर्मकांड मला मान्य नव्हतं तेव्हाहि आणि आजहि. माझ्या मनात खूप प्रश्न होते आणि त्याची उत्तरे मला भाऊंच्या प्रवचनात मिळू लागली. १९८९ सालच्या मे महिन्यात श्री. सदरे यांच्या घरात श्रीगुरुचरित्र ग्रंथाचे पारायण भाऊनी आयोजित केले. मी सुध्दा ठरवलं की पारायण करायचे. बऱ्याच जुन्या जाणत्यांनी भिती घातली की खूप कडक पाळावं लागतं म्हणून. मीहि जिद्दीला पेटलो. शेवटी न कळणारा ग्रंथ एकदाचा वाचून झाला. त्यातलं 'ओ' का 'ठो' कळालं नाही. पण समाप्तीच्या दिवशी भाऊंची प्रत्यक्ष भेट झाली. कोणीतरी त्यांना सांगितले की या लहान मुलानेसुध्दा पारायण केले. वयाच्या १२व्या वर्षी श्रीगुरुचरित्र पारायण करणारा त्या काळात बहुधा मी एकटाच असेन. समाप्तीच्या जेवणाची तयारी चालू होती. भाऊंना गवार आवडते म्हणून गवारीची भाजी करणार होते. योगायोग म्हणजे मी आणि भाऊ गवार मोडत होतो. आज हे कोणाल खरं वाटणार नाही. भाऊ गवार मोडता मोडता काही विषय काढून माझ्याशी काही ना काही बोलत होते. गवार मोडून झाल्यावर मी तिथेच बसून होतो. भाऊ माझ्याकडे एकटक शुन्यात नजर असल्यासारखे पहात होते. ते माझ्याकडे पहात होते आणि नाही पण. मला नक्की सांगता येणार नाही. काही वर्षांनी मला त्याचा अर्थ कळला. ते माझे मागचे पुढचे जन्म पहात होते. काही वेळाने ते उठले आणि माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, 'बाळा, यावर्षी दिवाळीला गाणगापूरला यायचं आहे. आई-बाबांनी पैसे नाही दिले तर मला सांग, मी तुला नेईन,पण यायचं आहे. मी तुला घडवणार!' आज या घटनेला ३० वर्षे झाली तरी काल घडल्यासारखे वाटते. त्या शब्दांनंतर मी माझे सर्वस्व भाऊंच्या चरणी समर्पित केले. पुढील आयुष्य म्हणजे फक्त भाऊ म्हणजे भाऊ. १९८९ सालापासून गाणगापुरची वारी सुरु झाली.

१९९० साली आम्ही श्री पिंपळेश्वर दत्त मंदिरात आलो आणि एक नविन पर्व सुरु झाले. श्रीकृष्णाबरोबर जो आनंद गोकुळवासियांनी घेतला तो आनंद भाऊंनी आम्हांला दिला. असो. २/३ वर्षापूर्वी भाऊंनी दिपक भटजीकडून गाणगापूर मठासाठी जमीन विकत घेतली होती. आपला स्वतःचा भाऊंचा मठ उभा राहणार ही भावनाच आनंद देणारी होती. दिवाळीच्या अभ्यंगस्नानासाठी जमलेली सर्व मंडळी जमिन पाहून येत असे. गावापासून जमीन दूर असल्यामुळे मन खट्ट होत असे. तेव्हा आम्ही आश्रीत धर्मशाळेत उतरायचो. मंदिर अगदी ५ मिनिटावर. त्यामानाने आपली जमीन अंमळ दूरच होती. पण मठासाठी भाऊंनी ती जागा का निवडली हे खूप वर्षांनंतर कळाले.

गाणगापुरातील जमीन स्वतः दत्तमहाराजांनी भाऊंना दाखविली होती. शकुन पक्षानेहि हजेरी लावली होती. आणि १९९२ साल उजाडलं. भाऊंनी काम सुरु करण्यापूर्वी इमारतीच्या पायाचे खड्डे आपण स्वतः मारायचे असे ठरविले. सगळ्या तरुण मुलांची तिकिटे काढली गेली. आम्ही १५ मुले पिंपळेश्वर दत्त मंदिरात १९९० ते १९९७ या सहा वर्षात रहायला होतो. भाऊंनीच आम्हांला ठेवले होते. खड्डे मारण्यासाठी १५ दिवस गाणगापूरला राहण्याचं नियोजन भाऊंनी केले. गाणगापूरला गेल्यावर सकाळी ६ वाजता तेथे जायचो, सकाळी ९ वाजेपर्यंत काम करायचो. तसेच संध्याकाळी ४ ते ६ ही कामाची वेळ होती. अंदाजे एप्रिल मे महिन्यात आम्ही गेलो होतो. त्याकाळात गाणगापुरात तापमान ४५ अंश असायचे. उष्माघात कोणाला होऊ नये म्हणून भाऊंनी ठराविक वेळेतच काम करण्यास सांगितले. खड्डे मारताना एका मुलाला जिरापाणी देण्याचे कामे दिले होते. शरीर थंड रहावे म्हणून ही योजना होती. काम करुन आश्रितमध्ये आल्यावर ५/६ मोठी कलिंगडे कापली जायची. दिवसातून दोन वेळा भरपूर कलिंगड खायला दिलं जायचं. काळजी कशी घ्यावी ? व नियोजन कसे करावे ? हे भाऊंकडूनच शिकावे. यासाठी त्यांनी एवढा पैसा खर्च केला होता की दोन इमारतीच्या खड्ड्यांची बिदागी देता आली असती. पण गाणगापुरच्या मठाचे खड्डे आम्ही मारले याचा सार्थ अभिमान व आठवण रहावी म्हणून एवढा खटाटोप. आम्ही मारलेले खड्डे काही व्यवस्थित नव्हते. भाऊंनी ते कामगारांकडवी नीट करुन घेतले. अशा तऱ्हेने मठाचे काम सुरु झाले. त्या काळात भक्त मंडळी कमी असल्याने पैशाचा वणवा, ददात होती. पिंपळेश्वर दत्त मंदिरातील खर्च व गाणगापूर मठ उभारणी भाऊ एकाच वेळी करत होते. सर्व शिष्य भाऊंना वेळोवेळी आपापल्या परिने मदत करत होते. काही वेळेला काही शिष्यांनी आपले पूर्ण पगार भाऊंच्या चरणी वाहिले होते. भाऊंनी ते घेतले नाहीत हा वेगळा भाग.

आम्ही ३/४ जण गाणगापुरला जात असू. सिताराम नाना फक्त तिथेच राहायला होता. मी, राजा, नारायण आम्ही आळीपाळीने जात असायचो. ३/४ महिने जायचे, काम पूर्ण करायचे, पैसे संपले की पुन्हा मुंबईला परत यायचं असं चालायचं. भाऊंनी प्रत्येकी दर दिवस १०रु असे देऊन ठेवलेले असायचे. २/३ महिन्यांनी भाऊ जायचे व कामाची पाहणी करुन पुढील दिवसांचे पैसे देऊन यायचे. भाऊंचे पैसे जास्त खर्च होऊ नये म्हणून आम्ही एकवेळ माधुकरी मागून खायचो व एकवेळ जेवायचो. आश्रितमधील अम्मी हिच्या हातच्या भाकऱ्या खाऊनच आम्ही मोठे झालो असे म्हणालो तरी वावगं ठरणार नाही. त्या माऊलीचे उपकार आम्ही जन्मभर विसरणार नाही. सर्व सणांमधील पक्कवानांचा आनंद आम्हांला अम्मीमुळेच मिळाला. आजही आम्ही तिच्याकडे गेल्यावर भाकरी खाल्ल्याशिवाय ती पाठवत नाही.

हा कालखंड गाणगापुर मठाच्या विकासाचा कालखंड होता. पैसे वाचावेत म्हणून आम्ही मुले बरीच कामे करायचो. पुढील गेटच्या बाहेरील तसेच ॲनेक्स बिल्डिंगचा पाया, भाऊंच्या खोलीचा पाया आम्ही मुलांनीच घातला. आज त्याचा खरच अभिमान वाटतो. दिवसभर काम, पूर्ण अंग सिमेंट, मातीने माखलेले असायचे. संध्याकाळी ७ नंतर पापविनाशी तीर्थावर आंघोळीला जायचो. कारण मठात पाणी नसायचं. पिण्याचे पाणी शाळेकडे असलेल्या बोअरवरुन आणावे लागत असे. पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने खूप हाल सहन करावे लागले. १९९४ साली मठाचे अनावरण झाले आणि परिक्षेला सुरुवात झाली. तोपर्यंत आम्ही आश्रीतमध्ये राहायचो. तेथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्नच नव्हता. अनवारण झाल्यानंतर आम्ही मठात राहायला आलो. फक्त दिवाळीचा कार्यक्रम व्हायचा. दररोज भिंतीला पाणी मारावे लागत असे, त्यासाठी पाण्याची सोय समोरच्या गुरुदास मठाने भरुन काढली. त्या मठात कोणी नसल्याने आत पाण्याची टाकी व बोअरपण होता. रात्री ११ नंतर मठातल्या ग्रीलवर चढून पाईप लावला जायचा व तेथून आपल्या मठातल्या पाण्याच्य टाक्या भरल्या जायच्या. हा रोजचा कार्यक्रम. रात्री रस्त्यावर बसून रहावे लागायचे. रस्त्यावरुनच पाईप आपल्या मठात आलेला होता. त्याला १०० जॉइट. पाईप वरुन एखादी गाडी गेली की एखादा जॉइन्ट निघायचा. त्यासाठी आम्ही रस्त्यावर उभे राहून देखरेख करायचो. ते पण रात्री ३ वाजेपर्यंत. यात बऱ्याचदा लोक आम्हांला पाहून आपली गाडी रिर्टन न्यायचे कारण त्यांना आम्ही लुटारु वाटायचो! भाऊंचा प्रचंड विश्वास आमच्या मागे होता त्यामुळे भीती हा शब्द आम्हांला माहित नव्हता. एकदा गंमत झाली मी आणि कृष्णा दोघे रस्त्यावर बसलो होतो. एवढा वेळ काय करणार म्हणून भाऊंची बॅटरी घेऊन त्याच्या उजेडात चेस (बुद्धिबळ) खेळत होतो. १२.३० वाजता भाऊ रस्त्यावर आले. बॅटरीचा अपव्यय पाहून आम्हांवर खूप रागावले. कारण त्याकाळी बॅटरीचे मोठे सेलसुध्दा गाणगापुरात मिळत नसत. आम्ही निर्लज्ज गुरुसंनिधो! पण दुसऱ्या दिवशी त्यानाच कसंतरी वाटलं. रात्रभर मुले जागी असतात हे त्यांना माहित होतं. दुसऱ्या रात्री स्वतः भाऊ बॅटरी घेऊन आले. स्वतःचा खाऊ घेऊन आले. अशी आमची माऊली. त्यांच्या शिव्यांसाठी आम्ही आसुसलेलो असायचो. कारण त्यात वरवर शिव्या असल्यातरी त्यामागे असलेला मातृत्वाचा अखंड झरा आम्हांला दिसायचा. आम्ही अभिमानाने एकमेकांना सांगायचो की भाऊंनी मला किती शिव्या घातल्या. भाऊंचा खरा राग म्हणजे ते बोलणेच टाळायचे आणि ते भयंकर क्लेशकारक असायचं.

बरेच कामगार कामाला असायचे, आम्ही पण त्यांच्याबरोबर काम करायचो. म्हणजे एका बिगारीचे काम वाचतील. ही भावना आम्ही त्यांच्या बरोबरच जेवायचो. यांच्या डब्यातल खायचो. आमच्याकडून त्यांना काहीही वेगळी वागणूक मिळाली नाही. त्यांनाही खूप आमचं आश्चर्य वाटायचं. याचं कारण म्हणजे भाऊ माऊली. त्यांनी पिंपळेश्वर दत्त मंदिरात आम्हांला प्रत्येक गोष्टीचं शिक्षण दिले होते. सुतारकाम, गवंडी, लाईटची कामे इत्यादी! भाऊ प्रत्यक्ष किमयागार होते. त्यांनी वायरमेनला सुतार बनवले. सुताराला शिंपी, शिंप्याला पेंटर बनवले. जे काम ज्याला येत होते ते त्याला न सांगता दुसरेच काम सांगायचे व त्यात प्रविण करायचे. हे भाऊंच करु शकतात.

भाऊंनी मठातच नंदनवन फुलवले होते. कन्ट्रक्शन चालू असताना बागहि फुलवली जात होती. बागेसाठी लागणारे पाणी नदीवरुन आणावे लागायचं. ती एक वेगळी धम्माल होती. प्लास्टीकचे हंडे त्यावेळी बाजारात आले नव्हते. बादलीने पापविनाशी तीर्थावरुन पाणी आणावे लागत होते. मठात येईपर्यंत बादली अर्धी झालेली असायची.

माझ्याकडेच झाडांची जबाबदारी होती. मठातील बाग भाऊंनी खूप प्रेमाने फुलविली. निसर्ग कसा जपावा, निसर्गाशी कसं एकरुप व्हावं, झाडांशी कसं बोलावं, पेशी संचयनाचा प्रयोग भाऊंनी शिकवला व करुनही दाखवला. ते झाडाशी बोलायचे, कधी कधी रागवायचे सुध्दा. एक लिंबाचे झाड होते. भाऊंनी एकदा त्या झाडाला दम दिला की तुला लिंबू नाही लागले तर कापून टाकीन. आणि खरेच काही दिवसांनी त्याला लिंबू लागले. दरवर्षी नर्सरीतून विविध प्रकारची झाडे ते आणायला लावत व मठाच्या परिसरात लावली जायची. ह्यातील काही मरायचीसुध्दा! पण तरीही भाऊंनी झाडे आणण्याचे कमी नाही केले.

मठाची पहिली इमारत बॉक्स सारखी बांधली गेली. गाणगापूरातील लोक भाऊंना विचारायचे हा खोका का बांधला? असं विचारायचे. भाऊ काही उत्तर नाही द्यायचे. कारण ती तर सुरुवात होती. पुढच्या बाजूला एक रुम काढून मठाला किल्ल्यासारखी फसवा प्रवेश केला. बाहेरच्या बाजूला पूर्वी एक मोठा धबधबा नारायण, सिताराम व राजा राणे यांनी बनविला होता. कृत्रिम धबधबा, मूर्त्या, डेकोरेशन यांचे भाऊंना खूप आकर्षण होते. हे सर्व भाऊंनी बाहेरील लोकांकडून बनवून न घेता आम्हां मुलांकडूनच बनवून घेतले. आजही मठाच्या बाहेरील श्रीकृष्णाची गोवर्धनधारी मूर्ती गाणगापुरात प्रसिध्द आहे. रंगकामहि ते स्वतः उभे राहून आमच्याकडून करवून घेत. कोणता रंग कोठे मारावा हे सांगत असत. महिना-दिडमहिना रंगकाम चालत असे. दिवसभर अंगावर रंग असायचे. काही ठिकाणी लॅम्प लावून त्याची शोभा वाढवली. गच्चीवरुन खाली येणारा जिना हे सुध्दा भाऊंच्या कल्पनेतून साकार झालेले आहे. १९९६ साली आम्ही मुलांनी मठात आरती सुरु केली. भाऊंनी त्यावर आक्षेप घेतला नाही व पुढे नामघोष, भजन चालू केले. मठातील दत्त मंदिर हे आम्ही मुलांनीच बांधले आहे. पण पुढे कधीहि त्याची पुर्नबांधनी करायची नाही, असे भाऊंनी भर सभेत सांगितले होते. ते माझ्या मुलांनी बांधलेले आहे, त्यात काहीच बदल करायचा नाही. ही सगळी कामे आठवली तरच आज खरेच वाटत नाही. एवढी उर्जा आमच्यात आली कुठून? सगळी भाऊंचीच कृपा! त्याकाळात हिप्नोटाईज (संमोहित) झाल्यासारखे प्रत्येकजण काम करायचा. भाऊंचा शब्द कसाही करुन पूर्ण करायचा हे एकच वाक्य आम्हांला माहित होते ते म्हणजे 'गुरु वाक्य मज कामधेनू'!

गाणगापुरात किती दिवस राहायचे हे भाऊंच ठरवित असत. पण त्याबद्दल आमच्या कोणाच्या आई-वडिलांनी भाऊंना एका शब्दाने कधी काहीही विचारले नाही. एवढा प्रचंड विश्वास होता. कित्येकांनी परिक्षा बुडविल्या, नोकऱ्या सोडल्या, कॉलेज अर्धवट सोडले. आज त्या गोष्टीचा अभिमान वाटतो की भले आम्ही आमच्या मित्रांबरोबर करीअरमध्ये पुढे जाऊ नाही शकलो पण भाऊंबरोबर जो काही वर्षे सहवास लाभला, त्या सहवासाने जे काही शिकलो, जगलो, वावरलो, हसलो, खेळलो त्याची किंमत इतर कशा बरोबरहि होणार नाही. तो अमूल्य असा ठेवा, वारसा आम्हाला जीवनात लाभला.

असे हे श्रेष्ठ सद्‌गुरु लाभणे हे भाग्यच आहे. देवानाही अशा सद्‌गुरुंचा हेवा वाटला असेल.

- श्री. समीर चव्हाण
(काळाचौकी, मुंबई.)

# दत्त सेवेने मृत्युच्या जबड्यातून बाहेर आलो.

कल्याणचा राजा असे शब्द कानावर पडले की संपूर्ण कल्याणची सुभेदारी मिळाल्यासारखे वाटायचं कारण महाराजांकडून मिळालेली ती एक अमोल देणगीच होती! इतरांसाठी महाराज असले तरी आमच्यासाठी ते भाऊ आजोबाच होते. माझे 'भाऊ आजोबा'. गैरसमज करुन घेऊ नका. आजोबा म्हणजे म्हातारे बाबा नव्हे. वय त्यांनी सांगितलं नसतं तर समजणं कठीण होतं. आमच्यासाठी आजोबा म्हणजे घरातील सर्वात मोठी व्यक्ति ज्यांनी 'च' म्हटले की चमचा की चटई हे आमच्या पटकन लक्षात यायचं. आमचं नातचं मुळात असं होतं. त्यांचा सहवास आम्हांला बऱ्यापैकी लाभला. त्यासाठी माझ्या मामाचा (श्री. दयानंद सावंत) मी सदैव ऋणी राहिन.

त्याचे नियम आताहि कडकच होते. सकाळी लवकर उठायचो (काम असो वा नसो). सुट्टीच्या दिवशी बाबा तावड्यांकडे भाऊ पांढऱ्या कपड्यात यायचे. त्यांना बघून चाळीतील इतर काही लोक त्यांच्याकडे हजेरी लावायचे. तेव्हा तेथे काही गप्पा व्हायच्या. मला त्यांचे विषय काही कळायचे नाही. आणि मग सर्वजण त्यांना नमस्कार करायचे. मी पण शहाण्या बाळासारखा डोके टेकायचो. एकदोनदा मामाने त्याच्याबरोबर मला कुठेतरी आरतीला नेले होते. तिथे अप्पा पोयरेकरांच्या बाजूला भाऊ बसले होते. त्यांना आरतीत डुलताना पाहून फार गंमत वाटली. छान मस्त लयीत डुलायचे भाऊ. त्यानंतर आरतीला बसताना ते नजरेस पडतील असाच मी बसायचो. एकदोन महिन्याभरात त्यांनी पिंपळेश्वर दत्त मंदिराचा शोध लावला. मग आम्ही तिथे आरतीला जाऊ लागलो. तिथे मला भाईमामा, विजयकाका यांची ओळख झाली. माझ्या ओळखीप्रमाणे भाऊ, मम्मा, भाईमामा,आरती मामी, विजयकाका, दिपाकाकू, दयामामा, बाई (सुजाता तावडे), बाईची आई हे एका कुटुंबाप्रमाणेच वाटायचे. आणखी एका महिन्याने भाऊंनी पिंपळेश्वर मंदिराचा काया पालट करण्याचे सुरु केले. रविवारी ते महिपाल, राजा, भावोजा, अमित चव्हाण, गणेश शिंदे अशी निवडक मुले व काही मोठ्या मंडळींना घेऊन मंदिराचे बांधकाम सुधारण्यासाठी घेऊन जाऊ लागले. ते आमचे काँट्रॅक्टर व आम्ही त्यांचे बिगारी कामगार असं काम सुरु झालं. एका रविवारी मंदिरात माझी पँट चोरीला गेली; आता घरी परत जायचे वांदे तेव्हा भाऊंनी स्वतःची लुंगी मला दिली. नकळत का होईना भाऊंचे वस्त्र वापरणारा मी पहिला मुलगा होतो असे मला वाटते. असो.

काही दिवसांनी भाऊंनी मला गाणगापूरला नेले. मीहि तेथे कामात दंगून गेलो. देवदयेने कोणत्याही कामात थोडी जास्तच हुषारी असायची. भाऊंसारखे सद्‌गुरु बरोबर असल्यावर काय सांगावे ? त्यांनी अनेक प्रकारची अवघड कामे सहजरित्या माझ्याकडून करवून घेतली. मठाचे काम पूर्ण झाल्यावर अंतर्गत सुशोभिकरणहि करुन घेतले. तेथे त्यांना नवनविन कल्पना सुचायच्या. मग ते आम्हां मुलांसमोर बोलायचे. मुले लगेच भाऊ राजा ते मस्त करील म्हणून अगोदरच स्वतःचा बचाव करायचे. पण मी मात्र आनंदून जायचो. चला नविन काम करायला मिळते आहे. आणि मी माझे सर्व कसब पणाला लावून ते काम पूर्ण करायचो. मग त्या मठातील लाद्या लावायचे असेल, दत्तमंदिर बांधायचे असेल, रोषणाई करण्याचे असेल वा धबधबा बनविण्याचे! ही सारी कामे भाऊंनी माझ्याकरवी करवून घेतली.

वर रोषणाईचा उल्लेख आला, त्यावरुन तो जीवघेणा (म्हणजे जवळ जवळ मेलोच होतो) प्रसंग आठवला;

आपल्या मठाच्या डाव्या बाजूस मोकळी जागा होती. (आता तेथे एकछोटासा मठ बांधला गेला आहे.) तेथे एक छोटा रंगमंच आम्ही मुले उभारायचो. अर्थात त्यात मी आघाडीवर असायचो. या मंचावर भाऊ मुला-मुलींची नृत्य स्पर्धा आयोजित करायचे. प्रथम क्रमांक पटकवणाऱ्यास सोन्याची अंगठी बक्षिस म्हणून द्यायचे. अगदी पहिल्या वेळेस नृत्य स्पर्धा घेतली गेली तेव्हा मला आठवते धनश्री गोसावी (अगदी लहान होती, हिने प्रथम क्रमांक पटकवून सोन्याची अगंठी मिळविण्याचा पहिला मान मिळवला होता. त्यानंतर पुढच्या वर्षापासून अनेक वेळा उमा चव्हाण हिने सोन्याची अंगठी प्राप्त केली होती.

आम्ही मुले उत्तम प्रकारे तो रंगमंच बांधून तयार करायचो. त्याचे सुंदर सुशोभिकरण करायचो. त्याला दिव्यांची रोषणाईहि करायचो. भाऊंना ते फार आवडायचे. गाणगापुरात विजेचा तुटवडा असल्याने काही वेळा विज नसायची. मग मी माझी करामत करायचो. बाहेरच विजेचा खांब होता, त्यावर आकडा टाकून विज घ्यायचो. एकदा भाऊंना ते समजले होते, तेव्हा त्यांनी आम्हां मुलांना सोलटवून काढले होते. विशेषतः मला. त्यांना हे असले खोटे उद्योग अजिबात मान्य नसायचे.

त्या दिवाळीला आम्ही रंगमंच उभा केला आणि आता विजेचा पुरवठा हवा म्हणून मी आणि दोन चार मुले त्या विजेच्या खांबाजवळ आलो. नेहमीप्रमाणे लाकडी शिडी लावली व त्या खांब्यावर (झाडवर चढतात तसे) चढलो. तो खांब २५ फूट उंचीचा होता. तारेपर्यंत गेलो. एक वायर जोडली. दुसरी जोडायच्या अगोदर माझ्याकडे असलेले जुने टेस्टर लावले मात्र आणि मोठा विजेचा लोळ (४४० दाबाचा) माझ्या हातात येऊन छातीवर आदळला. लोखंडीच खांब तो आणि मी खाली फेकलो गेलो. माझा हात, तोंड व छाती जळली गेली.

बरे खाली पडलो तो बाभळीच्या झाडात. त्याचे मोठे काटे माझ्या पाटीत आणि नको त्या जागेत घुसले. इतर मुलांची बोबडी वळली होती. त्यांनी मला तेथून उचलले. माझ्या अंगातील काटे काढले. कोणीतरी म्हणाले, पाणी पाजा. तेवढ्यात माझा अंकुश मामा म्हणाला, त्याला पाणी पाजू नका. ते घशात अडकेल व नको ते होईल.

मला मुले तेथील दवाखान्यात घेऊन गेली. मीनाताईहि बरोबर होती. तेथील डॉक्टर म्हणाले, हा काही जगणार नाही, याला घेऊन जा. मग मला जीप करुन गुलबर्ग्याला नेले. तेथील दोन रुग्णालयातूनहि मला ॲडमिट करायला नकार दिला. तेथेहि तेच उत्तर मिळाले, हा जगणार नाही. उगाच आम्ही अडकले जाऊ.

मग तिसऱ्या एका हॉस्पीटलमध्ये मला घेऊन गेले, तोवर मी बराच शुध्दीवर आलो होतो. मी मीनाताईला म्हणालो, मला डॉक्टरकडे घेऊन चल मीच त्यांच्याशी बोलतो. तेवढ्यात एक डॉक्टर आले. मला पाहिले. मी त्यांना सांगितले, मी चांगला शुध्दीत आहे. फक्त आपण आपल्या तऱ्हेने उपचार करा. बाकी काही झालेच तर मी जबाबदार असेन. त्या डॉक्टरांनी मला लगेच ॲडमिट करुन घेऊन तात्काळ उपचार सुरु केले.

इकडे मठात भाऊ माऊली फार चिंतातूर झाली होती. त्यांनी दत्त मंदिराकडे (मठातील) जाऊन महाराजांना साकडे घातले, मला माझा मुलगा सुखरुप हवा. मी उद्या त्याच्यासाठी श्रीगुरुचरित्र पारायण करतो. त्यावेळी तेथे

काकाश्री आणि भाईमामा होते. त्यांनी दोघांनीही भाऊंना सांगितले, आम्हीहि तुमच्याबरोबर राजासाठी पारायण करतो. दुसऱ्या दिवशी तिघांनीहि श्रीगुरुचरित्र पारायण (संकल्पाने) केले.

दत्तमहाराजांची कृपा पहा दोन दिवसात माझा चेहरा, हात, छाती बरी झाली. मुले व मीनाताई हॉस्पीटलमध्ये होते. मी मीनाताईला म्हणालो, मला आता बरे वाटते आहे आणि मठातील कार्यक्रम पहायचे आहेत. तेव्हा डॉक्टरांशी बोलून डिस्चार्ज घे. तू त्याची जबाबदारी घे. मला काहीहि होणार नाही.

मीनाताई लगेच जाऊन डॉक्टरांना भेटली. पण डॉक्टर तयार होईनात. मीनाताई म्हणाली, मी त्याची जबाबदारी घेते, तुम्हांला कसलाहि त्रास होणार नाही. अखेर डॉक्टरांनी मला डिसाचार्ज दिला आणि मला मठात आणले गेले. भाऊंनी ॲनेक्स बिल्डिंगमधील एक खोली अगदी स्वच्छ करुन घेतली. तेथे कोणीहि मीना शिवाय जायचे नाही अशी सक्त ताकिद दिली होती. मीनाताई मला रोज आंघोळ घालायची.

असे तीन दिवस झाले आणि मी खडखडीत बरा झालो. या काळात भाऊ माझी खूप काळजी घेत होते. गम्मत पहा, गरबा नृत्य चालू झाले तेव्हा भाऊ मला ठेवलेल्या खोलीत आले आणि मला बाहेर घेऊन आले. एक ढोल माझ्याकडे दिला आणि वाजव म्हणाले.

मी लगेच ढोल वाजवायला सुरुवात केली. त्याबरोबर सर्वांनी जल्लोश केला.

बघा, रुग्णालयातले दोन दिवस व मठातील तीन दिवस, म्हणजे पाच दिवसात मी जळलेला प्राणी बरा झालो.

नंतर दोन-चार दिवसांनी भाऊंनी माझी खरडपट्टी काढली. म्हणाले, मुर्खा, महाराज सढळ हस्ते देत असतात. मग असले वाईट उद्योग करायची तुला गरजच काय होती. तुझा अपमृत्यु होता तो तुझ्या सेवेमुळे महाराजांनी दूर केला. पुन्हा असे काही करु नकोस.

केवढा हा भाऊंचा प्रेमळपणा! त्यात त्यांनी जे काही माझ्यासाठी केले होते त्याचा कोठेहि उल्लेख नव्हता. काळ टपला होता पण भाऊंनी त्याला माझ्याजवळ येऊ दिला नाही.

अशी कृपाळू आपली भाऊ माऊली!

आणखी काय लिहू!



- श्री. राजेश राणे
(कल्याण)

# दत्त सेवेतल्या मजेदार आठवणी.

दिवाळी जवळ येऊ लागली की ओढ लागते ती गाणगापुरची ! अष्टतीर्थ, गुरुचरित्र पारायण, देव मांडीवर घेणे, पालखी पूजा, मुख्य मंदिरामधील भजन, कुलदैवत अभिषेक अशा सर्व कार्यक्रमाने हि यात्रा संपन्न होत असते. ह्या सर्वांची आठवण होत असताना सन २५-३० वर्षे मागे भूतकाळात जाते. पूर्वी भाऊ आम्हांला गाणगापूरला घेऊन जात होते. तेव्हा आमची व्यवस्था श्री मधूकर भटजींच्या आश्रीथ धर्मशाळेत करत असत. सध्या आपल्या मठ जिथे डौलाने उभा आहे ती जागा भाऊ महाराजांनी दिवाळीमध्ये आपल्या सोबत आलेल्या काही ठरावीक शिष्यांकडून पैसे जमवून घेतली होती. मठ उभारण्याचे निश्चित झाल्यानंतर भाऊ महाराजांनी त्यांच्या काही शिष्यांना वैयक्तिक मोठ्या प्रमाणात देणगी द्यावयाची इच्छा प्रकट केली होती. पण भाऊंना तसे करायचे नव्हते. त्यांनी आपल्या सर्व शिष्यांना आवाहन केले होते प्रत्येकाने फुल ना फुलाची पाकळी आपल्याला जमेल तसी मदत करावी. ज्यांना आर्थिक मदत करता येत नसेल त्यांनी वेळ देऊन तेथील कामामध्ये हातभार लावावा. ह्या गटामध्ये आम्ही सर्व मुले मोडत असल्यामुळे (हो मुले कारण आम्ही सर्व त्यावेळी १५ ते २० वर्षांचे होतो) अमित चव्हाण, समीर चव्हाण, अमित म्हात्रे, सिताराम (नाना) राणे, अंकुश सावंत, देवेंद्र भाबल, नारायण कोळी, कृष्णा कोळी, सुनिल गायकवाड, विजय पेडणेकर (पेमा), राजेश राणे, विनायक मेस्त्री, गणेश शिंदे, ज्ञानेश्वर घाडगे, अशी बरीच मोठी नावांची यादी आहे. आम्हांला मठाच्या पाया भरणीसाठी भाऊ गाणगापुरला घेऊन गेले.

तेथील एक मजेशीर किस्सा असा की; पाया उभारणीसाठी खड्डे खणत असताना सुनिल गायकवाड याने फावडे स्वतःच्या पायावर मारुन घेतले. पाय रक्तबंबाळ! स्वतःचे रक्त पाहून सुनिलला भोवळ आली. हळूहळू टप्पा-टप्पयाने काम होत होतं. मठाची वास्तू उभी राहिली. वास्तुचे उद्घाटन दिवाळीमध्य करण्याचे भाऊंनी ठरविले. ह्यावर्षी दिवाळी मध्ये मठाला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. तेलाचा 'उपडा डबा' असे भाऊ गमतीने म्हणत असत. पण त्याचे रुपांतर कालातरांने भाऊंनी राजवाड्यासारखे केले.

झाडांवर भाऊंना अतिशय प्रेम होते. विविध प्रकारच्या झाडांची ओळख व नावे त्यांना माहिती होती. गाणगापुरच्या जमिनीमध्ये जिथे फक्त बाभळीची काटेरी झाडे जगताता, तिथे मठामध्ये भाऊंनी विविध प्रकारची शोभेची फुल झाडे, फळ झाडे लावली व जगवली (हा त्यांच्या स्वतःच्या साधनेचा भाग आहे.). आजही आपण मठामध्ये अशी विविध फुल झाडे व फळ झाडे डौलाने उभी असलेली पाहतो आहोत.

एक मजेशीर किस्सा; मठामध्ये लागणारे सामान तेव्हा गुलबर्ग्याला जावे लागत असे. एकदा नारायण कोळीला भाऊंनी इतर सामानांसोबत काही शोभेची फुलझाडे आणण्यास सांगितली. त्याने आणलेल्या झाडांच्या रोपट्यांमध्ये एक झाड भाऊंना वेगळे वाटले. त्या झाडांबद्दल भाऊंना माहित नव्हते. पण नारायणने सांगितले की ते एक शोभेचे झाड आहे. इतर झाडांप्रमाणे तेही वाढत होते. पण त्याची शोभा काही भाऊंना दिसत नव्हती. ते नुसते वाढतच होते. त्या झाडाच्या रोपट्याचे रुपांतर नंतर एका मोठ्या वृक्षामध्ये झाले. शेवटी भाऊंनी त्या झाडाचे नामाकरण 'नारायण वृक्ष' करुन त्यावर तशी पाटी सुध्दा लावली होती. मठात गेल्यावर सर्वजण खास तो वृक्ष बघण्यास जात असत. आता ते झाड तेथे नाही आहे.

सुरुवातीला मठात पिण्याचे पाणी हे भागीरथी कुंडातून आणावे लागत असे. आम्ही तेथे राहणारे आंघोळीसाठी व कपडे धुण्यासाठी पापविनाशी तीर्थावर जात होतो. येताना प्रत्येकाने एक-दोन पाण्याच्या बादल्या घेऊन यायचा असा नित्यक्रम होता. अशा परिस्थिती मी व समीर चव्हाण एकदा मठामध्ये कपडे धूत असताना भाऊंच्या निर्दशनास आले. भाऊ समोर येताच आम्ही दोघांनी धूम ठोकत पापविनाशी तीर्थ गाठले.

भाऊंनी घातलेले साकडे दत्त महाराजांनी ऐकले व मठामध्ये पाण्याची स्तोत्र सापडले. तो दिवस सर्वांसाठी खूपच आनंदाचा होता. स्वत: भाऊ देखील खूपच आनंदीत होते. पाठी साठवून ठेवण्यासाठी मठामध्ये पाण्याच्या मोठ्या टाक्या बांधण्यात आल्या. वर्षांतून एकदातरी त्या साफ करण्याचा नित्यक्रम होता. मजेशिर किस्सा; एकदा टाक्या साफ करत असताना दयामामा त्याच्या सवयीप्रमाणे आम्हांला सल्ले देत होता. प्रसंगी भांडत होता. आम्हांला त्याची सवय होती. तो जरी आमच्यावर ओरडत असला तरी, आमच्या सर्वांचा तो लाडका मामा आहे. राजा व माझ्यामुळे दयामामा व भाईमामा हे सर्वांचे मामा झाले! (कारण हे दोघे माझे व राजेश राणेचे सख्खे मामा असल्यामुळे आम्ही दोघेहि त्यांना मामा म्हणूनच हाक मारायचो. पुढे सर्व मुले आणि इतरहि त्यांना त्या नावाने बोलू लागले.) दयामामांची टाक्या साफ करतानाची लगबग बघून भाऊंनी दयामामालाच टाकीच्या आतमध्ये उतरवून टाकी साफ करायला सांगितले.

रंगकाम हे माझे आवडते काम. गणेश शिंदे पोलिस ट्रेनिंगला गेल्यानंतर ही जबाबदारी भाऊंनी माझ्यावर सोपविली. एकदा एका भिंतीलादोन वेळा रंग मारुन देखील माझे समाधान होत नव्हते. भाऊंनी माझ्या मनामधील ही घालमेल ओळखली. कारण भाऊ प्रत्येक कामावर स्वत: लक्ष ठेवून असत. भाऊंनी रंग उत्तम लागला आहे भिंतीला असे सांगूनही मी समाधानी नाही हे समजल्यावर भाऊंनी दयामामाला बोलावून घेतले व त्याला सांगितले ह्या भिंतीला बबने तीन वेळा रंग मारला आहे, हा रंग कसा दिसतो. दयामामाने सांगितले की रंग उत्तम मारला आहे. तेव्हा भाऊ माझ्याकडे बघून स्मित हास्य करुन तेथून निघून गेले. प्रत्यक्ष सद्गुरुंची अशी कामाची पोच पावती मिळाल्यावर आम्ही दुप्पट उत्साहाने पुढील कामाला सुरुवात करत असू. आम्ही भाऊंनी नेमून दिलेली कामे करत असताना त्यांचे नाम घेत काम केले असता, ती कामे अगदी लिलया पार पडत असत.

मजेशीर किस्सा; एकदा गुलबर्ग्याला सामान आणण्यासाठी गेलेल्या कृष्णा कोळीला फक्त २ रु किलो दराने टोमॅटो मिळाल्यामुळे त्याने अख्खी गोणी भरुन टोमॅटो आणले, भाऊंनी सक्त ताकिद दिली की एकही टोमॅटो खराब झाला म्हणून टाकायचा नाही. मग काय आठवडाभर मठामध्ये रोज जेवणामध्ये दुपारी-रात्री टोमॅटोची भाजी आणी टोमॅटोचे सार.

एखाद्याने चांगले काम केले की आपण त्याचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करतो. आम्हां मुलांमध्ये देखील वरीलप्रमाणे कृष्णासारखे काम करणाऱ्यांचा सत्कार होत असे. पण शाली ऐवजी आम्ही चादर वापरत असू. आणि तेही द्वारकामाईमध्ये (सध्याची ६ नं रुम). चादर टाकू त्याचे फळ त्याला देत असू. तिथे राहणाऱ्या सर्व मुलांच्या वाटेला हा सत्कार आला आहे.

द्वारकामाई ही मठामध्ये अगदी बरोबर भाऊंच्या आराम करायच्या रुमच्या समोरची रुम. जिथे भाऊंनी आम्हां सर्व मुलांना रहायला सांगितले. रात्री उशीरापर्यंत जागून धिंगाणा घालण, मस्ती करणे, म्हणून आम्हांला ही पनिशमेंट होती. म्हणून आम्ही त्या रुमचे नाव द्वारकामाई असे ठेवले.

मठामध्ये राहून भाऊंनी आमच्याकडून फक्त कामच करुन घेतले नाही तर त्यांनी आमच्या खेळासाठी कॅरम घेतला होता. आम्ही सर्व जण कॅरम खेळायचो. गावातील भटांच्या मुलांशी ओळख झालेली होती, त्यामुळे ते देखील आमच्यासोबत कॅरम खेळायला मठामध्ये येत असत. ते ही आमचे मित्र बनले होते. गाणगापूरला गेल्यावर मंदिरामध्ये समोर दिसल्यावर आजही आमची गळा भेट होते.

संध्याकाळी आम्ही मठाच्या बाहेरील मोकळ्या जागेत क्रिकेट खेळायचो. कधी कधी भाऊ स्वतः तेथे येऊन आमचा खेळ बघत असत. स्वतः सद्‌गुरु आपला खेळ बघण्यासाठी आले आहेत म्हटल्यावर प्रत्येक जण आपला उत्कृष्ट खेळ दाखविण्याचा प्रयत्न करीत असत. खेळ म्हटल्यावर चिडाचिड,वाद इत्यादी गोष्टी आल्याच.

असेच एकदा खेळत असताना समीर चव्हाण व प्रकाश टुकरुलचे भांडण झाले. भाऊंच्या कानावर ही गोष्ट गेली. पण खेळ संपल्यावर थोड्यावेळाने भाऊंनी पाहिले तर समीर व प्रकाश एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून बसले होते. भाऊंना खूप आनंद झाला. त्यांनी सर्वांना हे दृश्य दाखविले.

गाणगापुरच्या मठाला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. गाणगापुर नंतर वाशिंद दहागांव येथील मठ, नरसोबावाडीचा मठ, कुडाळचा मठ निर्माण झाले.

ह्या निमित्ताने आपण सर्वांनी संकल्प करुया 'भाऊंनी नेमून दिलेली कामे नेमाने करुया त्या खंड पडू देऊ नये.' त्यांच्या स्वप्न पूर्ततेतील इतर कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ठ ठेऊया व त्यासाठी सर्व शिष्य परिवाराने प्रयत्न करुया!

अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त । सद्‌गुरु श्रीभाऊ महाराज की जय! भालचंद्र महाराज की जय!

श्री. बबन वारंग
(विरार)

# सद्गुरु सेवाव्रत.

आम्ही चार बहिणी आणि एक भाऊ! वडिलांच्या निधना नंतर माझी आई भाऊंच्या सान्निध्यात आली. आम्हांलाहि घेऊन जाऊ लागली. माझा तितकासा विश्वास नव्हता. पण भाऊंकडे गेल्यामुळे घरातील बदल जाणवत होते. एक दिवस भाऊंनी माझ्या आईला विचारले, 'रेखा तू गाणगापुरला राहशील का?' पण आम्ही सर्व लहान आणि मयू तर अवघ्या ५ ते ६ वर्षांचा त्यामुळे आईने नाही असे सांगितले. मग भाऊंनी त्यांचा मोर्चा माझ्याकडे वळविला, त्यांनी मला विचारले, 'शिल्पा तू गाणगापुरला राहशील का? तुमच्या घरी खूप अडचणी आहेत, तुझी आई राहू शकत नाही, तुला रहावे लागेल'. मी 'हो' म्हणाले.

वय अवघे अठरा वर्षे होते. खरे तर अविश्वासाचे रिकामे भांडे घेऊन मी गाणगापुरला गेले होते पण भाऊंनी दिड ते दोन वर्षांच्या माझ्या गाणगापुरच्या वास्तव्यात आपल्या विश्वासाने, अनुभूतीने आणि प्रेमाने मला इतके काठोकाठ भरुन टाकले की ते आता कधी म्हणजे कधीच रिकामे होणे शक्य नाही. मुंबईला घरामध्ये जिचा दिवस १२ वाजता सुरु होणारी मी गाणगापुरला पहाटे ५ वाजता उठायची. भाऊंना चहा द्यायची. भाऊंना व तेथे राहणाऱ्या मुलांसाठी नास्ता व जेवण करायची. जेवणातलं काहीही येत नसताना. मुली आपल्या आईकडून जेवण कसं करायचे ते शिकतात, पण मी हे सगळे गाणगापुरला आवशी (द्रोपदी तावडे आई) आणि भाऊंकडून शिकले.

मी केलेले कच्चे-पक्के, अळणी पदार्थ भाऊ आवडीने खात. माझं कौतुक करीत. मला ते खूप आवडे. ते मला सांगत पदार्थ अजून चांगले झाले असते? मी भाऊंना गुरु म्हणून समजण्याच्या भानगडीत कधी पडलेच नाही. माझ्यासाठी ते माझे वडिलच होते. मुलीचे आईचे घर म्हणजे तिचं माहेर असते पण माझे माहेर गाणगापुर!

एक दिवशी भाऊंनी माझे बारसे केले. त्यांनी माझे नाव ठेवले, 'च्यानू' ते मला च्यानु म्हणायला लागले. मासिक धर्म असला की आम्ही एम्.सी. रुममध्ये रहायचो. तरी ते सकाळी ५ वाजता बाहेरच्या गेटवर येऊन मला हाक मारायचे. च्यानू, च्यानू, मी त्यांच्या त्या प्रेमळ हाकेसाठी उठायचे,दरवाजा उघडायचे आणि 'ओ' द्यायचे. मग ते परत मठात जायचे. पण मला कळत नव्हते की त्यांनी हे माझे नाव च्यानू का ठेवले. एक दिवशी रात्री आम्ही सगळेजण त्यांच्या पायाचे मालिश करत असताना ते बोलले की हिच नाव मी च्यानू का ठेवले आहे तुम्हांला माहित आहे का? ती मला चहा विचारताना कशी बोलते बघा; 'भाऊ चा आणू' म्हणजे भाऊ चहा आणू का? आणि आम्ही सगळे हसायला लागलो.

थंडीचे दिवस होते. मी कृष्णा कोळीचे स्वेटर घातले होते. माझ्याकडे स्वेटर नव्हते. खूप थंडी होती. सकाळी भाऊंना चहा देण्यासाठी उठले. त्यांना चहा दिला तेव्हा त्यांनी मला विचारले तू स्वेटर कोणाचे घातलेस? मी बोलले कृष्णाचे! चहा झाल्यावर ते त्यांच्या खोलीमध्ये गेले व स्वतःचा स्वेटर घेऊन आले व माझ्या हातात दिला व म्हणाले, हे घे तुला! अशा छोट्या छोट्या गोष्टीची काळजी करणारी भाऊ माऊली कुठे भेटेल का? अश्या बऱ्याच आठवणी आहेत, ज्या लिहिणे शक्य नाही.

एके दिवशी भाऊंनी मला तीन दिवसांचे घोरकष्टोध्दरण स्तोत्राचे अनुष्ठान करायला सांगितले. हे अनुष्ठान

करताना घरातील अन्न घ्यायचे नाही, माधुकरी मागून (एक वेळ) भोजन करायचे. (गाणगापुरातील भाऊंचा हा अनुष्ठानाचा नियम होता) असे तीन दिवस अनुष्ठान पूर्ण झाले. त्या दिवशी मी गावात माधुकरी मागून आणली व आम्ही काहीजण जेवायला बसलो. जेवण झाले आणि एक माणूस तेथे आला आणि मला म्हणाला, मला खायला द्या. आम्ही नुकतेच जेवलो होतो, हातही तसेच होते ते त्याने पाहिले. मठातीलहि माधुकरी वाढून संपली होती.

त्या गृहस्थाने मला म्हटले, मला तुझ्याकडून दोन रुपये हवे आहेत, ते तू दे. तेव्हा नंदनदादा म्हणाला, शिल्पा पटकन हात धूवून त्यांना तुझ्याकडचे दोन रुपये दे. मी त्याप्रमाणे केले. त्याने आनंदाने माझ्याकडे पाहिले व तो चटकन निघूनहि गेला. म्हणजे महाराजांचा जो महिमा आहे, अतिथीरुपाने जाण्याचा त्याचा अनुभव घेतला.

आणखी एक गोष्ट मात्र आवर्जून सांगायची आहे ती अशी; एक दिवस सकाळीच भाऊ मला बागेत फिरायला घेऊन गेले. तेथे जाताच एक अतिशय सुंदर सुगंध आला, मी दीर्घ श्वास घेऊन तो घेतला. पण तो बागेतल्या कोणत्याही फुलाचा नव्हता. इतक्यात भाऊ म्हणाले, च्यानू तूला सुगंध जाणवला! मी हो म्हटले. पण हा कोणत्याही फुलाचा नाही.

भाऊ म्हणाले, आपल्याबरोबर कोणी फिरत आहे, त्यांचा हा सुगंध आहे. मी मनात घाबरले आणि पटकन भाऊंना विचारले, कोण आपल्याबरोबर फिरत आहे ? आणि हा कसला सुंगध ? भाऊ म्हणाले, बाळ, दत्त महाराज आपल्या मठात येऊन जातात, त्यांचाच हा सुगंध आहे. त्याला कस्तुरी सुगंध म्हणतात. हा सुगंध आपल्याला जाणवू लागला की समजावे, प्रभूंची स्वारी येऊन गेली.

मला खूप आनंद झाला, की स्वतः दत्तगुरु आमच्या सोबत बागेत फिरत होते. आता त्याची जाणीव होतें की भाऊंसोबत दत्तगुरु असायचे!

गाणगापुरला राहायल्यामुळे खूप काही शिकायला मिळाले. अगदी संडास साफ करण्यापासून ते लाद्या उचलणे, भिंतीना कलर करणे, बगीच्याला पाणी घालणे! वेळप्रसंगी भाऊ म्हणायचे हे ट्रेनिंग स्कुल आहे, इथे शिकलेला जगाच्या पाठीवर कुठेहि राहू शकतो. इथे आपल्याला कसे बोलायचे ? कसे वागायचे ? ते कळते. वेगवेगळ्या लोकांचे स्वभाव कळतात. कामे कशी आणि कोणत्या पद्धतीने केली पाहिजेत ते समजते. अर्थात सर्वात मोठे ट्रेनर म्हणजे भाऊ.

आमची साता जन्माची पुण्याई म्हणून सद्‌गुरु भाऊ महाराजांसोबत गाणगापुरसारख्या सिध्दभूमीत रहायचे भाग्य माझ्या पदरात पडले.

- कु. शिल्पा पेडणेकर (पुर्वीची)
सौ. जान्हवी जयवंत जाधव (आताची)
भाऊंची 'च्यानू'.
(डोंबिवली)

# जीवनातील सुवर्ण क्षण.

एका गुरुवारी काळाचौकी येथील अभ्युदयनगर हॉलमध्ये आरती चालू होती. त्यावेळी मी आणि सुनिल आचरेकर स्टॉलवर बसायचो. आरती चालू असताना भाऊ महाराज बाहेर आले आणि माझ्या खांद्यावर एक हात ठेवून म्हणाले, बाजूला (अमित चव्हाण उभा होता.) पुढच्या गुरुवारी तू आणि मी गाणगापुरला जायचे. अमितला म्हणाले जयवंतची आणि माझी गाणगापुरची ट्रेनची तिकिटे काढ.

मला इतका आनंद झाला की तो गगनात मावेना कारण, ते वर्ष होते १९९७ सालाचे. त्यावेळी बरीच मुले गाणगापुरला सेवा करण्यासाठी भाऊंसोबत किंवा भाऊ महाराज सांगायचे म्हणून रहायची अर्थातच सेवा करण्यासाठी आणि अशी सेवा मला कधी मिळणार म्हणून मी नेहमी विचार करायचो.

सद्‌गुरु भाऊ महाराज नेहमी प्रवचनात म्हणायचे की माझ्याकडे शिष्यांची खूप कठीण परिक्षा असते. प्रथमतः शिष्यत्व घेताना मी कसा आहे ते पूर्ण विचार करा, माझ्या विषयी पूर्ण माहिती घ्या व नंतरच शिष्यत्व घ्या. शिष्यत्व म्हणजे गुरु शिष्याचं एक वेगळ नातं असते आणि ते शेवट पर्यंत टिकवायचे असते. त्याच्यामध्ये अनेक प्रकारच्या परिक्षा गुरु घेतो आणि त्या परिक्षेत यशस्वी झाला तर तो टिकला आणि टिकला तो आयुष्यभर तरला.

त्यावेळी भाऊ महाराज एकदा म्हणाले होते की, माझी मुले मी गाणगापुरला सेवेसाठी ठेवतो, पण माझ्याकडे आल्यानंतर कमीत कमी तीन वर्ष तरी तो नियमीत माझ्या सान्निध्यात पाहिजे. म्हणजेच आरती, भजन, मंत्र, स्तोत्र पारायण हे झाले पाहिजे. आणि मी हे सर्व जमेल तसे करीत होतो. कारण केव्हातरी भाऊ मला गाणगापुरला सेवेसाठी घेऊन जातील ही तळमळ चालू होती.

आणि बरोबर हा सुवर्ण क्षण माझ्यासाठी तीन वर्षांनी माझ्या आयुष्यात आला.

त्यावेळी मला गाणगापुरला ठेवले ते वय २६-२७ म्हणजेच नोकरी धंदा करण्याचे पण माझे विचार वेगळेच होते. म्हणजे माझ्या घरी न पटणारे. गाणगापुरला मी आणि भाऊ महाराज आलो. त्यावेळी भाऊ काही एक बोलले नाही. म्हणजे मला गाणगापुरला ठेवीन नाही ठेवीन हे काहीही बोलले नाही.

गाणगापुरला दुसऱ्या दिवशी माऊली आपल्या सोबत सकाळी संगमावर घेऊन निघाले. त्यावेळी मंदार, योगेश मुळे, शिल्पा पेडणेकर माझ्याकडे बघून हसू लागले. संगमावरुन आल्यानंतर ते बोलायला लागले की जयवंत आता तुला भाऊ गाणगापुरला ठेवणार. कारण ज्यावेळी ज्याची वर्णी गाणगापुरला लागते, तेव्हा भाऊ असे त्याला खूष करतात.

आणि बरोबर तसेच झाले आणि आमचा मुक्काम गाणगापुरला नक्की झाला. कालावधी किती त्यावेळी माहित नव्हते.

गाणगापुरला त्यावेळी ॲनेक्स बिल्डिंगचे काम चालू होते. त्यावेळी त्या कामात दगड उचलणे, साफ सफाई, सिमेंट भरणे, पाणी मारणे अशी कामे होती. बांधकाम झाल्यावर कलर काम, बागकाम ही कामे होती. ज्यावेळी मी

आलो त्याअगोदर आवशी (तावडे आई), शिल्पा पेडणेकर, जयश्री पेडणेकर, बाबा म्हापसेकर, मंदार मुळे, योगेश मुळे, कृष्णा कोळी, ही सारी मुले होती. गाणगापुरातून भाऊ मुंबईला गेले आणि काकाश्री गाणगापुरला आले, त्यावेळी काकाश्रींनी कामातून (गोदरेज कंपनीतून) रिटायर्डमेन्ट घेतली होती.

त्यावेळी भाऊ किंवा काकाश्री कोणीही एक गाणगापुरला येत असत. आनंद या गोष्टीचा असायचा की खायला खूप घेऊन यायचे म्हणून! कारण आवशीच्या ताब्यात तेव्हा किचन होता. आणि प्रत्येक वस्तू मर्यादितच मिळायच्या.

गाणगापुरला नियमीत नामघोष, आरती, भजन आणि आठवड्यातून दोन-तीन गुरुचरित्र पारायण करायला मिळायची. दोनवर्षे नामघोषाला थोडी टाळाटाळ व्हायची. नियमीत बसायचे ते मंदार, योगेश,शिल्पा (जान्हवी) आणि तावडे आई. मला प्रामुख्याने गाणगापुरला म्हशी सांभाळणे (त्यावेळी मठात दोन म्हशी, एक गाय, दोन बैल, एक रेडकू होते) आणि संध्याकाळी कंदील लावणे. त्यावेळी लाईटचे खूप प्रॉब्लेम होते.

एकदा भाऊ गाणगापुरला आले. त्यावेळी मी म्हशी सांभाळायला गेलो होतो. संध्याकाळी मला पाहिले. माझा तो म्हशीकडून आल्यानंतरचा अवतार पाहून भाऊ बघतच राहिले. चिखलाने माखलेले ते कपडे कारण त्या म्हशी खूप लांब पळायच्या म्हणून त्यांना रस्सी बांधून घेऊन जायला-यायला लागायचे. भाऊंनी हे पाहिल्यावर काही महिन्यांनी कृष्णाला त्या म्हशी विकायला सांगितल्या.

गाणगापुरला आपली खूप जमिन होती. त्यावेळी आपण स्वतः शेती करायचो. तुर, ज्वारी, बाजरी त्यासाठी एक शेतकरी ठेवला होता. नाव दत्तू. त्याच्यासोबत आम्ही म्हणजे मी आणि मंदार अजूनही काही जण यायचे. पण मंदार, मी जास्त वेळ काम केले. तो दत्तू नेहमी बैलासाठी, म्हशींसाठी वैरण (कडबा) आणायला जायचा. तो खूप उशीर करायचा. एकदा मी आणि मंदार त्याची चांगलीच जिरवायची म्हणून त्याच्यासोबत गेलो.

तो म्हणाला की तुम्हाला जमणार नाही. पण आम्ही काही ऐकले नाही आणि त्याच्या सोबत जाऊन बैलगाडी अर्धा तासात भरली तो आमच्याकडे बघतच राहिला आणि हसत हसत म्हणाला, अरे बापरे! तुम्हांला येते की सगळे. अशी आम्ही त्याची गंमत केली.

भाऊंचा नेहमी पारमार्थिक गोष्टीत कर्मकांडावर जास्त विश्वास. त्यासाठीच भाऊ, मुलांना (त्यात काही मुलीही होत्या) ते सेवेत जास्त ठेवत. ते नेहमी म्हणायचे की हे तरुण भविष्यात चांगले घडले पाहिजे. त्यांना योग्य मार्गदर्शन केले तरी ते आपली जबाबदारी चांगली पार पाडणार.

एकदा तावडे आई कशावरुन तरी मुलांवर खूप रागावली. कारण भाऊ स्वतः तीची मस्करी करायचे आणि मुले तिला हसण्याचा आणि चिडवण्याचा आनंद घ्यायचे. त्यामुळे ती खूप चिडली. काहीही बोलायला लागली. त्यावेळी भाऊंनी मुलांची बाजू घेतली व आवशीला योग्य ती समज दिली.

ते मुलांना नेहमी म्हणायचे, तुम्ही कुठेही जा. सातासमुद्रा पलिकडे जा, तुम्ही कुठेही गेलात तरी मी तुम्हाला माझ्या चरणापाशी आणणारच! कारण मी तुमचा बाप आहे (पारमार्थिक). जन्मोनजन्मी मीच तुमचा गुरु आहे.

भाऊ मुलांच्या कीतीही चुका होवोत, कामात किंवा कोणत्याही गोष्टीत भाऊ योग्य पध्दतीने वेगळ्या पध्दतीने समजावयाचे. मुलांना नेहमी जवळ ठेवायचे.

रात्री जेवण झाल्यानंतर भाऊंच्या पायाचे मालिश करायला बसायचो. त्यावेळी होणाऱ्या गमंती-जमतीत न कळत साधनेचा भाग शिकवून जायचे. हे योग खूप दुर्मिळ होते. गाणगापुरला भाऊ नेहमी सांगायचे, काम करताना (सेवा) तुमचा घाम, त्या भूमीत पडला पाहिजे. म्हणून प्रत्येकाला दगड उचल, माती उचल, कलर काम, साफ सफाई इत्यादी मेहनतीची कामे देऊन, करुन घ्यायचे.

आम्ही असताना आणखी एक सेवा भाऊंनी चालू केली ती म्हणजे संगमावर रस्ता साफ-सफाई. म्हणजे रस्त्यावरील मानवी विष्टा साफ करणे. त्यावेळी आम्ही तुरीच्या झाडाचा झाडू व माती ओढायची फावडी घेऊन जायचो. साफ-सफाई करताना आम्ही मजा करायचो.

अशी सुंदर सेवा करायला मिळाली, या सद्‌गुरु रुपी देवाला माझे शतशः प्रणाम!

भाऊ महाराज की जय!

- श्री. जयवंत जाधव
(डोंबिवली)



# एका कोवळ्या मुलाची सद्गुरुसेवा.

गाणगापूरी सद्गुरु भालचंद्र महाराज उपासना मठ उभा राहिल्यानंतर, सीतारामचं तप बघून आणखी तरुण पुढे सरसावले. राजा राणे, अंकुश सावंत, नारायण कोळी, प्रकाश टुकरुल, देवेंद्र भाबल, समीर चव्हाण, योगेश मुळे, मंदार मुळे, मीना कोळी (टुकरुल), जयश्री गायकवाड, विनायक मेस्त्री इत्यादी मंडळी आपला जास्तीत जास्त वेळ म्हणजे किती, वर्ष दोन वर्षे आपल्या आई-वडिलांपासून, घरादारापासून दूर राहून भाऊ महाराजांनी सांगितलेली सेवा केली. भालचंद्र महाराज उपासना मठ सांभाळला, त्याची योग्य निगा राखली.

त्यात एक वयाने मोठी, अशा स्त्रीनेही आपल्या परीनं तेथे सेवा केली, ती म्हणजे द्रौपदी तावडे! (१२ वर्षे सेवाकरुन आता सध्या मुंबईत आहे). सर्व तरुण मंडळींनी आपली सेवा दत्तचरणी रुजू केली. प्रत्येकांना दत्तमहाराजांनी योग्य फळ प्रदान केलं.

या सर्व तरुणांमध्ये अगदी कोवळा मुलगा त्यावेळी गाणगापूरला येत असे. त्याने हे सर्व पाहिलं होतं. त्याच्याही मनामध्ये दत्तसेवेची, भाऊ माऊलींच्या कार्याची उर्मी आली. त्या कोवळ्या मुलानं आपली इच्छा भाऊ महाराजांकडे संगितली. त्यांना त्याचं कौतुक वाटलं. क्षणाचाही विचार न करता त्यांनी त्याला गाणगापूरला राहायला परवानगी दिली. हा कोवळा मुलगा दुसरा-तिसरा कोणी नसून तो कृष्णा कोळी होता.

आडनांव कोळी आणि जातीनंही कोळी. साहजिकच मासेमारी हा त्यांचा धंदा. त्यांचं संपूर्ण कुटुंब भाऊ महाराजांच्या चरणी लागलेलं. त्यात मोठा भाऊ नारायण, बहिण मीना या दोघांनीही गाणगापूरच्या भालचंद्र महाराज उपासना मठात राहून सेवा केलेली.

कृष्णाचाही पिंड तोच होता. कृष्णा गाणगापूरला राहू लागला. योग्य तऱ्हेने सर्व कामे करु लागला. भाऊ महाराजांच्या नवनवीन योजना राबवू लागला. त्यात यश प्राप्त करु लागला आणि त्यांना प्रिय झाला.

कृष्णाचं काम पाहून माऊली सुखावली. अगदी लहान पोरगा माझं दत्तसेवेचं काम सहजरित्या करतो आहे. कोणतीही तक्रार माझ्याकडे करत नाही. अभिमानानं माऊलींचा ऊर भरुन आला. जे जे काम कृष्णाला सांगावं ते कृष्णाने करुन दाखवावं.

भाऊ महाराजांना कृष्णाच्या सेवेने खूप आनंद व्हायचा.

= पुष्पांजळी =

गळा दाटून येई,
पाणी जेथे डोळी ठेविली
तेथेच समाधिवर आज
फुले वहाण्याची वेळ आली (१)

गुरूदेव जगी नाहीत
विश्वास बसत नाही
काळीज तिळ - तिळ तुटते
पोरके झालो आम्ही (२)

जीवावरचे दुखणे ज्या आले
तेथे यमास थांबविले
सद्गुरूंनी कितीकांचे
गंडांतर टळविले (३)

बापुडवाणे सगळे
पोरके जे आईविना
टाहो फोडितो आज
जीव माझा राहिना (४)

गुरुमाऊली आमुचे प्राण
सदा हसतमुख पाहिले
समाधि घेता आज
सगळेच संपून गेले (५)

भेट तयांची झाली
गत जन्मीचे सुकृत
डोई ठेवण्याचे भाग्य लाभले
अंतरले पाय जे दैवत (६)

(२)

संकटे येती नाना
भेटावे गुरूदेवांना
निवारण सर्वांचे करती
हीच आमुची भावना (७)

स्वतःवरील संकट
टाळता आले नाही
सर्व योग्यांचा अंत
येणेच परी का राही ? (८)

सोंगट्या सर्व आम्ही
काळाच्या सारीपटावर
सद्गुरूंचीच चाले
हुकमत त्याच्यावर (९)

सगळे मिळुनी आपण
प्रतिज्ञा एक करूया
सद्गुरूंनी दिले कार्य
सर्वांनी पुढे चालवूया (१०)

कित्येकांस ज्यांनी
माणूस बनविले
समाधीवर तयांच्या
हे पुष्पचक्र वाहिले (११)

सद्गुरूंच्या लोभ
जन्म जन्मांतरी लाभो
प्रार्थना ही तव पायी
हे विश्वात्मक विभो (१२)

डॉ. मधुसूदन प्रभू
भांडुप

## माझ्या गुरुची महती

माझ्या गुरुची महती
काय काय सांगू तुम्हा
घेता नाम त्यांचे मुखी
मती स्थिर होई तेव्हा..

दृष्टी समोर ती मूर्ती
नीलवर्ण कृष्णा परी
हसू ओठावर येता
फुले मथुरा नगरी...

साधी सहज राहणी
माझ्या भोळ्या विठ्ठलाची
शिष्य जमा होता भोवती
वारी वाटे पंढरीची...

हृदयी प्रेमाचा तो झरा
भरभरुन वाहतो
दु:खी शिष्यास पाहत
डोळ्यात अश्रू नाहतो....

माझ्या माऊलीची माया
तोड त्याची ना कुणाशी
शिष्यांच्या हाकेसाठी
होई जिवंत समाधी
होई जिवंत समाधी

## माझ्या सावळ्या विठ्ठला

किती साजरे रुप तुझे
माथी वसे शिवलिंग
एका हाती कमलपुष्पे
शंख दुजा हाती स्थिर ।।१।।

पाहण्यास रुप तुझे
निघाली पायी तीच दिंडी
सजले रत्न जडीत रथ
हृदयी नाम तेची ओठी ।।२।।

विसरले घर दार
लागला तुझाच एक ध्यास
डोई जड झाली तुळशी
थकले ना तरी पाय ।।३।।

आर्त हाक दिली तुला
स्वर आतून दाटला
देगा दर्शन मज तुझे
माझ्या सावळ्या विठ्ठला
माझ्या सावळ्या विठ्ठला

- सौ. जान्हवी समीर चव्हाण
(काळाचौकी)

# प. पु. सद्‌गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

## संस्थापित समाजोपयोगी संस्था

## सद्‌गुरु श्री भालचंद्र महाराज सेवाश्रम, मुंबई

कार्यालय : १०/७२३, म. हौ. बोर्ड, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुं. ३३. संपर्क : ९८१९२२०२०४

---

## सद्‌गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) रजि.

सद्‌गुरु भालचंद्र महाराज उपासना मठ,

देवल गाणगापूर, ता. अफजलपूर, जि. गुलबर्गा, कर्नाटक. संपर्क : 08470274374

---

## श्री भानुदास प्रतिष्ठान, नृसिंहवाडी - कोल्हापूर

(रजि. नं. एफ २२९६४)

नरसोबावाडी एस. टी. स्टॅन्ड जवळ, नरसोबावाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. संपर्क : ०२३२२२७०२००

---

## भाऊ महाराज उपासना ट्रस्ट (रजि.)- वाशिंद.

श्री दत्त मंदिर, देसलेपाडा, वाशिंद, दहागांव, ता. शहापूर, जि. ठाणे. दुरध्वनी : ९८६७७१७०७९

---

## श्री भानुदास सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

नोंदणी क्र.: एम.यु.एम./डब्ल्यु.ई./आर.एस.आर(सी.आर.)/१८२१ सन १९९९-२०००)

शॉप नं. ६, श्रीकृपा बिल्डिंग, रंगारी बदक चाळ, काळाचौकी, मुंबई - ४०००३३.

चिंचपोकळी (पुर्व), मुंबई - ४०० ०१२. दुरध्वनी : ८१०८८८६२६१

# प. पु. सद्‌गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

## संस्थापित समाजोपयोगी संस्था

## सद्‌गुरु श्री भाऊ महाराज सेवाश्रम धर्मदाय संस्था

पत्ताः मु. पो. नेरुर(भाक्राड), वाघोसे वाडी रोड, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

संपर्क : ९२७०४५८५१७

---

## श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संकुल - वाशिंद.

दहागांव, वाशिंद, ता. शहापूर, जि. ठाणे.

प्रदुषणमुक्त वातावरणात उत्कृष्ट घरकुलांसाठी अवश्य संपर्क साधावा.

दुरध्वनी : ८९७६२९२९६०

---

## श्रीभाऊ मेडिकल ॲन्ड ऐज्युकेशन ट्रस्ट

अमरदिप - सी विंग, डी. एल. मार्ग, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

संपर्क - ९८२०९८१६६५.

---

## श्रीदत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट

१७/बी, उदयश्री सोसायटी, माऊली निवास, भांडूप (पुर्व).

सद्‌गुरु श्री भाऊ महाराज शिष्य परिवारातर्फे तसेच

आमचे हितचिंतक, जाहिरातदार, देणगीदार, सेवेकरी

यापैकी दिवंगत झालेल्यांना

सद्‌गुरु श्री भालचंद्र महाराज सेवाश्रम, मुंबई

श्री भानुदास प्रतिष्ठान - नृसिंहवाडी, कोल्हापूर

सद्‌गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) - देवल गाणगापूर, कर्नाटक

भाऊ महाराज उपासना ट्रस्ट, दहागांव - वाशिंद

श्री भानुदास सहकारी पतपेढी मर्यादित - मुंबई

श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था, दहागांव - वाशिंद

सद्‌गुरु भाऊ महाराज सेवाश्रम धर्मादाय संस्था - कुडाळ

श्री भाऊ मेडीकल ॲन्ड एज्युकेशन ट्रस्ट - मुंबई

श्री दत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट - मुंबई

आणि गुरु महिमा परिवारातर्फे



# भावपूर्ण श्रध्दांजली




सद्गुरु श्री भाऊ महाराज

गुरु महिमा दिवाळी अंकास
प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष ज्या ज्या सर्वांचे
आम्हांस अनमोल सहकार्य लाभले,
त्या सर्वांचे गुरु महिमा परिवार आणि
सद्गुरु श्री भाऊ महाराज संस्थापित सर्व संस्थांतर्फे

# हार्दिक आभार



हि दिवाळी आपण सर्वांना सुख-शांती
आणि समृध्दीची जावो, हिच सद्गुरुचरणी प्रार्थना